श्रीमन् महाभारत

(मराठी भाषांतर)

आदिपर्व – (१ ले पर्व) – भाग १

अध्याय १ ते ६४

श्रीमन्महाभारत

या ग्रंथाचें

मराठी सुरस भाषांतर.

पुस्तक पहिलें.

आदिपर्व आणि सभापर्व.

हा ग्रंथ

आप्पाशास्त्री राशिवडेकर विद्यावाचस्पति, प्रो. चिंतामण गंगाधर भानु,
रा. रा. रामचंद्र भिकाजी दातार, आणि कृ. ना. आठल्ये, एडिटर केरळकोकिळ,
यांनीं लिहिला

आणि

बाळकृष्णशास्त्री उपासनी,

व

वासुदेवशास्त्री अभ्यंकर,

यांनीं तपासला;

तो

गणेश विष्णु चिपळूणकर आणि मंडळी,

यांनीं

पुणें एथें

इंदिरा छापखान्यांत छापून प्रसिद्ध केला.

शके १८२६.

क्रोधीनाम संवत्सरे

प्रकाशकांचे दोन शब्द.

पूर्वी प्रसिद्ध केल्याप्रमाणें 'श्रीमन्महाभारताचें मराठी सुरस भाषांतर' या ग्रंथाचा पहिला भाग ईश्वरकृपेनें आज तयार झाला आहे. यांत महाभारताच्या अठरा पर्वांपैकीं आदिपर्व व सभापर्व या दोहोंचें भाषांतर आलें असून, या एकंदर ग्रंथाच्या परिशीलनापासून कोणकोणत्या गोष्टींचें ज्ञान प्राप्त होईल त्याचें दिग्दर्शन करणारा उपोद्घात दिला आहे. शिवाय 'भारतलेखन' 'भीष्मजन्म' 'बकवध' 'द्रौपदीला कुंतीचा आशीर्वाद' 'सुभद्राहरण' व 'द्रौपदीवस्त्रहरण' हीं सहा सुंदर चित्रें यांत घातलीं आहेत. हीं चित्रें येथें नुकत्याच स्थापन झालेल्या "डेक्कन प्रिंटिंग वर्कस् कंपनी"च्या प्रेसमध्यें छापविलीं आहेत. या भागांत आठ चित्रें येतील म्हणून आम्हीं पूर्वीं प्रसिद्ध केलें होतें. परंतु पुढील भागांत चित्रें देण्यासारखीं विशेष स्थळें फार असल्यामुळें यांत दोन चित्रें कमी केलीं आहेत. तरी एकंदर ग्रंथांत पासष्ट चित्रें यावयाचीं तीं येतीलच.

हा ग्रंथ अतिशय मोठा असल्यामुळें, याच्या प्रकाशनाच्या कामास हात घालणें म्हणजे एक मोठें धाडसाचेंच काम होय. परंतु असे महत्त्वाचे ग्रंथ सद्यःकालीं प्रसिद्ध होण्याची आवश्यकता जाणून, मोठमोठे विद्वान गृहस्थ आम्हांस साहाय्य करण्यास तयार झाले: मराठी भाषेचे पूर्ण ज्ञाते अशा कित्येक विद्वान लोकांनीं भाषांतर वेळेवर करून देण्याचें कबूल केलें; वेदशास्त्रसंपन्न बाळकृष्णशास्त्री उपासनी आणि वासुदेवशास्त्री अभ्यंकर यांनीं तें तपासण्याचें काम आपल्या शिरावर घेतलें; प्रसिद्ध कादंबरीकार रा. रा. हरि नारायण आपटे यांनीं उपोद्घात आणि सुमारें ५०० पृष्ठांचा उपसंहार लिहिण्याचें काम अंगावर घेतलें; आणि या ग्रंथास अतिशय पूर्णता आणणारा आणि अत्यंत मेहनतीचा असा भारतीय काळचा हिंदुस्थानचा नकाशा रा. रा. महादेव नारायण ऊर्फ भाऊसाहेब दोसर बी. ए. एलएल्. बी. यांनीं देण्याचें कबूल केलें. हें काम अतिशय खर्चाचें व फार परिश्रमांचें आहे, तरी भारतसंग्रहेच्छु जनांच्या सुकृतानेंच तो आम्हांस मिळाला; म्हणून, जरी आम्हीं पूर्वीं प्रसिद्ध केलेल्या किमतींत हा देण्याचें प्रसिद्ध केलें नाहीं, तरी तो तसाच देण्याचें ठरविलें आहे. भाषांतरकारांचीं नांवें प्रत्येक भागाच्या वेळीं त्याच्या मुखपृष्ठावर प्रसिद्ध होतील. आतां, अशा कामांत मुख्यत्वेंकरून लागणारें जें द्रव्य, त्याचें साहाय्य आमचे परममित्र व निःसीम हितचिंतक श्रीमंत रा. काशिनाथ विनायक बावडेकर, श्रीमंत रा. नारायण रघुनाथ टिळक, आणि वेदशास्त्रसंपन्न श्रीधरशास्त्री भोरकर, राजवैद्य, यांनीं अशा आणीबाणीच्याही प्रसंगीं मोठ्या औदार्यानें केलें, ही गोष्ट खरोखरच चिरस्मरणीय व अभिनंदनीय होय यांत शंका नाहीं. खेरीज, हा ग्रंथ छापून तो योग्य वेळीं प्रसिद्ध करण्याविषयीं, केवळ आमच्याचप्रमाणें कळकळ बाळगून झटणारे रा. रा. रघुनाथ गंगाधर गद्रे, आणि इंदिरा प्रेसचे मालक रा. रा. त्र्यंबक हरि आवटे हे दोघे शरीरसंरक्षण करणाऱ्या उजव्या आणि डाव्या हातांसारखे आम्हांस साहाय्य करीत आहेत.

असो; शेवटीं, सर्व गोष्टी घडवून आणणारा आणि सर्वांस बुद्धिशक्ति देणारा जो जगच्चालक परमेश्वर, त्यास अनन्यभावें शरण जाऊन व त्याजपाशीं आश्रय मागून, हा लेख संपवितों.

पुणें, आश्विन शुद्ध
१०, शके १८२६.

प्रकाशक.

नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।
देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत् ॥

ज्या अखिलब्रह्मांडनायकाच्या लीलेनें या जगाचीं यच्चयावत्
कार्यें घडतात, ज्याच्या कृपेनें ह्या अनिवार मायामोहाचें
निरसन करितां येतें, व अल्पशक्ति जीवांना परमपद
प्राप्त करून घेतां यावें म्हणून जो त्यांस
बुद्धिसामर्थ्य देतो, त्या

परमकारुणिक

श्रीमन्नारायणाचे चरणीं.

त्याच्याच कृपेनें पूर्ण झालेला हा ग्रंथ

अर्पण असो.

अनुक्रमणिका.

आदिपर्व.

स्वयंवरपर्व.

वैवाहिकपर्व.

राज्यलंभपर्व.

अर्जुनवनवासपर्व.

१ या ठिकाणीं चुकून हरणहारिका असें पडलें आहे.

सभापर्व.

अनुक्रमणिका.

चित्रांची सूचि.

उपोद्घात

महाभारताचें महत्त्व त्याच ग्रंथांत प्रारंभीं अनेकवार आलें आहे. परंतु आपल्या ग्रंथाचें वर्णन व्यासांनीं ब्रह्मदेवाजवळ केलें आहे, तें फारच समर्पक आहे. व्यास म्हणाले, " भगवन् ब्रह्मदेवा, मीं अत्यंत श्रेष्ठ असें काव्य रचिलें असून त्यांत अनेक विषयांचें प्रतिपादन केलें आहे. वेदांचें रहस्य, त्यांतील इतर विस्तार, सांगोपांग उपनिषदें, इतिहास, पुराणें, कालाची त्रिविध स्थिति, धर्माधर्मविचार, आश्रमांचीं लक्षणें, चातुर्वर्ण्य, तपश्चर्या व ब्रह्मचर्य यांचें यथास्थित विवेचन, पुराणांतील कथानिर्देश, पृथ्वी व युगें, चंद्र व सूर्य, ग्रह व नक्षत्रें, आणि इतर तारका यांचें प्रमाण, ब्रह्मज्ञान, न्याय, शिक्षा, चिकित्सा, दान, पाशुपतमाहात्म्य, पुण्यतीर्थें, पवित्र देश, नद्या, पर्वत, वनें व समुद्र, महान महान नगरें, धनुर्वेदांतर्गत शस्त्रास्त्रविचार, लोकाचाराचें निरूपण करणारें नीतिशास्त्र, आणि सर्वव्यापक परब्रह्म या सर्वांचें मीं आपल्या काव्यांत प्रतिपादन केलें आहे. "

या वर्णनावरून आपल्यास महाभारताचें खरें स्वरूप किती चांगल्या प्रकारें कळून येतें! व्यासांपेक्षां आपण त्याचें आणखी कसें वर्णन करूं शकणार?

" जें भारतांत नाहीं तें जगांत नाहीं. " हें वाक्य वाचतांक्षणींच भारताच्या महत्त्वाची कल्पना आपणांस येते. " तुमचें तत्त्वज्ञान काय? तुमचें नीतिशास्त्र काय? तुमचीं धर्मतत्त्वें काय? तुमच्या कथा काय? तुमचे इतिहास काय? कोणत्या शास्त्रांत आणि कलांत तुम्ही पूर्वी प्रवीण होतां? तुमची सुधारणा—सर्वांगीण सुधारणा—किती उच्च स्थितीला जाऊन पोहोंचली होती? " असे व याच प्रकारचे आणखीही कांहीं प्रश्न जरी कोणी आपणांस केले, तरी त्याला आमचे जवळ एक उत्तर आहे. तें उत्तर " महाभारत पहा. " हें होय.

या ग्रंथांत आमच्या सृष्ट्युत्पत्तीच्या प्राचीन कल्पनांपासून तों तहत नीतिशास्त्राच्या अत्युत्तम तत्त्वांपर्यंत सर्व कांहीं भरलें आहे. महाभारत हा एक रत्नाकर आहे. या रत्नाकरांत ज्यानें बुडी मारावी, त्यास जें वाटेल तें रत्न सांपडणार आहे. ज्या दृष्टीनें जो पाहील, त्या दृष्टीनें त्याचें समाधानच होईल, अशी या ग्रंथाची रचना आहे. आमच्या देशास भरतखंड किंवा भारतवर्ष म्हणतात. या भारतवर्षाचा सर्वांगसुंदर असा प्राचीन इतिहास महाभारत होय. याचा अभ्यास प्रत्येक भारतवर्षीयानें मनःपूर्वक केला पाहिजे. हा अभ्यास कोणकोणच्या दृष्टींनीं केला पाहिजे, एवढेंच या उपोद्घातांत सांगण्याचा माझा विचार आहे. हा अभ्यास झाला म्हणजे त्यापासून कायकाय आपणांस उपलब्ध होईल, या महाभारतरूप महोदधींत निमज्जन केलें असतां आपणांस कायकाय रत्नें प्राप्त होतील, त्याचा विचार पुष्कळ विस्तारें करून उपसंहाररूप अंतिम भागांत केला जाईल. या उपोद्घातांत केवळ त्या अभ्यासाची—त्या अवगाहनाची—दिशामात्र दाखवावयाची आहे.

१ महाभारत ग्रंथ अगदीं अपूर्व, अगदीं अप्रतिम, एवढा मोठा इतिहास, एवढें मोठें काव्य, आज पृथ्वीवर कोणत्याही भाषेतील वाङ्मयांत नाहीं. अर्थातच त्याच्या रचनेपासून तों तहत त्यांत ग्रथित केलेल्या कथा व विचार यांपर्यंत सर्व संबंधानें पाश्चिमात्यांनीं अनेक प्रकारचे तर्क, वितर्क व कुतर्कही केले

आहेत. त्या सर्वांचा विचार समग्र ग्रंथ भाषांतररूपानें वाचकांचे हातीं पडल्यानंतरच नीटपणें समजणार आहे. आज मितीस त्या तर्कवितर्कांचें नुसतें कथन करून ठेवितों.

महाभारत ग्रंथ फार प्रचंड—उणापुरा एक लक्ष असल्या कारणानें, प्रथमचा तर्क म्हणजे हा ग्रंथ एकाची कृति नव्हे हा होय. मूळ कथा-भाग लहान असून अनेकांनीं अनेक आख्यानें वेळोवेळीं त्यास जोडून दिल्यामुळें हा ग्रंथ एवढा मोठा झाला.

अनेकांनीं हा ग्रंथ रचिला असें विधान झालें तेव्हां अर्थातच प्रश्न असा उभा राहिला कीं, अनेकांनीं मिळून एकाच वेळीं हा ग्रंथ रचिला, कीं अनेकांनीं भिन्न भिन्न काळीं आपल्याला आठवतील तीं आख्यानें उपाख्यानें जोडून त्याला एवढें स्वरूप दिलें?

या दुसऱ्या प्रश्नाचा निकाल बहुतेकांनीं असाच लाविला आहे कीं, भिन्न भिन्न कालीं भिन्न भिन्न ग्रंथकारांनीं आपण आख्यानें उपाख्यानें रचून तीं महाभारतांत गोंवून दिलीं. असा निकाल लाविला, म्हणजे तिसरी गोष्ट कालनिर्णया-संबंधाची पुढें उभी रहाते.

महाभारत केव्हां रचलें असावें? तें मूळचें एका ऋषीनें रचिलें, तें लहान असून नंतर भिन्न भिन्न कालीं भिन्न भिन्न ऋषींनीं आपण रचिलेल्या गाथा, कथा, आख्यानें, उपाख्यानें, गीता व स्मृति त्या ग्रंथास जोडून दिल्यामुळें मोठें झालें! मूळची 'भारत' संहिता होती, परंतु पुढें 'महाभारत' झालें. असें मत प्रतिपादन करणाऱ्यांनीं केलेला कालनिर्णय अर्थातच विवक्षित शतकालाच मर्यादित झाला नाहीं. ई० स० पूर्वी ४०० वर्षांच्या पूर्वी भारत किंवा महाभारत यांपैकीं कांहींच नव्हतें; पुढें इ० स० पूर्वी ४०० ते २०० पर्यंत केव्हां तरी भारत झालें; त्यानंतर इ० स० पूर्वी २०० पासून इ० सनानंतर १०० ते २०० वर्षांत भारतास नीतिग्रंथाचें रूप दिलें गेलें; व त्यास स्मृतिग्रंथांसारखे ग्रंथ जोडले; आणि पुढें इ० स० २०० पासून ४०० पर्यंतच्या काळांत त्याला आजचें स्वरूप आलें, असें पाश्चिमात्य पंडितांपैकीं पुष्कळांचें मत आहे. म्हणजे इ० स० पूर्वी ४०० पासून इ०स० नंतर ४०० पर्यंतच्या आठशें वर्षांच्या काळांत हा ग्रंथ भारतसंहितारूप बीजापासून महाभारतरूप प्रचंड वृक्ष बनला. या आपल्या विधानास त्या ग्रंथकारांनीं साधक प्रमाणें पुष्कळ दिलीं आहेत. तीं कशाकशाच्या आधारानें दिलीं आहेत, हें थोडक्यांत येथें सांगितलें असतां, वाचकांस हा भारत ग्रंथ त्या दृष्टीनें वाचण्यास ठीक पडेल; आणि उपसंहारांत त्या प्रमाणांस बाधक प्रमाणें दाखविण्यास सुलभ जाईल.

या ग्रंथकारांनीं हीं जीं प्रमाणें दिलीं आहेत, तीं दोन प्रकारचीं आहेत: १ अंत:प्रमाणें, २ बाह्य-प्रमाणें.

अंत:प्रमाणांत, प्रथमत:, महाभारतांत कोणकोणच्या प्राचीन ग्रंथांचीं नांवें आलीं आहेत, किंवा कोणकोणच्या शब्दांनीं त्यांचा उल्लेख केलेला असावा असें वाटतें, हें सर्व विविक्त केलें जातें. वेद, उपवेद, अंगें, उपांगें, ब्राह्मणें, उपनिषदें, सूत्रें, धर्मशास्त्रें, पुराणें, इतिहास व काव्यनाटकें यांपैकीं कशाकशाचा उल्लेख महाभारतांत आहे; कोणच्या वेदांतून, उपनिषदांतून, किंवा इतर ग्रंथांतून प्रत्यक्ष अवतरणें महाभारतांत घेतलीं आहेत हें पहावयाचें. हें पाहिलें म्हणजे अर्थातच त्या त्या ग्रंथांच्या नंतर, महाभारत सबंध, किंवा ज्या श्लोकांत तें अवतरण आलें आहे तेवढा श्लोक तरी रचिला गेला, हें उघड होय. म्हणून अंत:प्रमाणांत पहिलें स्थान या ग्रंथांच्या नामनिर्देशास, अप्रत्यक्ष रीतीनें केलेल्या उल्लेखास, किंवा या ग्रंथांतील अवतरणांस दिलें पाहिजे, हें उघड आहे. कालनिर्णयाकरितां आपणांस

अशा प्रकारचे निर्देश, उल्लेख, किंवा अवतरणें आलीं असतील तीं फार सूक्ष्म दृष्टीनें पाहिलीं पाहिजेत. त्याचप्रमाणें निरनिराळीं दर्शनें, अनुशासनें, पंथ, मतें वगैरे जर कोठें उल्लेखिलीं असलीं, तर त्यांचाही विचार केला पाहिजे.

अंत:प्रमाणांत दुसरें एक प्रमाण महाभारतांतील छंदांचें आहे. या प्रचंड ग्रंथांत कोठेंकोठें गद्य आहे. बहुतेक भाग छंदोमय आहे. गद्य ग्रंथ लिहिण्याची पद्धति जुन्या काळीं ब्राह्मण ग्रंथांतून आढळते. त्या पद्धतीचें अनुकरण करून महाभारतांतील गद्य लिहिलें आहे कीं काय हे पहावयाचें. त्याचप्रमाणें, वैदिक छंदांशीं समान अशा छंदांपासून तों शार्दूलविक्रीडितापर्यंत बरेच छंद आले आहेत. कित्येक मात्रावृत्तेंही आहेत. त्या सर्वांचें निरीक्षण करून, त्यांवरून भारताचा काळ कोणचा आणि महाभारताचा कोणचा हें काढणें शक्य आहे की काय तेंही पाहिलें पाहिजे.

अंत:प्रमाणांतलें तिसरें प्रमाण—आर्यावर्ताच्या धार्मिक किंवा राजकीय इतिहासांतील ज्या प्रसंगांचा काळ निर्णीत झाला आहे, अशा प्रसंगांचा निर्देश करणारे कांहीं उल्लेख असल्यास तें होय. उदाहरणार्थ—भगवान् बुद्धाच्या धर्ममताचा किंवा ग्रीक लोकांशीं आर्यांचें युद्ध झाल्याचा किंवा व्यवहार झाल्याचा बोध होण्याजोगा उल्लेख जर कोठें सांपडला, तर बौद्धांच्या नंतर किंवा ग्रीकांशीं संबंध आल्यानंतर हा ग्रंथ किंवा त्या उल्लेखाचा श्लोक रचिला गेला असें म्हणण्यास एक प्रमाण झालें.

अंत:प्रमाणांतलें चौथें प्रमाण—ज्योतिषसंबंधाचें होय. या ग्रंथांत कित्येक प्रसंगीं आकाशस्थ ग्रहांची व नक्षत्रांची स्थिति वर्णन करून सांगितली आहे, महिन्यांचीं वगैरे नांवें आलीं आहेत, आणि आणखीही कांहीं ज्योतिषशास्त्रासंबंधी उल्लेख आहेत; त्यांवरून, ग्रंथांतील कथानकाच्याच नव्हे तर ग्रंथरचनेच्याही काळासंबंधानें कांहीं अनुमान बांधण्यास जागा आहे कीं काय हें पहावयाचें.

इतकें अंत:प्रमाणांबद्दल झालें. बाह्यप्रमाणांत—महाभारताव्यतिरिक्त कोणकोणत्या ग्रंथांतून किंवा शिलालेखांतून या ग्रंथाच्या नांवाचा, महत्त्वाचा किंवा दुसरा कसला उल्लेख केला आहे कीं काय हें पाहणें येतें. त्याचप्रमाणें, आज मितीस महाभारत एक लक्ष ग्रंथ म्हणून मानिलें जातें, तसेंच याच्या पूर्वी किती वर्षेंपर्यंत मानलें जात आलें आहे, हेंही समजण्यास तद्व्यतिरिक्त ग्रंथांतील त्या संबंधाचे उल्लेख चांगलेच प्रमाणभूत धरले पाहिजेत. याकरितां, कोणकोणत्या ग्रंथांतून महाभारताचे कसकसे उल्लेख केले आहेत हेंही पहाणें कालनिर्णय करणारास अगदीं अवश्य आहे. वास्तव त्या दृष्टीनें सर्व प्राचीन ग्रंथांचा शोध केला पाहिजे.

या संबंधांत नुसते आमचेच ग्रंथ शोधून उपयोग नाहीं. बौद्ध लोकांचे व ग्रीक लोकांचे ग्रंथही त्या दृष्टीनें पाहून, त्यांत कोठें आमच्या या महाग्रंथाचा उल्लेख आहे कीं काय, व असला तर तो काय आहे, हेंही आपण शोधलें पाहिजे. बौद्धांच्या ग्रंथांतून उल्लेख असण्याचा फार संभव आहे. ग्रीकांच्या इतिहासांतील पुष्कळ प्रसंगांच्या संबंधानें कालनिर्णय कायम झालेले आहेत. त्या इतिहासांत, जर आपल्या या महाभारत ग्रंथाचा उल्लेख आढळेल, तर हा ग्रंथ अमक्या वर्षाच्या पलीकडला असें म्हणण्यास मुळींच प्रत्यवाय नाहीं. तेव्हां ग्रीक ग्रंथांतून हिंदुस्थानासंबंधी काय काय कोणकोणत्या काळीं लिहिलें आहे, तें शोधणें आपलें कर्तव्य आहे.

याप्रमाणें अंतर्बाह्य प्रमाणांचें पक्कें शोधन झालें, म्हणजे या ग्रंथाच्या कालनिर्णयास लागणाऱ्या सर्व प्रमाणांची सामग्री आपण स्वाधीन करून घेतली असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं.

महाभारत ग्रंथाच्या रचनेचा कालनिर्णय करी

झाला, तरी पुढें या ग्रंथांत असलेल्या प्रमुख कथेसंबंधानें आक्षेप आहेतच. कौरव-पांडवांची कलहकथा खरोखर प्राचीन काळीं घडली, कीं महाभारतकारानें ती आपल्या कल्पनेनें वाटेल तशी रचली ? म्हणजे या ग्रंथरूप सुंदर मंदिराचा पाया खऱ्या इतिहासांत आहे कीं सर्व कल्पनेचें गारुड आहे ? यांत इतिहास कांहीं नाहीं, सगळी कल्पना आहे, असें प्रतिपादन करणारे क्वचित् आहेत. एका जर्मन पंडिताचें तर असें म्हणणें कीं, भारतसंहिता मूळ लहान कथा होती, व ती बौद्धधर्मीय—निदान अहिंसाधर्मीय—असून कर्ण तिचा नायक होता. परंतु पुढें ब्राह्मणधर्माचें प्राबल्य झाल्यावर ब्राह्मणांनीं या काव्याला आपले जोड लावून, ह्यांत कृष्णपरमात्म्याचा परमभक्त जो अर्जुन त्यास व त्याच्या भावांस प्राधान्य देऊन त्याच्या द्वारें कृष्ण किंवा विष्णु याचें माहात्म्य वाढविलें ! या पंडिताच्या म्हणण्याचें परीक्षण यथास्थितपणें करण्याचें काम उपसंहारांत होईलच.

दुसरे कित्येक पंडित म्हणतात कीं, महाभारत हा ग्रंथ मूळचा स्मृतिग्रंथ असून त्यांत दृष्टांतादाखल कथा उपकथा यांची योजना केली आहे. कित्येकांच्या मतें हा ग्रंथ म्हणजे एक रूपकच आहे. यांत इतिहास वगैरे तादृश नाहीं; कित्येकांच्या मतें, कौरवपांडवांचें युद्ध जरी यांत वर्णिलें असलें, तरी तें युद्ध कांहीं खरें नव्हे. कवीच्या समकालीन कोणा दोन पक्षांमध्यें झालेल्या कलहावरून हें काव्य रचलें, व त्यांत मग पुढें इतर गोष्टींचा समावेश दुसऱ्या ग्रंथकारांकडून केला गेला. सारांश काय कीं, या ग्रंथांत इतिहास आहे कीं काय, आणि असलाच तर तो कोणच्या काळच्या कोणच्या लोकांचा आहे, हेंही सूक्ष्म तऱ्हेनें पाहून काढलें पाहिजे.

इतिहास आहे असें माझ्या मतें सिद्ध आहे. परंतु यदाकदाचित् इतिहास आहे असें प्रतिपक्षाचें समाधान होई अशा तऱ्हेनें सिद्ध करण्यास अडचणी आल्या, तरी पण या ग्रंथावरून आपणांस प्राचीन काळची व भगवान व्यासांच्या काळची सामाजिक स्थिति खचीत कळते. याबद्दल मतांतर असणें शक्य दिसत नाहीं. कल्पनेनें रचिलेलें काव्य जरी असलें, तरी त्या काव्यांत वर्णिलेलें समाजस्वरूप कवि आपल्या समकालीन समाजस्वरूपाप्रमाणेंच वर्णन करणार हें कांहीं कोणासही नाकबूल करतां यावयाचें नाहीं. याकरितां, वरील सर्व प्रश्नांचा निकाल कसाही लावला गेला, तरी महाभारतांतील वर्णनांवरून तत्कालीन व तत्पूर्वकालीन समाजघटना कशी असावी हें काढणें आपणांस इतिहासरचनेस सर्वथैव उपयोगी आहे. किंबहुना खरा इतिहास म्हणजे काय याबद्दल अर्वाचीन पंडितांचें जें मत आहे, त्या मताप्रमाणें खरा इतिहास आपणांस या महनीय ग्रंथापासूनच काढणें शक्य आहे. इतिहास म्हणजे केवळ महाप्रतापवान व बुद्धिवान पुरुषांच्या महत्कृत्यांचें वर्णनच नव्हे, तर समाजवृक्षाच्या वृद्धीचें, समाजाच्या उत्कर्षापकर्षाचें सकारण व साधार कथन होय. प्राचीन काळीं आमचा समाज कोणच्या कोणच्या स्थितींतून कसकसा विकसित होत गेला, व त्याचें भारतकालीं कसें परिणत स्वरूप होतें, हें जाणणें म्हणजे समाजशास्त्राचीं मूलतत्त्वें काढण्यास सर्व प्रकारचीं प्रमाणेंच जमविणें होय. भारतकालीं आम्ही कोणच्या समाजस्थितींत होतों तेवढेंच आम्हांस भारतापासून उपलब्ध होणार, असें नाहीं; तर त्या काळाच्या पूर्वीं, फार प्राचीन काळापासून आमची समाजस्थिति कशी आहे याचेंही ज्ञान आपणांस चांगलें होईल. कारण, या ग्रंथांत, कित्येक संबंधांत, पूर्वींचे लोक काय करीत, पूर्वीच्यांनीं काय धर्म सांगितले, पूर्वीं काय घडलें, याचेंही कथन व वर्णन केलेलें कित्येक ठिकाणीं आढळतें. आदिपर्वांतच पाहूं गेलें असतां, ज्या वेळीं ‘विवाह’ मुलींच आलि-

त्यांत नव्हता, अशा वेळेच्या समाजस्थितीचा उल्लेख आहे. हे सर्व प्राचीन आचाराविचारांचे उल्लेख एकत्र करून, व त्यांचा पूर्वापर संबंध पाहून, त्यांपासून पूर्वेतिहासच काय, परंतु इतिहासाची परंपरा आपणांस काढतां येईल. याकरितां वाचकांनीं त्या दृष्टीनें या ग्रंथाचें अध्ययन केलें पाहिजे. वर सांगितल्याप्रमाणें इतिहास काढावयाचा म्हटलें म्हणजे प्रथमतः या ग्रंथाचें पठन चालकें असतां विघटना पद्धतीचाच (Analytical method) स्वीकार केला पाहिजे. विघटना पद्धति म्हणजे प्रत्येक श्लोक वाचून, त्यांत जें काय आपणांस टिपून ठेवण्याजोगें वाटेल तें निराळ्या विवक्षित कोष्टकाचे पोटीं टिपून ठेवणें. अशा तऱ्हेनें दर कोष्टकांत त्या त्या कोष्टकांत घालण्याजोगी सर्व माहिती स्वर्गारोहणपर्वापर्यंत टिपून झाली, म्हणजे विघटना पद्धतीचें कार्य झालें. मग तेथून पुढें संघटना पद्धतीचा (Synthetical method) उपयोग करून इतिहासाची रचना करण्यास लागावयाचें. उदाहरणार्थ—आतां आपण एक विवाहसंबंधच घेऊं. या विवाहसंबंधाचाच विचार करितांना आपल्यास असें दिसून येईल कीं, प्रथमतः विवाहपद्धति मुळींच नव्हती, अशा काळाचा उल्लेख आहे, त्याचप्रमाणें स्त्रीनें अनेक पति करण्याच्या पद्धतीचा उल्लेख आहे, पुरुषानें अनेक स्त्रिया केल्याचा उल्लेख आहे, एकपत्नीव्रताचा उल्लेख आहे; सहगमनाचा उल्लेख आहे, विवाहसंबंधी नीति सांगितली आहे, गार्हस्थ्याचें महत्त्व वर्णिलें आहे, स्त्रियांची थोरवी वर्णिली आहे, आणखीही तत्संबंधी उल्लेख आहेत. हे सर्व उल्लेख एकत्र करून त्यांची व्यवस्थितपणें वांटणी केली म्हणजे आपल्या पूर्वजांच्या—आर्यांच्या—वैवाहिक स्थितीबद्दलच्या विचारांचा व आचारांचा इतिहासच आपणांस सांपडेल. वैवाहिक स्थिति ही अर्थातच गार्हस्थ्य स्थितीच्या पोटांत येणार. हें एक उदाहरण झालें. तें एवढ्याचकरितां दिलें आहे कीं, आपणांस महाभारतरूप खाणीतून जे काय निरनिराळ्या प्रकारचे ऐतिहासिक कण उपलब्ध होतील, ते सर्व एकत्र करून नंतर त्यांचे पुनः गट बनविले असतां आपल्यास काय होईल हें वाचकांच्या निदर्शनास आणावयाचें.

आतां असे कण काढून ते ज्या सदरांत अगर कोष्टकांत घालावयाचे, तीं सदरें अगर कोष्टकें काय काय असावीं त्याचें दिग्दर्शन येथें करितों.

१ भूवर्णन—यांत या प्रचंड ग्रंथांत भूगोलसंबंधी जीं जीं नांवें आलीं आहेत, तीं सर्व एकत्र यावीं, व त्यांचें वर्णन असेल तेंही यावें. समुद्र, नद्या, पर्वत, सरोवरें, देश, प्रांत, द्वीपें, महाद्वीपें, द्वीपकल्पें, भूशिरें, सामुद्रधुन्या, गांवें, तीर्थें, बंदरें, किनारे, अरण्यें वगैरे वगैरेंचा या सदरांत समावेश व्हावयाचा. अर्थात् यावरून महाभारतकाळीं कोणचे देश, कोणचीं नगरें, नद्या, पर्वत वगैरे होतीं तें सर्व समजेल. परदेशांचेही उल्लेख घेतले पाहिजेत.

२ वनस्पतिवर्णन—यांत त्या काळीं कोणचे वृक्ष, कोणच्या लता, कोणचीं पुष्पें लोकांस ठाऊक होतीं, व कोणकोणच्या वृक्षलतादिकांचा काय काय उपयोग होत होता, हें समजेल.

३ जलचर व स्थलचर पशु व पक्षी यांचें वर्णन—महाभारतांत नांवें आलेले सर्व पशुपक्षी या सदरांत नमूद केले जावे. जेथें त्यांचें विशेष वर्णन असेल, तेथें तेंही आलेंच पाहिजे. त्याचप्रमाणें सर्प व कीटकादिकांचीं नांवेंही नमूद झालीं पाहिजेत.

४ खनिजपदार्थवर्णन—कोणकोणचे धातु, कोणकोणचीं रत्नें, दगड वगैरे उल्लेखिलेले आहेत तेंही घेतलें पाहिजे.

पुढें समाजस्थितीसंबंधी आपणांस काय काय माहिती मिळवावयाची तें पाहूं.

१ कौटुंबिक किंवा गार्हस्थ्यस्थिति—'कुटुंब'

हें समाजाचा मूळ पाया. तेव्हां त्यापासून आपण समाजाच्या संबंधाचा इतिहास पहाण्यास प्रारंभ केला पाहिजे. प्रथम विवाहसंबंध–विवाह नाहीं असा काळ–गोत्रांतल्या गोत्रांत विवाह–परगोत्रविवाह—विवाहाचे प्रकार—अनेकपतिविवाह—अनेकपत्नीविवाह—एकपति व एकपत्नी व्रतें—अपत्यांचा व पितरांचा परस्पर संबंध—स्त्रियांची पदवी–सापत्न संबंध कुटुंबविस्तार इ.इ.–

२ राजकीय स्थिति—राजे—मंत्री—मंत्रिमंडळें—अराजक स्थिति—एकराजसत्ता—प्रजेचे हक्क—प्रजेची सत्ता—प्रजेचे प्रतिनिधि—स्थानिक स्वराज्य—उत्तम राजा कसा? उत्तम मंत्री कसा? प्रजेचीं कर्तव्यें काय? जमाबंदी कशी होई? न्यायपद्धति कशी असे? कायदे कसे असत? मालमत्तेवरील सत्ता—सैन्य, शिबंदी वगैरे.

हीं नुसतीं पोटसदरें झालीं, परंतु या प्रत्येक पोटसदरासंबंधानेंच किती किती तरी माहिती आपल्यास उपलब्ध होणार आहे. उदाहरणार्थ कायद्यांचेंच पोटसदर घ्या. ह्यांत कुटुंबसंबंधी, देवघेवीसंबंधी व फौजदारी गुन्ह्यांसंबंधी अशी सर्व प्रकारच्या कायद्यांची माहिती येणार. त्याचप्रमाणें सैन्याचें सदर घ्या. या सदरांत शस्त्रें, अस्त्रें, युद्धकला, युद्धाचे नियम, सैन्याचे प्रकार, सैन्याची मांडणी वगैरे सर्व कांहीं येणार.

३ धर्मसंबंधी विचार–यांत महाभारतांत कोणकोणच्या देवता मानिल्या आहेत; ह्या देवतांस भजण्याचे मार्ग काय सांगितले आहेत; कोणच्या कोणच्या पदार्थांस, पशूंस, पक्ष्यांस देवत्व व पावित्र्य मानिलें आहे; यक्ष, गंधर्व, किन्नर, भूत, प्रेत, पिशाच यांसंबंधाच्या कल्पना काय आहेत; सुषुप्ति आणि स्वप्न या दोन अवस्थांसंबंधाचे विचार—सारांश, सृष्टींतील कित्येक पदार्थ व प्राणी हे देवस्वरूप आहेत, अशा विचारापासून तों सर्व दृश्य व अदृश्य विश्व ब्रह्ममय आहे अशा उदात्त विचारापर्यंतचीं सर्व धर्ममतें भारतांत संग्रहीत आहेत; त्या सर्वांचा इतिहास या सदराखालीं आपणांस संकलित करतां येणार आहे. त्याचप्रमाणें धर्मगुरु, व विविध धर्मपंथांचे गुरु, चार आश्रम, चार वर्ण, त्यांची व्यवस्था इत्यादिसंबंधाचाही विचार याच सदराखालीं आपणांस करावा लागेल. कांकीं, चातुर्वर्ण्य व चतुराश्रम यांची उत्पत्ति कशीही झाली असली, तरी त्यांचा संबंध पुढें धर्मव्यवस्थेशींच आला, असें आपणांस दिसून येईल. भारतकालींही धर्ममतें किती विविध, परमेश्वरप्राप्तीचे मार्ग किती भिन्न भिन्न होते, हेंही समजून येईल. त्याचप्रमाणें यज्ञयागादिकांचा सर्व भाग या प्रकरणाचे पोटीं येईल.

४ विविध शास्त्रें व मीमांसा हीं कोणकोणचीं ह्या काळीं माहीत होतीं हें आपल्या पृथक्करणावरून काढतां येणार आहे. वैद्यशास्त्र, रसायनादि शास्त्रें, ज्योतिषशास्त्र, भाषाशास्त्र, न्यायशास्त्र, इतिहासशास्त्र, संगीतशास्त्र, नाट्यशास्त्र, शिल्पशास्त्र, मूर्तिशिल्प, चित्रकला वगैरे वगैरे जितकीं म्हणून शास्त्रें किंवा विद्या आहेत, तेवढ्यांचा व त्या जाणणारांचे, त्याचप्रमाणें सर्व कला व ह्या कला जाणणारांचे उल्लेख असतील तेथून ते काढून त्यांचें संकलन केलें पाहिजे.

५ शिक्षणव्यवस्था कशी असे? गुरुशिष्यसंबंध काय असे? साधारण लोकांचें शिक्षण काय असे? क्षत्रियांचें कसें असे? राजपुत्रांचें कसें असे? स्त्रियांस काय काय शिकवीत असत? धंद्याचें शिक्षण कसें दिलें जात असे वगैरे वगैरे.

६ शेतकीसंबंधी व उद्योगधंद्यासंबंधीही काय व्यवस्था होती, तें पाहिलें पाहिजे. दास होते कीं काय? मजूर कसे असत, त्यांस काम काय वेतनावर करावें लागे? हल्लींच्याप्रमाणें कांहीं संघ किंवा संस्था असत कीं काय? धंदे कोणकोणचे असत? नाणीं कोणचीं असत? वजनें

कोणचीं असत? आउतें वगैरे साधनें कशीं असत? शेती कोणकोणत्या धान्यांची करीत? दूधदुभतें कसें असे वगैरे वगैरे.

७ व्यापार व्यवहार–देवघेव कशी चाले? व्याजबट्टा कसा असे? कोणकोणच्या मार्गांनीं व्यापार चाले? परदेशांशीं व्यापार होत असे काय? कोणकोणच्या जिनसांचा व्यापार होई? वगैरे वगैरे.

८ अन्न, वस्त्र व भूषणें–अन्न किती प्रकारचें खात? धान्यें कोणकोणचीं व शाकभाज्या कोणकोणच्या असत? मांसाहार असे काय? कोणच्या प्राण्यांचें मांस खात? सूपशास्त्र होतें काय? वस्त्रें कशाकशाचीं करीत? तीं नेसण्यापांघरण्याची पद्धति काय असे? त्याचप्रमाणें भूषणें कशाकशाचीं करीत? कोणत्या धातु व कोणचीं रत्नें भूषणासाठीं योजीत? अन्नाचीं, वस्त्रांचीं व भूषणांचीं नांवें काय होतीं? वगैरे वगैरे.

९ आचार व रीतिभाति—श्रेष्ठांशीं कनिष्ठांचें वर्तन, वडिलांशीं लहानांचें वर्तन वगैरे संबंधांत काय माहिती उपलब्ध होईल तें यांत येणार.

आखेरीज—

१० पुरुषांचीं, स्त्रियांचीं, देवतांचीं, यज्ञांचीं वगैरे जीं नांवें येतील, त्यांचीही जंत्री करून ठेवणें जरूर आहे. त्या नांवांची मीमांसा फार चित्तरंजक असते.

सारांश, वर दिलेल्या एकंदर सदरांखालीं येणारी सर्व माहिती आपण या ग्रंथांतून काळजीपूर्वक काढून ज्या त्या सदरांत नमूद केली असतां, आपल्याला भारतीय काळाचें इतिहासज्ञान फार चांगलें होईल याबद्दल मुळींच शंका घ्यावयास नको. या प्रचंड पुराणांतून मिळणारी सर्व सामग्री कणशः जुळविली असतां आपल्या प्राचीन इतिहासाचें मंदिर उभारण्यास फार सोपें जाईल. एका महाभारताचें अशा तऱ्हेनें पर्यालोचन केलें कीं, सर्व पुराणांचेंच पर्यालोचन झालें असें समजण्यास हरकत नाहीं. कारण, त्या त्या पुराणांचा पाया महाभारतच होय. याप्रकारें या ग्रंथांतून माहिती काढण्याचा प्रयत्न मीं केला आहे, व त्याचें फल या ग्रंथाचे शेवटीं उपसंहाररूपानें वाचकांचे पुढें ठेवण्याचा विचार आहे. सध्यां या महाभारतरूप महावृक्षाचें अवलोकन व त्याच्या महाफलाचें व अमृततुल्य रसाचें सेवन करण्यासाठीं तो वाचकांपुढें ठेवतों. वर निर्दिष्ट केलेल्या विषयांसंबंधें ज्ञानरूप गोरस या भारतरूप कामधेनूपासून आपणांस काढून सेवन करावयाचा आहे, हें मात्र सदासर्वकाळ लक्षांत धरावें.

हरि नारायण आपटे.



भारत लेखन

उपोद्घात.

ह्या जगतीतलावर पूर्वी लोमहर्षण नांवाचा एक महाविख्यात पुराणिक होऊन गेला. तो इतिहास कथन करण्यांत फारच कुशल होता. त्याचें भाषण श्रवण करून श्रोतृसमुदायाची मनोवृत्ति अगदीं तल्लीन होत असे. लोमहर्षणाचें व्याख्यान ऐकून श्रोतृवृंदाचीं शरीरें रोमांचित झालीं नाहींत असें क्वचितच घडे. त्याला उग्रश्रवा नामक पुत्र होता. तोही पुराण निवेदन करण्यांत आपल्या पित्याप्रमाणें निपुण असे. त्याचें ज्ञान मोठें अगाध होतें. वक्त्यास अलंकृत करणाऱ्या सर्व गुणांचें तो केवळ निधानच होता; आणि सर्व उपनिषदांचें रहस्य त्यास केवळ करतलामलकवत् पूर्ण अवगत होतें.

एके प्रसंगीं नैमिषारण्यांत[1] शौनक नामक कुलपतीनें[2] द्वादशवार्षिक सत्र[3] आरंभिलें असतां, त्या सत्राकरितां तेथें मोठमोठे उग्र तपश्चर्या करणारे ब्रह्मर्षि प्राप्त झाले. ते महात्मे एके दिवशीं नित्यनैमित्तिक कर्में आटोपून स्वस्थपणें ब्रह्मविचार करीत असतां सूतपुत्र उग्रश्रवा पुराणिक त्या स्थळीं आला. त्या वेळीं, तेथें महान महान तपोनिधि अधिष्ठित आहेत असें पाहून त्यास मोठा आल्हाद वाटला, आणि चित्रविचित्र कथा सांगून आपण त्या ब्रह्मर्षींचें मनोरंजन करावें अशा लालसेनें त्या ऋषिवृंदापुढें तो विनयपूर्वक हात जोडून उभा राहिला.

ह्याप्रमाणें उग्रश्रवा सत्रमंडपांत ब्रह्मनिष्ठ मुनींच्या अग्रभागीं प्राप्त झाला असतां त्यास पाहून सर्वांची एकच लगबग उडाली. जो तो त्याजपासून मनोहर कथा श्रवण करण्याविषयीं आतुर झाला, आणि ते सर्व तपस्वी त्या श्रेष्ठ पुराणिकाच्या आसमंतात् एकदम जमा झाले.

मग उग्रश्रव्यानें सर्व मुनिवर्यांस प्रणिपात करून, त्यांची तपश्चर्या अव्याहतपणें चालली होती कीं नाहीं, ह्याजबद्दल विचारपूस केली. नंतर त्या सर्व ऋषींनीं उग्रश्रव्याचें मनापासून स्वागत केलें, आणि त्यास यथोचित आसनाचा स्वीकार करण्यास सांगून सर्व ब्रह्मर्षि आपआपल्या स्थानीं स्थित झाले, तेव्हां उग्रश्रव्यानेंही ऋषिनिर्दिष्ट आसनाचा अंगीकार केला.

पुढें त्या सूतपुत्रानें (सौतीनें) थोडा वेळ विसांवा घेतल्यानंतर, कोणी एका ऋषीनें कथांचा उपक्रम करण्याकरितां त्या सौतीस प्रास्ताविक प्रश्न केले: तो ऋषि म्हणाला, "हे सूतपुत्रा, आज तुझें कोठून येणें घडलें बरें? तूं हे प्रस्तुतचे दिवस कोठकोठें घालविलेस, तें मला सांग." ह्याप्रमाणें प्रश्न श्रवण केल्यावर लौमहर्षणीनें विमलचित्त तपोनिधींच्या त्या विशाल सभेमध्यें चित्ताकर्षक भाषण करून नानाविध कथांचा उपन्यास केला.

सौति म्हणाला:—मुनिश्रेष्ठहो, महाराज परीक्षित

---

१ नैमिषारण्य—ह्या अरण्यांत भगवंतानें एका निमिषांत दैत्यांचा संहार केला म्हणून ह्यास नैमिषारण्य असें म्हणतात. ह्यास नैमिशारण्य असेंही दुसरें नांव आहे. हें नांव पडण्याचें कारण असें कीं, येथें ब्रह्मदेवानें उत्पन्न केलेल्या मनोमय चक्राची नेमि म्हणजे धाव एकदम शीर्ण म्हणजे कुंठित झाली. ह्याबद्दल अशी कथा आहे कीं, पूर्वीं ऋषींनीं "तपश्चर्येस उत्तम स्थल कोणतें?" असा ब्रह्मदेवास प्रश्न केला असतां ब्रह्मदेवानें त्यांस सांगितलें कीं, "मी आतां एक मनोमय चक्र निर्माण करितों; त्याची गति जेथें कुंठित होईल, तें स्थल तपश्चर्येस योग्य असें समजावें." नंतर ब्रह्मदेवानें एक मनोमय चक्र उत्पन्न करून सोडून दिलें. तें ह्या अरण्यांत कुंठित झालें. हें स्थल नर्मदेच्या उत्तरेस व कुरुदेशाच्या पश्चिमेस आहे.

२ मुनीनां दशसाहस्रं योऽन्नदानादि पोषणात् ।
अध्यापयति विप्रर्षिरसौ कुलपतिः स्मृतः ॥

अर्थ—जो विप्रर्षि दहा सहस्र शिष्यवर्गीय ऋषींच्या उपजीविकेची व्यवस्था करून त्यांस वेदविद्या शिकवितो, त्यास 'कुलपति' म्हणतात.

३ बहुभ्यो दीयते यत्र । तृप्यन्ति प्राणिनो बहु ॥
कर्तारो बहवो यत्र । तत्सत्रमभिधीयते ॥

अर्थ—ज्यांत दानधर्म फार होतो, अन्नादिकांच्या योगें प्राणिमात्राची तृप्ति घडते, व अनेक पुरुष कर्ते असतात, त्यास 'सत्र' म्हणतात.

राजाचा पुत्र जो महात्मा जनमेजय, त्याचे सर्पसत्रास मी गेलों होतों. तेथें त्या राजेंद्राला वैशंपायनांनीं कृष्णद्वैपायनप्रणीत महाभारत ग्रंथांतील अनेक पुण्यकारक व हृदयंगम कथा निवेदन केल्या, त्या मीं यथाविधि श्रवण केल्या; आणि नंतर अनेक तीर्थें व क्षेत्रें पर्यटन करून समंत-पंचक नामक परमपावन देशास गेलों. ब्रह्मवर्यहो, समंतपंचक देशांत मुख्यत्वेंकरून द्विजांचेंच वास्तव्य आहे, आणि एथेंच पूर्वी कौरव व पांडव ह्यांचें घोर युद्ध होऊन त्यांत दोन्ही पक्षांकडील सर्व भूपालांचा संहार झाला. ऋषीहो, प्रस्तुत मी त्या समंतपंचक देशाहून आपलें दर्शन घेण्याच्या लालसेनें येथें प्राप्त झालों आहें. महाभाग आयुष्मंतहो, ह्या सत्रामध्यें सूर्य व अग्नि ह्यांप्रमाणें तुम्ही मला भासत आहां. तुम्ही प्रत्यक्ष परब्रह्म, असेंच मला वाटतें. महाराज, अंतर्बाह्य शुद्धि करणारीं स्नानसंध्यादिक कर्मे आटोपून आणि जपजाप्य व होमहवन ह्यांचें अनुष्ठान करून आपण स्वस्थ बसलां आहां; ह्यास्तव, परमपावन पुराणकथा, दानमोक्षादिकांचे नियम, अर्थप्राप्तीचे उत्तम मार्ग, अथवा थोर थोर महात्म्यांचीं वृत्तें, किंवा महान महान राजर्षींचीं चरित्रें ह्यांपैकीं काय निरूपण करूं तें कृपा करून विदित करावें.

ऋषि म्हणाले:–हे सौते, हें काय विचारावें ? जें भारत नांवाचें पुराण[1] महान ऋषि कृष्णद्वैपायनांनीं रचिलें आणि देवांनीं व ब्रह्मर्षींनीं आपआपल्या लोकीं ऐकतांक्षणींच ज्याची वाहवा केली; ज्यामध्यें थोर थोर महात्म्यांचीं चरित्रें वर्णिलीं असून, ज्यांतील पदलालित्य व अर्थसौष्ठव अतिशय मनोहर आहे; शुद्ध आत्मतत्त्वज्ञानाला व सयुक्तिक कार्यकारणपद्धतीचा जो केवळ आदर्शच होय; आणि वेदप्रतिपाद्य विषयांचें सांगोपांग विवेचनामुळें ज्यास अपूर्व शोभा प्राप्त झाली आहे; तसेंच, जो भारत नामक इतिहास जनमेजय राजाच्या सर्पसत्रांत भगवान व्यासांच्या आज्ञेवरून वैशंपायनांनीं मोठ्या आनंदानें सविस्तर कथन केला; ज्याचें श्रवण, मनन व निदिध्यसन केलें असतां चित्ताची शुद्धि होऊन चतुर्विध पुरुषार्थांचा लाभ घडतो; ज्यांतील पदें शाणोल्लीढ रत्नांप्रमाणें सुसंस्कृत असून अर्थ ब्रह्मज्ञानविषयक आहे; जो नानाविध शास्त्रांच्या व चतुर्विध श्रुतींच्या अर्थाचें भांडागारच होय; आणि ज्याच्या दृढ परिशीलनानें अहंकारग्रंथीचा मोक्ष होऊन पापवासनेची भीति अजीबात नष्ट होते, त्या भारतसंज्ञक श्रेष्ठ संहितेचें श्रवण करावें, असेंच आमची मनीषा आहे.

सौतिकृत मंगलाचरण.

सौति म्हणाला:—ज्याच्यापासून ह्या स्थिरचर सर्व विश्वाची उत्पत्ति होते; गाढ निद्रेंत व प्रलयकालीं ज्याच्यामध्यें ह्या सर्व ब्रह्मांडाचा लय होतो; सर्व जगाचा योगक्षेम चालण्याकरितां यज्ञयागादिकांत अनेक होते पुरुष ज्याचें आह्वान करून साममंत्रांनीं गायन करितात; जो सर्व त्रिभुवनांत जीव व ईश्वर ह्या रूपांनीं सर्वत्र व्याप्त आहे; आणि जो एक, अद्वितीय, सत्य, नित्य, परब्रह्मरूप व देशकालादिकांनीं अपरिच्छिन्न असा आहे; तसेंच, ज्याचें वास्तव स्वरूप कार्यकारणसृष्टीच्या व्यतिरिक्त असून, ज्याच्या ठिकाणीं, वास्तविकपणें मिथ्या असलेली कार्यकारणसृष्टि केवळ अज्ञानामुळें सत्य भासते; ज्याच्यापासून उच्च, नीच अशा सकल वस्तूंची उत्पत्ति होते; जो वस्तुतः अनादि, अनंत व विकारशून्य असूनही केवळ भक्तकल्याणाकरितां नवीन नवीन रूपें (अवतार) धारण करितो; संसार हा अनंत असून त्याच्या मुळाशीं आदिकारणरूपानें हा परमात्मा असल्यामुळें ज्याचा कधींच लय होत नाहीं; आणि सर्व विश्वांत जो अत्यंत श्रेष्ठ होय; त्या-

[1] भारत ग्रंथास पुराण व इतिहास, अशा दोन्ही संज्ञा आहेत. (आदिपर्व अध्याय १२ व ६२.)

प्रमाणेंच, जो मंगलदायक असून स्वतः मंगलमूर्ति आहे; ज्याच्या ठिकाणीं दोषादिकांचें मुळींच वास्तव्य नसून जो पावनत्वाचें निधान आहे; आणि जो इंद्रियादिकांचा नियंता असून चराचराचा अधिपति होय, अशा त्या भक्तकामकल्पद्रुम, जगद्व्यापक, भवभंजक व यज्ञस्वरूप परमात्म्यास मी नमस्कार करितों; आणि अमानुष कर्में करून दाखविणाऱ्या व सर्व लोकांस वंदनीय झालेल्या त्या महामुनि भगवान व्यासांनीं कथन केलेला जो दिव्य महाभारत ग्रंथ, त्याचें निरूपण करितों.

महाभारताचें महत्त्व.

ऋषीहो, ह्या इतिहासग्रंथाचें महत्त्व फारच अगाध आहे. तिन्ही कालीं अबाधित असलेल्या तत्त्वांचें ह्यांत प्रतिपादन केलें आहे; म्हणून ह्या जगतीतलावर कांहीं कवींनीं पूर्वींच हा इतिहास सांगितला आहे, कांहीं कवि प्रस्तुत तो सांगत आहेत, आणि कांहीं कवि पुढेंही तो सांगतील. उत्तम, मध्यम व अधम अशा तिन्ही प्रकारच्या लोकांस ह्या ग्रंथाचा उपयोग एकसारखा होतो. ब्राह्मणादि तीन वर्णांतील पुरुष म्हणजे द्विज हे ह्या ग्रंथांतील विषयाचें परिशीलन मोठ्या कळकळीनें करितात; आणि ह्या ग्रंथाचें संकलित व विस्तृत स्वरूप पूर्णपणें ध्यानांत यावें व त्याच्या अंगें प्रतिपादित तत्त्वांची उपस्थिति चांगली व्हावी, म्हणून ते संक्षेपानें व विस्तारानें ह्या ग्रंथाचें पठन करितात. ह्यांतील सुंदर शब्दरचना, मनोहर अशी वैदिक व लौकिक आचारपद्धति, आणि विविध छंद व मोहक वृत्तें हीं अवलोकन करून मोठमोठे विद्वान व रसिक पुरुषही माना डोलवितात.

जगताची उत्पत्ति.

ऋषीहो, ह्या सृष्टींतील अगणित वस्तु व त्यांचे अनंत व्यापार हीं सर्व त्या भगवन्मायेचीं कार्यें होत. मायेच्या अंगीं जें हें लोकोत्तर सामर्थ्य प्राप्त झालें आहे, त्याच्या योगानें ह्या जगतांतील यच्चयावत् घडामोडी चालतात. ह्या घडामोडींचा विचार केला म्हणजे मायेच्या प्रचंड शक्तीबद्दल आश्चर्य वाटतें. परंतु वास्तविक स्थिति अशी आहे कीं, सर्व विश्वास प्रचलित करणारी ही माया स्वतः सर्वस्वीं परतंत्र आहे. तिच्या अंगीं जो हा विलक्षण पराक्रम दृग्गोचर होतो, तो त्या अचिंत्य लोकनायक परमात्म्याचा आहे. माया ही केवळ त्याच्या हातांतली काष्ठप्रतिमा होय. त्याच्या प्रेरणेप्रमाणें ही आपलीं कामें करिते. परमात्म्याच्या शक्तीमुळेंच मायेला हें जग उत्पन्न करितां येतें, व त्याच्या शक्तीमुळेंच माया स्तिमित होऊन ह्या जगताचा उपसंहार होतो. जगताची उत्पत्ति व लय हीं कशीं घडतात, हें ह्या विवेचनावरून तुमच्या ध्यानांत येईल.

ऋषीहो, प्रलयकालीं म्हणजे ह्या दृश्यमान जगाचा उदय होण्यापूर्वीं मायेची शक्ति अशीच स्तिमित होऊन ती परब्रह्मरूपांत लीन होऊन बसली होती; आणि त्या वेळीं द्रष्टा, दृश्य व दर्शन, अथवा ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान इत्यादि विकार मायेच्या अभावामुळें नष्ट झाले होते. अशा प्रकारची सर्वत्र स्थिति असतांना परमात्म्याच्या मनांत जगदुत्पत्तीचा विचार उत्पन्न झाला, व सर्व त्रैलोक्यास धारण करणारें असें एक बृहत् अंडें उत्पन्न झालें. ऋषीहो, ह्या सृष्टींतील स्थावरजंगम सर्व वस्तूंस उत्पन्न करणारें हें अंडें म्हणजे सर्व सृष्टीचें अविनाशी असें बीजच होय. प्रत्येक कल्पाच्या आरंभीं ब्रह्मांडाच्या उत्पत्तीचें हें मूळ कारण असल्यामुळें ह्यास "महद्दिव्य" अशी संज्ञा देतात. ह्या अंड्यांत (कारणात्म्यांत) त्या अद्भुत, अचिंत्य, सर्वत्र समत्वानें व्याप्त, अव्यक्त, जगत्कर्तृक, सूक्ष्म, कार्यकारणरूप, नित्य, सत्य व ज्ञानमय अशा परमात्म्यानें प्रवेश केला, असें श्रुति सांगतात.

नंतर त्या दिव्य अंड्यांतून हिरण्यगर्भसंज्ञक प्रजापति उत्पन्न झाला. हा सर्व त्रिभुवनाचा मूळ

अधिपति असून पितामह होय. ब्रह्मदेव, विष्णु व महेश्वर ह्या त्या हिरण्यगर्भाच्या राजस, सात्त्विक व तामस अशा विभूति आहेत. मनु, क, परमेष्ठी, प्राचेतस दक्ष, क्रोध, तम, दम, विक्रीत, अंगिरा, कर्दम व अश्व हे सात दक्षपुत्र, आणि मरीच्यादिक सप्तर्षि व चतुर्दश मनु असे एकवीस प्रजापति, हे सर्व ब्रह्मदेवापासून उत्पन्न झाले. मत्स्यकूर्मवराहादि अचिंत्य अवतारांस कारणभूत अशी जी पुरुष नामक विभूति, तिचा मूळ उद्गम भगवान विष्णूमध्यें आहे. विश्वेदेव, आदित्य, वसु व अश्विनीकुमार हे त्या विष्णूचे अंश होत; आणि यक्ष, साध्य, पिशाच, गुह्यक व पितर हे महेश्वरापासून उत्पन्न झाले. त्याप्रमाणेंच, महान महान ज्ञानी व ब्रह्मवेत्ते पुरुष, धैर्यौदार्यादि सकल गुणांनीं मंडित असे अनेक भूपति, पृथ्वी, अप्, तेज, वायु, आकाश हीं महाभूतें, चंद्र, सूर्य, संवत्सर, ऋतु, मास, पक्ष व अहोरात्र हीं सर्व त्या शंकरापासूनच निर्माण झालीं. ऋषीहो, ह्यांवांचून दुसरें जें कांहीं ह्या जगांत दृष्ट–दृश्य, ज्ञात–ज्ञेय किंवा श्रुत–श्राव्य म्हणून असेल, तें सर्व ह्या बृहत् अंड्याच्या मुख्य तीन विभूतींपैकीं कोणत्या तरी विभूतीपासून उत्पन्न झालें आहे, असें समजावें.

जगताचा उपसंहार.

कल्पकालाचा प्रारंभ झाला असतां ह्याप्रमाणें परमात्म्यापासून जगताची उत्पत्ति होते, व कल्पकालाचा अंत होण्याची वेळ आली म्हणजे पुनः परमात्म्यामध्येंच जगताचा उपसंहार होतो. वसंतादिक ऋतूंमध्यें ज्याप्रमाणें त्या त्या ऋतूंना अनुसरून पल्लवकुसुमादिक ऋतुचिन्हें प्रकट होतात, व त्या त्या ऋतूंची समाप्ति झाली म्हणजे तीं तीं चिन्हें अदृश्य होतात, त्याप्रमाणें, प्रत्येक कल्पाच्या उत्पत्तिसमयीं त्या त्या विशिष्ट वस्तु प्रकट होतात व कल्पाच्या प्रलयसमयीं त्या पुनः अदृश्य होतात; त्यांचा आत्यंतिक नाश म्हणून केव्हांही होत नाहीं. ऋषीहो, ह्या कल्पाच्या उत्पत्तीला व प्रलयाला वास्तविक कारण मायेची अद्वितीय शक्ति हें होय. परब्रह्मरूपाच्या यथातथ्य ज्ञानानें मायेचें पारतंत्र्य अनुभवास आलें म्हणजे ह्या जगताची तुच्छता तात्काळ मनांत ठसते, व मग जीव हा परमात्म्याच्या सच्चिन्मयरूपांत लीन होऊन शाश्वतसुखाचा उपभोग घेऊं लागतो; असो. जोंपर्यंत ज्ञानरूप सूर्यानें मायारूप अंधकाराचा नाश झाला नाहीं, तोंपर्यंत, भूतांचा संहार करणारें व त्यांस पुनः जन्म देणारें असें हें आद्यंतरहित कालचक्र ह्या ब्रह्मांडांत एकसारखें फिरत राहतें, हें ध्यानांत ठेवा.

देवसृष्टि.

ऋषीहो, ज्या बृहत् अंड्यामध्यें ज्ञानमय परमात्म्यानें प्रवेश केला म्हणून तुम्हांस सांगितलें, त्या बृहत् अंडयांतील चैतन्यापासूनच पुढें देवादिक चेतनसृष्टि उदय पावली. मुख्य देव तेहेतीस आहेत. आठ वसु, अकरा रुद्र, बारा आदित्य, इंद्र व प्रजापति हे ते होत. ह्या तेहेतीस कोटींपासूनच (मुख्य वर्गांपासूनच) तेहेतीसशें, आणि पुढें तेहेतीस हजार देव झाले; हेंही देवसृष्टीचें संक्षिप्त लक्षणच होय. कारण, ह्यांच्या विभूति अगणित आहेत. दिवःपुत्र, बृहद्भानु, चक्षु, आत्मा, विभावसु, सविता, ऋचीक, अर्क, भानु, आशावह, रवि व सह्य[१] हे बारा आदित्यही भगवत्तेजापासूनच निर्माण झाले असून सह्य हा त्यांतील श्रेष्ठ होय. ह्या सह्यास देवभ्राट् नांवाचा पुत्र झाला, व त्यापासून पुढें सुभ्राटाचें जन्म झालें. दशज्योती, शतज्योती व सहस्रज्योती हे तीन सुभ्राटाचे पुत्र होत. हे महाज्ञानी असून ह्यांस संतति वगैरे विपुल झाली. दशज्योती म्हणजे महात्मा अग्नि होय. धूम्रा, अर्ची, उष्मा, ज्वलिनी, ज्वालिनी, विस्फुलिंगिनी, सुश्री, सुरूपा, कपिला व हव्यकव्यवहा ह्या दहा दशज्योतीच्या ज्योती किंवा कळा

१ सह्य ह्याच्या जागीं मह्य असाही पाठभेद आढळतो.

समजाव्या. शतज्योती म्हणजे प्रत्यक्ष चंद्रच होय. ह्या देवतेचें हृदय हें निवासस्थान आहे. मूर्धन्या, सौरी वगैरे हृदयाच्या ज्या शंभर नाडिका, त्याच ह्या शीतरश्मीच्या शत ज्योती समजाव्या. सहस्रज्योती म्हणजे सहस्र किरणांनीं प्रकाशमान होणारा भगवान सूर्य होय. दशज्योतीला दहा सहस्र पुत्र झाले, शतज्योतीपासून एक लक्ष पुत्र जन्मले, व सहस्रज्योतीपासून दहा लक्ष पुत्र जन्मास आले. ऋषीहो, ब्राह्मणवंश, कुरु,[१] यदु, भरत, ययाति व इक्ष्वाकु ह्यांचे वंश, आणि इतर सर्व राजवंश हे अग्नि, चंद्र व सूर्य ह्या देवतांपासूनच उत्पन्न झाले आहेत. तसेंच, सर्व ब्रह्मांडांत ओतप्रोत भरलेल्या ह्या विविध भूतसृष्टीचें देखील उद्गमस्थल ही देवसृष्टिच होय. ह्या देवसंघापासूनच मानवांचीं वसतिस्थानें म्हणजे ब्राह्मणांचे आश्रम, तीर्थादि पुण्यक्षेत्रें, भूपतींचे राजवाडे व नगरें, आणि अन्यजातीयांच्या व्यवसायभूमिका वगैरे उत्पन्न झाल्या. तसेंच ज्ञानमार्ग, कर्ममार्ग व उपासनामार्ग, धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चतुर्विध पुरुषार्थ व तत्प्रतिपादक अनेक शास्त्रें, आणि आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद वगैरे सर्वांचीं उत्पत्तिही ह्या परमप्रतापवान देववर्गापासूनच झाली.

भारताचा विषय व अभ्यास.

ऋषीहो, ह्या भारत ग्रंथांत देवसृष्टि, भूतसृष्टि, चतुर्विध पुरुषार्थ, तत्प्रतिपादक श्रुतिस्मृति व शास्त्रें इत्यादि अनेक विषयांचें यथासांग विवेचन केलें आहे. सृष्टीचा हा सर्व उपक्रम व उपसंहार, भगवान बादरायणांस योगबलानें गोचर झाला. दृढ समाधीच्या अनुष्ठानानें त्यांच्या हृदयांत संपूर्ण इतिहास व सकल श्रुति प्रकट झाल्या, आणि त्यांनीं त्या सर्वांचा ह्या ग्रंथांत तात्पर्यरूपानें संग्रह केला. हें भारतात्मक ज्ञानकांड श्रीव्यासांनीं संक्षिप्त व विस्तृत अशा दोन्ही रूपांनीं निरूपण केलें आहे. कोणत्याही विषयाचें संकुचित व विकसित स्वरूपानें प्रतिपादन केलें असतां त्याची उपस्थिति राखण्यास उत्तम साधन होतें, ह्यास्तव विद्वान लोकांस हा दुहेरी मार्ग फारच प्रशस्त वाटतो.

ऋषीहो, ह्या महाभारत ग्रंथास कोठून आरंभ होतो म्हणून म्हणावें ह्याजबद्दल मतभेद आहे. कित्येकांच्या मतें " ॐ नमो भगवते वासुदेवाय " ह्या महामंत्रापासून महाभारत ग्रंथास प्रारंभ होतो; कित्येकांचा अभिप्राय आस्तीकाचे[२] चरित्रापासून ह्या ग्रंथाचा आरंभ समजावा, असा आहे; आणि उपरिचरवसूंच्या[३] आख्यानापासून भारताचा आरंभ मानावा असें कित्येक लोक म्हणतात; असो. ह्याचा आरंभ कोठून कां होईना, ह्याच्या महतीबद्दल व ज्ञानप्रतिपादकत्वाबद्दल मुळींच मतभेद नाहीं. हा ग्रंथ सर्वांस एकसारखा अमोलिक व श्रेष्ठ वाटतो, आणि प्रत्येक सहृदय पुरुष ह्याचें मनापासून अध्ययन करितो. महान महान ज्ञाते लोक भारतसंहितेचा अर्थ नानाविध प्रकारांनीं व्यक्त करितात; कांहींजण ह्या ग्रंथाचें प्रांजलपणें व्याख्यान करितात; आणि कित्येक अहर्निश श्रवण, मनन व निदिध्यास चालवितात.

व्यासांस ब्रह्मदेवांचें दर्शन.

ऋषीहो, भगवान व्यासांनीं उग्र तपश्चर्या व कडकडीत ब्रह्मचर्य ह्यांच्या योगें समाधियोग सिद्ध केल्यावर सनातन वेदाचे विभाग केले, आणि त्यांतील तत्त्वांचें विवेचन करण्याकरितां त्यांनीं ह्या परमपावन इतिहासाची अंतर्यामीं सुव्यवस्थित रचना केली. परंतु इतकें झालें तरी त्या महात्म्याच्या चित्तास समाधान वाटलें नाहीं. अशा प्रकारचा दिव्य ग्रंथ फक्त तयार झाला म्हणजे कार्यभाग आटोपला असें नव्हे; तर सर्वतोमुखीं अभ्यास चालून ह्यांतील सिद्धांतांचें पठन जर

१ पृष्ठ १ मधील पारिग्राफ २ च्या आरंभापासून. २ आदिपर्व अध्याय १३ पासून. ३ आदिपर्व अध्याय ६३ पासून.

प्रत्येकाकडून सदासर्वकाळ होईल तरच अशा ग्रंथाचें साफल्य झालें असें समजलें पाहिजे, नाहीं तर हे केवळ श्रमच होत, अशी त्या महात्म्याच्या चित्तास एकसारखी तळमळ लागली व तो मोठ्या चिंतेंत पडला. ह्याप्रमाणें भगवान व्यासांच्या मनास अस्वस्थता उत्पन्न होऊन ते विवंचना करीत असतां, सर्वलोकगुरु ब्रह्मदेव ह्यास अपरोक्षज्ञानानें तें विदित झालें, व ते स्वतः लोकहित करण्याच्या वासनेनें प्रेरित होऊन भगवान व्यासांचा मनोरथ पूर्ण करण्याकरितां त्या ठिकाणीं प्रकट झाले. विश्वाधिपति ब्रह्मदेव त्या स्थलीं प्राप्त होतांच मुनिश्रेष्ठ बादरायण व त्यांच्या भोंवतीं अधिष्ठित असलेले दुसरे ऋषि ह्यांची एकच लगबग उडाली, त्या सर्वांनीं प्रेमपूर्वक हात जोडून त्या देवाधिदेवास उत्थापन दिलें, आणि आसनपरिग्रह करण्याविषयीं प्रार्थना केली. नंतर परात्परगुरु ब्रह्मदेवांनीं आसनाचा स्वीकार केला व व्यासप्रमुख सर्व मुनि त्यांस प्रदक्षिणा घालून त्यांच्या समीप उभे राहिले. तेव्हां ब्रह्मदेवांनीं त्यांस बसण्याविषयीं आज्ञा केली, आणि तदनुसार ते मोठ्या आनंदानें ब्रह्मदेवांच्या आसनासमीप बसले. नंतर महातेजस्वी व्यास ऋषि परमेष्ठी ब्रह्मदेवाशीं बोलूं लागले.

भारताचें स्वरूप व व्यासांची चिंता.

व्यास म्हणाले:—भगवन् ब्रह्मदेवा, मीं अत्यंत श्रेष्ठ असें काव्य रचिलें असून त्यांत अनेक विषयांचें प्रतिपादन केलें आहे. वेदांचें रहस्य, त्यांतील इतर विस्तार, सांगोपांग उपनिषदें, इतिहास, पुराणें, काळाची त्रिविध स्थिति, जरा, मृत्यु, भय, व्याधि, अस्तित्व व अभाव ह्यांचा निश्चय, धर्माधर्मविचार, 'आश्रमांचीं लक्षणें, चातुर्वर्ण्य, तपश्चर्या व ब्रह्मचर्य' ह्यांचें यथास्थित विवेचन, पुराणांतील कथानिर्देश, पृथ्वी व युगें, चंद्र व सूर्य, ग्रह व नक्षत्रें, आणि इतर तारका ह्यांचें प्रमाण, ऋग्यजुस्सामसंज्ञक वेदत्रयी, ब्रह्मज्ञान, न्याय, शिक्षा, चिकित्सा, दान, पाशुपत म्हणजे पशु जो जीव त्याचा पति म्हणजे त्याच्या अंतर्यामीं असणारा जो भगवान त्याचें माहात्म्य, प्राक्तनानुरूप दिव्य अथवा मानुष जन्म, पुण्यतीर्थें, पवित्र देश, नद्या, पर्वत, वनें व समुद्र, महान महान नगरें, धनुर्वेदांतर्गत युद्धोपयोगी शस्त्रास्त्रविचार, जात्यनुसार भाषाभेद, लोकाचाराचें निरूपण करणारें नीतिशास्त्र, आणि सर्वव्यापक परब्रह्म ह्या सर्वांचें मीं आपल्या काव्यांत प्रतिपादन केलें आहे. परंतु ह्या काव्याचा लोकांत प्रसार व्हावा व त्याच्या द्वारें काव्यरचनेचा हेतु सिद्धीस जावा, ह्यास्तव चतुर लेखक कोण मिळेल म्हणून मी चिंतन करीत आहें; पण मला हवा असा लेखक ह्या पृथ्वीवर मला आढळेंत नाहीं.

व्यासचिंतापरिहार.

ब्रह्मदेव म्हणाले:—हे व्यासा, ह्या भूतलावर तपोनिष्ठ व महाज्ञानी असे अनेक ऋषि आहेत, परंतु त्यांमध्यें तुझ्याप्रमाणें अध्यात्मशास्त्रांत एकही पारंगत नाहीं; ह्यास्तव मी तुला सर्व ब्रह्मवेत्त्यांत अग्रपद देतों. बाबारे, तुझी वाणी सत्य व वेद ह्यांस अनुसरून आहे, ह्याकरितां तूं आपल्या ग्रंथास काव्य म्हणून जी संज्ञा दिली आहेस ती खरोखरीच अन्वर्थक होईल; आणि ज्याप्रमाणें गृहस्थाश्रमावर वरचढ करण्यास दुसरा एकही आश्रम समर्थ नाहीं, त्याप्रमाणें तुझ्या काव्यावर वरचढ करण्यास दुसरें कोणतेंही काव्य समर्थ होणार नाहीं. हे पराशरपुत्रा, हें तुझें काव्य लिहिण्यास विद्याधिपति विघ्ननायक गणपतिच योग्य होय. तूं त्याचें स्मरण कर, म्हणजे तो प्रकट होऊन तुझी चिंता दूर करील.

व्यासगणपतिसंवाद.

सौति म्हणाला:—शौनकादि ऋषीहो, व्यासांस ह्याप्रमाणें सांगून जगद्गुरु ब्रह्मदेव स्वस्थानीं निघून गेले. नंतर व्यासांनीं गणनायकाचें स्मरण केलें, आणि स्मरण करितांच भक्तकामकल्पद्रुम

भगवान हेरंब त्या स्थळीं प्रकट झाले. पुढें पूजा वगैरे होऊन ते आसनाधिष्ठित झाले असतां सत्यवतीसुत व्यास त्यांस म्हणाले, "हे विघ्नेशा, मीं भारत ग्रंथाची मनांत रचना केली असून तो मी स्वतः सांगत आहें; तर तूं त्याचा लेखक हो." ऋषीहो, तें ऐकून गणाधीश म्हणाले, "बा व्यासा, तुझें म्हणणें मला मान्य आहे; परंतु माझी अशी अट आहे कीं, मी लिहीत असतांना माझी लेखणी क्षणभरही थांबणार नाहीं असें तूं कबूल करीत असल्यास मी लेखक होईन." व्यासांनीं म्हटलें, "तुझी अट मी मान्य करितों; परंतु ह्यावर माझें म्हणणें इतकेंच आहे कीं, तूं जें कांहीं लिहिशील त्याचा अर्थ मनांत आणून तूं तें लिहीत जा, म्हणजे माझी कांहींच हरकत नाहीं." ऋषीहो, ह्याप्रमाणें व्यासांनीं गजाननांस सांगितल्यानंतर गजाननांनीं 'ठीक आहे' असें म्हणून हातांत लेखणी घेतली, आणि मग भारतलेखनाचें काम सुरू झालें.

कूटश्लोक.

ऋषीहो, पुढें व्यासांनीं भारत ग्रंथ सांगितला व गणेशांनीं तो लिहिला. ह्यांत व्यास मुनींनीं कित्येक स्थळीं मुद्दाम कौतुकानें असा कांहीं गूढ अर्थ ठेविला आहे कीं, तो उकलणें फारच कठिण आहे. "ह्या ग्रंथांतील अठ्ठायशीशें श्लोक एक मला अथवा शुकाला मात्र बरोबर रीतीनें कळले आहेत. संजय हा महाज्ञानी खरा, परंतु त्याला हे श्लोक कळले आहेत कीं नाहींत ह्याची वानवाच आहे," असें खुद्द व्यासांनींच प्रतिज्ञेवर सांगितलें आहे. शौनका, महाभारत ग्रंथांतील हीं अठ्ठायशीशें कूटें अर्थ व तदाश्रित शब्द ह्यांच्या दुर्बोधत्वामुळें इतकीं बिकट झालीं आहेत कीं, त्यांचा अर्थ सुबोधपणें व्यक्त करणें अद्यापही अशक्यच आहे. ऋषीहो, सर्वज्ञ गणेश ह्या कूटश्लोकांचा अर्थ ध्यानांत आणण्याकरितां जों थोडा वेळ मनन करीत बसत, तों व्यास मुनि दुसरे अनेक श्लोक रचून तयार करीत, व त्यामुळें लेखनाचा आणि कथनाचा ओघ एकसारखा अव्याहतपणें चालू राही.

भारताचें महत्त्व.

ऋषीहो, ह्या ग्रंथाचें महत्त्व काय सांगावें? अज्ञानरूप तिमिरानें अंध झालेल्या लोकांचे नेत्र उघडण्याकरितां ज्ञानरूप अंजनाची ही शलाकाच होय. अहो, ह्या महाभारतरूप सूर्यानें धर्म, अर्थ, काम व मोक्ष ह्या चतुर्विध पुरुषार्थांचें संक्षिप्त व विस्तृत विवेचन करून सर्व मनुष्यजातीचें अज्ञानतम नष्ट केलें आहे. अहो, ह्या भारतपुराणरूपी पूर्णचंद्राच्या उदयानें सर्वत्र श्रुतिरूप किरण विकीर्ण होऊन मानवबुद्धिरूप कुमुदें प्रफुल्लित झालीं आहेत. अहो, ह्या भारतसंज्ञक इतिहासरूप प्रदीपानें अखिलब्रह्मांडरूप मंदिरांतील मोहपटलाचा विध्वंस करून सर्वत्र ज्ञानप्रभा प्रसृत केली आहे. अहो, हा भारतग्रंथ म्हणजे एक महान वृक्षच होय. संग्रहाध्याय हें ह्याचें बीज समजावें. पौलोमपर्व व आस्तीकपर्व हीं ह्याचीं मुळें होत. संभवपर्व, हा स्कंधविस्तार समजावा. सभापर्व व वनपर्व हीं ह्या वृक्षावर पक्षी बसण्याचीं स्थानें होत. अरणीपर्व हा ह्या वृक्षास अनुपम शोभा प्राप्त करून देणारा अलंकार समजावा. विराटपर्व व उद्योगपर्व हें ह्या ग्रंथाचें सत्त्व होय. भीष्मपर्व हीं ह्या वृक्षाची प्रचंड शाखा समजावी. द्रोणपर्व हीं ह्या भारतवृक्षाचीं पर्णें होत. कर्णपर्व हें ह्या वृक्षावरील शुभ्र पुष्पांच्या स्थानीं समजावें. शल्यपर्व हा ह्या वृक्षाचा सुगंध होय. स्त्रीपर्व व ऐषीकपर्व ही ह्या वृक्षाची थंडगार सावली समजावी. शांतिपर्व हें ह्या वृक्षाचें महाफळ होय[१]. अश्वमेधपर्व हा वृक्षाचा

१ आठरा पर्वांपैकीं अनुशासन पर्वाचाच तेवढा उल्लेख केला नाहीं. कदाचित्, शांतिपर्व आणि अनुशासनपर्व ह्यांतील विषय सामान्यतः एकच असल्यामुळें त्याचा उल्लेख केला नसावा.

अमृततुल्य मधुर रस समजावा. आश्रमपर्व हें ह्या वृक्षाचें अधिष्ठान होय; आणि मौसलादि पर्वें हे ह्या वृक्षाचे शाखाप्रपल्लव होत. ऋषीहो, महाभारत ग्रंथ हा प्रत्यक्ष मूर्तिमान वेदवृक्षच असल्यामुळें महान महान ब्रह्मनिष्ठ पुरुष ह्या वृक्षाचा नित्य व निरंतर आश्रय करितात. अहो, ह्या भूतलावर जे जे श्रेष्ठ कवि उदय पावतील, त्या सर्वांना भारतवृक्ष हा जणुं काय एक मोठा आधारस्तंभच होईल; आणि ज्याप्रमाणें पर्जन्याच्या योगें सर्व प्राण्यांचें उपजीवन चालतें, त्याप्रमाणें ह्या दिव्य वृक्षाच्या योगें भूतलावरील सर्व रसिक व ज्ञानसंपन्न जनांचें अखंड उपजीवन चालेल. ऋषीहो, हा भारतवृक्ष इतका अपूर्व आहे कीं, ह्यावर धर्मरूप व मोक्षरूप सरस आणि स्वादिष्ट फलपुष्पांचा बहर सदोदीत एकसारखा राहून त्यांत इंद्रादि लोकपालांकडूनही वैगुण्य उत्पन्न होणार नाहीं; असो.

भारतकथेचा आरंभ.

ऋषीहो, भगवान व्यास हे पराशर व सत्यवती ह्यांचे पुत्र होत. व्यासांचें जन्म झाल्यानंतर सत्यवतीचा विवाह शंतनु राजाशीं झाला. शंतनूचा सत्यवतीशीं विवाह होण्यापूर्वीं त्यास गंगेपासून भीष्म हा झाला होता. शंतनु राजाला सत्यवतीच्या उदरीं चित्रांगद व विचित्रवीर्य असे दोन पुत्र झाले. शंतनूच्या पश्चात् भीष्मानें चित्रांगदास राज्यावर बसविलें, परंतु तो अल्पवयांतच चित्रांगद नामक गंधर्वाच्या हातून मरण पावला. नंतर भीष्मानें विचित्रवीर्यास राज्यपद दिलें, आणि अंबिका व अंबालिका ह्या दोन वधूंशीं त्याचा विवाह केला.. पण त्यासही संतति वगैरे होण्यापूर्वींच अकालीं मृत्यूनें गांठिलें! तेव्हां विचित्रवीर्याची माता सत्यवती व सापत्न भ्राता भीष्म ह्यांस मोठा विचार पडला कीं, आतां पुढें कसें करावें? इतक्यांत सत्यवतीला विचार सुचून, आपण कौमारस्थितींत असतां पराशरापासून झालेल्या व्यासाचें तिनें स्मरण केलें. तेव्हां तात्काळ व्यास मुनि त्या ठिकाणीं प्रकट झाले, व त्यांनीं, काय आज्ञा आहे? म्हणून मातेस प्रश्न केला. तेव्हां तिनें भीष्माचें अनुमोदन घेऊन विचित्रवीर्याच्या क्षेत्रांत म्हणजे अंबिका व अंबालिका ह्या दोन धर्मपत्न्यांच्या ठिकाणीं पुत्र उत्पन्न करण्याविषयीं व्यासांस आज्ञा केली. नंतर व्यासांनीं मातेच्या आज्ञेवरून अंबिका व अंबालिका ह्यांच्या ठिकाणीं दोन पुत्र निर्माण केले; व तसाच त्या दोन स्त्रियांच्या दासीच्या ठिकाणीं एक पुत्र उत्पन्न केला, आणि ते पुन: तपश्चर्येचें अनुष्ठान करण्याकरितां बदरिकाश्रमीं निघून गेले. ऋषीहो, पुढें अंबिका, अंबालिका व त्यांची एक दासी ह्यांच्या उदरीं अनुक्रमें धृतराष्ट्र, पांडु व विदुर हे वैश्वानराप्रमाणें अत्यंत देदीप्यमान असे तीन पुत्र जन्मास आले. नंतर ते लहानाचे मोठे होऊन त्यांस पुत्रपौत्रादि संतति झाली, व अखेरीस त्यांस जगाच्या राहाटीप्रमाणें काळवश व्हावें लागलें; असो. ऋषीहो, त्या धृतराष्ट्रादिकांच्या मरणानंतर ह्या मृत्युलोकांत भगवान व्यासांनीं महाभारताची रचना केली; आणि पुढें जनमेजयानें सर्पसत्र आरंभिलें असतां त्यांत त्यानें व्यासांस भारत सांगण्याची प्रार्थना केली, तेव्हां त्या महर्षींनीं आपल्या समीप अधिष्ठित असलेल्या वैशंपायनांस आज्ञा करून, त्यांजकडून, सहस्रावधि सदस्यांसह सर्पसत्रास प्रवृत्त झालेल्या जनमेजयास, यज्ञक्रिया करीत असतां मध्यंतरीं मधून मधून जो विसांवा मिळतो त्यामध्यें भारत निवेदन केलें. ऋषीहो, ह्या भारत ग्रंथांत व्यासांनीं कुरुवंशाचा विस्तार, गांधारीचें पातिव्रत्य, विदुराची बुद्धि, कुंतीचें धैर्य, तसेंच श्रीकृष्णाचें माहात्म्य, पांडवांची सत्यनिष्ठा व दुर्योधनादिकांचें दुराचरण ह्यांचें मोठें हृदयंगम चित्र काढिलें आहे.

भारताची संख्या व व्याख्यानें.

ऋषीहो, मी जें हें भारत तुम्हांस सांगत

आहे, तें मूळचें एक लक्ष आहे. त्यामध्यें भारतसंहिता चोवीस हजार असून राहिलेल्या शाहात्तर हजार श्लोकांत सच्छील पुरुषांच्या मनोवेधक कथा वर्णिल्या आहेत. कथाभाग शिवाय करून बाकी राहिलेला चोवीस हजार संहिताग्रंथ हा एवढा अवाढव्य असल्यामुळें त्यांतील तत्त्वें व आख्यानें यथास्थितपणें मनांत आणणें अवघड आहे. ह्यास्तव भगवान बादरायणांनीं त्या विस्तृत ग्रंथाचा संकोच करून दीडशें श्लोक रचिले, व त्यांत भारत ग्रंथाचीं सर्व पर्वे व त्या पर्वांतील विविध वृत्तांत संकलित रूपानें निरूपण केले. विप्रहो, ह्या अध्यायास अनुक्रमणिकाध्याय असें नांव आहे; कारण त्यांत सर्व ग्रंथाची अनुक्रमणिका सांगितली आहे.

हा महाभारत ग्रंथ प्रथम भगवान द्वैपायनांनीं आपला पुत्र शुक ह्यास निवेदन केला, व नंतर तो दुसऱ्या अनेक सत्पात्र शिष्यांस सांगितला.

भगवान व्यासांनीं प्रथम एक लक्ष श्लोकांत महाभारत ग्रंथाची रचना केल्यावर त्यांनीं आणखी एकुणसाठ लक्ष श्लोक रचले, व एकंदर साठ लक्ष श्लोकांची दुसरी एक भारतसंहिता तयार केली. ह्या संहितेपैकीं तीस लक्ष संहिता देवलोकीं प्रसिद्ध आहे; पंधरा लक्ष संहिता पितृलोकीं प्रसिद्ध आहे; चौदा लक्ष संहिता गंधर्वलोकीं प्रसिद्ध आहे; आणि आतां मी सांगत आहें ही एक लक्ष संहिता मृत्युलोकीं प्रसिद्ध आहे.

देवलोकांत प्रतिष्ठित असलेल्या भारतसंहितेचें व्याख्यान देवर्षि नारद ह्यांनीं केलें; पितृलोकांतील संहिता असित व देवल ह्यांनीं पितरांस सांगितली; गंधर्वलोकीं गंधर्व, यक्ष व राक्षस ह्यांस शुकाचार्यांनीं ती निवेदित केली; आणि ह्या मानुष लोकांत वैशंपायन ऋषींनीं हिचें निरूपण केलें. ऋषीहो, वैशंपायन मुनि हे भगवान व्यासांचे मुख्य शिष्य असून केवळ धर्माची मूर्ति होत. श्रुतिस्मृत्यादि ग्रंथांत आजपर्यंत जे जे निष्णात होऊन गेले, त्यांमध्यें वैशंपायनांची अग्रस्थानीं गणना केली पाहिजे. ऋषीहो, त्या परमसमर्थ वैशंपायनांपासून श्रवण केलेलें हें एक लक्ष महाभारत मी तुम्हांस सांगत आहें, तर तुम्ही सावधान चित्तानें ऐका व त्याचें उत्तम प्रकारें मनन करून आपल्या जन्माचें साफल्य करा.

कौरवपांडवांचे वंश व त्यांवर वृक्षांचें रूपक.

तपोधनहो, महाभारत ग्रंथाचें रहस्य तुमच्या मनांत उत्तम प्रकारें प्रतिबिंबित होण्याकरितां कौरव व पांडव ह्या दोन प्रबळ पक्षांचें रूपक आधीं निरूपण करणें इष्ट आहे. मुनीहो, कौरवपक्षाचा अधिपति दुर्योधन हा होता, व पांडवपक्षाचा अधिपति युधिष्ठिर हा होता. दुर्योधन हा, अहंकारापासून उत्पन्न होणाऱ्या द्वेष, ईर्ष्या, मत्सर इत्यादि दुष्ट मनोविकारांचा पुतळा असल्यामुळें, कौरववंशास अहंकारवृक्ष असें नांव दिलें असतां चालेल. ह्या वृक्षांत अभिसरण पावणारे नानाविध रस म्हटले म्हणजे क्रोध, द्रोह, राग, द्वेष हेच होत; व ह्यामुळें ह्या वृक्षाचें खोड, शाखा, पुष्पें, फळें वगैरे सर्व अंगें व उपांगें दुष्ट मनोवृत्तींच्या मूर्ति होत्या. कर्ण हें ह्या कौरववृक्षाचें खोड होय; शकुनि ह्या त्याच्या शाखा समजाव्या; फलपुष्पांच्या जागीं दुष्ट दुःशासनाची योजना करावी; व मूर्ख धृतराष्ट्र हा ह्या विषवृक्षाचें मूळ असें मानिलें पाहिजे. ऋषीहो, दुर्योधनादिक शत पुत्र धृतराष्ट्रापासून जन्म पावले म्हणून मी धृतराष्ट्रास त्या अहंकाररूप वृक्षाचें मूळ मानितों असें समजू नका; तर दुर्योधनादिक पुत्रांविषयीं प्रेम धारण करून नीच धृतराष्ट्र सर्वस्वीं त्यांच्या अधीन झाला, व त्यांच्या इच्छेप्रमाणें वागावयास लागून त्यानें त्यांस अधिकाधिक दुष्ट कृत्यें करण्यास उत्तेजन दिलें, म्हणून धृतराष्ट्राचा अविवेक हेंच दुर्योधनादिकांच्या घोर कृत्यांचें बीज असें मी

मानितों, व कौरवकुलरूप हालाहलतरूचें धृतराष्ट्र हेंच मूळ असें मी म्हणतों.

ब्रह्मज्ञहो, आतां पांडवपक्षाच्या स्थितीचा विचार करा. त्या पक्षाकडील अग्रणी पुरुष युधिष्ठिर हा होता. त्याच्या ठिकाणीं शम, दम, सत्य, अहिंसा इत्यादिक अनंत सद्‌गुणांचें वास्तव्य असल्यामुळें, तो केवळ धर्माचा पुतळाच होता, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. कौरवपक्षाप्रमाणें पांडवपक्षावर वृक्षाचें रूपक करणें झाल्यास धर्मप्रमुख पांडवपक्ष हा प्रत्यक्ष धर्मवृक्षच होय, असें म्हटलें पाहिजे. दयादाक्षिण्यादि उदार मनोवृत्ति हे पांडववृक्षांतील नानाविध रस असून स्कंध, शाखा, पुष्पें, फळें इत्यादि अमृततुल्य अंगें व उपांगें हीं अर्जुन, भीमसेन, नकुल व सहदेव होत. पांडववृक्षाचा मुख्य आधार सत्त्वगुणमूर्ति भगवान श्रीकृष्ण परब्रह्म व ब्रह्मनिष्ठ ब्राह्मण हे असल्यामुळें त्या सर्वांस पांडवकुलरूप धर्मवृक्षाचें मूळ असें मी मानितों. ऋषीहो, परब्रह्मस्वरूप भगवान वासुदेवाची पूर्ण कृपा व प्रोत्साहन आणि महान महान उदारधींचा अनुग्रह व उपदेश ह्यांमुळें पांडववृक्ष सदासर्वकाळ निर्मल व धर्ममय राहिला !

पांडवांचें जन्मचरित्र.

ब्राह्मणहो, आतां मी तुम्हांस पांडवांचें जन्म वगैरे निवेदन करितों. अंबालिकेपासून व्यासवीर्यानें पांडूची उत्पत्ति झाली हें मीं तुम्हांस सांगितलेंच आहे. पांडु मोठा झाला तेव्हां भीष्मानें धृतराष्ट्रास राज्यासनावर न बसवितां पांडूस राज्यासनावर बसविलें, आणि कुंती व माद्री ह्यांशीं त्याचा विवाह करून दिला. राज्यपदीं आरूढ झाल्यावर पांडुराजानें आपल्या बुद्धिकौशल्यानें व पराक्रमानें अनेक देश जिंकून घेतले व आपलें सामर्थ्य सर्वत्र गाजविलें. पुढें एकदा तो आपल्या स्त्रियांसमवेत अरण्यांत वनविहार करण्यास गेला असतां त्याच्या हातून एक भयंकर कृत्य घडलें. आणि त्यामुळें एक घोर आपत्ति उत्पन्न झाली, ती अशी: एके दिवशीं पांडुराजा मृगयेंत निमग्न असतां दम नामक कोणीएक ऋषि मृगवेषानें आपल्या पत्नीशीं रतिक्रीडा करीत होता. त्या समयीं, पांडुराजानें अन्य मृगांवर जसे निःशंकपणें बाण सोडिले, तसा ह्या कामासक्त दम ऋषीवरही त्यानें निःशंकपणें बाण सोडिला, व त्या योगें तो ऋषि एकदम विव्हळ होऊन मरणोन्मुख झाला. नंतर त्या ऋषीनें तात्काळ आपलें पूर्वरूप धारण केलें, व प्राण सोडतांना पांडुराजास शाप दिला कीं, "राजा, तूंही असाच स्त्रीसमागम होतांच मृत्यु पावशील." ऋषीहो, तें शापवचन श्रवण करून पांडुराजास अनिवार दुःख झालें, व त्यानें आपल्या दोन्ही पत्न्यांस तो प्रकार विदित केला. तेव्हां पांडुराजाच्या स्त्रिया फार दुःखित झाल्या, व त्यांनीं, राजानें आपणांशीं रतिक्रीडा करण्यास प्रवृत्त होऊं नये अशी व्यवस्था ठेविली. ऋषीहो, पुढें पांडूनेंही विचार केला कीं, आपण राजवैभव उपभोगीत राहिल्यास आपल्याला स्त्रीसमागमाची आसक्ति उत्पन्न होईल; ह्यास्तव अरण्यांत देह क्षीण करून तपश्चर्येंत काळ घालवावा, व आपल्या देहाचें सार्थक्य करावें हेंच बरें. नंतर तो पांडुराजा भीष्माचें अनुमोदन घेऊन हिमालयाच्या शिखरावर स्त्रियांसहित जाऊन घोर तपश्चर्या करूं लागला, व तेथें त्यानें अनेक तपोनिष्ठ ब्राह्मणांच्या समागमें राहून आपला कालक्षेप पूर्ण वैराग्यानें चालविला. ऋषीहो, पांडुराजा व त्याच्या उभय स्त्रिया ह्याप्रमाणें वानप्रस्थाश्रमाचें आचरण करीत असतां एके समयीं कुंतीनें पांडुराजाची प्रार्थना केली कीं, "हे प्रियतमा, पुत्रप्राप्ति करून देणारे मंत्र दुर्वास ऋषींपासून मीं संपादन केले आहेत; आपली आज्ञा झाल्यास त्यांच्या जपानें मी पुत्र उत्पन्न करीन." विप्रहो, कुंतीचें तें भाषण श्रवण करून पांडुराजास मोठा संतोष झाला, व कुलस्त्रियांनीं आप-

त्काळीं विशिष्ट पुरुषाची प्रार्थना करून संतान-वृद्धि केली असतां त्यांत कोणताही दोष नाहीं, हा धर्म मनांत आणून पांडुराजानें कुंतीला अनुमोदन दिलें. तेव्हां तिनें यमधर्म, वायु आणि इंद्र ह्यांचे मंत्र जपून त्या देवांचें आह्वान केलें, आणि त्यांकरवीं आपल्या ठिकाणीं युधिष्ठिर, भीम व अर्जुन असे तीन पुत्र निर्माण करविले. मुनिवर्यहो, नंतर कुंतीपाशीं एक मंत्र अवशिष्ट राहिला होता तो तिनें पतीच्या आज्ञेनें माद्रीस अर्पण केला, आणि तिला त्याच्या योगें अश्विनीकुमारांपासून नकुल व सहदेव असे दोन पुत्र झाले. ह्याप्रमाणें पांडुराजास देवतुल्य पांच पुत्र झाले, आणि कुंती व माद्री ह्यांनीं त्यांचें उत्तम प्रकारें संगोपन केलें. पवित्र आश्रमांत जन्म व जन्मादारभ्य तपोनिधींचा समागम ह्या अपूर्व योगामुळें त्या धर्मादिक बालकांच्या ठिकाणीं नानाविध थोर थोर गुण उदयास आले, व त्यांजवर आश्रमांतील सर्व तपस्व्यांचें अतिशय प्रेम जडलें.

ऋषीहो, कामविकार हा अत्यंत प्रबळ शत्रु होय. कोणीही पुरुष कितीही सावधानचित्तानें कामवासनेचें नियंत्रण करीत असला, तरी किंचित् छिद्र पडतांच हा शत्रु त्यांतून प्रवेश करण्याकरितां एकसारखा टपत बसलेला असतो. पांडुराजानें वानप्रस्थाश्रमांत चित्ताची वृत्ति अंतर्मुख करून मनोविकारांचें संयमन केलें असतांही त्याचें चित्त प्रचलित झालें, व ती संधि साधून कामरिपूनें तें हस्तगत करून घेतलें, आणि राजाच्या मनांत माद्रीशीं समागम करण्याची वासना उत्पन्न केली. त्या वेळीं माद्रीनें राजाचें निवारण करण्याचा प्रयत्न केला; परंतु दैवाची गति विपरीत असल्यामुळें राजानें मदांध होऊन माद्रीचा बलात्कारानें उपभोग घेतला ! ऋषीहो, ब्रह्मशाप मोठा अमोघ असतो; ह्यास्तव रतिक्रीडेंत आसक्त होतांच पांडुराजा तात्काळ मरण पावला व सर्वत्र एकच हाहाकार झाला!

ऋषीहो, त्या प्रसंगीं माद्रीनें आपले पुत्र कुंतीच्या स्वाधीन करून आपल्या पतीबरोबर सहगमन केलें; व नंतर त्या आश्रमांत धर्मादिक पांच अनाथ बालकें व त्यांची माता महासाध्वी दीन अबला कुंती हीं मात्र राहिलीं. असो; पुढें हें वर्तमान हस्तिनापुरीं जाऊन पोहोंचलें. इकडे हिमाचलावरील तपस्व्यांनीं कुंतीसहित पांच पांडवांस हस्तिनापुरीं पोहोंचविण्याची तयारी केली, व ते त्या सर्वांस घेऊन हस्तिनापुरास दुर्योधनादिक कौरवांकडे गेले व त्यांस म्हणाले कीं, " कौरवहो, हे पांच बालक पांडूचे पुत्र असल्यामुळें तुमचे भ्राते आहेत. हे जरी लहान आहेत, आणि जटाधारी आहेत, तरी आचारविचारांनीं फार श्रेष्ठ आहेत; ह्यास्तव ह्यांजवर तुम्ही स्नेहभाव ठेवा, ह्यांस धनुर्वेदादिक विद्या शिकवा, आणि हे आपल्या कुळास शोभा आणितील व आपल्या कुळाची कीर्ति दशदिशांस प्रसृत करतील अशी व्यवस्था करा." शौनकादिक तपोधनहो, तपस्व्यांनीं धृतराष्ट्रप्रमुख कौरवांस ह्याप्रमाणें सांगितलें, व पांडुपुत्रांस कौरवांच्या स्वाधीन करून ते पुनः हिमालयावर आपल्या आश्रमांस निघून गेले. "हे लहान बालक पांडूचे पुत्र होत" असें त्या तपस्व्यांनीं सांगितलें तें ऐकून व त्या मनोहर बालकांस अवलोकन करून भीष्म, द्रोण, कृप वगैरे कौरवपक्षीय महात्म्यांस आणि इतर थोर थोर नागरिकांस व प्रजाजनांस फार आनंद झाला. तेथें कित्येक दुष्ट दुरात्मेही होतेच; त्यांनीं त्या मुलांस पाहून व त्यांची कोकोत्तररूपें निरीक्षण करून म्हटलें कीं, "अहो, पांडुराजा वास्तविकपणें किती तरी वर्षें म्हणजे दम ऋषीनें शाप दिला तेव्हांपासून , मृततुल्यच होता; ह्यास्तव, हे पांडूचे पुत्र आहेत, हें म्हणणें सर्वथा असत्य होय." ह्यावर पुनः शिष्टजनांनीं उत्तर दिलें कीं, "अहो, अशी भलतीच शंका घेणें प्रशस्त नव्हे; पांडुराजाच्या दोन्ही भार्या महापतिव्रता आहेत; ह्यास्तव ह्यांजकडून अनाचार

घडला अशी शंका काढणें हें शंका काढणारालाच पातकाला कारण होय. अहाहा! आज आम्ही किती धन्य झालों बरें! आमच्या सुदैवामुळें आम्हांस पांडुराजाचे हे पुत्र दृष्टीस पडले; अहो, ह्यांचें सर्वांनीं पूर्ण प्रेमानें स्वागत करणें हेंच इष्ट आहे." ऋषीहो, ह्याप्रमाणें कौरवसभेंत बरीच भवति न भवति झाली; इतक्यांत, सर्वत्र गुप्तरूपानें संचार करणाऱ्या भूतांनीं दशदिशांकडून पांडवांचा एकच जयजयकार केला; आकाशांतून पुष्पांची व सुगंधि द्रव्यांची विपुल वृष्टि झाली; शंखदुंदुभींच्या शब्दानें आकाश दुमदुमून गेलें; आणि पांडवांनीं राजवाड्यांत प्रवेश केला! ऋषीहो, त्या समयीं तो सर्व चमत्कार अवलोकन करून नागरिक जनांनीं पांडवांविषयीं इतके हर्षोद्गार काढिले कीं, तो जयसूचक ध्वनि स्वर्गमंडळास जाऊन पोंहोंचला!

ह्याप्रमाणें राजवाड्यांत पांडवांचा प्रवेश झाला. नंतर त्यांनीं सर्व वेद व विविधशास्त्रें ह्यांचा अभ्यास केला; आणि शस्त्रास्त्रांत प्रवीण होऊन ते निर्भयपणानें तेथें राहिले. विप्रहो, पांडव हे सद्गुणांचे केवळ निधिच होते. सर्वांच्या ठिकाणीं विनय व पराक्रम हे गुण एकसारखे वास करीत होते. धर्मराजामध्यें सर्वत्र समबुद्धि होती; भीमसेनाच्या अंगीं अपूर्व धैर्य होतें; अर्जुनाच्या ठिकाणीं विलक्षण शौर्य नांदत होतें; आणि नकुल व सहदेव ह्यांच्या ठायीं गुरुजनांविषयीं आदर व क्षमा हीं परिपूर्ण होतीं. पांडवांच्या ठिकाणीं असलेले हे सर्व गुण पाहून सर्व प्रजेस फार आनंद झाला, व सर्व लोक त्यांची वाहवा करूं लागले.

पांडवांचीं पराक्रमाचीं कृत्यें.

मुनिवर्यहो, पांडवांच्या अंगचा लोकोत्तर पराक्रम व दुसरे अद्वितीय गुण दृष्टिगोचर होण्यास फारसा काळ लागला नाहीं! द्रुपद राजानें आपल्या कन्येच्या स्वयंवराकरितां देशोदेशींचे राजे जमवून मत्स्ययंत्राचा पण लाविला असतां तें दुर्घट कृत्य अर्जुनानें सहज करून द्रौपदी मिळविली, आणि भूतलावरील सर्व धनुर्धाऱ्यांना तो वंदनीय होऊन त्याचा दरारा इतका बसला कीं, युद्धभूमीवर, मध्यान्हींच्या सूर्याप्रमाणें, कोणीही त्याकडे वर मान करून पाहीनासा झाला! ऋषीहो, पुढें धर्मराजाच्या मनांत जगतीतलावरील सर्व भूपालांस जिंकून राजसूय यज्ञ करावा अशी इच्छा उत्पन्न झाली असतां, अर्जुनानें सर्व राजे व सर्व सैन्यें जिंकून त्यांस आपल्या हस्तगत करून घेतलें. त्या प्रसंगीं श्रीकृष्णानें भीम व अर्जुन ह्यांजकडून जरासंधाचा व इतर अनेक दुर्धर वीरांचा नाश करविला, आणि शिशुपालास सक्रोध करूनही तो वळेना, तेव्हां भगवंतांनीं आपल्या सुदर्शनानें त्याचा वध केला. ऋषीहो, ह्याप्रमाणें सर्व पृथ्वी पादाक्रांत करून युधिष्ठिरानें राजसूय यज्ञ शेवटास नेला; व त्यांत अन्नदान, दक्षणा, ब्राह्मणसंतर्पण इत्यादि सर्व गोष्टी यथासांग करून आपली कीर्ति दशदिशांस प्रसृत केली. विप्रहो, त्या राजसूय यज्ञांत धर्मराजास अनेक राजांकडून नानाप्रकारचे नजरनजराणे आले: बहुमोल रत्नें, जडावाचे अलंकार, धेनु, हत्ती, अश्व, द्रव्य, चित्रविचित्र वस्त्रें, शिबिरांच्या कनाती, सुंदर गालिचे, उत्तम मृगाजिनें व अनेक प्रकारच्या सवज्या ह्यांना रीघ नाहींसा झाला. त्या समयीं कोशागारावर दुर्योधन होता. त्यानें तें सर्व ऐश्वर्य अवलोकन केलें, तेव्हां त्यास तें मुळींच सहन झालें नाहीं व तो अंतर्बाह्य संतप्त झाला. पुढें त्या संतापांत आणखीही भर पडली: मयासुरानें एक विमानतुल्य दिव्य सभा पांडवांना अर्पण केली होती. ती पाहण्याविषयीं दुर्योधनाच्या मनांत कौतुक उत्पन्न झालें व तो ती सभा पाहण्यास गेला. त्या सभेमध्यें मयासुरानें जलाच्या ठायीं स्थळ व स्थलाच्या ठायीं जल, भिंतीच्या ठायीं द्वार व द्वाराच्या ठायीं भिंत, असें भासवि-

ण्याचें विलक्षण कौशल्य केलें होतें; पण दुर्योधनास तें विदित नसल्यामुळें कोणेएके स्थलीं जलाची भ्रांति होऊन दुर्योधनानें आपलीं वस्त्रें सावरून घेतलीं, व दुसरे एके स्थलीं वास्तविक जल असतां तेथें स्थलाची भ्रांति होऊन तो त्यांत पडला; आणि तें पाहून श्रीकृष्णाच्या समक्ष एखाद्या ग्राम्य मनुष्याप्रमाणें भीमसेन दुर्योधनास हसला. ऋषीहो, हा उपहास दुर्योधनानें त्या वेळीं तसाच मनामध्यें ठेविला; परंतु पांडवांचें सर्व ऐश्वर्य हिरावून घेऊन त्यांचा सूड कसा घ्यावा हा विचार त्याच्या अंतःकरणांत एकसारखा घोळूं लागला. जरी तो नानाप्रकारचे सुखोपभोग घेऊन अतुल संपत्ति उपभोगीत होता, तरी त्याच्या हृदयांत मत्सराग्नीचा भडका झाल्यामुळें तो अगदीं कृश, पांढरा व कलाहीन असा झाला. पुढें धृतराष्ट्रास ही सर्व स्थिति समजली, तेव्हां त्यानें दुर्योधनाचा मानस काय आहे हें जाणिलें, व आपल्या सदसद्विवेकबुद्धीस झुगारून देऊन द्यूतादिक दुष्ट कृत्यें करण्यास दुर्योधनास अनुमोदन दिलें.

ऋषीहो, धृतराष्ट्रानें दुर्योधनास द्यूत खेळण्यास अनुमोदन दिल्याचें ऐकून भगवान श्रीकृष्णास अतिशय क्रोध उत्पन्न झाला; परंतु कालगतीवर लक्ष देऊन त्यानें तो बाहेर दिसूं दिला नाहीं. तथापि कौरवांनीं द्यूत वगैरे घोर कृत्यें आरंभिलीं असतां सच्छील पांडवांना अनेक दुर्धर यातना भोगाव्या लागतील, हें मनांत येऊन श्रीकृष्णास फार वाईट वाटलें. असो; दुर्योधनादिक दुरात्मे हे द्यूतादिकांच्या योगानें आतां पांडवांशीं कलह करतील, व अखेरीस विदुर, भीष्म, द्रोण व कृपाचार्य ह्यांच्याही आज्ञेचा अनादर करून ते भयंकर युद्धास प्रवृत्त होतील, आणि परिणामीं त्यांत एकमेकांचा संहार करून भूमीचा भार उतरतील, हें कांहीं वावगें नाहीं असें मनांत आणून धृतराष्ट्राच्या अनुमोदनाकडे व कृत्यांकडे श्रीकृष्णानें दुर्लक्ष केलें.

धृतराष्ट्राचें संजयाशीं भाषण.

ऋषीहो, लोकनायक प्रभूनें भविष्य केल्याप्रमाणें सर्व गोष्टी घडून आल्याः कौरव व पांडव ह्यांचें भयंकर युद्ध सुरू होऊन त्यांत क्षत्रियांचा संहार झाला, आणि दुर्योधनादिक सर्व धार्तराष्ट्रांचा वध होऊन धर्मादिक पांडव विजयी झाल्याचें वर्तमान संजयाकडून वृद्ध धृतराष्ट्रास विदित झालें. तेव्हां धृतराष्ट्र बराच काळपर्यंत स्तब्ध बसला. नंतर त्याच्या मनांत दुर्योधनादिकांच्या सर्व मसलती मूर्तिमंत उभ्या राहिल्या, व तो कांहीं वेळपर्यंत मनन करून संजयास म्हणाला, "संजया, मी जें कांहीं सांगत आहें, त्याचा नीट विचार कर. माझ्या सर्व स्थितीचा तू विचार करशील तर ह्या घोर अनर्थाबद्दल तूं मला दोष देणार नाहींस. बाबारे, तूं बहुश्रुत, धूर्त, ज्ञानी व सुज्ञ लोकांस मान्य असा आहेस; ह्याकरितां माझा आशय तुझ्या मनांत नीटपणें येईलच. अरे संजया, हा असा घोर संग्राम माजावा, व त्यांत सर्व कुलाचा क्षय व्हावा हें केव्हांही माझ्या मनांत नव्हतें. वास्तविकपणें दुर्योधनादिक हे माझे पुत्र, व युधिष्ठिरादिक हे पांडूचे पुत्र, हा भेदभाव माझ्या मनांत मुळींच नव्हता. परंतु माझे पुत्र पांडवाचा मत्सर करूं लागले, व 'ह्या म्हाताऱ्याला कांहींच कळत नाहीं' असे उद्गार काढून माझा तिरस्कार करूं लागले; त्यामुळें माझी मति गुंग झाली. संजया, काय करूं रे! मी आधींच अंधळा व दीन, आणि त्यांत पुत्रप्रेमानें पराधीन झालों; ह्यास्तव त्या मूर्ख दुर्योधनाबरोबर माझीही बुद्धि भ्रष्ट झाली! अरे, त्या महापराक्रमी पांडवाची संपत्ति राजसूय यज्ञांत जेव्हां दुर्योधनानें अवलोकन केली, व मयसभा पाहत असतां भीमादिकांनीं ज्या वेळीं त्याचा उपहास केला, त्या वेळीं तर त्या दुर्योधनाचा संताप अगदीं अनावर झाला. तेव्हां युद्धभूमीवर पांडवांचा पराभव करण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं असतें, तर तो

युद्धासच उभा राहिला असता; परंतु तें सामर्थ्य त्याच्या ठिकाणीं नव्हतें, ह्यास्तव अगदीं हताश होऊन जाऊन क्षत्रियास कलंक लावणाऱ्या कृत्यांनीं पांडवांची संपत्ति हरण करण्याची मसलत त्यानें योजिली. संजया, ह्या वेळीं दुष्ट शकुनीनें त्यास अधिकच प्रोत्साहन दिलें, व पांडवांशीं कपटद्यूत करून त्यांचें सर्वस्व हिरावण्याचा व्यूह रचिला. हे बुद्धिमंता, पांडव हिमाचलावरून हस्तिनापुरीं आले, तेव्हांपासून पुढें ज्या कित्येक गोष्टी मीं वेळोवेळीं ऐकिल्या, व त्यांजवरून माझ्या मनाचा जो कांहीं समज होत गेला, तें सर्व क्रमानें मी तुला सांगतों; त्याचें तूं नीट मनन कर, म्हणजे मीं कांहीं अविवेक केला कीं काय हें तुला कळून येईल. संजया, पांडवांचा जय होईल व कौरवांवर असा भयंकर अनर्थ गुदरेल, हें मीं आधींच अनुमान केलें होतें. द्रुपद राजाच्या सभेंत सर्व राजांच्यासमक्ष अर्जुनानें लक्ष्यभेद करून मत्स्य पृथ्वीवर पाडिला व द्रौपदी जिंकून घेतली, असें जेव्हां मीं ऐकिलें, तेव्हांच पांडवांच्या लोकोत्तर पराक्रमाविषयीं माझी खातरी झाली; आणि पांडवांशीं वैर करण्यांत अर्थ नाहीं, असा मीं निश्चय केला. संजया, पुढें अर्जुनानें यादवांचा पराजय करून श्रीकृष्णभगिनी सुभद्रा हिला हरण केलें, आणि बलराम व श्रीकृष्ण हे इंद्रप्रस्थास आले, असें जेव्हां मीं ऐकिलें, तेव्हांच, भगवान श्रीकृष्णाचें ज्यांस साहाय्य मिळालें, त्यांना अपकार करण्यास कोणीही समर्थ होणार नाहीं, हें मनांत येऊन माझ्या मनांतील विजयाशा अगदीं नाहींशी झाली. संजया, इंद्रानें खांडववनावर मुसळधार चालू केली असतां दिव्य बाण सोडून अर्जुनानें तिचा प्रतिकार केला व अग्नीस खांडववन देलें हें जेव्हां माझ्या कानीं आलें, तेव्हां तर माझा निश्चयच झाला कीं, देवादिकांना सुद्धां पांडवांचा पराभव करणें दुःसाध्य आहे; ह्याकरितां कौरवांनीं पांडवांपासून जय मिळविण्याची हाव धरणें हें सर्वथा व्यर्थ आहे. संजया, लाक्षागृहांतून कुंती व पांडव सुरक्षितपणें पार पडले, व त्यांचे हेतु परिपूर्ण करण्याकरितां प्रत्यक्ष विदुरच सिद्ध आहे, असें जेव्हां मला समजलें, तेव्हांच दुर्योधनादिकांची सर्व खटपट शेवटीं फुकट जाईल असा माझा निर्धार झाला. हे सुज्ञा, द्रुपदराजसभेंत अर्जुनानें पांचाली प्राप्त करून घेतली इतकेंच नव्हे, तर तिच्याबरोबर धृष्टद्युम्नादिक अनेक शूर शूर पांचाल वीर पांडवपक्षास येऊन मिळाले हें जेव्हां मीं ऐकिलें, तेव्हांच हें पुढील भविष्य माझ्या मनांत आलें. संजया, जरासंधासारखा महाप्रबळ वीर भीमसेनानें बाहुयुद्धांत मारिला हें जेव्हां मला विदित झालें, तेव्हांच माझा सर्व धीर सुटला. हे सारथे, पांडवांनीं यज्ञसमयीं भूतलावरील सर्व राजांस सामदानादिक गौण उपायांनीं न जिंकितां केवळ शासन करूनच हस्तगत केलें व आपला अपूर्व राजसूय यज्ञ सिद्धीस नेला, हें जेव्हां मला माहीत झालें, तेव्हांच पांडवांचा द्वेष करणें हा दुर्योधनादिकांचा अविचार आहे असें मीं स्पष्टपणें म्हटलें. संजया, दुःशासनानें एकवस्त्रा व रजस्वला अशा द्रौपदीला—ती रडत असतां राजसभेंत फरफर ओढीत नेलें व तिच्या भर्त्यांसमक्ष तिची विटंबना केली, हें जेव्हां मीं ऐकिलें, तेव्हांच, पतिव्रतेचा कोप कधींही अन्यथा होणार नाहीं असें मनांत येऊन कौरवांवर येणाऱ्या दुर्धर प्रसंगाचें मीं अनुमान केलें. संजया, दुष्ट दुःशासनानें द्रौपदीचें वस्त्र हरण करण्याचा प्रयत्न केला, व त्यानें कितीही वस्त्रें हरण केलीं तरी त्याला त्यांचा अंत लागला नाहीं, असें जेव्हां मीं ऐकिलें, तेव्हांच, भगवंताचें पाठबळ असल्यास कोणीही अपकार करण्यास समर्थ नाहीं, असा माझा पूर्ण सिद्धांत झाला, व दुर्योधनादिकांची जयाशा अगदीं मिथ्या आहे असें मीं ठरविलें. हे सूता, द्यूतामध्यें कपट करून शकुनीनें युधिष्ठिरास

जिंकिलें, व त्याचें सर्व राज्य हिरावून घेऊन त्यास वनांत दवडिलें त्या वेळीं त्याच्या मागोमाग त्याचे महापराक्रमी बंधुही वनांत गेले असें जेव्हां मीं ऐकिलें, तेव्हांच पांडवांच्या बंधुप्रेमाबद्दल व अगाध धैर्याबद्दल माझी खातरी झाली, आणि परिणामीं घोर अनर्थ गुदरेल असा माझा अभिप्राय ठरला. संजया, भीमादिक भ्राते युधिष्ठिराची इच्छा मोडणें हें अयोग्य होय असें मनांत आणून केवळ त्याचें मन न दुखविण्याकरितां धर्मराजाबरोबर वनवास भोगण्यास सिद्ध झाले, व त्याजबरोबर वनांत जातांना त्यांनीं बाहुदर्शनादि अनेक प्रकारांनीं कौरवांविषयीं संताप व उद्वेग व्यक्त केला, असें जेव्हां मला समजलें, तेव्हांच, हे सूड घेतील रे घेतील, असें मनांत येऊन माझ्या मनांत हा भावी अनर्थ मूर्तिमंत उभा राहिला. संजया, धर्मराजाबरोबर फक्त त्याचे बंधुच वनांत गेले असें नव्हे, तर तो वनांत असतां सहस्रावधि थोर थोर ब्रह्मवेत्ते पुरुष केवळ भिक्षेवर निर्वाह करून त्याच्या सहवासास जाऊन राहिले, असें जेव्हां मीं ऐकिलें, तेव्हांच माझ्या मनांत आलें कीं, ब्राह्मणांचा अनुग्रह ज्यावर आहे, त्यास अपयश येणें कधींही शक्य नाहीं. संजया, अर्जुनानें युद्धामध्यें किरातरूपधारी देवाधिदेव शंकराला संतुष्ट करून त्याजपासून पाशुपत अस्त्राची प्राप्ति करून घेतली असें जेव्हां मला कळलें, तेव्हांच अर्जुनाच्या अमानुष शक्तीची कल्पना होऊन कौरवांच्यानें पांडवांचा पराजय होणें दुष्कर आहे, असा माझा निश्चय झाला. संजया, सत्यप्रतिज्ञ अर्जुनानें स्वर्गलोकीं जाऊन प्रत्यक्ष इंद्रापासून देखील दिव्य अस्त्रांचा यथाविधि उपदेश ग्रहण केला, व आपली लोकोत्तर कीर्ति जगद्विख्यात केली; असें जेव्हां मीं ऐकिलें, तेव्हांच माझा सर्व धीर सुटला. संजया, कालकेय आणि वरप्राप्तीमुळें उन्मत्त होऊन देवांनाही दुर्जय झालेले पौलोम ह्यांस अर्जुनानें जिंकिलें असें जेव्हां मला समजलें, तेव्हांच पांडवांच्या अमोघ प्रतापाचें स्वरूप माझ्या लक्षांत आलें, व दुर्योधनानें पांडवांशीं कलह करण्यांत हित नाहीं, असें माझें ठाम मत झालें. संजया, असुरांचा नाश करण्याकरितां अर्जुन हा इंद्रलोकीं गेला व तेथें कृतार्थ होऊन परत आला, असें जेव्हां माझ्या कानीं पडलें, तेव्हांच माझी सर्व आशा मावळली. हे सारथे, भीम व दुसरे पांडुपुत्र हे कुबेराबरोबर मानवांना अगम्य अशा देशीं गेल्याचें जेव्हां मीं श्रवण केलें, तेव्हांच कौरवांच्या भावी नाशाची भीति माझ्या मनांत उद्भवली. संजया, माझे पुत्र कर्णाचा बुद्धिवाद मान्य करून घोषयात्रेच्या निमित्तानें द्वैतवनांत पांडवांना आपलें ऐश्वर्य दाखविण्याकरितां गेले असतां तेथें गंधर्वांनीं त्यांस बांधून नेलें व अखेरीस अर्जुनानेंच त्यांची सुटका केली, असें जेव्हां मला कळलें, तेव्हांच पांडवांची महाशक्ति व कौरवांचें दौर्बल्य हीं माझ्या मनांत पूर्णपणें ठसलीं. संजया, यमधर्मानें यक्षरूप घेऊन धर्मराजास कांहीं प्रश्न विचारिले व धर्मराजानें त्यांचीं समर्पक उत्तरें दिलीं, असें जेव्हां माझ्या कानीं आलें, तेव्हांच, यमधर्माचा प्रसाद झाला असतां मृत्यूचें भय तें कोठून राहणार? असें मनांत येऊन माझ्या मनांतील जयाशा अजीबात नष्ट झाली. संजया, पांडव हे विराट राजाकडे गुप्तरूपानें द्रौपदीसहवर्तमान राहत होते व असें असतांही माझ्या मुलांना त्यांचा पत्ता काढितां आला नाहीं, असें जेव्हां मला समजलें, तेव्हांच पांडवांच्या विलक्षण चातुर्याविषयीं माझी खातरी झाली व त्यांजबरोबर द्वेष करणें सर्वथा अयोग्य होय असें मीं ठरविलें. संजया, उत्तरगोग्रहणप्रसंगीं अर्जुनानें एकट्यानें माझ्या पक्षाकडील मोठमोठ्या वीरांचा पराजय केला असें जेव्हां मला समजलें, तेव्हां माझें सैन्य अर्जुनाशीं युद्ध करण्यास अगदीं निरुपयोगी आहे, अशी माझी पक्की

खातरी झाली; व कौरवांचे प्रयत्न कधींही सफल होणार नाहींत असा मीं सिद्धांत ठरविला. संजया, विराट राजानें आपली कन्या उत्तरा अलंकृत करून अर्जुनास अर्पण केली, परंतु अर्जुनानें तिचा स्वतांकरितां स्वीकार न करितां अभिमन्यूकरितां स्वीकार केला असें जेव्हां माझ्या कानीं पडलें, तेव्हांच मीं अर्जुनाच्या अंगीं इंद्रियजय कितपत आहे हें ओळखिलें, व इंद्रियजेत्या पुरुषापुढें प्रत्यक्ष काळाचाही पराक्रम चालणार नाहीं असें मनांत येऊन माझी जयाशा भग्न झाली. संजया, द्यूतामध्यें जिंकल्यामुळें निर्धन होऊन वनांत घालवून दिलेल्या युधिष्ठिराच्या पक्षास आप्तस्वकीयांचें पाठबळ नसतांही सात अक्षौहिणी सैन्य येऊन मिळालें असें जेव्हां मला समजलें, तेव्हांच कौरवांचें भवितव्य माझ्या मनांत येऊन चुकलें. हे महामते, सर्व पृथ्वीचें एका पावलांत आक्रमण करणाऱ्या भगवान लक्ष्मीपति श्रीकृष्णाचें पांडवपक्षाला पूर्ण साहाय्य असून तो अहर्निश पांडवांच्या हिताकरितां तत्पर आहे असें जेव्हां मला विदित झालें, तेव्हांच माझी जयाशा संपली. संजया, देवर्षि नारदाच्या मुखांतून " श्रीकृष्ण व अर्जुन हे प्रत्यक्ष नरनारायणच आहेत; कारण मी त्यांस ब्रह्मलोकीं पाहिलें असल्यामुळें ओळखितों," असें जेव्हां मीं ऐकिलें, तेव्हांच त्यांची असाधारण शक्ति माझ्या लक्षांत आली, व कौरवांनीं कृष्णार्जुनांशीं द्वेष करणें सर्वथा अयोग्य होय, असा माझा ग्रह झाला. संजया, घोर युद्ध होऊन भयंकर संहार न व्हावा, ह्यास्तव साम करण्याच्या इच्छेनें भगवान श्रीकृष्ण कौरवांकडे आले व दुर्योधनादिकांनीं त्यांचें कांहींएक न ऐकिल्यामुळें ते साम न करितां परत गेले असें जेव्हां मला कळलें, तेव्हांच हें पुढलें भाविष्य माझ्या पुढें मूर्तिमंत दिसूं लागलें. संजया, त्या प्रसंगीं कर्ण व दुर्योधन ह्यांनीं त्या भगवान लोकनायक श्रीकृष्णास कारागृहांत टाकण्याचाही यत्न केला व तेव्हां त्या विश्वव्यापक प्रभूनें आपलीं अनेक रूपें दाखविलीं, असें जेव्हां मीं ऐकिलें, तेव्हां तर माझ्या पुत्रांसारखे अविचारी पुरुष जगांत कोठें आढळणार नाहींत असा माझा पूर्ण सिद्धांत ठरला. बा संजया, भगवान वासुदेव द्वारकेस जाण्यास निघाले असतां त्यांच्या रथाच्या पुढें अनाथ कुंती एकटी उभी राहिली व तिचें त्यांनीं सांत्वन केलें असें जेव्हां मीं ऐकिलें, तेव्हांच माझी जयाशा अस्तास गेली. सारथे, भगवान श्रीकृष्ण व गांगेय भीष्म हे पांडवांचे सल्लागार असून द्रोणाचार्य देखील त्यांस आशीर्वाद देत असतात असें जेव्हां मीं ऐकिलें, तेव्हांच पुढें काय होणार ह्याची मीं अटकळ केली. संजया, जेव्हां ' तुम्ही युद्ध करीत आहां तों मी युद्ध करणार नाहीं ' असें कर्ण भीष्माचार्यांस बोलून सैन्य सोडून चालता झाला असें मीं ऐकिलें, तेव्हांच, आपसांत कलह करणाऱ्या माझ्या वीरांना जय प्राप्त होणें दुर्घट आहे असें माझें मत झालें. संजया, श्रीकृष्ण, अर्जुन व तें अमोघ गांडीव धनुष्य ह्या तीन उग्र शक्ति एकत्र झाल्याचें जेव्हां मला कळलें, तेव्हांच माझी सर्व आशा निर्मूल झाली. हे प्रिय सारथे, अर्जुन हा मोहानें व्याप्त होऊन शस्त्रास्त्रें खालीं ठेवून निरुत्साह होत्साता रथांत बसला असतां भगवान श्रीकृष्णानें आपलें विराटरूप दाखवून अर्जुनास वीरश्री उत्पन्न केली असें जेव्हां मला समजलें, तेव्हांच पांडव खचीत विजयी होणार असा मीं निश्चय केला. संजया, महापराक्रमी भीष्म युद्धामध्यें सहस्रावधि महान महान वीरांचा संहार करीत असतां पांडवांकडील एकही बलाढ्य वीर पडला नाहीं असें जेव्हां मला समजलें, तेव्हांच माझी जयाशा लुप्त झाली. संजया, धर्मशील गांगेयानें युद्धामध्यें आपण होऊनच आपल्या मृत्यूचा मार्ग पांडवांना कळविला व पांडवांनीं मोठ्या आनंदानें त्या मार्गाचा अवलंब केला असें जेव्हां मीं ऐकिलें, तेव्हांच माझी पूर्ण निराशा झाली. बा संजया, अत्यंत शूर व दुर्धर अशा भीष्माचा

अर्जुनानें शिखंडीस पुढें करून वध केला असें जेव्हां मीं ऐकिलें, तेव्हांच माझ्या मनाची सर्व उमेद नाहींशी झाली. संजया, वृद्ध भीष्मानें बहुतेक सोमकांनाच काय तें मारिलें, इतरांस मारिलें नाहीं व आपण स्वतः अर्जुनाच्या बाणांनीं विद्ध होऊन शरशय्येवर शयन केलें असें जेव्हां मला विदित झालें, तेव्हांच माझा सर्व धीर सुटला. हे सारथे, भीष्म शरपंजरीं पडले असतां अर्जुनास उदक आणून देण्याविषयीं आज्ञा झाल्यावर त्यानें भूमीचें विदारण करून उदक निर्माण केलें व त्याच्या योगें भीष्माची तृषा भागविली असें जेव्हां मीं श्रवण केलें, तेव्हांच अर्जुनाच्या लोकोत्तर सामर्थ्याविषयीं खातरी होऊन मला हा भयंकर परिणाम मूर्तिमंत दिसूं लागला. संजया, वायु, चंद्र व सूर्य हे पांडवांस अनुकूल चिन्हें दर्शवूं लागले आणि कुत्रीं, लांडगे, कोल्हीं वगैरे श्वापदें रुदनादिकेंकरून आम्हांस भेडसावूं लागलीं असें जेव्हां माझ्या कानीं आलें, तेव्हांच माझी सर्व जयाशा गळून गेली. संजया, द्रोणाचार्यांनीं भयंकर युद्ध करून शस्त्रास्त्रांतील अपूर्व कौशल्य व्यक्त केलें—परंतु त्यांच्या हातून एकही शूर पांडव पतन पावला नाहीं असें जेव्हां मीं एकिलें, तेव्हांच पुढें काय होणार हें मला दिसून आलें. संजया, अर्जुनाचा नाश करण्याकरितां आमच्या पक्षाकडील महारथी संशप्तक वीर हातावर शीर घेऊन युद्धास प्रवृत्त झाले असतां त्यांचाही अर्जुनानें संहार केला असें जेव्हां मला कळलें, तेव्हांच माझी आशा मनांतल्या मनांत जिरून गेली. बा संजया, अर्जुनावांचून अन्य वीरास सुदुर्भेद्य असा चक्रव्यूह रचून त्याच्या संरक्षणार्थ सैन्याशिरीं स्वतः द्रोणाचार्य उभे राहिले असतां एकट्या अभिमन्यूनें व्यूह भेदून त्यांत प्रवेश केला असें जेव्हां माझ्या कानीं पडलें, तेव्हांच माझ्या मनांत अत्यंत भीति उत्पन्न झाली. संजया, अर्जुनाचा वध करण्यास असमर्थ असलेले माझ्या पक्षाकडील योद्धे अभिमन्यु बाळास चोहोंकडून कोंडून टाकून तसें केल्याबद्दल अतिशय धन्यता मानीत आहेत असें जेव्हां मला कळलें, तेव्हांच अर्जुन ह्याचा सूड घेईल रे घेईल असें मनांत येऊन पुढील घोर अनर्थ मला दिसूं लागला. संजया, दुर्योधनादिक माझे पुत्र अभिमन्यूचा वध करून आज आम्ही मोठा जय मिळविला असें समजून आनंदभरांत निमग्न असतां अर्जुनानें संतप्त होऊन 'जयद्रथास मारीन नाहीं तर अग्निप्रवेश करीन' अशी प्रतिज्ञा केली असें जेव्हां मला समजलें, तेव्हांच माझी सर्व उमेद खचली. संजया, जयद्रथास मारण्याची भयंकर प्रतिज्ञा अर्जुनानें शत्रूंच्या समक्ष सिद्धीस नेली असें जेव्हां मला कळलें, तेव्हांच मी अगदीं हताश होऊन बसलों. हे प्रिय सारथे, अर्जुनाच्या रथाचे घोडे श्रांत झाले असतां कृष्णानें ते सोडिले व त्यांस खुशाल पाणी पाजून आणून पुनः रथास जोडिले असें जेव्हां मीं ऐकिलें, तेव्हांच कौरववीरांची दीन दशा माझ्या मनांत आली. संजया, अर्जुनाचे अश्व दमून जाऊन स्वस्थ उभे राहिले असतां आपणावर चाल करून येणाऱ्या सर्व योद्धयांना अर्जुनानें केवळ रथावर उभें राहूनच मागें हटविलें असें जेव्हां मला विदित झालें, तेव्हांच मीं जयाची आशा सोडून दिली. संजया, महान महान हत्तींच्या योगानें बलिष्ठ असलेलें द्रोणाचार्यांचें सैन्य मारून टाकून सात्यकि कृष्णार्जुनांस जाऊन मिळाला असें मला कळलें, तेव्हांच पुढें काय होणार ह्याची पूर्ण कल्पना माझ्या मनांत आली. संजया, कर्णाच्या कचाट्यांत भीमसेन सांपडला असतां त्यास कर्णानें 'मूर्खा, खादाडा' वगैरे केवळ कुत्सित शब्दांनीं व धनुष्याच्या अग्रानें ताडन करून सोडून दिलें असें ज्या वेळीं माझ्या कानीं आलें, त्याच वेळीं कौरवांस यश येणार नाहीं असा माझा निश्चय झाला. हे सारथे, अर्जुन जयद्रथाचा वध करीत असतां

द्रोणाचार्य, कृतवर्मा, कृपाचार्य, कर्ण, अश्वत्थामा व शल्य ह्या महान महान शूरांपैकीं एकहीजण अर्जुनावर चालून गेला नाहीं आणि तें भयंकर कृत्य सर्वांनीं निमूटपणें सहन केलें असें जेव्हां मला समजलें, तेव्हांच माझा सर्व धीर सुटून गेला. संजया, देवेंद्रानें कर्णास दिलेल्या दिव्य शक्तीची योजना कृष्णानें घोर घटोत्कच राक्षसावर करवून ती शक्ति व्यर्थ दवडिली असें जेव्हां मला कळलें, तेव्हांच माझे सर्व आशातंतु तुटले. संजया, जिच्या योगानें कर्णास अर्जुनाचा वध करितां आला असता, ती इंद्रदत्त दिव्य शक्ति घटोत्कचाशीं युद्ध करीत असतां त्यावर कर्णानें सोडिली असें जेव्हां मला विदित झालें, तेव्हांच अर्जुन आतां कौरवांच्या हातून मरत नाहीं असा माझा सिद्धांत झाला. संजया, द्रोणाचार्य रथामध्यें बसून अन्नपानादिक ग्रहण न करितां मरण्याचा निश्चय करून निश्चल झाले असतां धृष्टद्युम्नानें धर्ममर्यादेचा अतिक्रम करून त्या एकट्या व निःशस्त्र वीराचा शिरच्छेद केला असें जेव्हां मला समजलें, तेव्हांच माझी जयाशा अस्तास गेली. संजया, माद्रीपुत्र नकुलानें सर्व लोकांसमक्ष अश्वत्थाम्याशीं मल्लयुद्ध आरंभिलें व नानाप्रकारच्या मंडलांनीं अश्वत्थाम्याशीं सामना केला असें जेव्हां मीं ऐकिलें, तेव्हांच पांडवांच्या असाधारण सामर्थ्याबद्दल माझी खातरी झाली. द्रोणवधाची वार्ता ऐकून अश्वत्थाम्यानें पांडवांवर दिव्य नारायणास्त्र सोडिलें असतां तेंही व्यर्थ झालें असें जेव्हां मीं ऐकिलें, तेव्हांच कौरवांचे सर्व श्रम व्यर्थ होत असा माझा निर्धार झाला. हे सारथे, भीमसेनानें युद्धामध्यें आपला भाऊ दुःशासन ह्याचें रक्त प्राशन केलें व तो तसें करीत असतां ह्याचें कोणींही निवारण केलें नाहीं असें जेव्हां मला समजलें, तेव्हांच कौरवांच्या हीनवीर्यत्वाविषयीं खातरी होऊन माझी सर्व आशा नष्ट झाली. संजया, कर्ण हा आपला भ्राता होय ही गोष्ट विदित नसल्यामुळें त्या अतिशय शूर व दुर्धर अशा कर्णावरोबर अर्जुन युद्ध करूं लागला व त्या युद्धामध्यें अखेरीस अर्जुनानें कर्णाचा वध केला असें जेव्हां मला समजलें, तेव्हांच मला हे सर्व भावी अनर्थ प्रत्यक्ष दिसूं लागले. संजया, अश्वत्थामा, दुःशासन व उग्र कृतवर्मा ह्यांस युधिष्ठिरानें जिंकिलें म्हणून जेव्हां मीं ऐकिलें, तेव्हांच खरें तेज पांडवांच्या ठिकाणीं मात्र आहे असा मला पूर्ण प्रत्यय आला. संजया, महापराक्रमी मद्र देशाचा राजा जो शल्य, त्याला धर्मराजानें युद्धभूमीवर पाडिलें व त्याची कृष्णास जिंकण्याची मोठी हाव विलयास नेली असें जेव्हां मला समजलें, तेव्हांच माझी सर्व जयाशा समाप्त झाली. हे संजया, कपटद्यूत व तन्मूलक सर्व कलह ह्यांचा मूळ उत्पादक जो दुष्ट शकुनि, त्याचा युद्धामध्यें सहदेवानें वध केला असें जेव्हां मीं ऐकिलें, तेव्हांच कौरवांचे सर्व प्रयत्न फुकट गेले असा मीं सिद्धांत केला. संजया, दुर्योधन रथहीन व शक्तिहीन होऊन श्रांत झाल्यामुळें डोहांत जाऊन बसला आणि तेथें जलाचें स्तंभन करून एकटाच गुप्त राहिला असें जेव्हां मला समजलें, तेव्हांच आतां धडगत नाहीं अशी भीति माझ्या मनानें घेतली. हा संजया, कृष्णासमवेत पांडव त्या डोहाच्या संनिध गेले असून दुर्योधनास दुःसह शब्दांनीं टोंचून युद्धाकरितां बोलावीत आहेत असें जेव्हां मीं ऐकिलें, तेव्हांच माझी सर्व आशा निर्मूल झाली. संजया, दुर्योधन गदायुद्धांत चित्रविचित्र हात करून नानाप्रकारच्या मंडलांनीं फिरत असतां, वासुदेवाचें अनुमोदन घेऊन भीमानें दुर्योधनाचा कपटानें वध केला असें जेव्हां मला विदित झालें, तेव्हांच, सर्वस्वीं घात झाला, असे मीं उद्गार काढिले! संजया, धृष्टद्युम्नादिक पांचाल योद्धे व प्रतिविंध्यादिक द्रौपदीपुत्र हे निद्रित असतां अश्वत्थामा

आदिकरून वीरांनीं त्यांचा नीचपणानें वध केला, हें बीभत्स कृत्य जेव्हां मला कळलें, तेव्हांच, सर्व कुळाचा समूळ उच्छेद झाला, असें मीं म्हटलें. संजया, भीमसेनानें पाठलाग केला असतां अश्वत्थाम्यानें क्रुद्ध होऊन ऐषीक नामक ब्रह्मास्त्र सोडिलें आणि उत्तरेचा गर्भ मरणोन्मुख केला असें जेव्हां मला समजलें, तेव्हांच, महान अनर्थ झाला, असा मीं आक्रोश केला. संजया, नंतर 'स्वस्ति' असें म्हणून अर्जुनानें अश्वत्थाम्याच्या ब्रह्मास्त्रावर ब्रह्मास्त्रच सोडिलें व तें ब्रह्मास्त्र शांत करून अखेरीस अश्वत्थामाच्या मस्तकांतील माणि हरण केला असें जेव्हां मीं ऐकिलें, तेव्हांच मी धाय मोकलून रडूं लागलों. संजया, अश्वत्थाम्यानें ब्रह्मास्त्र सोडून उत्तरेचा गर्भ पतनोन्मुख केला असतां द्वैपायन व कृष्ण ह्या दोघांनींही द्रोणपुत्रास भयंकर शाप दिले असें जेव्हां मला कळलें, तेव्हांच आतां आम्हांस कोणी त्राता राहिला नाहीं असें म्हणून मीं एकसारखा आक्रोश मांडिला. संजया, अशा प्रकारें पुत्रपौत्रादिकांचा, वडील मनुष्यांचा, आप्तस्वकीयांचा व सौबलादिक बंधूंचा अंत होऊन गांधारी दुःखसागरांत बुडाली आणि पांडवांनीं दुष्कर कृत्य करून निष्कंटक राज्य मिळविलें! संजया, त्या महाभयंकर संग्रामामध्यें अठरा अक्षौहिणी क्षत्रियांपैकीं माझ्या पक्षाचे तीन म्हणजे कृप, अश्वत्थामा व कृतवर्मा आणि पांडवपक्षाचे सात म्हणजे पांच पांडव, कृष्ण व सात्यकि, मिळून एकंदर दहाजणच अवशिष्ट राहावेना! हरहर! संजया, काय करूं रे! सर्वत्र अंधकार झाला! माझी ज्ञानकला मावळली! माझें देहभान गेलें! आतां मला कांहींच सुचत नाहीं!

धृतराष्ट्राचें सांत्वन.

सौति म्हणालाः—शौनकादिक ऋषीहो, ह्याप्रमाणें भाषण करून दुःखावेग सहन न झाल्यामळें तो दीन धृतराष्ट्र मोठमोठ्यानें आक्रोश करूं लागला व अखेरीस मूर्छा येऊन पतन पावला. नंतर संजयानें त्यास सावध केलें, तेव्हां तो पुनः संजयास म्हणाला, "बा संजया, आतां अशा अवस्थेंत मीं देहत्याग करावा हेंच उचित होय; ह्याउपर जगून कांहींच अर्थ नाहीं!"

सौति म्हणालाः—ऋषीहो, शोकविव्हळ झालेला तो धृतराष्ट्र राजा अशा प्रकारचे केविलवाणे उद्गार काढून सर्पाप्रमाणें फुसकारत उसासे देत आहे व वारंवार बेशुद्ध होऊन मूर्छित पडत आहे, असें पाहून त्या महाबुद्धिमान व ज्ञानसंपन्न संजयानें त्यास मोठा चिरस्मरणीय बोध केला.

संजय म्हणालाः—हे भूपते धृतराष्ट्रा, महासमर्थ कृष्णद्वैपायन व देवर्षि नारद ह्यांनीं काय निवेदन केलें, तें तुला अवगत आहेच. अरे, ह्या जगतीतलावर एक तुझेच पुत्र मरण पावले असें नाहीं. ज्यांचें विशाल यश सर्व त्रिभुवनांत गाजत आहे, अशा सोमसूर्यादि अनेक वंशांत आजवर अगणित राजे जन्मास आले, व तुझ्या पुत्रांप्रमाणें हा लोक सोडून चालते झाले. बाबारे, ते भूपाळ सामान्य होते असेंही नाहीं. त्यांचा पराक्रम इंद्रादि लोकपालांप्रमाणें लोकोत्तर होता; त्यांचा उत्साह व सामर्थ्य केवळ अश्रुतपूर्व होतें; त्यांना नानाविध दिव्य अस्त्रें प्राप्त झालेलीं होतीं; त्यांनीं धर्ममर्यादेचें अतिक्रमण न करितां सर्व भूमंडळाचें राज्य जिंकून घेतलें होतें; आणि यज्ञयागादिक क्रिया करून व त्यांत विपुल दक्षिणा देऊन त्यांनीं आपली धवल कीर्ति स्वर्गलोकापर्यंत विस्तृत केली होती. परंतु, राजा, त्या परमप्रतापी व महाशक्तिमान राजांसही कालवश होऊन मृत्युमुखांत पडावें लागलें! महारथी शैब्य, रणधुरंधर सृंजय, सुहोत्र, रंतिदेव, काक्षीवंत, औशिज, बाल्हीक, दमन, चैद्य, शर्याति, अजित नल, विजयी विश्वामित्र, महाबलाढ्य अंबरीष, मरुत्त, मनु, इक्ष्वाकु, गय, भरत, दाशरथि राम, शशबिंद, भगीरथ, महाभाग कृतवीर्य

जनमेजय, आणि होमकुंडें, यज्ञवेदिका व यूप ह्यांच्या योगें सर्व पृथ्वी अलंकृत करून अनेक यज्ञ केल्यामुळें प्रत्यक्ष देवांनीं देखील ज्याचा सन्मान केला, असा परमपावन ययाति, ह्या चोवीस राजांचीं चरित्रें देवर्षि नारदांनीं पूर्वीं श्वैत्य राजाला सांगून त्याचा पुत्रशोक दूर केला. शिवाय, हे धृतराष्ट्रा, ह्या राजांच्या पूर्वीं अनेक दुसरे राजे बलवत्तर होऊन गेले. ते सर्व महारथी व महात्मे असून त्यांच्या ठिकाणीं सत्य, शौच, दया, दृढ भगवद्भक्ति इत्यादि अनंत गुण ओतप्रोत भरले होते. पूरु, कुरु, शूर यदु, महातेजस्वी विष्वगश्व, अणुह, युवनाश्व, ककुत्स्थ, विजयशील रघु, विजय, वीतिहोत्र, अंग, भव, श्वेत, बृहद्गुरु, उशीनर, शतरथ, कंक, दुलिदुह, द्रुम, दंभोद्भर, पर, वेन, सगर, संकृति, निमि, अजेय, परशु, पुंड्र, शंभु, देवावृध, अनघ, देवाव्हय, सुप्रतिम, सुप्रतीक, बृहद्रथ, महोत्साह, विनीतात्मा, सुक्रतु, निषध देशाचा राजा नल, सत्यव्रत, शांतभय, सुमित्र, सुबल, प्रभु, जानुजंघ, अनरण्य, अर्क, प्रियभृत्य, शुचिव्रत, बलबंधु, निरामर्द, केतुशृंग, बृहद्बल, धृष्टकेतु, बृहत्केतु, दीप्तकेतु, निरामय, अविक्षित्, चपल, धूर्त, कृतबंधु, दृढेषुधि, महापुराणसंभाव्य, प्रत्यंग, परहा आणि श्रुति, हे व दुसरे शतावधि, सहस्त्रावधि, किंबहुना असंख्य महान महान राजे ऐहिक वैभवाचा त्याग करून तुझ्या पुत्रांप्रमाणेंच मृत्युवश झाले. हे सर्व भूपति अत्यंत दानशूर, परमप्रतापी व धैर्यौदार्यादि गुणांनीं मंडित असल्यामुळें ह्यांचें शुद्ध व देदीप्यमान यश मोठमोठे कवि नित्य गात असतात. राजा, अशा प्रकारच्या सद्गुणनिधींना सुद्धां जर ही पृथ्वी सोडून जावें लागलें, तर तुझ्या पुत्रांची ती कथा काय!

धृतराष्ट्रा, तुझे पुत्र मरण पावले, हें एका अर्थी चांगलेंच झालें, असें मला वाटतें. कारण ते दुरात्मे क्रोध, लोभ, ईर्षा, असूया इत्यादि दुष्ट मनोविकारांनीं क्षुब्ध होऊन नित्य दुराचरण करण्यांत तत्पर असत. ह्यास्तव त्यांच्या मृत्यूनें ह्या भूतलावरील कंटकच नाहींतसे झाले असें मी मानितों. राजा, अशा त्या कुलांगारांबद्दल त्वां शोक करीत बसावें हें अनुचित होय! हे नृपते, तूं ज्ञानसंपन्न आहेस, तुझ्या ठिकाणीं दूरदर्शित्व उत्तम प्रकारें वास करितें, तुझ्या बुद्धीला सदसन्निर्णय उत्कृष्ट करितां येतो, आणि मोठमोठे प्राज्ञ पुरुषही तुझ्या ज्ञानमत्तेची प्रशंसा करितात; ह्यासाठीं सामान्य जनांप्रमाणें तूं मोहवश व्हावेंस हें अयोग्य होय. ज्ञानवान पुरुष कसाही दुर्धर प्रसंग ओढवला असतां विवेकभ्रष्ट होत नाहींत हें लक्षांत आण. शिवाय, राजा, हा जो घोर अनर्थ घडला, तो म्हणजे केवळ तुझ्या पुत्रांच्या दुर्वर्तनामुळेंच घडला असा अर्थ नाहीं; तर ह्याच्या मुळाशीं तूं सुद्धां आहेस. आपल्या दुर्योधनादिक पुत्रांविषयीं तूं लोभ धरिलास व युधिष्ठिरादिक पांडुपुत्रांविषयीं तूं द्वेष केलास, आणि ह्यामुळेंच हा सर्व अनर्थ झाला, ह्यांत संदेह नाहीं. राजा, विष देणें, आग लावणें इत्यादि दुष्ट कृत्यांना जर तूं अनुमत दिलें नसतेंस, तर खचीत आज तुला पुत्रशोक करण्याचा प्रसंग आला नसता. ह्यास्तव, ज्या गोष्टी केवळ तुझ्याकडूनच झाल्या आहेत असें म्हटलें तरी चालेल, त्यांविषयीं तूं दुःख करीत बसावेंस हें प्रशस्त नव्हे. राजा, जें भवितव्य असेल, तें कधींही चुकत नाहीं. तुझे पुत्र अशा रीतीनें मरणार हें आधींच ठरलें होतें, व त्याप्रमाणें तें घडून आलें ह्यांत विशेष असें कांहींच नाहीं. ब्रह्मदेवानें जें भालपटलीं लिहिलें असेल, तें, मनुष्य कितीही ज्ञानी किंवा प्रतापवान झाला तरी त्याच्यानें टाळतां येईल अशी कल्पना करणें हा भ्रम होय. जन्म, मरण, सुख, दुःख इत्यादि सर्व गोष्टी कालशक्तीनें घडून येतात. काल हाच प्राणिमात्राचा उत्पादक व संहारक होय. प्राण्यांचें जनन व मरण ज्या काला-

कडून होतें, त्या कालाचें नियमन तरी कालच करितो. कालाचें वास्तविक स्वरूप म्हटलें म्हणजे अचिंत्यशक्ति परमेश्वराचें परमात्मरूपच होय. ह्या त्रैलोक्यांतील बऱ्यावाईट सर्व वस्तूंचें जन्म परमात्म्याच्या कालशक्तीपासूनच घडतें; त्या अनिर्वचनीय कालाच्या योगेंच सर्व वस्तूंचा उपसंहार होतो; आणि परमात्मस्वरूपीं लीन झालेल्या ह्या अखिल ब्रह्मांडाचें पुनरुज्जीवन तरी कालच करितो; विश्वांतील सर्व जीव निद्रित असतां काल हाच जागा असतो, सर्व स्थावरजंगम पदार्थांच्या अंतर्भागीं सदासर्वकाल निष्प्रतिबंधपणें संचार करणारा कालच होय, आणि कालाचें सामर्थ्य नष्ट करण्यास समर्थ असा कोणीही नाहीं. राजा, ह्या जगांत आजपर्यंत ज्या ज्या गोष्टी घडल्या, प्रस्तुतकालीं ज्या ज्या गोष्टी घडत आहेत, आणि भविष्यकालीं ज्या ज्या गोष्टी घडतील, त्या सर्वांचें आदिकारण तो दुर्निवार्य कालच होय; ह्याकरितां तूं मोहाकुल होऊन विवेकाचा त्याग करावयास हें सर्वथा अनुचित होय.

सौति म्हणाला:—ऋषीश्वरहो, पुत्रशोकानें विव्हल झालेल्या धृतराष्ट्राला गावल्गणि संजयानें ह्याप्रमाणें चार ज्ञानाच्या गोष्टी सांगितल्या, तेव्हां त्यांचें मनन करून धृतराष्ट्रानें आपली चित्तवृत्ति सुस्थिर केली, व परमात्मस्वरूपाचें चिंतन करून देहादिकांविषयीं ममत्वबुद्धि सोडून दिली; आणि आपल्या हृदयांतील पुत्रशोकरूप सुदृढ ग्रंथीचा विच्छेद करून टाकिला.

भारत ग्रंथाची अपूर्वता.

ऋषीहो, ह्या भारत ग्रंथाची अपूर्वता काय वर्णन करावी? शोकमोहादिक शत्रूंनीं जर्जर केलेल्या पुरुषांच्या मनाला शांति उत्पन्न करून देणारें असें हें एक व्यासप्रणीत उपनिषदच होय. ह्याच्या अध्ययनानें अविद्या व तिचीं कार्यें ह्यांचा समूळ उच्छेद होऊन परब्रह्मरूप निर्मल ज्ञानज्योतीची प्रभा सर्वत्र पसरली आहे असा अनुभव प्राप्त होतो, व त्याच्या योगें मुमुक्षु जनास देहाचें साफल्य करून घेतां येतें. ऋषीहो, ह्या ग्रंथांतील तत्त्वें अनादिसिद्ध आहेत. श्रीमद्व्यासासारखे जे जे ज्ञानी पुरुष होऊन गेले, त्यांनीं त्या तत्त्वांचें केवळ प्रवचन मात्र केलें आहे. ह्या ग्रंथांतील आध्यात्मिक सिद्धांत त्रिकालाबाधित असल्यामुळें सनातन व शाश्वत आहेत, आणि त्यामुळें ते अनादि म्हणजे अत्यंत प्राचीन असतांनाही नित्य नवीन म्हणजे अत्यंत तेजःपुंज भासतात; व ह्या कारणानेंच ज्ञानी पुरुष ह्या ग्रंथाला, हा प्राचीन असून, नवीन अशा अर्थाची पुराण ही समर्पक संज्ञा देतात. ऋषीहो, ह्या ग्रंथाचें फल मोठें अगाध आहे. केवळ एका श्लोकाचा एक चरणही श्रद्धापूर्वक पठन केल्यास पठन करणाराचीं सर्व पातकें दग्ध होतात; मग सर्व ग्रंथाचें यथासांग अध्ययन करणारास काय फल प्राप्त होईल, ह्याचें काय वर्णन करावें! जो पुरुष ह्या ग्रंथाचें श्रवण, मनन व निदिध्यसन करितो, त्यास ब्रह्मसाक्षात्कारही सुलभ आहे. ब्राह्मणहो, चतुर्विध पुरुषार्थ प्राप्त करून घेणाऱ्या जनांना महाभारत ग्रंथ म्हणजे एक उत्कृष्ट कित्ताच समजावा. ह्यांत दयादाक्षिण्यादि सत्त्वगुणांनीं विभूषित असलेल्या देवांचें व देवर्षींचें, तसेंच परमपावन ब्रह्मर्षींचें आणि सद्गुणशाली यक्षांचें व महोरगांचें वर्णन केलें आहे. ह्या ग्रंथांत—सकल ऐश्वर्य, ज्ञान, यश, श्री, वैराग्य व धर्म ह्या षड्गुणांचें निधान असा जो परब्रह्मरूप वासुदेव, त्याच्या मनोहर कथा विस्तारानें सांगितल्या आहेत. ऋषीहो, ह्या अवाढव्य विश्वामध्यें चिरंतन राहणारा एक भगवान वासुदेवच होय. ब्रह्मांडांत जें कांहीं ज्ञात किंवा ज्ञेय आहे, तें सर्व त्याचेंच स्वरूप समजावें. प्राणिमात्र यीं जीं कर्में करितो, व ब्रह्मवेत्ते पुरुष वेदादिकांच्या अध्ययनानें जें कांहीं पवित्र असें ठरवून त्याच्या अनुष्ठानानें देहाची कृतार्थता जोडितात, त्या सर्वांचा आत्मा

तो वासुदेवच आहे. त्या सच्चिदानंद प्रभूस देशकालादिकांचा उपाधि मुळींच नाहीं. तो नित्य व निर्विकार आहे. कार्यकारणपरंपरेच्या पलीकडे त्याची व्याप्ति आहे. तो अगदीं स्वतंत्र आहे. तो स्वेच्छेनें मायाविग्रही बनून नानाविध कर्में करितो. त्याची कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं शक्ति मनांत आणूनच महान महान ज्ञानी लोक त्याच्या दिव्य कर्मांचें नित्य कीर्तन करितात. ऋषीहो, भगवंताच्या त्या परब्रह्मस्वरूपापासूनच ह्या अनिर्वचनीय विश्वाची उत्पत्ति झाली, आणि कार्यकारणरूप सृष्टीचें जाळें पसरलें. ब्रह्मादिकांचें जन्म, यज्ञयागादिकांची प्रवृत्ति आणि अखिल जगताची उत्पत्ति, लय व पुनर्जनन हीं त्या परमात्म्यापासूनच होतात. ह्या पांचभौतिक देहामध्यें प्राणादिक ज्या ज्या शक्ति आहेत, तीं सर्व परमात्म्याचींच रूपें होत. वाणीची वचनशक्ति, नेत्रांची निरीक्षणशक्ति, कर्णांची श्रवणशक्ति, मनाची मननशक्ति इत्यादि सर्व शक्ति ह्या सर्वसाक्षी लोकनियंत्याच्या विश्वव्यापक दिव्य शक्तींचींच अपररूपें आहेत. देहादिकांच्या ठायीं पूर्वकर्मानुसार प्रवर्तित असलेला जो जीवात्मा, तोही त्या ज्ञानज्योतीचेंच प्रतिबिंब होय; आणि ध्यान, योग इत्यादि साधनांनीं शुद्धचित्त झालेले ब्रह्मनिष्ठ पुरुष अंतर्मुख दृष्टीनें आपल्या हृन्मंदिरांत ज्या मूर्तीचें अवलोकन करितात, ती मूर्तिही तो वासुदेवच आहे; असो.

प्रथमाध्यायाची फलश्रुति.

ऋषीहो, ह्या भारत ग्रंथाचें पठन केलें असतां त्या भगवान वासुदेवाचें यथार्थ ज्ञान प्राप्त होऊन मायामोहाची पूर्ण निवृत्ति होते. ह्यास्तव प्रत्येकानें ह्या ग्रंथाचा अहर्निश अभ्यास करणें इष्ट आहे. जो पुरुष श्रद्धापूर्वक, चित्त एकाग्र करून व धर्मनिष्ठेनें ह्या अध्यायाचें मनन करील, त्याचीं सर्व पातकें नष्ट होतील. ह्या अध्यायास अनुक्रमणिकाध्याय असें नांव आहे. जो पुरुष आस्तिक्यबुद्धीनें सदासर्वकाळ ह्या अध्यायाचें आरंभापासून श्रवण करील, त्यास कोणतीही आपत्ति प्राप्त होणार नाहीं. ह्या अध्यायाचा थोडासा भागही जरी सकाळसंध्याकाळ वाचिला, तरी तेवढ्यानें सुद्धां रात्रीं व दिवसास केलेल्या पातकांचा तत्काल विनाश होईल. ऋषीश्वरहो, हा अनुक्रमणिकाध्याय म्हणजे भारतरूप विशाल वृक्षाचा गाभा होय. हा ब्रह्मप्रतिपादक सनातन सिद्धांतांचा सूत्रात्मक निष्कर्ष आहे.

मुनिवर्यहो, भारताची महती किती म्हणून सांगावी? गोरसामध्यें जसें नवनीत, मानवांमध्यें जसे ब्राह्मण, श्रुतींमध्यें जशीं उपनिषदें, औषधींमध्यें जशी यज्ञशेष ओषधि, जलाशयांमध्यें जसा सागर, अथवा चतुष्पादांमध्यें जशी धेनु, तसा इतिहासपुराणांमध्यें भारत ग्रंथ होय. श्राद्धकालीं ह्यांतील श्लोकाचा एक चरण जरी ब्राह्मणांस ऐकविला, तरी तेवढ्यानें पितरांस अक्षय्य अन्नोदक पोहोंचतें.

ऋषीहो, श्रुत्यर्थाचा होईल तेवढा विस्तार केला असतां चतुर्विध पुरुषार्थ सुलभ होतात; ह्यास्तव इतिहास व पुराणें ह्यांच्या द्वारें प्रत्येकानें श्रुतींचा विस्तार करावा. अल्पज्ञ जनांना श्रुति ह्या नेहमीं भीत असतात. त्यांना वाटत असतें कीं, अज्ञानी लोक हे आम्हीं प्रतिपादन केलेल्या तत्त्वांचें परिशीलन करणार नाहींत, व त्यामुळें आमचा प्रसार न होतां लोककल्याणाचे मार्ग संकुचित होतील. ह्याकरितां, ब्राह्मणहो, प्रत्येक साधकानें भारतरूप पंचम वेदाचा अभ्यास करून त्याचा पाठ नेहमीं दुसऱ्यास सांगत जावा आणि आपण स्वतः त्याच्या अर्थाचें चिंतन करून दुसऱ्यासही तो निरूपण करावा. जो पुरुष प्रत्येक पर्वणीस देहादिकांची शुद्धि करून ह्या अध्यायाचा पाठ करील, त्याचीं भ्रूणहत्यादिक घोर पातकेंही तात्काळ दग्ध होतील, आणि त्याच्या अंतःकरणांत सर्व ग्रंथाची उत्कृष्ट जागृति राहून सर्व

ग्रंथ नित्य पठन केल्याचें त्यास निःसंशय श्रेय मिळेल, असा माझा अभिप्राय आहे. जो पुरुष श्रद्धेनें व्यासप्रणीत अशा भारत ग्रंथाचें श्रवण करील, त्यास दीर्घ आयुष्य, विशाल कीर्ति व परलोक हीं साधितां येतील. ऋषीहो, पूर्वी देवांनीं ह्या भारत ग्रंथाची व उपनिषदांसहित चारी वेदांची तुळना केली; त्या वेळीं ह्या भारत ग्रंथाचें पारडें खालीं बसलें व वेदांचें पारडें किती तरी उंच गेलें! आणि तेव्हांपासून ह्या ग्रंथास नुसतें भारत असें न म्हणतां, महाभारत असें म्हणूं लागले. कारण, ह्याचें महत्त्व म्हणजे विस्तृतपणा आणि भार म्हणजे अर्थगौरव हीं खरोखरीच आश्चर्यकारक आहेत. सारांश, महाभारत ह्या संज्ञेची व्युत्पत्ति व पूर्व इतिहास हीं ध्यानांत आणिलीं असतां मुमुक्षु जनांची प्रवृत्ति चतुर्विध पुरुषार्थ साध्य करून घेण्याकडे होईल, व त्या योगें तात्काळ त्यांचीं सर्व पातकें दग्ध होतील हें अवश्य लक्षांत आणावें.

ऋषीहो, ह्या अनुक्रमणिकाध्यायावरून भारत ग्रंथाचें सामान्य स्वरूप तुमच्या लक्षांत आलें असेलच. ह्यामध्यें युद्धादिकांचीं भयंकर वर्णनें आहेत, तसेच स्थलविशेषीं कुटिल नीतीचेही उल्लेख आहेत, ह्यासाठीं ह्यांत "धर्माधर्मविवेक किंवा आत्मानात्मविचार ह्यांचा जरी ऊहापोह असला, तरी त्याबरोबर दुसऱ्या गौण किंवा त्याज्य गोष्टींचेंही ह्यांत मिश्रण आहे, ह्यास्तव विषमिश्रित अन्नाप्रमाणें हा ग्रंथ सर्वथा त्याज्य होय, अशी कदाचित् कोणी शंका घेईल; परंतु अशी शंका घेणें सर्वतोपरी अयोग्य आहे हें ध्यानांत आणा. ह्या ग्रंथांत जें मुख्य प्रमेय प्रतिपादन केलें आहे, त्यास साधक अशींच प्रमाणें ह्यांत विशेषत्वानें व प्राधान्येंकरून निरूपण केलीं आहेत. ह्यांत पापक्षालन करणाऱ्या व ब्रह्मपद जोडून देणाऱ्या कृच्छ्रचांद्रायणादि तपोनुष्ठानांचें विस्तृत वर्णन आहे; श्रुतीचा उत्तानार्थ कोणता व गर्भितार्थ कोणता, प्रवृत्तिपर अर्थ उद्दिष्ट किंवा निवृत्तिपर अर्थ उद्दिष्ट इत्यादि गोष्टींचेंही ह्यांत साकल्यानें विवेचन केलें आहे; ह्यांत वर्णाश्रमधर्मांचें व्याख्यान करून शमदमादिक साधनें आणि अग्निहोत्र, संध्योपासना, नित्यनैमित्तिक विधि इत्यादिकांचा पूर्ण विचार केला आहे; आणि ह्या ग्रंथांत सांगितलेल्या अर्थप्राप्तीच्या उपायांचा हेतु इंद्रियांचा संतोष करणें हा नाहीं, तर क्षुधा, पिपासा वगैरे सहन करून देहयात्रा कशी चालवावी व परब्रह्मचिंतन करून जन्माचें साफल्य कसें संपादावें हा मुख्य हेतु आहे. सारांश, ह्या ग्रंथांत धर्माधर्मविवेक व परब्रह्मप्राप्ति ह्यांचेंच मुख्यत्वेंकरून विवेचन आहे. स्थलविशेषीं इतर विषयांचा निर्देश आहे खरा, परंतु त्यांचा उद्देश काय आहे, इकडे अवधान ठेवून त्यांची उपयुक्तता मनांत आणिली पाहिजे, आणि एकंदर ग्रंथाच्या प्रधान प्रमेयाचा विचार करितांना तर त्यांजकडे सर्वस्वींच दुर्लक्ष करणें इष्ट होय. तात्पर्य, तपाचरण, वेदाध्ययन, वेदांत सांगितल्याप्रमाणें यज्ञयागादि करणें, अनेक प्रकारें कष्ट करून द्रव्य संपादन करणें हीं कर्में पापनाशक आहेत खरीं; परंतु तींच शुद्ध भावानें केलीं नाहींत तर उलटीं पातकाला कारण होतात.

पर्वसंग्रहपर्व.

अध्याय दुसरा.

—:०:—

समंतपंचकवर्णन.

ऋषि म्हणाले:—हे सूतनंदना, ज्या परमपावन समंतपंचक देशाहून तूं आलास, व जेथें कौरवपांडवांचें घोर युद्ध होऊन त्यांत दोन्ही पक्षांकडील सर्व भूपालांचा संहार झाला म्हणून तूं म्हटलेंस, त्या पवित्र देशाविषयीं व तेथें घडलेल्या त्या लोकोत्तर रणसंग्रामाविषयीं यथातथ्य वर्णन ऐकावें अशी आमची मनीषा आहे; तर तूं ती पूर्ण कर.

सौति म्हणाला:—विप्रवर्यहो, बरें आहे. कोणत्या तरी पुण्यकारक कथा निरूपण कराव्या, हाच माझा हेतु आहे. ह्यास्तव आपण विचारल्याप्रमाणें मी आतां त्या समंतपंचक क्षेत्राचाच इतिहास आपणांस निवेदन करितों. तो इतिहास आपण सावधानचित्तानें श्रवण करावा; त्यांत आपणांस दुसऱ्याही अनेक कथा ऐकावयास सांपडतील.

शौनकादिक ऋषीहो, त्रेता व द्वापर ह्या युगांच्या संधिकालीं एक भयंकर गोष्ट घडून येऊन तिच्या योगें पुढें क्षत्रियकुलावर महान अनर्थ ओढवला: तेव्हां कार्तवीर्य नामक क्षत्रियानें (सहस्रार्जुनानें) एके प्रसंगीं जमदग्नि ऋषीची कामधेनु हरण केली; आणि जमदग्नीचा पुत्र परशुराम ह्यानें त्या सहस्रार्जुनाचा वध करून त्याजपासून ती परत आणिली. आपल्या पित्यास परशुरामानें ठार मारिलें ही गोष्ट सहस्रार्जुनाच्या पुत्रांस सहन झाली नाहीं. परशुरामाचा सूड कसा घ्यावा ह्याचा ते विचार करूं लागले, आणि आश्रमांत तो नाहीं अशी संधि साधून त्यांनीं त्याच्या पित्याचा म्हणजे जमदग्नीचा वध केला!

ऋषीहो, कार्तवीर्याच्या पुत्रांनीं जमदग्नीचा वध केला, ही गोष्ट परशुरामाच्या कानीं जातांच त्यास अनिवार क्रोध आला, आणि जो प्रज्वलित अग्नीप्रमाणें नखशिखांत लाल झाला. त्या शस्त्रधराग्रणीनें लागलेंच शस्त्र उचलिलें व पुनः पुनः क्षत्रियांचा अनेक वेळां निःपात उडविला. शौनकादिक मुनिवर्यहो, त्या क्रोधांध झालेल्या वीरानें त्या समयीं क्षत्रियांच्या रक्तानें पांच ऱ्हद (डोह) भरून टाकिले, आणि त्यांतील रुधिररूप उदकानें आपल्या पितरांचें तर्पण केलें, असें ऐकण्यांत आहे.

ऋषीहो, त्या वेळीं परशुरामाचें तें कृत्य पाहून त्याचे ऋचीकादि पितर त्याजवळ येऊन त्यास म्हणाले:—हे महाभाग भार्गवा, तुझी ही अपूर्व पितृभक्ति व लोकोत्तर शौर्य पाहून आम्हांस परम संतोष झाला आहे. बा वीरा, तुला कोणता वर पाहिजे आहे, तो निवेदन कर. तुझें कल्याण असो. ह्याप्रमाणें पितृवचन श्रवण करून परशुराम म्हणाला, "पितरहो, आपण मजवर अनुग्रह करण्यास सिद्ध आहां, असें अवलोकन करून मला मोठी धन्यता वाटते; पण मीं जें कांहीं कृत्य केलें, त्याजबद्दल मात्र मला तितकी धन्यता वाटत नाहीं. ह्याकरितां, मजवर जर आपण प्रसन्न झालां असाल, व मला वर द्यावा अशी जर आपली इच्छा असेल, तर माझी आपणांस इतकीच प्रार्थना आहे कीं, क्रोधाविष्ट होऊन मीं जो क्षत्रियकुलाचा पुनः पुनः निःपात केला, त्या भयंकर पातकापासून माझी मुक्तता व्हावी; आणि क्षत्रियांच्या रुधिरानें भरलेले हे पंचऱ्हद जगतीतलावर 'महापवित्र क्षेत्रें' म्हणून विख्यातीस यावे."

शौनकादिक ऋषीश्वरहो, परशुरामाचें तें अनुतापपर भाषण श्रवण करून पितरांनीं 'हे परशुरामा, तुझ्या म्हणण्याप्रमाणें घडेल' असें म्हटलें, आणि 'ह्यापुढें तूं क्षत्रियांचा वध करूं नको, आतां त्यांस क्षमा कर.' असा बोध केला; आणि नंतर परशुरामानें पितृवचनास अनुसरून क्षत्र संहाराचें कृत्य थांबविलें.

विप्रवर्यहो, क्षत्रियांच्या रक्तानें भरलेल्या त्या

पंचऱ्हदांसमीप जो देश आहे, तोच तो समंतपंचक देश होय. कोणत्याही देशाची किंवा स्थळाची जी कांहीं विशिष्ट परिस्थिति असते, अथवा त्या देशीं किंवा स्थळीं जें कांहीं लोकोत्तर कृत्य घडलेलें असतें, त्या विशिष्ट परिस्थितीवरून किंवा त्या लोकोत्तरकृत्यावरून त्या देशास किंवा स्थलास विद्वान पुरुष नामनिर्देश करीत असतात; वास्तव त्या नियमास अनुसरूनच, पंचऱ्हदांसमीप असलेल्या देशास समंतपंचक देश असें नांव पडलें आहे.

शौनकादिक मुनिवर्यहो, समंतपंचक देशास समंतपंचक देश असें म्हणण्याचीं दोन कारणें आहेत. त्या देशाच्या समंतभागीं म्हणजे सभोवतीं क्षत्रशोणित ऱ्हदांचें पंचक म्हणजे क्षत्रियांच्या रक्तानें भरलेले पांच डोह आहेत, हें एक कारण होय; आणि हें कारण माझ्या पूर्वविवेचनावरून तुमच्या मनांत स्पष्टपणें प्रतिबिंबित झालें असेलच. आतां, त्या देशांत कोणतें लोकोत्तर कृत्य घडलें व त्यामुळें त्या देशास समंतपंचक हें नांव कसें प्राप्त झालें, त्याचें थोडक्यांत विवेचन करितों, तें ऐका.

ऋषीहो, द्वापरयुगाच्या अखेरीस व कलियुगाच्या प्रारंभीं कौरव व पांडव ह्यांचें घोर युद्ध प्रवृत्त झालें. तेव्हां, ज्यास सांप्रत समंतपंचक देश म्हणतात, तो पुण्यप्रदेश समपृष्ठ व कंटकरहित आहे, असें अवलोकन करून तेथें दोन्ही दळें युद्धार्थ सिद्ध झालीं. ऋषीहो, तीं दळें लहानसहान नव्हतीं. त्यांमध्यें अठरा अक्षौहिणी सैन्य होतें, आणि तें सर्व त्या रणभूमीवर धारातीर्थी पतन पावलें. मुनिश्रेष्ठहो, समंतपंचक ह्या शब्दाचा पूर्व अवयव जो समंत, तो, ह्या भयंकर संग्रामाचा व त्यांत झालेल्या रक्तपाताचा द्योतक आहे. समंत ह्या पदाचा अर्थ समंतांचा म्हणजे जमलेल्या वीरांचा अंत असा होतो. वास्तव ह्या इतिहासावरून व व्युत्पत्तीवरून त्या परमपावन, रमणीय व पंचऱ्हदसमीपवर्ती देशास समंतपंचक असें नांव मिळालें व त्याची त्रिभुवनांत प्रख्याति झाली.

अक्षौहिणीचें परिमाण.

ऋषि म्हणाले:—"हे सौते, कौरवपांडवांच्या युद्धांत अठरा अक्षौहिणी सैन्याचा नाश झाला, म्हणून तूं सांगितलेंस खरें; परंतु अक्षौहिणी म्हणजे काय, हें त्वां आम्हांस विशद करून सांगितल्याशिवाय, त्या उभय दळांचा विस्तार किती होता ह्याची आम्हांस यथार्थ कल्पना होणार नाहीं; ह्याजकरितां अक्षौहिणीचें परिमाण काय आहे, रथ, गज, अश्व व नर किती किती असले म्हणजे एक अक्षौहिणी सेना होते, हें सर्व सविस्तर निवेदन कर. बाबा, तूं सर्वज्ञ असल्यामुळें तुला अमुक एक विषय अपरिचित आहे, असें मुळींच नाहीं.

सौति म्हणाला:—ऋषिवर्यहो, तज्ज्ञ पुरुष, एक रथ, एक गज, तीन अश्व व पांच नर (पदाति) ह्यांच्या समुदायास 'पत्ति' अशी संज्ञा देतात. तीन पत्तींचें एक 'सेनामुख' होतें. तीन सेनामुखांचें एक गुल्म होतें. तीन गुल्मांचा एक गण होतो. तीन गणांची एक वाहिनी होते. तीन वाहिनींस एक पृतना व तीन पृतनांस एक चमू अशी संज्ञा आहे. तीन चमूमिळून एक अनीकिनी होते; व अशा दहा अनीकिनी मिळून एक अक्षौहिणी होते.

विप्रवर्यहो, ह्या कोष्टकावरून एक अक्षौहिणी सैन्यांत गज, रथ इत्यादि किती किती असतात, हें गणितानें काढितां येतें. एकवीस हजार आठशें सत्तर रथ, तितकेच हत्ती, एक लक्ष नऊ हजार तीनशें पन्नास पदाति, व पासष्ट हजार सहाशें दहा अश्व, इतकें सैन्य एका अक्षौहिणीमध्यें असतें. कौरव व पांडव ह्यांचें सैन्य अशा प्रकारच्या अठरा अक्षौहिणी होतें.

ऋषीहो, कालाची गति विचित्र आहे. त्यानें कौरवपांडवांस निमित्तमात्र पुढें करून हें अवाढ-

ऱ्य सैन्य समंतपंचकांत एकत्र जमविलें; व त्या सर्वांचा परस्परांकरवीं त्याच स्थळीं अंत केला.

मुनिश्रेष्ठहो, समंतपंचक क्षेत्रांत त्या कौरव-पांडवसैन्याचा जो निःपात झाला, त्यास फारसा काळही लागला नाहीं. अठरा अक्षौहिणी सेनेनें अठरा दिवसांतच आपले देह भूमीवर ठेवून स्वर्गलोकीं गमन केलें! त्या युद्धांत प्रथम दहा दिवसपर्यंत कौरवसेनेचें आधिपत्य, त्या महापराक्रमी व सकल शस्त्रास्त्रें जाणणाऱ्या भीष्माकडे होतें. पुढें त्या महान धनुर्धरानें शरपंजरीं शयन केल्यावर द्रोणाचार्यांनीं सेनानायकत्व स्वीकारून कौरवदलाचें पांच दिवसपर्यंत संरक्षण केलें. नंतर, शत्रुसैन्यास त्रासवून सोडणारा कर्ण हा कौरवसैन्याचा अधिपति झाला. तो दोन दिवसपर्यंत युद्ध करून समरांगणांत पतन पावला, तेव्हां मद्रपति शल्यानें अर्धा दिवसपर्यंत पांडवांशीं युद्ध केलें. त्यापुढें अर्धा दिवसपर्यंत दुर्योधन व भीम ह्यांचें गदायुद्ध झालें, व त्यांत दुर्योधन पडून पांडवांस पूर्ण विजय प्राप्त झाला. ऋषीहो, ह्याप्रमाणें दुर्योधनप्रमुख सर्व कौरवांचा अंत झाला, तेव्हां आतां आपणांस कोणत्याही प्रकारची भीति राहिली नाहीं असें समजून धर्मराजाचें सैन्य अठरावे दिवशीं रात्रीं स्वस्थ निजलें असतां, कौरवपक्षाकडील उर्वरित वीर अश्वत्थामा, कृपाचार्य व कृतवर्मा ह्यांनीं त्या पांडवसैन्यावर एकदम छापा घालून त्याचा वध केला.

भारताचा विस्तार.

मुनीश्वरहो, हें परमश्रेष्ठ भारताख्यान जनमेजयाच्या त्या सर्पसत्रांत श्रीमद्व्यासांचे महाबुद्धिमान शिष्य वैशंपायन ह्यांनीं जसें कथन केलें, तसें मी तुम्हांस येथें कथन करितों. परंतु भगवान वैशंपायनांनीं त्या सत्रांत न सांगितलेल्या अशा पौष्य, पौलोम व आस्तिक ह्या तीन पर्वांचें आधीं निरूपण करून नंतर वैशंपायनांनीं सांगितलेल्या भारतकथेचा मी उपक्रम करीन. ऋषीहो, ह्या पौष्यादिक तीन पर्वांचा हेतु—भूपतींचें यश व पराक्रम ह्यांचें वर्णन करून भारतकथेचा विस्तार करावा हाच आहे. ह्या तीन पर्वांमध्यें गुरूंचा अगाध प्रभाव व गुरुशुश्रूषणाचें दिव्य फळ, तपोनिधींचे विलक्षण सामर्थ्य व अपूर्व महत्त्व, आणि गृहस्थाश्रमाचा स्वीकार न केल्यामुळें होणारे घोर अनर्थ व त्याचा स्वीकार केल्यामुळें यज्ञयागादिकांच्या योगें प्राप्त होणारें परमात्मसुख, ह्यांचें सविस्तर कथन आहे. तेव्हां महाभारतासारख्या अनुपम ग्रंथास पौष्यादिक पर्वांची जोड लाविल्यानें ज्ञानज्योतीची प्रभा अधिकच फाकेल ह्यांत संदेह नाहीं. ऋषीहो, ह्या

भारताची योग्यता

काय वर्णन करावी? त्यांत आलेले नानाप्रकारचे सुरस कथाभाग, उत्कृष्ट विविध आचार, शब्दसौष्ठव व अर्थगांभीर्य ह्यांनीं ह्या भारत ग्रंथास विलक्षण योग्यता आली आहे! मुमुक्षुजन ज्याप्रमाणें वैराग्याचा नित्य आश्रय करितात, त्याप्रमाणें ज्ञानी लोक ह्या भारताचा नित्य आश्रय करितात. ज्ञानगम्य अशा सर्व विषयांमध्यें आत्म्याचें सत्यस्वरूप ओळखणें हेंच मुख्य होय, किंवा सर्व प्रिय वस्तूंमध्यें स्वतांचे प्राण हेच श्रेष्ठ होत; तद्वत्, ब्रह्मांडाचें आदिकारण जें भगवंताचें सच्चिन्मयस्वरूप, त्याच्या ज्ञानानें परिपूर्ण असलेलें हें भारतशास्त्रच सर्व शास्त्रांत श्रेष्ठ होय. शरिरास जसा मुख्य आधार अन्नादिकांचा, तसा जगतांतील सर्व कथांस मुख्य आधार ह्या महाभारत ग्रंथाचा आहे. ज्या कथाभागास ह्या दिव्य ग्रंथाचा आश्रय नाहीं, असा एकही कथाभाग ह्या जगतीतलावर विद्यमान असणें शक्य नाहीं. उत्कर्षेच्छु सेवकजन ज्याप्रमाणें कुलीन अधिपतीचा अवलंब करून आपलें उपजीवन चालवितात, त्याप्रमाणें सन्मान्य कविजन ह्या महाभारतरूप कथासुरभीचा अवलंब करून आपलें उपजीवन चालवितात. आत्मविद्या व भौतिकशास्त्र.

ह्यांस आश्रयभूत असलेल्या वाणीचें अधिष्ठान जसें स्वरव्यंजनसमुदाय हेंच आहे, तसें ब्रह्मज्ञानाचें अधिष्ठान हा अद्वितीय भारत ग्रंथच आहे. सारांश, हा ग्रंथ म्हणजे ज्ञानाचें केवळ भांडागार होय. ह्यांतील पदरचना व पर्वसंग्रह हीं मोठीं मनोहर आहेत. सूक्ष्म अर्थ व साधार प्रतिपादन ह्यांचा तर हा केवळ कित्ताच समजावा; आणि ह्याच्या प्रत्येक अवयवास वेदार्थरूप उत्तम अलंकारांनीं अप्रतिम शोभा प्राप्त झालेली आहे. असो. आतां ह्या महाभारत ग्रंथांतील मुख्य पर्वें आणि उपपर्वें हीं तुम्हांस सांगतों.

मुख्य पर्वें.

१ आदिपर्व, २ सभापर्व, ३ वनपर्व, ४ विराटपर्व, ५ उद्योगपर्व, ६ भीष्मपर्व, ७ द्रोणपर्व, ८ कर्णपर्व, ९ शल्यपर्व, १० सौप्तिकपर्व, ११ स्त्रीपर्व, १२ शांतिपर्व, १३ अनुशासनपर्व, १४ आश्वमेधिकपर्व, १५ आश्रमवासिपर्व, १६ मौसलपर्व, १७ महाप्रस्थानिकपर्व, व १८ स्वर्गारोहणपर्व, अशीं अठरा मुख्य पर्वें आहेत. ह्याशिवाय १९ हरिवंश नामक आणखी एक मुख्य पर्व मानण्याची रूढि आहे.

उपपर्वें.

१ आदिपर्व—ह्या मुख्य पर्वांत अनुक्रमणिकापर्व, पर्वसंग्रहपर्व, पौष्यपर्व, पौलोमपर्व, आस्तीकपर्व, अंशावतरणपर्व, संभवपर्व, जतुगृहपर्व, हिडिंबवधपर्व, बकवधपर्व, चैत्ररथपर्व, स्वयंवरपर्व, वैवाहिकपर्व, राज्यलंभपर्व, अर्जुनवनवासपर्व, सुभद्राहरणपर्व, हरणाहरणपर्व, खांडवदाहपर्व व मयदर्शनपर्व हीं उपपर्वें आहेत.

२ सभापर्व—ह्या मुख्य पर्वांत सभाक्रियापर्व, लोकपालसभाख्यानपर्व, राजसूयारंभपर्व, जरासंधवधपर्व, दिग्विजयपर्व, राजसूयिकपर्व, अर्घाभिहरणपर्व, शिशुपालवधपर्व, द्यूतपर्व व अनुद्यूतपर्व हीं उपपर्वें आहेत.

३ वनपर्व—ह्या मुख्य पर्वांत आरण्यकपर्व किर्मीरवधपर्व, अर्जुनाभिगमपर्व, कैरातपर्व, इंद्रलोकाभिगमपर्व, नलोपाख्यानपर्व, तीर्थयात्रापर्व, जटासुरवधपर्व, यक्षयुद्धपर्व, निवातकवचयुद्धपर्व, आजगरपर्व, मार्कंडेयसमास्यापर्व, द्रौपदीसत्यभामासंवादपर्व, घोषयात्रापर्व, मृगस्वप्नोद्भवपर्व, व्रीहिद्रौणिकपर्व, द्रौपदीहरणपर्व, जयद्रथविमोक्षणपर्व, रामोपाख्यानपर्व, पतिव्रतामाहात्म्यपर्व, कुंडलाहरणपर्व व आरणेयपर्व हीं उपपर्वें आहेत.

४ विराटपर्व—ह्या मुख्य पर्वांत पांडवप्रवेशपर्व, समयपालनपर्व, कीचकवधपर्व, गोहरणपर्व व वैवाहिकपर्व हीं उपपर्वें आहेत.

५ उद्योगपर्व—ह्या मुख्य पर्वांत सेनोद्योगपर्व, संजययानपर्व, प्रजागरपर्व, सनत्सुजातपर्व, यानसंधिपर्व, भगवद्यानपर्व, सेनानिर्याणपर्व, उलूकदूताभिगमनपर्व, रथातिरथसंख्यानपर्व व अंबोपाख्यानपर्व हीं उपपर्वें आहेत.

६ भीष्मपर्व—ह्या मुख्य पर्वांत जंबूखंडनिर्माणपर्व, भूमिपर्व, भगवद्गीतापर्व व भीष्मवधपर्व हीं उपपर्वें आहेत.

७ द्रोणपर्व—ह्या मुख्य पर्वांत द्रोणाभिषेकपर्व, संशप्तकवधपर्व, अभिमन्युवधपर्व, प्रतिज्ञापर्व, जयद्रथवधपर्व, घटोत्कचवधपर्व, द्रोणवधपर्व व नारायणास्त्रमोक्षपर्व हीं उपपर्वें आहेत,

८ कर्णपर्व—ह्या मुख्य पर्वांत उपपर्व नाहीं.

९ शल्यपर्व—ह्या मुख्य पर्वांत शल्यसैनापत्याभिषेकपर्व, ह्रदप्रवेशपर्व व गदायुद्धपर्व हीं उपपर्वें आहेत.

१० सौप्तिकपर्व—ह्या मुख्य पर्वांत धृष्टद्युम्नादिकवधपर्व व ऐषीकपर्व हीं उपपर्वें आहेत.

११ स्त्रीपर्व—ह्या मुख्य पर्वांत जलप्रदानिकपर्व, स्त्रीविलापपर्व व श्राद्धपर्व हीं उपपर्वें आहेत.

१२ शांतिपर्व—ह्या मुख्य पर्वांत राजधर्मपर्व, आपद्धर्मपर्व व मोक्षपर्व हीं उपपर्वें आहेत.

१३ अनुशासनपर्व—ह्या मुख्य पर्वांत आनु-

शासनिकपर्व व भीष्मस्वर्गारोहणपर्व हीं उपपर्वें आहेत.

१४ आश्वमेधिकपर्व—ह्या मुख्य पर्वांत अश्वमेधिकपर्व व अनुगीतापर्व हीं उपपर्वें आहेत.

१५ आश्रमवासिपर्व—ह्या मुख्य पर्वांत आश्रमवासपर्व, पुत्रदर्शनपर्व व नारदागमनपर्व हीं उपपर्वें आहेत.

१६ मौसलपर्व—ह्या मुख्य पर्वांत उपपर्व नाहीं.

१७ महाप्रस्थानिकपर्व—ह्या मुख्य पर्वांतही उपपर्व नाहीं.

१८ स्वर्गारोहणपर्व—ह्यांत सुद्धां उपपर्व नाहीं.

१९ हरिवंशपर्व—ह्या मुख्य पर्वांत विष्णुपर्व, कृष्णक्रीडापर्व, कंसवधपर्व व भविष्यपर्व हीं उपपर्वें आहेत.

[भगवान बादरायणांनीं मूळ शंभर पर्वांत हें भारताख्यान ग्रथित केलें, व पुढें लोमहर्षणपुत्र उग्रश्रवा सौति ह्यानें तीं शंभर पर्वें अठरा मुख्य पर्वांत विभागून समग्र भारतकथा नैमिषारण्यांत शौनकादि ऋषिवर्यांस सविस्तर कथन केली.]

सौति म्हणालाः—शौनकादिक मुनिश्रेष्ठहो, महाभारतग्रंथाचें संक्षिप्त स्वरूप ध्यानांत येण्यासाठीं हा पर्वसंग्रह तुम्हांस सांगितला. आतां त्या मुख्य पर्वांतील व उपपर्वांतील विषयांचें संकलित वर्णन करितों.

(१) आदिपर्व.

१ अनुक्रमणिकापर्व—ह्यांत गणपत्यावाहन, पर्वानुक्रम व भारत ग्रंथाची अपूर्वता वर्णिली आहे.

२ पर्वसंग्रहपर्व—ह्यांत समंतपंचकवर्णन, अक्षौहिणीपरिमाण इत्यादिकांचें निरूपण आहे.

३ पौष्यपर्व—ह्यांत जनमेजयशाप, आरुण्यादिशिष्याख्यान, उत्तंकचरित्र, पौष्यकथा इत्यादि सांगितलें आहे.

४ पौलोमपर्व—ह्यांत भृगुवंशवर्णन, च्यवनोत्पत्ति, अग्निशाप, रुरुचरित वगैरे विषय प्रतिपादिले आहेत.

५ आस्तीकपर्व—ह्यांत जरत्कारुपितृसंवाद, जरत्कारुविवाह, सर्पोत्पत्ति, सर्पांस मातृशाप, अमृतमंथन, अमृतपान, सुपर्णाख्यान, उच्चैःश्रव्याचें दर्शन, विनतादास्य, आस्तीकोत्पत्ति, जनमेजयकृत सर्पसत्रप्रतिज्ञा, सर्पांचें हवन, तक्षकाचें आश्वासन, आस्तीकाचा मातेशीं संवाद, सर्पांचें परित्राण, सर्पसत्राची समाप्ति इत्यादि विषय निरूपिले आहेत.

६ अंशावतारण—ह्यांत कथानुबंध, भारतवर्णन, उपरिचरराजचरित्र इत्यादि विषय सांगितले आहेत.

७ संभवपर्व—ह्या पर्वांत दक्षकन्यावंशवर्णन, द्वैपायनजन्म, देवांचा अंशावतार, दैत्य, दानव, यक्ष, नाग, गंधर्व, पक्षी व नानाविधभूतें ह्यांची उत्पत्ति, दुष्यंताचें आख्यान, भरताचें जन्म, दक्षाचा वंश, ययातीचें चरित्र, कचोपाख्यान, ययातिविवाह, शर्मिष्ठापुत्रोत्पत्ति, ययातीस शाप, पुरूला राज्याभिषेक, शंतनूचा गंगेशीं परिणय, शांतनवाचें चरित्र, चित्रांगद व विचित्रवीर्य ह्यांचें देहावसान, सत्यवतीभीष्मसंवाद, मांडव्याचा शाप धृतराष्ट्रादिकांचें जन्म, पंडूला राज्याभिषेक, पांडवांची उत्पत्ति, पंडूचा मृत्यु, पांडवांचा पुरप्रवेश, भीमाला विषप्रयोग, धनुर्वेदाचा अभ्यास, युधिष्ठिराला यौवराज्याभिषेक इत्यादि अनेक कथा निरूपण केल्या आहेत.

८ जतुग्रहपर्व—ह्यांत धृतराष्ट्रदुर्योधनसंवाद, पांडवांचें वारणावतीं गमन, लाक्षाग्रहप्रवेश, विदुरोपदेश, बिलखनन, बहिर्निर्गमन, पुरो-

१ श्रीमद्व्यासांच्या व्यवस्थेप्रमाणें भारत ग्रंथाचीं उपपर्वें शंभरच भरलीं पाहिजेत. परंतु विवेचनाच्या सौकर्यासाठीं संकेतभेदानें त्या उपपर्वांपैकीं कित्येकांचीं एकाहून अधिक उपपर्वें मानिलीं जाऊन उपपर्वांची संख्या शंभरापेक्षां कांहीं अधिक भरते.

चनाचें व निषादीच्या पुत्रांचें दहन, पांडवांचा वनप्रवेश इत्यादिकांचें वर्णन आहे.

९ हिडिंबवधपर्व—ह्यांत हिडिंबवध, घटोत्कचोत्पत्ति, व्यासदर्शन, एकचक्रानगरीप्रवेश हीं प्रकरणें सांगितलीं आहेत.

१० बकवधपर्व—ह्यांत बकासुराचा वध, नागरिकांना विस्मय इत्यादि आख्यानें वर्णिलीं आहेत.

११ चैत्ररथपर्व—ह्यांत द्रोणद्रुपदोत्पत्ति, धृष्टद्युम्नद्रौपदीजन्म, पांडवांचें पंचालदेशीं गमन, व्यासकथित द्रौपदीवृत्तांत, अंगारपर्णाचा पराजय व त्याशीं सख्य, तपती, वासिष्ठ व और्वानल ह्यांच्या कथा इत्यादि विषय निरूपण केले आहेत.

१२ स्वयंवरपर्व—ह्यांत पांडवांचें द्रुपदपुरीं गमन, अर्जुनानें केलेला लक्ष्यवेध, द्रौपदीची प्राप्ति, क्षुब्ध भूपतींचा पराजय, रामकृष्णांची शंका, त्यांचें पांडवांकडे गमन, पांच इंद्रांचें उपाख्यान पांचांच्या एकपत्नीत्वामुळें द्रुपदाचा संताप इत्यादि मनोहर कथाभाग सांगितले आहेत.

१३ वैवाहिकपर्व—ह्यांत द्रुपदकृत पांडवपरीक्षण, द्रौपदीचें जन्मकथन, द्रौपदीचें पाणिग्रहण, कृष्णप्रेषित अलंकारांचा स्वीकार इत्यादिकांचें वर्णन आहे.

१४ राज्यलंभपर्व—ह्यांत पांडवांचा वृत्तांत, धृतराष्ट्राची भीष्मादिकांशीं मसलत, धृतराष्ट्राला विदुराचा बोध, विदुरास पांडवांकडे पाठविणें, त्यास श्रीकृष्णदर्शन, पांडवांचें हस्तिनापुरीं गमन, इंद्रप्रस्थीं वास्तव्य, द्रौपदीकालनियम, सुंदोपसुंदांचें आख्यान इत्यादि सांगितलीं आहेत.

१५ अर्जुनवनवासपर्व—ह्यांत चोरांपासून गाईची सुटका, अर्जुनाचा वनवास, उलूप्यर्जुनसमागम, पुण्यतीर्थी गमन, बभ्रुवाहनाचें जन्म, पंचाप्सरांची शापमुक्ति, प्रभासतीर्थी कृष्णार्जुनांची भेट इत्यादि कथा वर्णिल्या आहेत.

१६ सुभद्राहरणपर्व—ह्यांत द्वारकेमध्यें अर्जुनाला सुभद्रा कशी प्राप्त झाली तें सांगितलें आहे.

१७ हरणाहरणपर्व—ह्यांत नजरनजराण्यांसह कृष्णाचें आगमन, सुभद्रेशीं विवाह व अभिमन्यूचें आणि द्रौपदीच्या पुत्रांचें जन्म हीं वर्णिलीं आहेत.

१८ खांडवदाहपर्व—ह्यांत अग्नीचें अर्जुनाप्रत आगमन, त्याशीं अर्जुनाचें भाषण, अर्जुनास गांडीवादिलाभ, खांडवदाह व इंद्रार्जुनांचें युद्ध हीं निरूपिलीं आहेत.

१९ मयदर्शनपर्व—ह्यांत मयासुर व शार्ङ्गक ह्यांची मुक्तता, जरितेच्या ठिकाणीं मंदपाल ऋषींपासून पुत्रोत्पत्ति, जरितेचा पुत्रांशीं संवाद, त्या पुत्रांचें आपसांत संभाषण, मंदपालाचा लपितेशीं संवाद, जरितामंदपालांचा संवाद इत्यादि विषय सांगितले आहेत.

ऋषींहो, हें आदिपर्व फार विस्तृत आहे. ह्यांत २२७ अध्याय असून ८८८४ श्लोक आहेत.

(२) सभापर्व.

१ सभाक्रियापर्व—ह्यांत पांडवसभेचा उपक्रम, किंकरांचें दर्शन, सभानिर्माण व सभाप्रवेश हीं वर्णिलीं आहेत.

२ लोकपालसभाख्यानपर्व—ह्यांत राजधर्मानुशासन व नारदकृत लोकपालसभावर्णन हीं सांगितलीं आहेत.

३ राजसूयारंभपर्व—ह्यांत राजसूयारंभ, जरासंधवधविचार इत्यादिकांचें वर्णन आहे.

४ जरासंधवधपर्व—ह्यांत कृष्णार्जुनभीमांचा मागधपुरप्रवेश, जरासंधवध व बंदींतील राजांची सुटका हीं निरूपण केलीं आहेत.

५ दिग्विजयपर्व—ह्यांत पांडवांनीं केलेल्या दिग्विजयाचें वर्णन आहे.

६ राजसूयिकपर्व—ह्यांत राजसूय यज्ञाकरितां

भूपतींचें आगमन, त्यांचा सत्कार, यागक्रिया इत्यादि विषय सांगितले आहेत.

७ अर्घाभिहरणपर्व—ह्यांत अर्घाभिहरण, शिशुपालकृत उपहास इत्यादिकांचें वर्णन आहे.

८ शिशुपालवधपर्व—ह्यांत शिशुपालाची उत्पत्ति, त्याचा वध, यज्ञाची समाप्ति इत्यादि कथा सांगितल्या आहेत.

९ द्यूतपर्व—ह्यांत दुर्योधनाचा उपहास, शकुनिदुर्योधनसंवाद, द्यूतसभाप्रवेश, युधिष्ठिराचा द्यूतांत पराजय, द्रौपदीस जिंकणें, द्रौपदीकेशाकर्षण, वस्त्रहरण, द्रौपदीप्रत भीष्मभाषण, धृतराष्ट्राची युधिष्ठिरास आज्ञा, द्रौपदीची मुक्तता इत्यादि विषय वर्णिले आहेत.

१० अनुद्यूतपर्व—ह्यांत पुनः द्यूताचा विचार, युधिष्ठिराचा पराजय, पांडवांस वनवासप्राप्ति, नागरिकांचें पांडवांसमवेत वनांत आगमन इत्यादिकांचें निरूपण आहे.

ऋषीहो, ह्या सभापर्वांत ७८ अध्याय असून २५११ श्लोक आहेत.

(३) वनपर्व

१ आरण्यकपर्व—ह्यांत युधिष्ठिरकृत सूर्यस्तव, स्थालीप्राप्ति, धृतराष्ट्रकृत विदुरनिंदा, विदुराचें पांडवांप्रत गमन, विदुराचें निवर्तन, दुर्योधनशकुनींची मसलत, कर्णप्रोत्साहनानें पांडवहननाचा बेत, व्यासांचें आगमन, त्यांनीं केलेला निर्याण न करण्याविषयीं बोध, सुरभीची कथा, मैत्रेयांचा दुर्योधनास शाप इत्यादिकथाभाग वर्णिले आहेत.

२ किर्मीरवधपर्व—ह्यांत भीमसेनानें किर्मीराचा वध कसा केला हें सांगितलें आहे.

३ अर्जुनाभिगमपर्व—ह्यांत वृष्णिपंचालांचें आगमन, कृष्णसंताप व अर्जुनकृत उपशम द्रौपदीविलाप, कृष्णादिकृत द्रौपदीसांत्वन, सौभवधवृत्तांत, यादवांचें सुभद्रेसह द्वारकेंत गमन, पांचालांचें द्रौपदीपुत्रांसमवेत स्वस्थानप्रयाण, पौरजननिवर्तन, द्वैतवनप्रवेश, भीम व द्रौपदी ह्यांशीं धर्माचा संवाद, पांडवांसमीप व्यासांचें आगमन, प्रतिस्मृति, विद्यादान, काम्यकवनप्रवेश, अस्त्रप्राप्त्यर्थ अर्जुनाचें गमन इत्यादि विषय वर्णिले आहेत.

४ कैरातपर्व—ह्यांत किराताचें अर्जुनाशीं युद्ध, अर्जुनास पाशुपतास्त्रप्राप्ति, लोकपालांचें दर्शन, दिव्यास्त्रलाभ इत्यादि कथा निरूपिल्या आहेत.

५ इंद्रलोकाभिगमपर्व—ह्यांत अर्जुनाचें स्वर्गगमन, त्यास उर्वशीशाप, धृतराष्ट्रचिंता, बृहदश्वाचें दर्शन, युधिष्ठिराची आर्तावस्था इत्यादि प्रसंग सांगितले आहेत.

६ नलोपाख्यानपर्व—ह्यांत नल व दमयंती ह्यांचा विवाह, पुत्रकन्योत्पत्ति, द्यूतांत नलाचा पराजय, नलाचें नगराहून प्रयाण, दमयंतीत्याग, नलाचा ऋतुपर्णगृहीं वास, दमयंतीचा पितृगृहीं प्रवेश, पुष्कराचा पराभव, नलास राज्यप्राप्ति, बृहदश्वापासून द्यूतरहस्यज्ञान, बृहदश्वगमन इत्यादिकांचें वर्णन आहे.

७ तीर्थयात्रापर्व—ह्यांत पुलस्त्यनारदकृत तीर्थयात्रामाहात्म्य, लोमशागमन, तीर्थयात्रोपक्रम, गययज्ञवर्णन, कर्णाचा कवचकुंडलमोक्ष, अगस्त्याख्यान, लोपामुद्राऽगस्त्यसंवाद, वृत्रासुरवध, ऋष्यशृंगकथा, भार्गवचरित्र, कार्तवीर्यहैहयवध, प्रभासतीर्थीं वृष्णिसमागम, सौकन्याख्यान, शर्यातियज्ञवर्णन, च्यवनकृत इंद्रमोचन, मांधातृचरित्र, जंतूपाख्यान, सोमकाला शतपुत्रलाभ, श्येनकपोतींचें आख्यान, इंद्राग्नियमकृत शिबिपरीक्षण, अष्टावक्रवृत्तांत, अष्टावक्रकृत बंदिपराजय, कहोडप्राप्ति, यवक्रीत व रैभ्य ह्यांचीं आख्यानें, गंधमादनप्रवेश, नरकासुरवृत्तांत, नारायणाश्रमनिवास, कमलांकरितां भीमाचें गमन, हनुमद्भीमसंवाद व भीमाचें यक्षराक्षसांशीं युद्ध हीं प्रकरणें आहेत.

८ जटासुरवधपर्व—ह्यांत भीमसेनाच्या हस्तें जटासुराचा वध झाला, तो वृत्तांत सांगितला असून वृषपर्व राजांचें तेथें आगमन वर्णिलें आहे.

९ यक्षयुद्धपर्व—ह्यांत आर्ष्टिषेणदर्शन, पांचालीचें प्रोत्साहन, भीमसेनाचें कैलासारोहण, मणिमान्प्रभृति बलिष्ठ यक्षांशीं घोर युद्ध, पांडवकुबेरसमागम, स्वर्गाहून अर्जुनाचें आगमन, भ्रात्यांची भेट इत्यादि विषय निरूपिले आहेत.

१० निवातकवचयुद्धपर्व—ह्यांत हिरण्यपुरदर्शन, निवातकवचयुद्ध, देवशत्रु निवातकवच, पौलोम व कालकेय ह्यांचा वध, इत्यादि कथाभाग वर्णिले आहेत.

११ आजगरपर्व—ह्यांत दिव्यास्त्रदर्शननिवारण, द्वैतवनप्रवेश, भीमाचा अजगरग्रास, अजगरयुधिष्ठिरसंवाद, भीमाची अजगरापासून सुटका इत्यादि विषय सांगितले आहेत.

१२ मार्कंडेयसमास्यापर्व—ह्यांत पांडवांचा काम्यकवनप्रवेश, कृष्णाचें आगमन, ब्राह्मणमाहात्म्यवर्णन, वेनपुत्र पृथूचें चरित्र, तार्क्ष्यसरस्वतीसंवाद, मत्स्योपाख्यान, मार्कंडेयसमास्यापुराण, इंद्रद्युम्न, धुंधुमार, आंगिरस ह्यांचीं उपाख्यानें, पतिव्रतेचें माहात्म्य, इंद्रस्कंदसंवाद इत्यादि प्रकरणें आहेत.

१३ द्रौपदीसत्यभामासंवादपर्व—ह्यांत महिषासुरवध, द्रौपदीचा सत्यभामेशीं संवाद, श्रीकृष्णाचें द्वारकेंत गमन इत्यादि विषय निरूपिले आहेत.

१४ घोषयात्रापर्व—ह्यांत पांडवांचें द्वैतवनाप्रत पुनः आगमन, कौरवांची घोषयात्रेची मसलत, घोषयात्राप्रस्थान, कुरुगंधर्वांचें युद्ध, कर्णाचें पलायन, युधिष्ठिराच्या आज्ञेवरून कौरवांचें मोचन हे कथाभाग वर्णिले आहेत.

१५ मृगस्वप्नोद्भवपर्व—ह्यांत धर्मराजानें मृगस्वप्न अवलोकन केल्यामुळें पांडवांनीं काम्यकवनांत प्रवेश केला, तें प्रकरण निरूपण केलें आहे.

१६ व्रीहिद्रौणिकपर्व—ह्यांत धर्माप्रत व्यासांचें वचन, मुद्गलचरित, मुद्गलदेवदूतसंवाद इत्यादि कथाभाग वर्णिले आहेत.

१७ द्रौपदीहरणपर्व—ह्यांत दुर्वास मुनींचें पांडवांकडे प्रेषण, कृष्णाचें आगमन, द्रौपदीचें हरण, जयद्रथाचा पाठलाग व पलायन इत्यादिकांचें वर्णन आहे.

१८ जयद्रथविमोक्षणपर्व—ह्यांत जयद्रथाचे पांच पाट व सुटका, आणि शिवाराधन व वरप्राप्ति वगैरे सांगितलीं आहेत.

१९ रामोपाख्यानपर्व—ह्यांत रामरावणजन्मवृत्त, रामाचा वनवास, सीताहरण, सीतारावणसंवाद, रामरावणयुद्ध, रावणाचा वध, रामाला राज्याभिषेक, युधिष्ठिराचें सांत्वन इत्यादि विषयांचें निरूपण केलें आहे.

२० पतिव्रतामाहात्म्यपर्व—ह्यांत महान पतिव्रता सावित्री हिची कथा वर्णिली आहे.

२१ कुंडलाहरणपर्व—ह्यांत कर्णाप्रत इंद्राचें आगमन, कर्णकृत कवचकुंडलदान, त्यास इंद्राकडून शक्तीची प्राप्ति इत्यादि कथाभाग सांगितले आहेत.

२२ आरणेयपर्व—ह्यांत यमधर्मानें पुत्रास उपदेश केला तो वर्णिला असून पांडवांचें पश्चिम दिशेचें प्रयाण निरूपिलें आहे.

ऋषीहो, ह्या पर्वांत २६९ अध्याय असून श्लोकसंख्या ११६६४ आहे.

४ विराटपर्व.

१ पांडवप्रवेशपर्व—ह्यांत शमीवृक्षावर पांडवांनीं केलेला अस्त्रन्यास, त्यांचा विराटनगरांत प्रवेश व तेथें गुप्तवास्तव्य हें वर्णिलें आहे.

२ समयपालनपर्व—ह्यांत जीमूताचा वध निरूपिला आहे.

३ कीचकवधपर्व—ह्यांत कीचकसैरंध्रीसंवाद, द्रौपदीभीमसंवाद, कीचकवध इत्यादि मनोहर कथा वर्णिल्या आहेत.

४ गोहरणपर्व—ह्यांत पांडवांच्या शोधार्थ हेरांची असमर्थता, कीचकवधवार्ताप्रसार, दक्षिणगोग्रहण, त्रिगर्तांशीं विराट राजाचें तुमुल युद्ध, विराटाचें बंधन, भीमहस्तें त्याची सुटका, उत्तर-

गोग्रहण, कौरवांचा पराभव, धेनूंचें मोचन इत्यादि विषय सांगितले आहेत.

९ वैवाहिकपर्व---ह्यांत पांडवांची प्रसिद्धि, अभिमन्यूचा उत्तरेशीं विवाह इत्यादि कथा निरूपिल्या आहेत.

ऋषीहो, ह्या पर्वांत ६७ अध्याय असून २०५० श्लोक आहेत.

(५) उद्योगपर्व.

१ सैन्योद्योगपर्व---ह्यांत जयाशेनें अर्जुनाचें व दुर्योधनाचें श्रीकृष्णासमीप गमन, दुर्योधनकृत अक्षौहिणीस्वीकार व अर्जुनकृत श्रीकृष्णस्वीकार, दुर्योधनास शल्यसाहाय्यप्राप्ति, शल्योक्त वृत्रवधाख्यान इत्यादि विषय निरूपण केले आहेत.

२ संजययानपर्व—ह्यांत पांडवांच्या पुरोहिताचें भीष्मादिकांशीं सामपर भाषण, संधीकरितां संजयाचें पांडवांकडे आगमन, धृतराष्ट्राप्रत संजयाची उक्ति इत्यादि प्रकरणें सांगितलीं आहेत.

३ प्रजागरपर्व—ह्यांत धृतराष्ट्राची चिंता व निद्रानाश, त्यास विदुराचा बोध इत्यादि कथाभाग वर्णिले आहेत.

४ सनत्सुजातपर्व—ह्यांत धृतराष्ट्र चिंताकुल असतां त्यास सनत्सुजात मुनींनीं ब्रह्मविद्येचा उपदेश केला, तें प्रकरण निरूपण केलें आहे.

५ यानसंधिपर्व—ह्यांत कृष्णार्जुनांच्या एकविचाराबद्दल संजयाचें भाषण, दुर्योधनाची आत्मश्लाघा, दुर्योधनाप्रत गांधारीचें भाषण, धृतराष्ट्रकृत श्रीकृष्णवर्णन इत्यादि कथाभाग सांगितले आहेत.

६ भगवद्यानपर्व—ह्यांत विदुरकृत श्रीकृष्णपूजा, श्रीकृष्णाचा सभाप्रवेश, दंभोद्भवाचें आख्यान, मातलिवरान्वेषणकथा, गालवचरित, विदुलेच्या पुत्रास बोध, श्रीकृष्णानें केलेलें विश्वरूपप्रदर्शन, कर्णाशीं श्रीकृष्णाची कानगोष्ट, कर्णानें दिलेलें उद्धटपणाचें उत्तर, उपप्लव्यास पांडवांसमीप श्रीकृष्णाचें आगमन व सर्ववृत्तांतनिवेदन इत्यादि विषय वर्णिले आहेत.

७ सेनानिर्याणपर्व—ह्यांत उभयपक्षांची युद्धाची सिद्धता, युधिष्ठिरार्जुनसंवाद, धृतराष्ट्रास संजयाचें भाषण इत्यादि कथा सांगितल्या आहेत.

८ उलूकदूताभिगमनपर्व---ह्यांत युधिष्ठिराकडे उलूकाचें प्रेषण, उलूकानें सांगितलेला दुर्योधनाचा निरोप, उलूकाशीं कृष्णार्जुनांचें भाषण इत्यादि विषय वर्णिले आहेत.

९ रथातिरथसंख्यानपर्व—ह्यांत नर, अश्व, गज, रथ इत्यादि सेनेची गणना वर्णन केली आहे.

१० अंबोपाख्यानपर्व—ह्यांत अंबोपाख्यान निरूपण केलें असून युधिष्ठिराचें युद्धार्थ प्रयाण सांगितलें आहे.

ऋषीहो, ह्यांत १८६ अध्याय असून ६६९८ श्लोक आहेत.

(६) भीष्मपर्व.

१ जंबूखंडनिर्माणपर्व, व २ भूमिपर्व—ह्यांत सैन्याचें शिक्षण, व्यासांचें आगमन, द्वीपांचें वर्णन इत्यादि विषय प्रतिपादिले आहेत.

३ भगवद्गीतापर्व—ह्यांत युधिष्ठिरार्जुनसंवाद, अर्जुनाचा विषाद, आत्मानात्मविचार, विश्वरूपदर्शन इत्यादि कथाभाग निरूपिले आहेत.

४ भीष्मवधपर्व—ह्यांत कौरवपांडवांच्या सैन्यांचें घोर युद्ध, श्रीकृष्णाचो चाबूक घेऊन भीष्मावर स्वारी, अर्जुनास श्रीकृष्णाचे वाक्प्रहार, भीष्मशिखंडिसमागम, भीष्माचें पतन व शरपंजरीं शयन इत्यादि अनेक प्रसंग वर्णिले आहेत.

ऋषीहो, ह्या पर्वांत ११७ अध्याय व ५८८४ श्लोक आहेत.

(७) द्रोणपर्व.

१ द्रोणाभिषेकपर्व—ह्यांत महाप्रतापी द्रोणाचार्यांस सैनापत्याभिषेक, द्रोणाची प्रतिज्ञा, भीमशल्यांचें युद्ध इत्यादि कथा सांगितल्या आहेत.

२ संशप्तकवधपर्व-ह्यांत अर्जुनाची संशप्तकांवर स्वारी, भगदत्ताचा वध, शकुनीचा पराभव इत्यादिकांचें निरूपण आहे.

३ अभिमन्युवधपर्व—ह्यांत चक्रव्यूहनिर्माण, अभिमन्यूचा प्रताप, अभिमन्यूच्या रथशस्त्रादिकांचा भंग, सहाजणांनीं मिळून शस्त्रहीन अभिमन्यु बाळकाचा वध इत्यादि कथाभाग वर्णिले आहेत.

४ प्रतिज्ञापर्व, ५ जयद्रथवधपर्व व ६ घटोत्कचवधपर्व—ह्यांत अर्जुनानें केलेली जयद्रथवधाची प्रतिज्ञा, त्याजकडून जयद्रथाचा वध, अर्जुनाच्या शोधासाठीं भीमसेन व सात्यकि ह्यांचा भारतीसेनेंत प्रवेश, अवशिष्ट संशप्तकांचा नाश, दुर्मर्षणादि धार्तराष्ट्रांचा वध, नारायणगण व गोपाळ, अलंबुष, श्रुतायु, जलसंध, सौमदत्ति, विराट, द्रुपद, घटोत्कच इत्यादिकांचा वध वगैरे विषय सांगितले आहेत.

७ द्रोणवधपर्व व ८ नारायणास्त्रमोक्षपर्व—ह्यांत द्रोणाचार्यांचा वध, अश्वत्थाम्यानें केलेला नारायणास्त्राचा प्रयोग, रुद्राचें माहात्म्य, व्यासांचें आगमन, कृष्णार्जुनांचा महिमा इत्यादि कथाभाग सांगितले आहेत.

ऋषीहो, ह्या पर्वांत १७० अध्याय व ८९०९ श्लोक आहेत.

(८) कर्णपर्व.

ह्या पर्वांत उपपर्वें नाहींत. ह्यामध्यें शल्याची कर्णाच्या सारथ्याविषयीं प्रार्थना, त्रिपुरवधाख्यान, कर्ण व शल्य ह्यांचें संभाषण, हंसकाकीयाख्यान, अश्वत्थाम्याच्या हस्तें पांड्य राजाचा वध, दंडसेनदंडांचा वध, धर्मराजास संकट, धर्मार्जुनांचा एकमेकांवर क्रोध, श्रीकृष्णकृत अर्जुनसांत्वन, भीमाकडून दुःशासनाचा वध व रुधिरप्राशन, अर्जुनहस्तें कर्णाचें हनन इत्यादि कथा निरूपण केल्या आहेत.

ह्या पर्वांत ६९ अध्याय असून ४९६४ श्लोक आहेत.

(९) शल्यपर्व.

१ शल्यसैनापत्याभिषेकपर्व—ह्यांत मद्रराज शल्याची सेनापतीच्या अधिकारावर योजना, कौमाराख्यान, अभिषेकविधि, मुख्य मुख्य कौरवांचा नाश, धर्मराजाकडून शल्याचा व सहदेवाकडून शकुनीचा वध इत्यादिक कथाभाग आहेत.

२ न्हदप्रवेशपर्व, व ३ गदायुद्धपर्व—ह्यांत दुर्योधनाचा न्हदामध्यें प्रवेश व जलस्तंभन, दुर्योधनाचा शोध, दुर्योधन व युधिष्ठिर ह्यांचा संवाद, भीमदुर्योधनसंवाद, बळरामाचें आगमन, तीर्थांचें माहात्म्य, गदायुद्धास प्रारंभ, दुर्योधनाचा ऊरुभंग, दुर्योधनाचा विलाप, अश्वत्थाम्यास सैनापत्याभिषेक इत्यादि कथा सांगितल्या आहेत.

ह्या पर्वांत ५९ अध्याय असून ३२२० श्लोक आहेत.

(१०) सौप्तिकपर्व.

१ धृष्टद्युम्नादिकवधपर्व—ह्यांत उलूककर्माचें अवलोकन, अश्वत्थाम्याची प्रतिज्ञा, शिबिरद्वारीं अद्भुतदर्शन, शिवाराधन, धृष्टद्युम्नादिकांचा वध, पांडव व सात्यकि ह्यांची सुटका, दुर्योधनाचा प्राणत्याग इत्यादि विषय निरूपिले आहेत.

२ ऐषीकपर्व—ह्यांत धृष्टद्युम्नादिकांच्या वधवृत्तांताचें श्रवण, द्रौपदीचा शोक, अश्वत्थाम्यावर भीमाची स्वारी, अश्वत्थामाकृत नारायणास्त्राचा मोक्ष, त्याचा अर्जुनकृत उपशम, अश्वत्थाम्याचें मणिहरण व त्यास श्रीकृष्णाचा शाप इत्यादि कथा निवेदन केल्या आहेत.

ऋषीहो, ह्या पर्वांत १८ अध्याय असून ८७० श्लोक आहेत.

(११) स्त्रीपर्व.

१ जलप्रदानिकपर्व, व २ स्त्रीविलापपर्व—ह्यांत प्रज्ञाचक्षु धृतराष्ट्राकडून भीमरूपधारी लोहमूर्तीचा भंग, विदुरकृत धृतराष्ट्रप्रबोध, जलप्रदानार्थ धृतराष्ट्राचें स्त्रीजनांसमवेत युद्धभूमीप्रत गमन, श्रीकृष्णाकडून गांधारीस उपदेश, युद्धभूमीवर पतन पावलेल्या वीरांचें यथाविधि दहन, स्त्रियांचा विलाप, गांधारीची मूर्च्छा व कृष्णास शाप इत्यादि विषय निरूपण केले आहेत.

२ श्राद्धपर्व—ह्यांत युद्धांत पतन पावलेल्या वीरांची संख्या व गति, सर्वांना उदकदान, कुंतीकृत कर्णजन्मवृत्त कथन इत्यादि कथाभाग वर्णिले आहेत. ह्या पर्वांत २७ अध्याय व ७७९ श्लोक आहेत.

(१२) शांतिपर्व.

ह्या पर्वामध्यें, शरपंजरीं शयन केलेल्या भीष्माचार्यांनीं आप्तसुहृदांच्या शोकानें विव्हळ झालेल्या युधिष्ठिरास १ राजधर्म, २ आपद्धर्म, व ३ मोक्षधर्म सांगितले, त्यांचें वर्णन आहे. हें पर्व म्हणजे सर्व प्रकारच्या ज्ञानाचें भांडागार होय. ह्या पर्वांतील विषयांच्या श्रवणमननादिकांच्या योगें पुरुषास सर्वज्ञता प्राप्त होते. ह्यांत ३२९ अध्याय असून श्लोकसंख्या १४७३२ आहे.

(१३) अनुशासनपर्व.

ह्या पर्वामध्यें गांगेयकथित धर्मज्ञानामुळें युधिष्ठिराला प्राप्त झालेली शांति वर्णिली असून, धर्मार्थपर व्यवसायांचें व दानादिकांचें फल सांगितलें आहे. दानास सत्पात्र कोण, दानाचा उत्कृष्ट विधि कोणता, सदाचाराचे नियम, सत्याचें उत्तम फल, गोब्राह्मणांचें महत्त्व, देशकालानुरूप धर्मरहस्य इत्यादि अनेक मनोहर विषय ह्या पर्वांत विशद केले आहेत. ह्या पर्वांत १४६ अध्याय असून ८००० श्लोक आहेत.

(१४) आश्वमेधिकपर्व.

ह्या पर्वांत संवर्तमरुत्तीयकथा, सुवर्णकोशप्राप्ति, परिक्षिताचें जन्म, त्याचें अस्त्राग्नीनें दहन व श्रीकृष्णप्रसादानें पुनरुज्जीवन, आश्वमेधीय अश्वाचें उत्सर्जन, पांडवांचें अनेक असहिष्णु राजपुत्रांशीं युद्ध, बभ्रुवाहनापासून अर्जुनास प्राप्त झालेलें संकट, अश्वमेध यज्ञांतील नकुलाख्यान इत्यादि कथाभाग वर्णिले आहेत. ह्या पर्वांत १०३ अध्याय असून ३३२० श्लोक आहेत.

(१५) आश्रमवासिपर्व.

ह्या पर्वांत धृतराष्ट्रगांधारींचें विदुरासमवेत आश्रमांत गमन, त्यांच्या मागोमाग धर्मादिकांस सोडून कुंतीचें प्रयाण, युद्धांत पतन पावलेल्या पुत्रपौत्रादिकांचें व्यासप्रसादानें धृतराष्ट्रास दर्शन व त्यास वाटलेलें आश्चर्य, धृतराष्ट्र गांधारींस सद्गति, विदुराचें स्वस्थानीं निर्याण, संजयास उत्तम गति, धर्मराजाला नारदांची भेट, यादवकुलाचा संहार झाल्याचें वर्तमान इत्यादि कथा आहेत. ह्या पर्वांत ४२ अध्याय असून ११०९ श्लोक आहेत.

(१६) मौसलपर्व.

ह्या पर्वांत ब्रह्मशापानें दग्ध झालेल्या यादवांनीं सुरापान करून मुसळाच्या अंशानें युक्त असलेल्या लव्हाळ्यांनीं एकमेकांचा अंत कसा केला हें वर्णिलें असून, रामकृष्णांसही कालवश व्हावें लागलें हें निरूपण केलें आहे. पुढें अर्जुनाचें द्वारकेंत आगमन झालें असतां यादवरहित द्वारका पाहून त्यास झालेलें दुःख, व वसुदेवाचा और्ध्वदेहिक संस्कार केल्यावर अर्जुनानें पानभूमीवर अवलोकन केलेला यादवांचा भयंकर संहार, नंतर त्यानें केलेले रामकृष्णांचे अंत्यविधि, तसेंच अर्जुनाचें द्वारकेंतून निर्वर्तन, त्यास आलेली मार्गांतील आपत्ति, गांडीवाचा पराभव, दिव्यास्त्रांची पराङ्मुखता, पराक्रमाचा लोप, यादवस्त्रियांची दुर्दशा, अर्जुनाला अत्यंत विषाद, त्याचें धर्माप्रत आगमन इत्यादि हृदयभेदक कथा आहेत. ह्या पर्वांत ८ अध्याय असून ३२० श्लोक आहेत.

(१७) महाप्रस्थानिक पर्व.

ह्या पर्वांत पांडवांचा राज्यत्याग, त्यांचें द्रौपदीसहित उत्तर दिशेस देहत्यागार्थ प्रयाण, पुढें लौहित्य नामक सागरासमीप आल्यावर त्यांस अग्नीचें दर्शन, तेथें पार्थाकडून अग्नीस गांडीवाचें पूजनपूर्वक अर्पण, भ्राते व द्रौपदी ह्यांचें पतन, युधिष्ठिराचें वैराग्य व महाप्रस्थान इत्यादि

विषय निरूपिले आहेत. ह्या पर्वांत ३ अध्याय असून १२३ श्लोक आहेत.

(१८) स्वर्गारोहणपर्व.

ह्या पर्वांत धर्मराजाला नेण्याकरितां दैविक रथाची प्राप्ति, श्वानावांचून आरोहण करण्याची धर्मराजाची अनिच्छा, भूतवत्सल युधिष्ठिराची धर्मनिष्ठा, श्वानरूपाचा त्याग करून यमाचें धर्मासमवेत स्वर्गाप्रत आगमन, धर्मास स्वर्गमार्गीं झालेल्या यातना, देवदूतकृत मायिक नरकप्रदर्शन व त्यांतून भ्रात्यांचें दीनशब्दश्रवण, आणि यम व इंद्र ह्यांजकडून धर्मराजास ऐहिक ऐश्वर्यफलाचें निदर्शन, त्याचें आकाशगंगेंत स्नान, मानवदेहाचा त्याग, स्वर्गप्राप्ति, देवादिकांकडून धर्मराजाचा सन्मान व त्यास आनंद इत्यादि कथाभाग निरूपिले आहेत. ह्या पर्वांत ५ अध्याय असून २०९ श्लोक आहेत.

(१९) हरिवंशपर्व.

ह्या पर्वामध्यें हरिवंश व भविष्य ह्यांचा संग्रह आहे. हरिवंशामध्यें १२००० श्लोक आहेत.

ऋषीहो, महाभारत ग्रंथांतील पर्वांचा व विषयांचा संग्रह हा असा आहे.


महाभारताचें फल.

ज्यांत अठरा अक्षौहिणी सैन्य एकत्र होऊन, त्याचें घनघोर युद्ध अठरा दिवसपर्यंत झालें म्हणून वर्णिलें आहे असें हें भारताख्यान ज्यानें उत्तम प्रकारें जाणलें नाहीं, त्यानें, चारी वेदांचें सांग अध्ययन करून वेदांतशास्त्राचाही जरी अभ्यास केला असला, तरी त्यास विचक्षण असें म्हणतां येणार नाहीं. भगवान व्यास मुनींनीं, ह्या विस्तृत भारत ग्रंथांत, सर्व व्यवहारांत आदिभूत जें अर्थशास्त्र तें पूर्णपणें प्रतिपादिलें आहे. तसेंच धर्मशास्त्र व कामशास्त्र यांचेंही ह्यांत सांग वर्णन आहे. त्यामुळें, चतुर्विध पुरुषार्थ साध्य करून देणाऱ्या ह्या ग्रंथाचें ज्यानें एकदा श्रवण केलें, त्यास ह्याव्यतिरिक्त दुसरें कांहींएक श्रवण करावेंसें वाटत नाहीं. कोकिळ पक्ष्याची मंजुळ वाणी ज्यानें एकदा ऐकिली, त्यास कर्कश अशा काकशब्दाचा जसा तिटकारा येतो, तसा भारत ग्रंथ श्रवण केलेल्या पुरुषास अन्य ग्रंथांचा तिटकारा येतो. त्रैलोक्यांतील सकल पदार्थ ज्याप्रमाणें पृथिव्यादि पंचमहाभूतांपासूनच उत्पन्न झाले आहेत, त्याप्रमाणें कवींच्या सकल कल्पना ह्या भारतेतिहासापासूनच उत्पन्न झाल्या आहेत. जसें आकाशरूप अवकाशामध्यें जारज, अंडज, स्वेदज व उद्भिज्ज ह्या चारी प्रकारच्या सृष्टीचा अंतर्भाव आहे, तसा ह्या भारताख्यानांत सर्व पुराणांचा अंतर्भाव आहे. इंद्रियांचे सर्व व्यापार जसे केवळ विचित्र मनोवृत्तींवरच अवलंबून असतात, तशीं ह्या जगांतील बऱ्या वाईट कर्मांचीं सर्व साधनें ह्या भारत ग्रंथावरच अवलंबून आहेत. आहारावांचून शरीर राहणें जितकें अशक्य, तितकेंच भारताख्यानाच्या आधारावांचून एखादी कथा अस्तित्वांत असणें अशक्य आहे. आपला उत्कर्ष व्हावा अशी इच्छा बाळगणारे सेवक जसे कुलीन धन्याची सेवा करून उपजीवन करितात, तसे सर्व कविश्रेष्ठ ह्या भारताख्यानाचाच मनोभावें आश्रय करून आपलें उपजीवन करितात. ब्रह्मचर्य, वानप्रस्थ व संन्यास ह्यांपैकीं एकही आश्रम गृहस्थाश्रमावर वर्चस्व स्थापण्यास समर्थ नाहीं; तद्वत् कोणीही कवि ह्या भारतकाव्यावर वर्चस्व करण्यास समर्थ नाहीं. ऋषीहो, आपलीं अंतःकरणें सदोदीत जागृत राखून धर्मावर पूर्ण लक्ष ठेवा. परलोकीं गेल्यावर त्या ठिकाणी आपलें साह्य करणारा ह्या धर्मावांचून अन्य नाहीं. संपत्ति व स्त्रिया ह्यांची कितीही सेवा केली, तरी त्यांच्या ठिकाणीं आत्मभाव व स्थिरता उत्पन्न होत नाहीं. संपत्ति व कलत्र हीं क्षणभंगुर आहेत. धर्म हा मात्र अढळ होय. असो. ऋषीहो, व्यासांच्या ओष्ठप्रांतापासून उत्पन्न झालेलें हें अगाध भारत

शास्त्र अत्यंत पुण्यदायक असल्यामुळें त्याच्यापासून सर्व पातकांचें भस्म होऊन चित्तशुद्धि घडते व सर्वतोपरी कल्याण होतें. जो कोणी ह्या भारत ग्रंथाचें उत्तम प्रकारें श्रवण करून मननिदिध्यसनांनीं तें हृदयांत प्रतिबिंबित करील, त्यास पुष्कर तीर्थांतील स्नानानें काय अधिक मिळणार आहे ? इंद्रियवृत्तीच्या स्वाधीन होऊन प्राण्यानें सकाळपासून सायंकाळपर्यंत जें जें पातक केलें असेल, तें तें सर्व सायंकाळीं ह्या महाभारताच्या पठनानें नष्ट होतें. त्याचप्रमाणें, प्रातःकाळीं ह्याचें पठन केलें असतां, रात्रीमध्यें जें जें कायिक, वाचिक व मानसिक पातक घडलें असेल, त्या सर्वांपासून प्राणी मुक्त होतो. सुवर्णमंडित शिंगें करून शंभर उत्तम धेनु प्रतिदिवशीं वेदार्थवेत्त्या महाज्ञानी ब्राह्मणास दान दिल्यानें जितकें पुण्य लागतें, तितकेंच पुण्य ह्या परमपावन भारत ग्रंथाचें नित्य श्रवण केल्यानें लागतें.

अध्यायाची फलश्रुति.

ऋषीहो, हा श्रेष्ठ ग्रंथ महासागराप्रमाणें विस्तीर्ण व अर्थगांभीर्यामुळें मोठा अगाध आहे. ह्यास्तव ह्याच्या परतीरीं जाणें अत्यंत दुष्कर होय. म्हणून सर्व ग्रंथाचा सारांशरूप हा पर्वसंग्रहाध्याय तुम्ही श्रवण करा, म्हणजे हा नौकेप्रमाणें तुम्हांस साहाय्य करून भारतोदधीच्या परतीरास अनायासें पोहोंचवील !



पौष्यपर्व.

अध्याय तिसरा.

—:०:—

जनमेजयास शाप.

सौति म्हणाला:–शौनकादिक ऋषीहो, पूर्वी एकावेळीं जनमेजय राजा कुरुक्षेत्रामध्यें दीर्घ सत्र करीत होता. त्या राजास श्रुतसेन, उग्रसेन व भीमसेन असे तीन भ्राते होते; त्यांच्यासह तें जनमेजयाचें सत्र चालू असतां तेथें एक सारमेय म्हणजे कुत्रा प्राप्त झाला. सत्रमंडपांत सारमेय आला असें पाहून श्रुतसेनादिक जनमेजयाच्या बंधूंनीं त्यास ताडन करून हांकून लाविलें. तेव्हां तो मोठमोठ्यानें आक्रोश करीत आपली माता देवशुनि सरमा हिच्याकडे गेला. तो सारमेय रडत आला, असें पाहून त्याची आई त्यास म्हणाली, 'बाळा, कां रे रडतोस? तुला कोणीं मारिलें कीं काय?' तेव्हां त्यानें मातेस उत्तर दिलें, 'आई, मला जनमेजयाच्या भ्रात्यांनीं मारिलें.' त्यावर देवशुनीनें त्यास म्हटलें, 'तूं खचीत तेथें कांहीं तरी खोडी केली असशील, म्हणून तुला मार मिळाला!' तेव्हां तो सारमेय पुन: मातेला म्हणाला, 'हे माते, मीं कांहींएक खोडी केली नाहीं. यज्ञीय द्रव्यांकडे मीं पाहिलें सुद्धां नाहीं; मग. त्यांस चाटण्याची वगैरे गोष्ट कशास हवी?' पुत्राचे ते शब्द ऐकून देवशुनीस फार दु:ख झालें, व ती लागलीच मुलास बरोबर घेऊन सत्रमंडपांत प्राप्त झाली. तेथें जनमेजय राजा व त्याचे बंधु आपआपल्या कार्यांत निमग्न होते. त्यांस पाहून ती क्रोधानें संतप्त झाली व श्रुतसेनादिकांसमक्ष जनमेजयास म्हणाली, 'हे राजा, ह्या माझ्या पुत्रानें तुझ्या सत्रांत कांहींएक अपराध केला नसतांही तुझ्या भ्रात्यांनीं त्यास शिक्षा केली, ती कां बरें? अरे, ह्यानें येथें हविर्द्रव्यांस चाटलें नाहीं, इतकेंच नव्हे, तर त्यांकडे त्यानें पाहिलें सुद्धां नाहीं; आणि असें असूनही त्यास मार बसला, हें मला मोठें आश्चर्य वाटतें!'

ऋषीहो, देवशुनीचें तें भाषण श्रवण करून त्यावर कांहीं उत्तर न देतां सर्वच स्तब्ध बसले. तेव्हां ती जनमेजयास फिरून म्हणाली:—राजा, पहा–हे तुझे भ्राते कांहींच बोलत नाहींत, ह्यावरून ह्यांनीं माझ्या पुत्रास विनाकारण शिक्षा केली हें उघड आहे. तेव्हां या तुमच्या अविचारीपणाबद्दल तुम्हांस शिक्षा होणेंच योग्य आहे. ह्याकरितां मी तुला शाप देतें कीं, ह्या तुझ्या सत्रास अकल्पित विघ्न उत्पन्न होईल. ऋषीहो, देवशुनीचें तें शापवचन श्रवण करितांच जनमेजय राजा एकदम चकित झाला; त्याच्या मुखावाटे शब्दही निघेना; त्याचीं गात्रें विगलित झालीं; त्याला मोठी भीति पडली; आणि आपल्या भावांकडून निरपराध्याला व्यर्थ शासन झालें, असें पुन: पुन: मनांत येऊन तो फार तळमळूं लागला! नंतर त्यानें तें सत्र समाप्त केलें आणि हस्तिनापुरास परत येऊन त्या शापरूप पापकृत्येचा संहार करण्याकरितां महासमर्थ असा पुरोहित मिळविण्याचा प्रयत्न चालविला

कांहीं कालानंतर जनमेजय राजा मृगयेकरितां वनांत हिंडत असतां त्यास एक आश्रम आढळला. तो आश्रम त्याच्या राज्यांतीलच एका प्रांतांत होता. त्या आश्रमांत श्रुतश्रवा नामक कोणी एक ऋषि रहात असे. त्याला सोमश्रवा नांवाचा एक पुत्र होता. तो सदासर्वकाल तपोनुष्ठानांत निमग्न असे. त्याची उग्र तपश्चर्या अवलोकन करून जनमेजयानें त्यास पुरोहित करण्याचा विचार केला आणि तो श्रुतश्रव्यास अभिवंदन करून म्हणाला, 'हे भगवन्, ह्या आपल्या पुत्रानें माझें पौरोहित्य स्वीकारावें अशी माझी प्रार्थना आहे; तर माझी मनीषा पूर्ण करावी.' राजाची

विनंती श्रवण करून तो श्रुतश्रवा मुनि म्हणाला, 'हे जनमेजय भूपते, हा माझा पुत्र महादेदीप्यमान आहे. वेदादिकामध्यें ह्यास प्रतिसूर्यच म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. ह्याचें जन्म एका सर्पिणीच्या उदरीं झालें आहे. ह्याचा पिंड म्हणजे केवळ माझी दिव्य तपोमूर्तिच समजावी. माझें तपोमय उग्र वीर्य त्या सर्पिणीनें प्राशन केल्यामुळें तिच्या उदरीं ह्या लोकोत्तर पुरुषाचें जन्म झालें. राजा, हा माझा पुत्र तुझीं कोणतींही संकटें निवारण करण्यास समर्थ आहे. भगवान शंकरानेंच जर एखादें अरिष्ट निर्माण केलें असेल, तर मात्र ह्याचा उपाय चालणार नाहीं. परंतु, जर कोणी ब्राह्मण याचना करावयास आला, तर त्यास तो जें मागेल तें द्यावयाचें, असा त्याचा कडकडीत नियम आहे; ह्यास्तव ही गोष्ट तुला मान्य असेल तर तूं ह्यास घेऊन जा व त्याजला पुरोहितपणा दे.'

मुनिश्रेष्ठहो, श्रुतश्रव्याचें भाषण श्रवण करून जनमेजय राजास त्याचें म्हणणें मान्य झालें; आणि तो सोमश्रव्यास समवेत घेऊन राजधानीस परत गेला. तेथें त्यानें आपल्या बंधूंस सांगितलें कीं, 'भ्रातेहो, मीं ह्या सोमश्रवा ऋषिवर्यास पुरोहित केलें आहे; ह्यासाठीं, हा जी आज्ञा करील, ती तुम्हीं मागेंपुढें न पाहतां एकदम परिपूर्ण करावी.' ह्याप्रमाणें जनमेजयाचे शब्द ऐकून तात्काळ श्रुतसेनादिकांनीं तें शिरसा मान्य केलें; आणि उपाध्याय सोमश्रवा मुनि हे जसें सांगतील, तसें आचरण करण्याचा त्यांनीं परिपाठ ठेविला.

पुढें जनमेजय राजा तक्षशिला नामक देशावर स्वतः चाल करून गेला; आणि त्यानें तो देश हस्तगत करून घेतला, व तो आपले राजधानीस परत आला. ह्या काळांत एके स्थळीं धौम्य नामक कोणी एक ऋषि राहत होता. त्याच्या पित्याचें नांव अपोद असें होतें. कारण तो केवळ जलावर चरितार्थ करीत असे. धौम्य हा अपोदाचा पुत्र असल्यामुळें त्यास आपोद असेंही म्हणत असत. आपोद धौम्यापाशीं तीन शिष्य होते. त्यांचीं नांवें आरुणि, उपमन्यु व वेद अशीं होतीं. आरुणि हा पंचाल देशांतला होता, म्हणून त्यास आरुणि किंवा आरुणिपांचाल असेंही म्हणत.

आरुणीची गुरुनिष्ठा.

ऋषीहो, ते तिघेही शिष्य आपल्या गुरूच्या आज्ञेत उत्तम प्रकारें वागत असत. एकदां धौम्य गुरूंनीं आरुणीची परीक्षा करण्याकरितां त्यास आज्ञा केली कीं, 'बा आरुणे, तूं जा, आणि शेतास बांध घालून पाण्याचा निरोध कर.' तेव्हां आरुणि हा त्या आज्ञेप्रमाणें शेतावर गेला, आणि पाणी आडविण्याचा प्रयत्न करूं लागला. परंतु धौम्यगुरूंनीं योगबलानें जलाच्या प्रवाहास इतका जोर उत्पन्न केला होता कीं, कोणत्याही उपायानें त्या जलाचा निरोध होईना. अखेरीस आरुणि अगदीं खिन्न व हताश झाला. इतक्यांत त्यास एक युक्ति सुचली कीं, 'प्रवाहाचा वेग कुंठित करण्यासाठीं आपल्या शरिराचाच बांध घालावा, म्हणजे निश्चयानें पाण्याचा निरोध होईल!' नंतर लागलेंच आरुणीनें तसें केलें. आणि तो स्वतः पाण्याच्या ओघावर आडवा पडतांच पाण्यास तात्काळ प्रतिबंध झाला! ह्याप्रमाणें आरुणीनें आपल्या शरिराचा बांध घातला असतां कित्येक दिवस निघून गेल्यावर धौम्यांनीं एके दिवशीं शिष्यांस विचारिलें:—शिष्यहो, आरुणि हा कोठें आहे बरें? तेव्हां शिष्य म्हणाले:—भगवन्, आपणच आज्ञा केल्यावरून तो शेतांत येणारें पाणी आडविण्याकरितां गेला आहे? शिष्यांनीं दिलेलें उत्तर श्रवण करून धौम्य ऋषि म्हणाले:– बरें तर, आरुणि हा जेथें असेल, तेथें आपण सर्व जाऊं चला. नंतर ते सर्वजण त्या शेतावर गेले; परंतु त्यांस कोठेंही आरुणि आढळला नाहीं. तेव्हां 'बा आरुणे, कोठें आहेस रे? इकडे ये,' अशी

गुरूंनीं हांक मारिली. ती हांक प्रत्यक्ष धौम्य गुरूंची आहे, असें जाणून, जेथें आरुणि हा जलप्रवाहास प्रतिबंध करण्याकरितां निजून राहिला होता, तेथून तो एकदम उठला आणि गुरुचरणांपाशीं येऊन हात जोडून म्हणाला, 'भगवन्, शेतांत येणारा उदकप्रवाह कांहीं केल्यानें थांबेना, म्हणून मीं स्वतः बांधाच्या जागीं पडून राहून तो प्रवाह आडवून धरिला होता; पण ही तुमची हांक ऐकून मी तो प्रवाह सोडून देऊन येथें आलों आहें. तर कोणती आज्ञा आहे, ती निवेदन करावी.'

ऋषीहो, ह्याप्रमाणें आरुणीची विनंती ऐकून धौम्य मुनि म्हणाले:—बा आरुणे, ज्या अर्थी शेताच्या बांधाचें उद्दालन (विदारण) करून तूं उठलास, त्या अर्थी तुला उद्दालक असें नांव पडेल. तूं माझी आज्ञा अक्षरशः पाळलीस, ह्यामुळें मला फार संतोष झाला आहे. मी तुला असा वर देतों कीं, सर्व वेद, वेदांगें व धर्मशास्त्रें हीं तुला अर्थासुद्धां उपलब्ध होतील, आणि ऐहिक व पारलौकिक सर्व सुखांचा लाभ घडून अंतीं तूं सद्गतीस जाशील. ऋषींनो, अशा प्रकारें उद्दालकावर अनुग्रह करून धौम्य मुनींनीं त्यास स्वगृहीं जाण्यास अनुज्ञा दिली, आणि तीप्रमाणें तो सच्छिष्य आपल्या इष्ट देशास गेला.

उपमन्यूची गुरुनिष्ठा.

मुनिवर्यहो, धौम्य ऋषींचा उपमन्यु नामक दुसरा शिष्य होता, हें तुम्हांस माहीत आहेच. धौम्यांनीं गाई राखण्याच्या कामावर त्याची नेमणूक केली होती. गुरूंच्या आज्ञेप्रमाणें तो दिवसभर गाई राखी, व अस्तमानीं गाई घेऊन आला म्हणजे गुरूंपुढें हात जोडून उभा राही. ह्याप्रमाणें कितीएक दिवस निघून गेल्यावर एके समयीं धौम्य गुरूंनीं त्याच्या देहाकडे नीट न्यहाळून पाहिलें असतां त्यांस आढळलें कीं, ह्याचा देह मुळींच क्षीण न होतां उलट चांगला पुष्टच झाला आहे. तेव्हां त्यांनीं त्याला विचारिलें:—बा उपमन्यो, तूं चांगला बलवान दिसत आहेस; तर तूं आपली उपजीविका कशी चालवितोस बरें? गुरूंचा हा प्रश्न श्रवण करून उपमन्यूनें उत्तर केलें, 'गुरुमहाराज, मी मधुकरी मागून आपला चरितार्थ चालवितों.' तेव्हां धौम्य गुरूंनीं पुनः म्हटलें, 'बाळा, तूं जी मधुकरी मिळविशील, ती मला अर्पण करीत जा.' त्यावर उपमन्यूनें 'बरें आहे' असें म्हणून गुरूंची आज्ञा मान्य केली. नंतर दुसऱ्या दिवसापासून उपमन्यूनें मधुकरी मागून आणिल्यावर ती गुरूंच्या स्वाधीन करावी, आणि गुरूंनीं ती सर्व मधुकरी ठेऊन घेऊन उपमन्यूस गाई घेऊन वनांत जाण्यास सांगावें, असा क्रम सुरू झाला. उपमन्यु पूर्ववत् गाई घेऊन वनांत जाई, व सायंकाळीं घरीं आला म्हणजे गुरूंपुढें हात जोडून उभा राही. अशा प्रकारें बराच काल निघून गेल्यावर एके दिवशीं गुरूंची दृष्टि पुनः उपमन्यूच्या शरीरप्रकृतीवर गेली, तों तो पहिल्यासारखाच धष्टपुष्ट आहे, असें त्यांस दिसून आलें. तेव्हां धौम्य ऋषि त्यास म्हणाले, 'हे उपमन्यो, तुला जी मधुकरी मिळते, ती तर मी घेतों; आणि असें असूनही तुझी प्रकृति चांगली बळकट आहे. तेव्हां हें कसें? त्यावर उपमन्यूनें उत्तर दिलें, 'गुरुजी, मी हल्लीं दोन वेळां मधुकरी मागतों. प्रथम मिळते, ती मधुकरी मी आपणांस अर्पण करितों; आणि नंतर मिळते, ती भक्षण करून देहयात्रा करितों.' तेव्हां पुनः धौम्य गुरु म्हणाले:—बाळा, हें तुझें कृत्य उचित नाहीं. गुरूंपाशीं असें कपट करणें सर्वथा अयोग्य होय. तूं द्विवार मधुकरी मागतोस, ह्यामुळें दुसऱ्या मधुकऱ्यांस तुझ्यापासून अपकार होत आहे; ह्याकरितां तूं हा परिपाठ अगदीं बंद कर. असो. ह्याप्रमाणें गुरूंचें भाषण ऐकून शिष्यानें तें सर्वथा मान्य केलें व तो पूर्ववत् धेनु घेऊन वनांत गेला. पुढें पहिल्याप्रमाणें उपमन्यूनें

दिवसभर धेनु वळाव्या, व सायंकाळीं गुरूंच्या चरणांस अभिवंदन करून हात जोडून उभें रहावें असा क्रम चालू होताच. अशा प्रकारें आणखी कांहीं काल लोटल्यावर धौम्यांनीं पुनः उपमन्यूकडे लक्षपूर्वक अवलोकन केलें, आणि पाहतात तों त्याची प्रकृति त्या वेळींही पूर्ववत् सुदृढ आहे, असें त्यांस आढळलें. तेव्हां ते मुनि उपमन्यूस म्हणाले, ‘बाळा, तुझी सर्व मधुकरी मी घेतों; तू फिरून मधुकरीस जात नाहींस; आणि तरीही तुझी पुष्टता पूर्वीप्रमाणेंच आहे; तेव्हां हें कसें?’ ह्याप्रमाणें गुरूंचें भाषण श्रवण करून त्या शिष्यानें उत्तर दिलें:—गुरुराज, ह्या गाईच्या दुधावर मी आंपला चरितार्थ चालवितों. तेव्हां धौम्य गुरु म्हणाले:—हे उपमन्यो, हा तुझा अनाचारच होय. अरे, माझ्या अनुमतीवांचून गाईचें दुग्ध प्राशन करणें प्रशस्त नव्हे. ह्यावर उपमन्यूनें, बरें आहे, असें म्हणून तो क्रमही बंद केला, आणि पूर्ववत् गाई राखून प्रदोषकाळीं गुरुजींस अभिवंदन करण्याचा प्रघात चालू ठेविला. पुढें आणखी कांहीं काल गेल्यावर गुरूनीं त्याजकडे अवलोकन केलें तों तो पुनः सुदृढ व पुष्टच आढळला. तेव्हां धौम्यांनीं पुनः उपमन्यूस विचारिलें:—अरे, हल्लीं तर तुला सर्व प्रकारांनीं प्रतिबंध केलेला आहे; आणि असें असतांही तुझी कळा पूर्ववत्‌च आहे. तेव्हां तू कशावर देहसंरक्षण करितोस बरें? त्या वेळीं शिष्यानें उत्तर दिलें:—भगवन्, गाईचे वत्स गाईस पीत असतांना त्यांच्या मुखावाटें जो फेन खालीं पडतो, तो मी भक्षण करितों. हें ऐकून गुरूंनीं म्हटलें:—उपमन्यो, ‘हें तुझें वर्तन अगदींच अयोग्य आहे. अरे, ह्या ‘दीनवत्सल वत्सांस तुझ्याबद्दल अनुकंपा उत्पन्न होते व ते अधिक फेन बाहेर टाकितात, ह्यामुळें तुझी उदरपूर्ति चांगली होत आहे; ह्यास्तव आजपासून ही गोष्ट त्वां सर्वथा वर्ज्य करावी. कारण, ह्या कृत्यापासून त्या लहान वासरांच्या उपजीवनास धक्का पोंहचत आहे. गुरूचें तें भाषण श्रवण करून शिष्यानें त्यांच्या इच्छेप्रमाणें वागण्याचें कबूल केलें, आणि तो पहिल्याप्रमाणें धेनु राखूं लागला. ह्या प्रकार गुरुजांनीं सर्वतोपरी प्रतिबंध केला तेव्हां उपमन्यूस उपजीविकेचें कांहींच साधन उरलें नाहीं. तरीही त्यानें कित्येक दिवस उपोषित राहून काढिले; परंतु अखेरीस त्याचे पंचप्राण भुकेनें कासावीस झाले! तेव्हां त्यांचें रक्षण करण्यासाठीं त्यानें एक दिवशीं वनामध्यें रुईचीं पत्रें सेवन केलीं! ऋषीहो, त्या अर्कपत्रांपासून उपमन्यूस भयंकर अपकार झाला! त्या खारट, तिखट, कडू, रुक्ष व विदाही पानांचा त्याच्या जठरांत परिपाक होऊं लागला, तेव्हां त्याच्या सर्व देहाचा भडका झाला आणि त्याच्या योगें त्या बिचाऱ्याची दृष्टि नष्ट होऊन त्यास अंधत्व प्राप्त झालें! ह्याप्रमाणें तो आंधळा झाला तेव्हां त्यास मार्ग दिसेनासा झाला, व तो वाटेत चाचपडत चांचपडत चालतांना कोसळून एका कूपांत पतन पावला!

इकडे, त्या दिवशीं सूर्यास्त होऊन गेला तरी उपमन्यु घरीं आला नाहीं असें पाहून गुरुजी शिष्यांना म्हणाले:—कायरे, अजून उपमन्यु आला नाहीं काय? तेव्हां शिष्य म्हणाले, ‘गुरुमहाराज, उपमन्यु नित्याप्रमाणें गाई घेऊन वनांत गेला आहे, तो अद्याप तिकडेच आहे.’ नंतर गुरु म्हणाले:—‘बाळांनो, अलीकडे मीं उपमन्यूचा सर्व प्रकारचा प्रतिबंध केल्यामुळें, तो खचीत मजवर रागावला असेल, व ह्यामुळें इतका उशीर झाला तरी तो परत येत नाहीं. ह्याकरितां आपण त्यास आणावयास जाऊं चला.’ नंतर लागलेच ते गुरु व शिष्य वनांत गेले, आणि पाहतात तों त्यांस उपमन्यु कोठेंही आढळेना. तेव्हां ‘हे उपमन्यो, कोठें आहेस रे? लवकर ये,’ अशी धौम्य गुरूनीं हांक मारिली. गुरूंची हांक श्रवण

करून उपमन्यूनें मोठ्यानें ओरडून सांगितलें, ' गुरूजी, मी येथें ह्या कूपांत पडलों आहें. ' त्यावर गुरूंनीं म्हटलें, ' बाळा, तूं त्या कूपांत कसा पडलास बरें ? ' तेव्हां उपमन्यूनें उत्तर केलें, ' महाराज, मी रुईचीं पत्रें भक्षण करून आंधळा झाल्यामुळें कोसळून ह्या कूपांत पडलों. ' तेव्हां गुरूजींनीं त्यास सांगितलें, ' बाळा, तूं अश्विनीकुमारांचें स्तवन कर म्हणजे ते देवभिशक तुला दृष्टि देतील. ' शौनकादिक ऋषीहो, धौम्य गुरूंची आज्ञा होतांच, त्या उपमन्यु शिष्यानें ऋक् छंदांनीं अश्विनीकुमारांची स्तुति करण्यास प्रारंभ केला. ती स्तुति अशी:-

अश्विनीकुमारांची स्तुति.

अहो अश्विनीकुमारांनो, ह्या स्थावरजंगम सर्व विश्वाच्या आरंभीं परब्रह्मरूपानें वास्तव्य करणारे तुम्हीच आहां. हें सर्व जग ही केवळ तुमचीच लीला आहे. तुमच्या मनांत जगदुत्पत्ति करण्याचा विचार उत्पन्न झाला म्हणजे तुम्हीच कारणात्म्याच्या द्वारें हिरण्यगर्भाचा अवतार घेतां. हे परमेश्वरा, हा आश्चर्यकारक सर्व प्रपंच तुमच्या त्या हिरण्यगर्भमूर्तीपासूनच उदय पावतो. अश्विनीकुमारहो, श्रुतिस्मृत्यादिकांच्या ज्ञानानें व ध्यानमननादिकांच्या योगें तुमच्या त्या सच्चिन्मय मूर्तीची ज्ञानज्योत माझ्या चित्तांत प्रज्वलित व्हावी, अशी माझी आपणांपाशीं विज्ञप्ति आहे. हे परब्रह्ममूर्ते, तुमच्या स्वरूपाचें यथार्थ आकलन होण्यास ज्ञानदृष्टीचीच आवश्यकता आहे. देशकालातीत व इयत्ताशून्य अशा तुमच्या सर्वव्यापक स्वरूपाचें ज्ञान जड अशा ऐंद्रियशक्तीनें केव्हांही होणें शक्य नाहीं. देवाधिदेवहो, आपला प्रसाद होऊन माझ्या हृदयांत चिन्मयज्योत प्रज्वलित झाल्यास माझे सर्व पुरुषार्थ सिद्ध झाले, असें होईल; कारण ' ब्रह्मज्ञ पुरुष स्वतः ब्रह्म होतो ' असा निश्चय असल्यामुळें मी स्वतः त्या ब्रह्मानंदसुखाचा अनुभव घेऊं लागेन, आणि मग मला भवबंधाची मुळींच भीति राहणार नाहीं. अश्विनीकुमारहो, तुम्ही ब्रह्मांडभर व्याप्त असलेल्या विराट्शरीररूप वृक्षावरील लोकोत्तर पक्षी आहां. ईश्वरस्वरूपावर दृष्टि देऊन तुमच्या स्थितीचा विचार केला असतां, तुमच्या ठिकाणीं अविद्यारूप मळाचा गंध सुद्धां नाहीं, व तुमच्याविषयीं यथार्थ ज्ञान करून घेण्यास वाणी किंवा मन हीं मुळींच समर्थ नाहींत असा प्रत्यय येतो; आणि तुमच्या जीवस्वरूपावर दृष्टि देऊन तुमच्या स्थितीचा विचार केला असतां, जीवात्मा हा अविद्योपाधीनें स्वत्वापासून भ्रष्ट होऊन हीं अनंत ब्रह्मांडें निर्माण करितो, असें व्यक्त दिसतें.

शुद्धचैतन्यात्मक अश्विनीकुमारहो, तुमच्या परब्रह्मरूपापासूनच ह्या विश्वाची उत्पत्ति होते; तुमच्या परब्रह्मरूपांतच ह्या सर्वांचा लय होतो; व तुमचें परब्रह्मरूपच ह्या सर्वांच्या स्थितिकालींही सर्वत्र व्याप्त असतें. ज्याप्रमाणें रज्जूवर भुजंगाचा आरोप करणें हें अज्ञान होय, त्याप्रमाणेंच सर्वथा असंग असणाऱ्या तुमच्यावर देहधर्मांचा आरोप करणें हें अज्ञान होय; मृत्तिका व घट हीं वस्तुतः अभिन्न आहेत, तद्वत् हें सर्व ब्रह्मांड व तुम्ही वस्तुतः अभिन्न आहां. अहो अश्विनीकुमारांनो, काळाची शक्ति सर्वांवर चालते, पण तुम्हांपुढें ती सर्वथा कुंठित होते. तुम्ही सूर्याच्या द्वारें दिवसरूप श्वेततंतूंनीं व रात्रिरूप कृष्णतंतूंनीं संवत्सररूप वस्त्र मोठ्या वेगानें विणीत आहां. भगवंतहो, तुमच्या ह्या कृत्यावरून असें ध्वनित होतें कीं, जे कोणी अद्वैतरूप ज्ञानमार्गानें वागतील, त्यांस सायुज्य प्राप्त होईल; व जे कोणी द्वैतरूप मोहमार्गानें वागतील, त्यांस संवत्सरात्मक भवभ्रमणांत पडावें लागेल. अश्विनीकुमारांनो, संसारी जनांच्या उद्धाराचें मुख्य साधन-त्यांस तुमच्या अद्वैतस्वरूपाचें ज्ञान हेंच होय. जीवात्म्याला स्वस्वरूपाचें ज्ञान होणें हेंच मुख्य श्रेय असें मानिलें पाहिजे. जीवात्म्याचा स्वस्वरूपापासून भ्रंश

होण्यास कारण तरी तुमची काळशक्तिच होय. तेव्हां त्या काळशक्तीचा निरोध करून जीवात्म्यास पुनः स्वतांच्या चिन्मयस्थितींत स्थापन करणें हें तुम्हांवांचून इतराकडून घडणें शक्य नाहीं. अश्विनीकुमारहो, जोंपर्यंत जीवात्म्याला तुमच्या अद्वैतस्वरूपाचें ज्ञान झालें नाहीं, तोंपर्यंत तो रागद्वेषादि मायामोहास वश होऊन संसारचक्रांत फिरत राहतो. ह्यास्तव, संसारी जनांना तुमच्या अद्वैतस्वरूपाचें यथार्थ ज्ञान होणें अत्यंत इष्ट आहे. देवहो, हें तत्त्वज्ञान प्राप्त करून घेण्याचे मुमुक्षु पुरुषाचे मार्ग मात्र भिन्न असतात. कित्येकजण–तीनशें साठ अहोरात्री ह्या धेनु व संवत्सर हा त्यांचा वत्स अशी कल्पना करून नानाविध यज्ञयागादिक कर्में हें दुग्ध काढून घेतात; आणि त्याच्या सेवनानें तत्त्वजिज्ञासा म्हणजे भगवज्ज्ञानाची पात्रता संपादितात. अश्विनीकुमारहो, यज्ञयागादिकांच्या योगानें साधकाचें लक्ष जरी बहुविध कर्मफलांकडे असतें, तरी त्यांस अखेरीस तुमच्या माहात्म्याचें यथावत् स्वरूप त्या *कर्मांनींच कळतें व त्यांस सायुज्य मिळविण्याचा अधिकार येतो. हे देवाधिदेवांनो, हा संवत्सरात्मक काळ आणि त्या काळांत कर्तव्यभूत झालेलीं प्रपंचध्वंसक व प्रपंचोत्पादक कर्में ह्या सर्वांचे मूळ विधायक तुम्हीच आहां. अश्विनीकुमारांनो, प्रत्येक पुरुषानें तुमच्या चिन्मयपदाची अपेक्षा धरावी हें अवश्य आहे. कारण, ह्या जगांतील ऐहिक किंवा पारलौकिक सर्व सुखांवर तुमच्या काळचक्राची एकसारखी सत्ता चालू आहे. संवत्सर हा ह्या काळचक्राचा तुंबा होय. ह्यांत दिवस व रात्री ह्या नांवांचे सातशें वीस काळभाग हे आरे बसविले असून, त्या आऱ्यांचें नियमन करण्याकरितां द्वादश मास हे पुठ्ठे केले आहेत. देवाधिदेवांनो, तुम्ही मायेच्या करवीं ह्या काळचक्रास गति देऊन प्रत्यहीं दिनमानभेदानें फिरावयास लावितां, आणि देवमनुष्यादिकांस पूर्णपणें आपल्या अधीन करून घेतां. अश्विनीकुमारहो, इंद्रादिक काळाभिमानी देवता तुमच्या काळचक्राच्या स्वाधीन कशा होतात तें पहा: काळचक्राच्या संवत्सररूप तुंब्यावर जसे द्वादश मास हे पुठ्ठे बसविले आहेत, तसेच त्या तुंब्यांत द्वादशराशी हेच आरे बसविले असून त्या आऱ्यांस षड्ऋतु हीं बंधनें केलीं आहेत. ह्या चक्राचा एक फेरा म्हणजे यज्ञयागादिक सवन कर्में करणारांचें सावन वर्ष होय. देवाधिदेवांनो, ह्या सावनसंवत्सररूप काळपरिभ्रमणांत इंद्रादिक देवता नित्य आसक्त असतात. त्यांचें चित्त कर्मठांच्या यज्ञक्रियांकडे सतत लागलेलें असतें. यजमानांनीं कालोचित क्रिया करून हविर्भाग दिल्यास त्या देवता त्यांचें हित करितात, व त्यांनीं तसें न केल्यास विपरीत फळ देतात. ह्यास्तव तुमच्या काळचक्रांत सांपडलेल्या प्राण्यास कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारानें सुखदुःखादि विकार भोगावे लागतात, म्हणून मी प्रार्थना करितों कीं, मला ह्या काळचक्रांतून मुक्त करा.

अहो अश्विनीदेवांनो, हा पांचभौतिक सर्व पसारा तुम्हांपासून भिन्न नाहीं. अंतःकरणासहित सर्व इंद्रियांचे व्यापार, तद्रूप नानाविध कर्में व त्यांस अनुसरून प्राप्त होणारे अनेक सुखदुःखादिक भोग हीं सर्व तुम्हीच आहां. सर्व ब्रह्मांडांत त्रिकालाबाधित असें परब्रह्मतत्त्व तुम्हीच असून, अविद्याकृत उपाधींचा आश्रय करून त्या परब्रह्मरूपापासून दूर तुम्हीच होतां, आणि प्राणिमात्रास प्राक्कर्मानुसार विषयोपभोगांची वासना पूर्ण करण्यास तुम्हीच उद्युक्त करितां; ह्यास्तव माझ्यासारख्या सर्वस्वी परवश अशा प्राण्यास स्वस्वरूपीं लीन करण्याचें कृत्य तुम्हांवांचून इतराच्यानें होणार नाहीं.

अहो अश्विनीकुमारांनो, ह्या सृष्टीच्या पूर्वी दशदिशा तुम्हीच उत्पन्न करितां. नंतर त्या दशदिशांच्या ठिकाणीं, स्वपरभावहीन असा सूर्य, व त्या सूर्याच्या परिभ्रमणाचें स्थळ आकाश, हीं

तुम्हीच निर्मितां. देवहो, हा सूर्यनारायण आकाशाच्या ज्या ज्या भागीं व ज्या ज्या कालीं गमन करितो, त्या त्या स्थलीं व त्या त्या कालीं ऋषिजन यथोचित कर्में करितात, आणि त्यांच्या योगें देव व मनुष्यें आपआपल्या अधिकारानुरूप सुखोपभोग मिळवितात. अश्विनीकुमारहो, तेज, जल व अन्न (पृथ्वी) ह्यांचें बहुविध मिश्रण करून तुम्ही भिन्न भिन्न प्रकारची अप्रमेय भौतिकसृष्टि निर्माण करितां. ह्या विश्वांतील अनंत भुवनांमध्यें हीच प्रजा भरली आहे. देव, मनुष्यें व तिर्यगादिक हीं सर्व तीच प्रजा होय. त्यांच्या ठिकाणीं तुमचीं जीं पृथक् तत्त्वें व्याप्त असतात, त्यांच्या मानानें त्यांमध्यें पृथग्भाव आणि पृथग्विषयासक्ति दृष्टिगोचर होते.

अहो अश्विनीदेवांनो, मी तुमच्या त्या परब्रह्मरूपास अभिवंदन करितों; तसेंच तुम्हीं ब्रह्मांडरूप जी ही कमलमाला कंठीं धारण केली आहे, तिलाही मी नमस्कार करितों. सर्व जगांत नित्य व शाश्वत राहणारे तुम्हीच आहां. मायावश होऊन कर्में करणाऱ्या जनांना तुम्हीच फलें अर्पण करितां.कारण, तुमच्या कृपेशिवाय देवांस किंवा अन्यांस कोणतीही गोष्ट करितां येणें सुलभ नाहीं. हे देवाधिदेवांनो, प्राण्यांचें जनन कसें घडतें ह्याचा विचार केला असतांही सर्वत्र तुमचीच सत्ता अबाधित आहे ह्याचा अनुभव येतो. पहा,प्रथम मातापितरांना तुम्हीं उत्पन्न केलेल्या अन्नाच्या द्वारें गर्भबीज प्राप्त होतें. नंतर तें बीज पुरुषाच्या ठिकाणीं शुक्ररूपानें व स्त्रियेच्या ठिकाणीं शोणितरूपानें.परिपक्व होऊन पुढें स्त्रीपुरुषांच्या समागमांत गर्भाशयामध्यें उतरतें; आणि नंतर तो पिंड त्या स्थानीं वाढत राहून यथाकालीं बाहेर पडला म्हणजे मातेचें स्तनपान करण्यास आसक्त होतो. सारांश, हे लोकनायकांनो, सर्व कांहीं तुम्हीच आहां व सर्व कांहीं तुम्हीच करितां, ह्यांत संदेह नाहीं. म्हणून, माझ्या देहयात्रेकरितां मला निर्मल दृष्टि प्राप्त करून द्या. हे देवाधिदेवांनो, तुमचे अनंत गुण वर्णन करण्यास मी समर्थ नाहीं. मी नेत्रहीन झाल्यामुळें वाट चुकून ह्या भयंकर कूपांत कोसळून पडलों आहें. ह्या आपत्तींतून मला काढण्यास तुम्हांशिवाय कोणीही शक्तिमान नाहीं. म्हणून मी तुम्हांस शरण आलों आहें, तर माझें कार्य करा.

अश्विनीकुमारांचें दर्शन.

शौनकादिक ऋषिश्रेष्ठहो, उपमन्यूनें केलेली ही स्तुति श्रवण करून अश्विनीकुमार त्या स्थलीं प्राप्त झाले आणि त्यांनीं उपमन्यूला म्हटलें, 'हे उपमन्यो, आम्ही तुझ्या स्तवनानें संतुष्ट होऊन तुझ्याकरितां हा अपूप (तुपांत तळलेला घारगा) आणिला आहे, तर तूं तो भक्षण कर.' तेव्हां उपमन्यु म्हणाला, 'देवाधिदेवहो, हे मजवर तुमचे उपकार होत. तुम्ही मला जें सांगत आहां, तें माझ्या हिताचें आहे, ह्यांत संदेह नाहीं; परंतु तुम्हीं दिलेला हा अपूप गुरूंना अर्पण केल्याशिवाय मला सेवन करितां येत नाहीं.' ह्याप्रमाणें उपमन्यूनें सांगितलें, तेव्हां अश्विनीकुमार पुनः म्हणाले, 'उपमन्यो, तूं हा अपूप खुशाल खा. पूर्वी तुझ्या गुरूनें आमचा स्तव केला असतां आम्हीं त्यास असाच अपूप दिला होता, व त्यानें तो त्या वेळीं आपल्या गुरूस अर्पण न करितां तसाच सेवन केला; ह्यास्तव तूंही आपल्या गुरूप्रमाणें हा अपूप सेवन कर.' तेव्हां उपमन्यु फिरून अश्विनीकुमारांस म्हणाला, 'देवश्रेष्ठहो, मी तुमची पुनः प्रार्थना करितों कीं, हा अपूप गुरूस अर्पण केल्याशिवाय सेवन करावा असें मला वाटत नाहीं.'

ऋषीश्वरहो, उपमन्यूनें ह्याप्रमाणें निक्षून सांगितलें, तेव्हां अश्विनीकुमार त्यास म्हणाले:—बा उपमन्यो, तुझी ही गुरुभक्ति पाहून आम्ही फार आनंदित झालों आहों. बाबा, प्रत्येकानें आपल्या गुरूवर अशीच निष्ठा ठेविली पाहिजे. असो. तुला तुझ्या गुरूपेक्षांही अधिक ज्ञान प्राप्त होईल;

तुझे गुरु हे केवळ कर्मठ असल्यामुळें, कर्मापासून प्राप्त होणारीं फलें त्यांस भोगिलीं पाहिजेत; परंतु तुझा अधिकार त्यांच्याहूनही अधिक असल्यामुळें तुला कर्मांचा व त्यामुळें प्राप्त होणाऱ्या फलोपभोगांचा स्पर्श मुळींच होणार नाहीं, आणि तूं चिन्मयपद पावशील. हे उपमन्यो, तुला दिव्य दृष्टि प्राप्त होऊन तुझ्या ठिकाणीं दिव्य ज्ञान सदोदीत वास करील.

ऋषीहो, असें हें अश्विनीकुमारांचें भाषण समाप्त होत आहे, तों उपमन्यूस उत्तम दृष्टि प्राप्त झाली; आणि तो गुरुजींच्या समीप येऊन हात जोडून उभा राहिला. नंतर त्यानें सर्व वर्तमान गुरूस निवेदन केलें, व तें सर्व श्रवण करून गुरुही त्याजवर फार प्रसन्न झाले आणि आशीर्वाद देऊन म्हणाले कीं, ' अश्विनीकुमारांनीं जें कांहीं सांगितलें आहे, तें सर्व घडून येईल. तुला सर्व वेद व धर्मशास्त्रें करतलामलकवत् अवगत होतील आणि तुला अंतीं सायुज्यपद मिळेल. ' असो. ह्याप्रमाणें उपमन्यूची गुरुनिष्ठा कसास लावण्यांत आली.

वेदाची गुरुनिष्ठा.

शौनकादिक मुनिवर्यहो, धौम्य ऋषीचा वेद नामक तिसरा शिष्य होता, हें तुम्हांस पूर्वीं सांगितलें आहेच. त्याला धौम्यांनीं सांगितलें कीं, ' बाळा वेदा, तूं आमच्या घरींच कांहीं दिवस रहा व माझी शुश्रूषा कर, म्हणजे तुझें कल्याण होईल. ' वेद हा गुरूंच्या आज्ञेप्रमाणें सेवापरायण होऊन बरेच दिवसपर्यंत त्यांच्या घरीं राहिला. गुरुजी जें काम सांगत तें तो मनापासून करीत असे. ते त्यास नांगरास सुद्धां लावीत; तरी त्यास कधीं खेद वाटला नाहीं. शीत, उष्ण, क्षुधा, तृषा इत्यादिकांपासून होणारे क्लेश तो मोठ्या आनंदानें सहन करी. ह्याप्रमाणें पुष्कळ काल लोटला, तरी त्यानें कधीं कुरकूर म्हणून केली नाहीं. तेव्हां तें पाहून गुरूंस मोठा संतोष झाला, आणि गुरुकृपेचा लाभ घडतांच वेदास सर्वज्ञता प्राप्त होऊन त्याचें सर्वतोपरी कल्याण घडलें.

अशा प्रकारें वेदाची परीक्षा झाल्यावर त्यास गुरूंनीं ब्रह्मचर्याचें समावर्तन करण्यास अनुमोदन दिलें, आणि गृहस्थाश्रम स्वीकारून तो आपल्या गृहीं जाऊन राहिला.

ऋषीहो, वेदाच्या सर्वज्ञतेचा लौकिक प्रसृत होण्यास फारसा काळ लागला नाहीं. लागलेंच त्याजकडे अध्ययन करण्यास तीन शिष्य आले. गुरुशुश्रूषा करणें किती दुर्घट आहे हें वेद उत्तम प्रकारें जाणत होता. गुरुगृहीं भोगिलेल्या क्लेशांचें त्यास विस्मरण झालें नव्हतें. ह्यासाठीं त्यानें आपल्या शिष्यांस गुरुसेवेसारखीं दुर्धर कामें सांगून मुळींच कष्ट दिले नाहींत. असो.

उत्तंकाची कथा.

पुढें एके प्रसंगीं जनमेजय राजा व पौष्य राजा हे वेद ऋषीकडे प्राप्त झाले, व त्यांनीं त्यास पुरोहितत्व स्वीकारण्याविषयीं प्रार्थना केली. ती प्रार्थना अमान्य करणें वेद मुनींस उचित वाटलें नाहीं, आणि त्यांनीं त्या दोन्ही राजांचें उपाध्यायवरण स्वीकारिलें. नंतर कांहीं दिवसांनीं वेद ऋषींना त्या राजांकडे यजमानकृत्यासाठीं बाहेर जाणें भाग पडलें; तेव्हां त्यांनीं अग्नीच्या शुश्रूषणाचें काम उत्तंक नामक शिष्यास सांगितलें व म्हटलें कीं, ' बा उत्तंका, जें कांहीं उणें पडेल, तें तूं पुरें करून एथील व्यवस्था चांगली ठेव. ' ह्या प्रकारें घरची सर्व व्यवस्था लावून वेद ऋषि निघून गेले. इकडे उत्तंकानें गुरूंच्या आज्ञेप्रमाणें सर्व कारभार उत्तम रीतीनें चालविला. इतक्यांत एके दिवशीं तो उत्तंक शिष्य तेथें असतां आश्रमांतील स्त्रियांनीं त्यास हांक मारिली आणि सांगितलें कीं, ' हे उत्तंका, तुझी गुरुपत्नी ऋतुमती आहे; ह्या वेळीं वेद गुरु तर येथें नाहींत. ह्यास्तव तुझ्या गुरुपत्नीचा ऋतु व्यर्थ होणार नाहीं असें कर; नाहींपेक्षां तिची मोठी हानि होणार आहे. '

तेव्हां उत्तंकानें त्या स्त्रियांस असें उत्तर दिलें कीं, 'अहो स्त्रियांनो, तुम्ही मला अनुचित कार्य करण्यास सांगावें, हें प्रशस्त नाहीं. असलें निंद्य कर्म करण्यास गुरुजींनीं मला आज्ञा दिलेली नाहीं. ह्यासाठीं असली भलतीच गोष्ट मजपाशीं बोलूं नका.' ऋषीहो, उत्तंकानें त्या आश्रमवासी स्त्रियांचा ह्या प्रकारें निषेध करून त्या प्रसंगाचें निवारण केलें. नंतर कांहीं दिवसांनीं वेद मुनि यजमानकृत्य आटोपून घरीं परत आले, तेव्हां त्यांस तो सर्व प्रकार विदित झाला. उत्तंकाचा मनोनिग्रह पाहून त्यांस मोठा आनंद झाला व ते त्यास म्हणाले, 'बा उत्तंका, तुझें सदाचरण अवलोकन करून मी फार संतुष्ट झालों आहें; तर तुझा कोणता अभीष्ट मनोरथ असेल, तो मला निवेदन कर, म्हणजे तो मी तत्काल सिद्ध करितों. हे सच्छिष्या, तूं यथाशास्त्र गुरुसेवा केलीस, ह्यास्तव आपणां उभयतांमध्यें अत्यंत प्रेम उत्पन्न झालें आहे; तर, बाळा, तूं आतां स्वगृहीं जा, माझें तुला अनुमोदन आहे; तुझ्या सर्व इच्छा परिपूर्ण होतील.'

ऋषीहो, ह्याप्रमाणें गुरुवाक्य श्रवण करून उत्तंक म्हणाला, 'गुरुमहाराज, मीं आपलें कोणतें कार्य करूं तें सांगा. कारण, ज्यां शिष्यानें दक्षिणा द्यावी व आपण गुरुजींनीं तिचा स्वीकार करावा हा धर्म होय. जर मीं आपणास दक्षिणा न देतां ब्रह्मचर्याचा समारोप केला, तर मजकडे दक्षिणा न दिल्याचा व आपणांकडे दक्षिणा न घेतल्याचा असा दोघांसही दोष येत आहे. अशा प्रकारें गुरुशिष्यांस दोष लागले असतां त्यांपैकीं एक मरण पावतो व दुसऱ्याच्या द्वेषास पात्र होतो, असें वृद्धजन सांगतात. ह्याकरितां, मीं आपणांस कोणती गुरुदक्षिणा अर्पण करावी, त्याची आज्ञा करा. आपण जरी मला स्वगृहीं जाण्यास अनुमोदन दिलें आहे, तरी आपणांस दक्षिणा दिल्याशिवाय माझ्या मनांत घरीं जावयाचें नाहीं.' असा उत्तंकाचा आग्रह पाहिला तेव्हां वेद ऋषींनीं त्यास सांगितलें कीं, 'तूं कांहीं दिवस येथेंच रहा. तुझ्या म्हणण्याचा पुढें विचार करूं.' नंतर तो तेथेंच राहिला. पुढें कित्येक दिवसांनीं त्यानें पुनः गुरूपाशीं दक्षिणेविषयीं गोष्ट काढिली असतां वेद मुनि त्यास म्हणाले, 'बा उत्तंका, तुझा अजूनही आग्रह आहेचना? बरें तर, तूं घरांत जा आणि आपल्या गुरुपत्नीस काय दक्षिणा द्यावी म्हणून विचार, व ती जी काय सांगेल, ती दक्षिणा आणून दे म्हणजे झालें.'

ह्याप्रमाणें गुरूंची आज्ञा झाल्यावर उत्तंक शिष्य गुरुपत्नीकडे गेला आणि म्हणाला, 'हे मातोश्री, गुरुजींनीं मला घरीं जाण्यास आज्ञा दिली आहे; परंतु गुरुदक्षिणा अर्पण केल्याशिवाय जावयाचें नाहीं असा माझा मानस आहे. ह्यासाठीं, आपण आज्ञा कराल, ती गुरुदक्षिणा मी आणून देतों.' गुरुपत्नीनें उत्तंकाची प्रार्थना श्रवण करून सांगितलें कीं, 'तूं पौष्य राजाकडे जा व त्याच्या पत्नीनें धारण केलेलीं कुंडलें तिच्यापासून मागून आणून मला अर्पण कर; म्हणजे आजपासून चौथे दिवशीं आमच्या येथें पुण्यक नांवाचें व्रत आहे त्या वेळीं तीं कुंडलें घालून मी ब्राह्मणांस वाढीन. जर तूं हें कार्य करशील, तर तुझें कल्याण होईल; व जर तूं हें न करशील, तर कल्याणाची आशाच नको!'

गुरुपत्नीचें भाषण श्रवण करितांच उत्तंक शिष्य उठला आणि मार्ग चालूं लागला. मार्गांत त्यास एक भव्य पुरुष एका मोठ्या विशाल वृषभावर बसलेला आढळला. तो पुरुष उत्तंकाला म्हणाला, 'बा उत्तंका, तूं ह्या वृषभाचें पुरीष भक्षण कर.' तेव्हां उत्तंकाला तें सांगणें रुचलें नाहीं व त्यानें ती गोष्ट नाकारिली. नंतर तो वृषभारूढ असलेला पुरुष पुनः म्हणाला, 'उत्तंका, मी सांगत आहें हें करण्यास मागेंपुढें पाहूं नको. तुझ्या गुरूंनीं सुद्धां पूर्वीं ह्याप्रमाणें गोमय

भक्षण केलें आहे.' तें वाक्य श्रवण करून उत्तंकानें लागलेंच 'बरें आहे' असें म्हणून त्या बलीवर्दाचें मूत्र व पुरीष भक्षण केलें आणि लगबगीनें उभ्यां उभ्यां उदकस्पर्श करून तो पुढें चालता झाला. पुढें आणखी कांहीं वेळानें तो पौष्य राजाकडे जाऊन पोहोंचला, आणि त्यानें पौष्य राजा सिंहासनावर स्थित आहे असें अवलोकिलें. नंतर उत्तंकानें पुढें होऊन त्या राजर्षीचें आशीर्वचनपूर्वक अभिनंदन करून म्हटलें, 'हे राजा, मी तुजकडे याचना करण्यासाठीं आलों आहें.' तेव्हां पौष्य राजा त्या ब्राह्मणास अभिवंदन करून मोठ्या विनयानें म्हणाला, 'हे भगवंन्, मी आपला सेवक आहें. काय आज्ञा असेल, ती निवेदन करावी.' त्या वेळीं उत्तंक म्हणाला, 'राजा, मी गुरुदक्षिणेकरितां तुझ्या भार्येचीं कुंडलें मागण्यास आलों आहें; तर तीं त्वां मला द्यावीं.' उत्तंक ब्राह्मणाचें भाषण श्रवण करून पौष्य राजा म्हणाला, 'हे ब्राह्मणा, तूं अंतःपुरांत जाऊन माझ्या पत्नीपाशीं तीं माग.' नंतर त्याप्रमाणें उत्तंक हा अंतःपुरांत गेला. परंतु त्याची व राजस्त्रीची गांठ न पडल्यामुळें तो पुनः परत आला आणि राजास म्हणाला, 'हे राजा, तूं माझ्याशीं अशी प्रतारणा करावीस हें योग्य नाहीं. मी तुझ्या पत्नीची भेट घेण्याकरितां अंतःपुरांत गेलों होतों, परंतु ती तेथें जवळपास कोठेंही नव्हती, ह्यामुळें माझी व तिची भेटच झाली नाहीं.' उत्तंकाचे हे शब्द ऐकून पौष्य राजानें क्षणभर विचार केला व नंतर म्हटलें, 'हे ब्राह्मणा, तुझ्या ठिकाणीं खचीत उच्छिष्टदोष वसत आहे. तूं विचार करून पहा. ती पतिव्रता, उच्छिष्टदोषानें अपवित्र झालेल्या पुरुषाच्या दृष्टीस कधींही पडणार नाहीं.' तेव्हां स्मरण करून उत्तंकानें म्हटलें:—राजा, मी मार्गांत उभ्यां उभ्यां मुखप्रक्षालन केलें हें खरें. त्यावर पौष्य राजा म्हणाला:—तर मग, तुझ्या अंगीं उच्छिष्ट दोष वसत आहे, ह्यांत संदेह नाहीं. उभ्यानें किंवा धावतांना मुखप्रक्षालन करणें हें न केल्यासारखेंच आहे. मग उत्तंकानें राजाचें म्हणणें मान्य केलें, आणि पूर्वाभिमुख बसून हात, पाय व तोंड हीं स्वच्छ धुतलीं, व बुडबुडे वगैरे नाहींत असें थंडगार उदक वक्षस्थलापर्यंत नेऊन तीन वेळां प्राशन केलें, आणि फिरून दोन वेळां मुख प्रक्षाळून इंद्रियादिकांना उदकस्पर्श केला. ह्याप्रमाणें उच्छिष्टदोषाची निवृत्ति करून उत्तंक ब्राह्मण पुनः अंतःपुरांत प्रविष्ट झाला. ह्या वेळीं त्यास पौष्यस्त्रीची भेट लागलीच झाली. उत्तंकास पाहिल्याबरोबर ती उठून पुढें आली व तिनें नमस्कार करून 'काय आज्ञा आहे?' असा त्यास प्रश्न केला. तेव्हां उत्तंक हा तिला म्हणाला, 'हे सुक्षत्रिये, मी गुरुदक्षिणेसाठीं तुझ्या कानांतील कुंडलें मागण्यास आलों आहें; तर तूं तीं मला अर्पण कर.' उत्तंकाची गुरुनिष्ठा मनांत आणून त्या राजस्त्रियेस मोठा संतोष झाला; आणि अशा सत्पात्र ब्राह्मणाच्या प्रार्थनेचा अनादर करणें प्रशस्त नाहीं असें तिला वाटलें. नंतर तिनें आपलीं कुंडलें काढून उत्तंकाच्या हवालीं केलीं व म्हटलें, 'हे ब्राह्मणा, हीं कुंडलें हरण करण्यास्तव नागराज तक्षक अगदीं टपून बसला आहे. त्यानें अनेक वेळां माझ्यापाशीं हीं कुंडलें मागून पाहिलीं, परंतु माझ्यापासून तीं त्यास मिळालीं नाहींत. ह्यास्तव मोठ्या सावधगिरीनें तूं हीं घेऊन जा.' तेव्हां उत्तंक म्हणाला, "राजस्त्रिये, त्याविषयीं तूं निश्चिंत रहा. माझ्या वाटेस जाण्यास तक्षकाची छाती नाहीं." ऋषीहो, नंतर त्या ब्राह्मणानें त्या उदार पौष्यपत्नीचा निरोप घेतला; व तो तीं कुंडलें घेऊन पौष्य राजाकडे प्राप्त झाला. तेथें आल्यावर त्यानें राजास म्हटलें, "हे पौष्य राजा, तुझें व तुझ्या पत्नीचें औदार्य पाहून मला फार संतोष झाला. आतां मी गुरुगृहीं जातों." तेव्हां

पौष्य राजा म्हणालाः—भगवन्, तुम्हांसारखे सत्पात्र व गुणवान अतिथि वारंवार मिळत नाहींत; तर आज श्राद्ध करावें असें मनांत आलें आहे. आपण क्षण स्वीकारावा, अशी माझी प्रार्थना आहे. राजाची प्रार्थना श्रवण करून उत्तंक म्हणाला, " बरें आहे; हा क्षण स्वीकारला. पण मला सत्वर परत गेलें पाहिजे; ह्यासाठीं, जें कांहीं अन्न सिद्ध झालें असेल तें लवकर पात्रांत वाढ. " तेव्हां पौष्य राजानें 'बरें आहे' असें म्हणून तयार असलेलें अन्न वाढून पात्र सिद्ध केलें. व ब्राह्मणास अन्न ग्रहण करण्याविषयीं प्रार्थना केली. पुढें ब्राह्मणानें भोजनसमयीं पाहिलें तों तें अन्न अगदीं निवालेलें असून केशमिश्रित आहे असें त्याच्या निदर्शनास आलें; आणि तें अन्न अपवित्र असें पाहून तो पौष्यास म्हणाला, " राजा, ज्या अर्थी तूं अपवित्र अन्न मला अर्पण केलें आहेस, त्या अर्थी तूं आंधळा होशील. " त्यावर पौष्यही म्हणाला, " हे ब्राह्मणा, हें अन्न वास्तविक अपवित्र नसतांना तूं अपवित्र असें म्हणत आहेस, ह्यास्तव तूं संततिहीन राहशील. " त्यावर उत्तंक म्हणाला, "राजा, तूं खरोखरीच अपवित्र अन्न वाढलें आहेस, आणि असें असूनही तूं उलट शाप देत आहेस, हें योग्य नाहीं. हें अन्न तूं नीट पहा, म्हणजे माझ्या म्हणण्याची यथार्थता तुझ्या लक्षांत येईल. " नंतर पौष्य राजानें तें अन्न लक्षपूर्वक न्यहाळून पाहिलें, तेव्हां त्याची खातरी झाली कीं, ब्राह्मणाचा आक्षेप अक्षरशः खरा आहे. मग राजानें ब्राह्मणाची प्रार्थना केली कीं, " हे ब्रह्ममूर्ते, स्त्रियेनें केश मोकळे टाकून पाक सिद्ध केल्यामुळें व अज्ञानामुळें हा घोर दोष घडला आहे; ह्याकरितां कृपा करून शापाचें निवारण करावें. " ऋषीहो, राजाची दीन मुद्रा अवलोकन करून ब्राह्मणाचा कोप शांत झाला. नंतर तो राजास म्हणाला, " राजा, माझें भाषण अन्यथा होणार नाहीं हें खरें; परंतु तूं आंधळा होऊन लवकरच पुनः चांगला होशील. आतां तूं जो मला शाप दिला आहेस, तोही असाच परत घे. " ह्याप्रमाणें उत्तंकाचें भाषण श्रवण केल्यावर पौष्यानें उत्तर केलें:—ब्राह्मणा, मी आपला शाप परत घेण्यास समर्थ नाहीं. माझा क्रोध अद्याप नष्ट झाला नाहीं. तुला हें विदित नाहीं कीं, ब्राह्मणाचें हृदय नवनीतासारखें मृदु, व वाचा तीक्ष्ण वस्तऱ्याप्रमाणें जलाल असते; पण क्षत्रियाचें अगदीं ह्याच्या उलट आहे: क्षत्रियाची वाचा नवनीतासारखी मृदु व हृदय तीक्ष्ण वस्तऱ्याप्रमाणें जलाल असतें. म्हणून मीं जो एकदा शाप दिला, तो दिलाच; त्याचें उपसंहरण करण्यास मी सर्वथा असमर्थ आहें. ह्यास्तव तूं आतां जा. ह्याप्रमाणें पौष्य राजानें सांगितलें, तेव्हां उत्तंक ब्राह्मण पुनः त्यास म्हणालाः—राजा, पहा—तूं जेव्हां मला शाप दिलास, तेव्हां अन्नाची वास्तविक स्थिति कशी होती हें तुला विदित नव्हतें. तूं ज्या वेळीं अन्न नीट न्यहाळून पाहिलेंस, त्या वेळीं त्याची अपवित्रता लागलीच तुझ्या मनांत बाणली, व तूं उलट माझें सांत्वन करूं लागलास; तेव्हां वास्तविकपणें केवळ अविचारानें तुझ्याकडून मला शाप देण्यांत आला आहे, ह्यांत संदेह नाहीं; म्हणून तुझ्या शापापासून मला मुळींच अपकार होणार नाहीं हें उघड आहे. बरें असो. आतां मी जातों.

शौनकादिक ऋषीहो, तो उत्तंक शिष्य ह्याप्रमाणें पौष्य राजास बोलला व कुंडलें घेऊन बाहेर पडला. मार्गांत आल्यावर पाहतो तों त्यास एक पाखंडी बौद्धधर्मी भिक्षु आढळला. तो नग्न असून मधून मधून क्षणांत दिसे व क्षणांत अदृश्य होई. उत्तंक पुष्कळ लांब गेला, तरी भिक्षु पूर्ववत् त्याच्याबरोबर होताच. अखेरीस उत्तंक तृषाकुल झाला, व कुंडलें भूमीवर ठेवून उदकप्राशनार्थ जलाशयांत उतरला. तेथें तो हस्तपादादिकांचें क्षालन करून उदक पीत आहे तों इकडे

तो भिक्षु त्वरा करून तेथें आला, आणि त्यानें कुंडलें घेऊन एकदम धाव ठोकिली ! पुढें लवकरच उत्तंक त्या स्थलीं प्राप्त झाला, आणि पाहतो तों भिक्षु कुंडलें घेऊन पळत आहे, असें त्यास आढळलें. नंतर त्यानें चित्त एकाग्र करून देवांचें व गुरूंचें नमनपूर्वक ध्यान केलें, आणि तो मोठ्या वेगानें त्या भिक्षूच्या मागोमाग पाठलाग करीत धावूं लागला. शेवटीं त्यानें त्या भिक्षूला अगदीं लगट करून धरिलें; परंतु उत्तंकाच्या हातीं सांपडतांच त्यानें आपलें मायावी रूप टाकून देऊन तक्षकरूप धारण केलें, आणि तेथेंच भूमीला एक बीळ पडलें होतें, त्यांतून तो खोल गव्हरांत उतरून नागलोकीं आपल्या गृहांत खुशाल जाऊन पोहोंचला !

ऋषीहो, ह्याप्रमाणें तक्षक हा कुंडलें घेऊन गेल्याचें पाहून, पौष्य राजाच्या भार्येनें जें सांगितलें होतें, त्याची उत्तंकास पूर्ण प्रतीति आली; त्यानें त्या स्त्रियेला जें उत्तर दिलें होतें, त्याचीही त्यास आठवण झाली; आणि तो त्या दुष्ट तक्षकाचा आणखी पाठलाग करण्याच्या उद्योगास लागला. त्यानें काठीनें तें बीळ खणण्याचा प्रयत्न केला, पण तें कसचें खणलें जाणार ? अखेरीस ब्राह्मण श्रम करून थकला. इकडे इंद्र आपल्या दिव्य दृष्टीनें तो सर्व प्रकार पाहत होताच. त्यानें ब्राह्मणाच्या साहाय्यार्थ आपलें वज्र पाठवून दिलें. तेव्हां त्या वज्रानें ब्राह्मणाच्या काठींत प्रवेश करून त्या बिळाचें विदारण केलें, आणि भूमीच्या उदरांत उतरण्यासारखा प्रशस्त मार्ग सिद्ध केला. नंतर उत्तंक त्या बिळांत प्रवेश करून त्या मार्गानें नागलोकास गेला. तेथें त्यास देवालयें, राजमंदिरें, धनिकगृहें, पटशाळा, क्रीडाभुवनें, सामान्य (दुपाखी) वसतिस्थानें व उद्यानभूमिका ह्यांच्या चुतर्फा रांगाच लागून गेलेल्या आढळल्या ! मग उत्तंकानें तत्रस्थ

नागवरांची स्तुति

करण्यास प्रारंभ केला. ती स्तुति अशी: "अहो ऐरावतप्रमुख नागपुंगवांनो, आपलें युद्धनैपुण्य मोठें विचित्र आहे. ज्याप्रमाणें वायुप्रेरित मेघसंघात विजेसहवर्तमान मोठ्या प्रचंड वेगानें चाल करून जातात, त्याप्रमाणें तुम्ही मोठ्या प्रचंड वेगानें शस्त्रास्त्रांसहवर्तमान चाल करून जातां आणि शत्रूंचा क्षणांत निःपात उडवितां. आपलें सौंदर्य काय वर्णन करावें ? आपणांस वाटतील तीं मनोहर रूपें धारण करितां येतात. आपलीं कुंडलें पाहून तर प्रेक्षकांची चित्तवृत्ति चकितच होऊन जाते. स्वर्गांत जसे देव शोभतात, तसे तुम्ही ह्या नागलोकीं शोभत आहां. अहो गंगेच्या उत्तरतीरावरील नागश्रेष्ठांनो, माझ्या स्तुतीचा अंगीकार करा. भगवान आदित्य हा श्रेष्ठ ना? पण त्यास देखील ऐरावताच्या साहाय्याची अपेक्षा असते. ऐरावताचें सांनिध्य नसल्यास आदित्याचे सहस्त्ररश्मि सर्वत्र संचार करण्यास समर्थ नाहींत. ऐरावताचा भ्राता धृतराष्ट्र हा आपले मंदिरांतून बाहेर पडून दशदिशा उज्ज्वलित करितो, तेव्हां त्याच्या परिवारांतले २८००८ सर्प हे जणू काय त्याच्या किरणांप्रमाणें इतस्ततः प्रसृत होतात, आणि त्यामुळें त्याचा लवाजमा त्याच्या सन्निधही उभा आहे व दूरवरही फैलावला आहे, असा भास होतो ! आतां मी ऐरावताच्या वडील बंधूस अभिवंदन करितों. त्याप्रमाणेंच त्या नागराज तक्षकासही मी प्रणिपात करितों, आणि प्रार्थितों कीं, हे कुरुक्षेत्रांतर्गत खांडववासी नागाधिप तक्षका, मला कुंडलें अर्पण कर. तूं व तुझा सहचर अश्वसेन हे तुम्ही कुरु देशांत इक्षुमति नदीच्या कांठीं वास्तव्य करणाऱ्या प्राण्यांचे नेहमींचे स्नेही आहां. ह्यास्तव मजवर कृपा करून माझी इच्छा सफल करा. तसेंच आतां तुझा कनिष्ठ भ्राता श्रुतसेन जो महाद्युम क्षेत्रीं सूर्यनारायणाची आराधना

करून नागांचें आधिपत्य मागत होता, त्या महात्म्याचें मी स्तवन करितों."

शौनकादिक ब्रह्मज्ञहो, उत्तंक ऋषीनें ह्याप्रमाणें महान महान सर्पांची पृथक् पृथक् प्रार्थना केली, तरी त्यास कुंडलांची प्राप्ति झाली नाहीं. तेव्हां तो मोठ्या विवंचनेंत पडला. तो इकडे तिकडे पाहूं लागला तों त्यास दोन स्त्रिया दृग्गोचर झाल्या. त्या मागावर धोटीं चढवून वस्त्रें विणीत होत्या. त्यांनीं त्या मागावर शुक्ल व कृष्ण असे दोन रंगांचे धागे लावून दिले होते. नंतर उत्तंकानें एक चक्र अवलोकन केलें. त्यास बारा आरे असून तें चालविण्यांत सहा कुमार गुंतून राहिले होते; आणि त्या चक्रावर एक पुरुष व एक सुंदर अश्व बसलेला होता. ऋषीहो, त्यांस पाहून त्या सर्वांची उत्तंकानें वैदिक छंदांनीं स्तुति केली.

उत्तंक म्हणालाः—हे चक्रा, तुझ्या तुंब्यामध्यें ३६० आरे बसविले असून त्यांस २४ पेऱ्यांचें म्हणजे पुठ्यांचें बंधन केलेलें आहे. तूं सदासर्वकाळ गरगर गरगर फिरत असून ती गति तुला सहा कुमारांकडून प्राप्त होत आहे. हे युवतींनो, तुमचीं रूपें मोठीं अपूर्व भासतात. तुम्ही निरंतर हें वस्त्र विणण्यांत अगदीं तन्मय झाल्या आहां. तुम्ही ह्या मागावर एकसारखे शुक्लकृष्ण धागे आडवे उभे टाकीत आहां. मला असें वाटतें कीं, तुम्ही हें वस्त्र विणीत नसून केवळ वासनारूप ब्रह्मांडजाळकच विणीत आहां ! हे श्रेष्ठ पुरुषा, तूं लोकाधिप देवेंद्रच होस. तूं वज्र धारण करून भुवनाचें रक्षण करितोस. वृत्र व नमुचि ह्यांचा संहार तूंच केलास. तूं कृष्णवस्त्र परिधान केलें आहेस. तुझ्या ठिकाणीं सर्वज्ञता वास करिते. जगांतील सत्यासत्याचा निर्णय तुला करितां येतो. तुझ्या सन्निध अश्व आहे, हा तुझाच होय. जलांतून उत्पन्न झालेला प्रत्यक्ष अग्निच हा आहे. हे लोकत्रयाधिपा पुरंधरा, माझा नमस्कार स्वीकारावा.

ऋषीहो, उत्तंकानें ह्याप्रमाणें स्तुति केल्यावर तो पुरुष उत्तंकास म्हणाला, 'हे ब्राह्मणा, तुझ्या स्तवनानें मी फार प्रसन्न झालों आहें; तर तुला काय पाहिजे असेल तें सांग, म्हणजे मी तें तुला प्राप्त करून देतों.' तेव्हां उत्तंक म्हणाला, 'हे दिव्य पुरुषा, हे नाग माझ्या हस्तगत व्हावेत, अशी माझी इच्छा आहे.' त्यावर तो पुरुष फिरून म्हणाला, 'हे ब्राह्मणा, ह्या अश्वाच्या अपानद्वारांत फुंकर घाल.' नंतर उत्तंकानें तसें करण्यास प्रारंभ केला. त्या वेळीं अश्वाच्या रोमरंध्रांतून धूम्र व अग्निकण ह्यांचे लोट एकसारखे बाहेर पडूं लागले, आणि त्यांनीं तो नागलोक अंतरबाह्य व्याप्त करून टाकिला! तक्षकाच्या मंदिरांत धुराचे लोंढे व अग्निकणांचे झोत एकसारखे घुसूं लागले, आणि त्याची अगदीं गडबड उडाली! तो सैरावैरा धावूं लागला व अखेरीस नाइलाज होऊन कुंडलें घेऊन तो आपल्या मंदिरांतून बाहेर पडला ! कुंडलें उत्तंकास न दिल्यास आतां सर्व नागलोकाची रक्षा होणार, असें मनांत आणून तक्षक उत्तंकासमीप गेला व त्यानें तीं कुंडलें त्याच्या स्वाधीन केलीं. तेव्हां तीं कुंडलें उत्तंकानें ग्रहण केलीं व मनांत विचार केला कीं, 'अरे! गुरुपत्नीचें पुण्यकव्रत तर आजच आहे, मी तर इतका लांब आलों आहें; तेव्हां आतां कसें करावें ?'

ह्याप्रमाणें उत्तंक विचारांत निमग्न असतां तो पुरुष त्यास म्हणाला, हे उत्तंका, ह्या अश्वावर बैस म्हणजे तो तुला एका क्षणांत गुरुगृहीं पोहोंचवील.' नंतर 'बरें आहे' असें म्हणून उत्तंक अश्वारूढ झाला व तत्काळ गुरूच्या घरीं येऊन पोहोंचला. त्या वेळीं गुरुपत्नी नाहून वेणीफणी करीत बसली होती. तितक्यांत उत्तंक तेथें पोहोंचला म्हणून बरें झालें; नाहीं तर त्यास शाप देण्याचा

तिचा विचार ठरला होता. असो. गुरुगृहीं गेल्यावर उत्तंकानें प्रथम गुरुपत्नीस अभिवंदन करून कुंडलें अर्पण केलीं. तेव्हां ती त्यास म्हणाली, "उत्तंका, तूं येथें अगदीं वेळेवर येऊन पावलास; मी तुझें स्वागत करितें. बाळा, जर तूं आणखी कांहीं वेळानें येतास, तर खचीत तुला मीं व्यर्थ शाप दिला असता; परंतु तुझें दैव थोर आहे, तुला अणिमादिक सर्व सिद्धि प्राप्त होऊन तुझ्या देहाचें सार्थक्य घडेल." नंतर उत्तंक शिष्य वेद गुरूकडे गेला. तो त्यांस नमस्कार करून हात जोडून उभा राहिला असतां ते त्यास म्हणाले, "बाळा, तुझें कल्याण असो. अरे, तुला इतका विलंब कां लागला बरें ?" तेव्हां उत्तंकानें म्हटलें:—गुरुवर्य, मी पौष्य राजाकडून कुंडलें घेऊन येत असतां मार्गांत तक्षकानें मला फार मोठें विघ्न केलें, आणि त्यामुळें मला नागलोकीं जाणें भाग पडलें. गुरुमहाराज, तेथें मला दोन स्त्रिया आढळल्या. त्या मागावर वस्त्र विणीत होत्या. त्या वस्त्रांत शुक्ल व कृष्ण ह्या वर्णांचे धागे होते. तसेंच तेथें मीं एक चक्र पाहिलें. त्यास तीनशें साठ आरा व चोवीस पेरें किंवा पुठ्ठे होते व तें चक्र फिरविण्यास सहा कुमार लागले होते. त्याचप्रमाणें त्या ठिकाणीं मला एक पुरुष व एक भव्य अश्व आढळला. ह्याशिवाय, मी येथून पौष्य राजाकडे जात असतां मला वाटेंत एक वृषभावर बसलेला पुरुष भेटला. त्यानें मला त्या वृषभाचें पुरीष भक्षण करण्यास सांगितलें, पण मी त्याप्रमाणें करण्यास प्रथम राजी झालों नाहीं. तेव्हां त्या पुरुषानें आदरपूर्वक मला सांगितलें कीं, 'तुझ्या गुरूनें सुद्धां पूर्वी असेंच वृषभपुरीष भक्षण केलें आहे, ह्यास्तव तूं भक्षण करण्यास मागेंपुढें पाहूं नको.' ह्याप्रमाणें त्या पुरुषानें सांगितलें तेव्हां मीं तें पुरीष तात्काळ भक्षण केलें. असो. हे ब्रह्मज्ञ, नागलोकीं वस्त्र विणणाऱ्या दोन स्त्रिया आढळल्या, त्या कोण असाव्या ? त्या वस्त्रांत असलेले शुक्ल कृष्ण तंतु म्हणजे काय ? बरें, तेथें सहाजण मुलगे एक चक्र चालवीत होते, ते कोण ? आणि त्या स्थळीं एक पुरुष व प्रचंड अश्व आढळला ते कोण कोण ? शिवाय, पौष्य राजाकडे जातांना एक वृषभ आणि त्यावर बसलेला एक पुरुष मला भेटला, ते कोण असावे ? महाराज, ह्या सर्व गोष्टींचा उलगडा करून मला सांगा.

वेद गुरु म्हणाले:—बाळा, उत्तंका, नागलोकीं तुला ज्या दोन स्त्रिया वस्त्र विणतांना आढळल्या, त्या वास्तविकपणें स्त्रिया नव्हत. तीं परमात्म्याचींच रूपें होत. त्यांतील एक मायोपाधिक कारणात्मा व दुसरें वासनोपाधिक जीवात्मा. त्या स्त्रिया शुक्ल व कृष्ण तंतूंनीं वस्त्र विणीत होत्या म्हणून तूं म्हटलेंस, तर ते शुक्ल कृष्ण तंतु म्हणजे दिवस व रात्र हीं होत. सहा मुलगे तीनशें साठ आरांचें व चोवीस पुठ्ठ्यांचें एक चक्र एकसारखें चालवीत होते, तें संसारचक्र होय; आणि त्या तीनशें साठ आरा म्हणजे ते संवत्सरांतील तीनशेंसाठ दिवस होत; व चोवीस पुठ्ठे म्हणजे संवत्सरांतील चोवीस पर्वें होत; आणि ते सहा मुलगे म्हणजे षड्ऋतु समजावे. तेथें तूं जो पुरुष पाहिलास, तो पर्जन्य (किंवा इंद्र) होय; आणि तेथें प्रचंड अश्व तूं पाहिलास तो अग्नि समजावा. उत्तंका, पर्जन्य (किंवा इंद्र) हा प्रत्यक्ष ज्ञानमूर्ति ईश्वरच, आणि अग्नि हा प्रत्यक्ष महाभोक्ता जीवच आहे, असें समजण्यास हरकत नाहीं. बाळा, तूं येथून पौष्य राजाकडे जातांना मार्गांत जो वृषभ अवलोकन केलास, तो गजराज ऐरावत, आणि त्यावर आरूढ असलेला जो पुरुष तो प्रत्यक्ष देवेंद्र होता. तेथें तूं जें पुरीष भक्षण केलेंस, तें अमृतच होतें, आणि त्यामुळेंच तुझी नागलोकांतून सुटका झाली. उत्तंका, तो देवेंद्र माझा मित्र आहे. त्यास तुझी दया आली व त्यानें तुझ्यावर अनुग्रह केला;

म्हणूनच तूं आज येथें कुंडलें घेऊन परत येण्यास समर्थ झालास. तर, बाळा, तूं आतां जा. तुला माझी आज्ञा आहे. तुझें सर्व प्रकारें कल्याण होईल.

शौनकादिक ऋषीहो, ह्याप्रमाणें वेद गुरूंनीं आज्ञा केल्यावर उत्तंक शिष्यानें तेथून निघण्याचा विचार केला. जरी तक्षकापासून कुंडलें प्राप्त होऊन तीं त्यानें गुरुपत्नीस अर्पण केलीं होतीं, तरी तेवढ्यावर त्याचें मन शांत झालें नाहीं. तक्षकाचा सूड घेण्याविषयीं तो एकसारखा जळफळत होता. ह्यास्तव गुरूंची आज्ञा मिळतांच, तक्षकाचा सूड उगवावा ह्या इच्छेनें तो तडक हास्तिनापुरास चालता झाला ! तेथें आल्यावर लवकरच तो विप्रश्रेष्ठ उत्तंक जनमेजय भूपतीच्या भेटीसाठीं राजसभेंत प्राप्त झाला. पूर्वीं तक्षशिला देशावर स्वारी करून त्या देशास हस्तगत करून घेणारा तो विजयशाली जनमेजय राजा सिंहासनावर विराजित आहे, आणि सभोंवतीं प्रधानमंडल अधिष्ठित आहे, असें अवलोकन करून उत्तंक ब्राह्मण पुढें झाला, व त्यानें प्रथम त्या राजेंद्राला विजयसूचक असे सशास्त्र आशीर्वाद दिले, आणि त्याची मर्जी सुप्रसन्न पाहून त्याजपाशीं मोठ्या गांभीर्यानें गोष्ट काढिली. त्या वेळीं उत्तंक म्हणाला, "हे अधिराजा जनमेजया, खरें कर्तव्य दुसरेंच असतां, जणू काय अज्ञान्यासारखें तूं भलतेंच कृत्य करीत आहेस हें काय ! "

सौति म्हणाला:—शौनकादिक ऋषीहो, उत्तंकाचे हे शब्द ऐकून जनमेजयानें आधीं त्याची अर्घ्यपाद्यादिकांनीं पूजा केली, आणि नंतर मोठ्या विनयानें म्हटलें:—हे विप्रोत्तमा, मी ह्या आपल्या प्रजांचें यथान्याय संरक्षण करून क्षात्रधर्माचें परिपालन करीत आहें. तथापि आपले ज्या कार्याच्या उद्देशानें येथें आगमन झालें आहे, तें मला विदित करावें. मी तें कार्य करण्यास अगदीं सिद्ध आहें.

सौति म्हणाला:—मुनिवर्यांनो, हें भाषण श्रवण करून तो महासमर्थ ब्राह्मण त्या धीरोत्तम भूपतीस म्हणाला:—हे जनमेजय राजेंद्रा, मी तुला जें काय करण्यास सांगत आहें, तें तुझेंच आहे; ह्यास्तव त्वां तें अवश्य करावें. नंतर उत्तंक ऋषि आणखी म्हणाला:—राजा, ज्या तक्षकानें तुझ्या पित्याचा प्राण घेतला, त्या दुरात्म्याचा सूड घेणें हें तुझें कर्तव्य होय. दुष्ट शत्रूची उपेक्षा करणें हें सर्वथा गर्हणीय समजावें. ह्यास्तव विलंब न करितां त्या महात्म्या परिक्षिताच्या हिंसेबद्दल तूं एकदम सूड घे. हें कृत्य करण्यास हा काल योग्य आहे. राजा, काय सांगावें रे ! वज्रपात झाला असतां वृक्ष जसा धाडकन कोसळून पडतो, तसा तो निरपराधी परिक्षित राजा, दुष्ट तक्षकाचा दंश होतांच एकदम मृत होऊन पडला ! जनमेजया, त्या पन्नगाधम तक्षकानें बळाच्या मदानें अंध होऊन तुझ्या पित्यासारख्या राजशिरोमणीला दंश केला, हें खरोखरी घोर पातक आहे. शिवाय, हें दुष्ट कृत्य करण्यासाठीं त्या अधमाधमानें आणखी एक दुराचरण केलें: तें हें कीं, त्या राजवंशाचें संजीवन करणाऱ्या अमरतुल्य परिक्षित राजाकडे त्याच्या प्राणाचें रक्षण करण्यास्तव काश्यप धन्वंतरी येत असतां त्यास त्या दुष्ट तक्षकानें परतवून लाविलें ! ह्यास्तव, हे नराधिपा, तूं आतां सर्पांचें सत्र कर; आणि त्यामध्यें प्रज्वलित होमकुंडांत त्या दुरात्म्या तक्षकाची आहुति दे. जर हें कृत्य तूं करशील, तरच तूं पितृहत्येचा योग्य सूड घेतलास असें होईल, आणि त्या योगें माझेंही एक मोठें प्रिय कार्य घडेल. राजा, त्या महापातकी तक्षकानें तुलाच एक पीडा दिली असें नाहीं; तर त्यानें मलाही भयंकर पीडा दिली होती. मी गुरुदक्षिणेकरितां पौष्यपत्नीकडून कुंडलें आणीत असतां त्या नीचानें मला मोठें विघ्न केलें होतें, परंतु गुरुकृपेनेंच मी त्यांतून मुक्त झालों !

सौति म्हणाला:—शौनकादिक ऋषीहो, उत्तंकाचें भाषण ऐकून जनमेजय राजाचा क्रोधाग्नि भडकला, आणि त्यास तक्षकाविषयीं अत्यंत संताप उत्पन्न झाला. पित्यास ह्याप्रमाणें सर्पदंशानें मृत्यु आला, असें ऐकून त्यास फार दुःख झालें, व त्यानें लागलेंच उत्तंकाच्या समक्ष आपल्या मंत्र्यांस पितृमरणाचें साद्यंत वर्तमान विचारिलें.



पौलोमपर्व.

अध्याय चौथा.

-:०:-

कथाप्रस्ताव.

लोमहर्षणाचा पुत्र उग्रश्रवा सौति हा पुराण सांगण्यांत मोठा कुशल होता. त्यानें त्या कामांत चांगलें नैपुण्य संपादिलें होतें. तो नैमिषारण्यांत कुलपति शौनक महर्षि ह्यांनीं आरंभिलेल्या द्वादशवार्षिक सत्रास प्राप्त झालेल्या ऋषिमंडळाकडे आला, व त्यांस हात जोडून म्हणाला, 'ऋषीहो, आपणांस काय ऐकण्याची इच्छा आहे? मी काय निरूपण करूं तें सांगा.'

तेव्हां ते ऋषि त्यास म्हणाले:—हे लौमहर्षणे, हें काय विचारावें? आम्हांस तुझ्यापासून पुष्कळच गोष्टी ऐकण्याची मनीषा आहे; आणि तूंही त्या हौसेनें आम्हांस सांगशील, ह्यांत वानवा नाहीं; परंतु कथासमय प्राप्त होईपर्यंत जरा तूं थांब. भगवान् कुलपति शौनक गुरु हे अग्निशालेमध्यें होमहवनांत गुंतले आहेत; ह्यास्तव, ते सभामंडपांत येऊन आपल्या श्रेष्ठ आसनीं विराजमान झाले म्हणजे तुला उचित तो विषय किंवा कथाभाग निरूपण करण्याविषयीं प्रश्न करतील, व नंतर तूं तो आम्हांस सांग. लौमहर्षणे, भगवान शौनकांचा अधिकार काय वर्णावा? त्यांस देवांच्या, दानवांच्या, मनुष्यांच्या, सर्पांच्या, गंधर्वांच्या वगैरे कथा पूर्ण अवगत आहेत. ते महाविद्वान व बुद्धिमान असून विधिनिषेधादिक कर्मकांडांत व उपनिषदादिक ज्ञानकांडांत त्यांची बरोबरी करणारा कोणीही नाहीं. ते मोठे सत्यवक्ते, क्षमाशील व तपोनिष्ठ असून कडकडीतपणानें व्रतपालन करणारे आहेत. त्यांनीं यजमानदीक्षा घेतली असून आरंभिलेलें हें महत्कृत्य निर्विघ्नपणें शेवटास नेण्याविषयीं ते फार जपत आहेत. असो. त्यांच्या ठिकाणीं अशा प्रकारचा लोकोत्तर अधिकार असल्यामुळें आम्हां सर्वांस ते अत्यंत पूज्य व वंदनीय आहेत. ह्याकरितां आपण सर्वांनीं त्या महात्म्याची वाट पहावी, हें सर्वथैव इष्ट होय.

सौति म्हणाला:—ऋषीहो, बरें आहे; ते महासमर्थ शौनक गुरु येथें येत तोंपर्यंत मी थांबतों. ते ह्या सभेंत स्वासनीं अधिष्ठित झाल्यावर ते ज्या नानाविध पुण्यकारक कथा मला विचारतील, त्याच मी तुम्हांस निवेदन करीन.

नंतर कांहीं वेळानें भगवान शौनक मुनि अग्निपूजा, ब्रह्मयज्ञ, पितृतर्पण वगैरे सर्व कर्में यथास्थितपणें आटोपून त्या स्थलीं प्राप्त झाले. तेथें महान महान ब्रह्मनिष्ठ सिद्ध मुनि सूतपुत्रासमवेत सुस्थिर चित्तानें शौनक गुरूंची प्रतीक्षा करीत बसले होते. शौनक ऋषि सत्रमंडपांत आल्यावर, ऋत्विज् व सदस्य हे जेथें बसले होते, तेथें जाऊन त्यांच्यामध्यें बसले; आणि त्यांनीं सौतीस असा प्रश्न केला.

अध्याय पांचवा.

-:०:-

भृगुवंशाचें वर्णन.

शौनक म्हणाले:—हे सौते, पूर्वीं तुझ्या पित्यानें सर्व पुराणांचें अध्ययन केलें होतें, तसें तूंही केलें आहेसना? बाबा, पुराणांमध्यें थोर थोर महात्म्यांच्या ज्या दिव्य कथा व जे श्रेष्ठ वंश प्रतिपादन केले आहेत, ते आम्हीं पूर्वीं तुझ्या पित्यापासून श्रवण केले आहेत; तथापि आतां त्या वंशापैकीं प्रथम भृगुवंशाचें वर्णन ऐकावें अशी आम्हांस इच्छा आहे, तर तूं आमची ही इच्छा पूर्ण कर.

सौति म्हणाला:—शौनका, पूर्वीं वैशंपायनादिक श्रेष्ठ द्विजवर्यांनीं जें उत्तम प्रकारें अध्ययन करून लोकांस विवेचन करून सांगितलें, आणि तसाच माझ्या पित्यानें ज्याचा उत्कृष्ट अभ्यास

करून ज्ञानगंगेचा ओघ सर्वत्र पसरिला, तें सर्व मीं पित्यापासून व त्या इतर महात्म्यांपासून यथायोग्य रीतीनें संपादन केलें आहे; ह्यास्तव आपली जी इच्छा असेल, ती पूर्ण करण्यास मी सिद्ध आहें.

हे भृगुवंशोत्पन्न शौनका, भृगुकुलाची योग्यता काय वर्णन करावी ? ऋषि, मरुद्गण व इंद्रादिक देव ह्यांस तो अत्यंत पूज्य आहे; ह्यास्तव ह्या वंशाचें वर्णन करण्याविषयीं तुम्हीं मला आज्ञा केली हें फार चांगलें झालें. तेव्हां आतां मी भृगुवंशाचें पूर्वपीठिकेसहित वर्णन करितों तें श्रवण करावें.

ऋषीहो, ह्या वंशांतील मूळ पुरुष महर्षि भृगु हा स्वयंभू ब्रह्मदेवाचा पुत्र होय. वरुणाच्या यज्ञांत अग्नीपासून ह्याचें जन्म झालें, असें आम्हीं ऐकिलें आहे. ह्या भृगूचा पुत्र भार्गव होय. ह्यास च्यवनभार्गव असें म्हणतात. हा पित्याचा फारच लाडका होता. च्यवनभार्गवापासून प्रमति हा झाला. हा अत्यंत धर्मशील होता. प्रमतीच्या पुत्राचें नांव रुरु. तो घृताचीच्या उदरीं जन्मला. ह्या रुरूपासून प्रमद्वरेच्या ठिकाणीं धर्मात्मा वेदपारग ऋषि शुनक हा झाला. शौनका, तुझ्या कुलांतील हा प्रधान पुरुष होय. हा मोठा तपस्वी असून कीर्तिमान होता. ह्यानें सर्व विद्यांमध्यें प्रावीण्य जोडिलें असून ह्याच्या ठिकाणीं ब्रह्मज्ञान उत्तम वसत होतें. हा महाधार्मिक असून सत्यवक्ता होता. शमदमादि साधनांनीं हा संपन्न असून हित, मित व मेध्य अशाच अन्नावर तो उपजीवन करीत असे.

शौनक ऋषि म्हणाले:—हे सूतपुत्रा, महर्षि भृगु ह्यांच्या पुत्रास च्यवनभार्गव असें नांव कां पडलें बरें? असें कोणतें कारण घडलें कीं, त्यामुळें त्या महात्म्या भार्गवास च्यवनत्व प्राप्त झालें?

पुलोमाग्निसंवाद.

सौति म्हणाला:—शौनका, भृगु ऋषीची भार्या पुलोमा नांवाची होती. तिजवर पतीचें अत्यंत प्रेम असे. ती आपल्या पतीप्रमाणेंच सुशील व सद्गुणी होती. तिच्या उदरीं भृगुवीर्यापासून यथाकालीं गर्भसंभव झाला. नंतर एका समयीं धर्ममूर्ति भृगु ऋषि जलाशयावर स्नानास गेले असतां त्यांच्या आश्रमांत पुलोमा नांवाचा कोणी एक राक्षस प्राप्त झाला. त्यानें तेथें भृगु मुनींची लावण्यवती स्त्री पुलोमा ही अवलोकन केली. तिचें मनोहर रूप पाहतांच त्या राक्षसाच्या मनांत कामाग्नि प्रदीप्त झाला, आणि त्या योगें त्यास कांहीं एक सुचेनासें झालें. इकडे अभ्यागताचें आतिथ्य करणें हें आपलें कर्तव्य होय असें समजून, त्या सुंदरीनें, कामासक्त झालेल्या त्या पुलोमाचा फलमूलादिकांनीं सत्कार केला, आणि त्यामुळें त्याच्या कामवासनेस अधिक उत्तेजन मिळून त्या चारुगात्रीस हरण करून न्यावें असा त्या राक्षसानें संकेत केला. त्या समयीं तो म्हणाला, "अहो! ही मला उत्तम संधि साधली. आतां माझें कार्य झालेंच." मुनिवर्या शौनका, पुलोमा राक्षसाला ह्या प्रसंगीं परस्त्रीविषयीं पापवासना उत्पन्न झाली होती, असेंच म्हणतां येत नाहीं. त्याच्या समजुतीप्रमाणें ती स्त्री त्याचीच होती. कारण, पूर्वीं पुलोमेच्या बालपणांत एके समयीं ती रडत असतां तिचें तें रडें थांबावें म्हणून भय घालण्यासाठीं तिच्या बापानें असें म्हटलें होतें कीं, 'रे राक्षसा, ह्या मुलीला घेऊन जा.' त्या वेळीं तेथें कर्मधर्मसंयोगानें हा पुलोमा राक्षस समीप होता; ह्यास्तव पुलोमेच्या पित्याचे शब्द ऐकतांच त्यानें तिला मनानें वरिलें, 'आणि आतां ही माझी झाली' असे उद्गार काढिले. असो. पुढें पुलोमा मोठी होऊन उपवर झाली, तेव्हां तिच्या पित्यानें तिला भृगु ऋषींस दिलें आणि तिचा यथाशास्त्र विवाहसंस्कार केला. शौनकप्रमुख ऋषिजनहो, ह्याप्रमाणें पुलोमा ही अखेरीस आपणास न मिळतां भृगु ऋषीस मिळाली, ही गोष्ट पुलोमा

राक्षसाच्या मनांत एकसारखी जळत होती; आणि ह्या कारणानेंच, आश्रमांत भृगु ऋषि नाहींत व पुलोमा ही एकटीच आहे, असें पाहून तिचें हरण करण्याचा विचार त्यानें मनांत आणिला.

ऋषीहो, पुलोम राक्षसानें पुलोमेला घेऊन जाण्याचा जरी विचार केला, तरी त्यानें तिला एकदम नेलें नाहीं. आपण जें कांहीं म्हणत आहों, त्यास दुसऱ्या कोणाकडून तरी प्रत्यंतर मिळाल्यास चांगलें, असें ठरवून, जवळच अग्न्यागारांत प्रदीप्त अग्नि आढळला, त्यास त्यानें प्रश्न केला, "हे अग्ने, ही भार्या कोणाची ह्याचा मला निर्णय सांग. अग्ने, तुझी योग्यता मोठी आहे. म्हणून जें खरें असेल, तेंच तूं सांगशील, अशी माझी खातरी आहे. हे वैश्वानरा, तूं देवांचें मुख आहेस. ह्यास्तव तुझ्या मुखांतून सत्यच बाहेर पडेल, ह्यांत संदेह नाहीं. पहा—ह्या सुंदरीला हिच्या पित्यानें मला अर्पण केल्यावरून मीं पूर्वीच मनानें आपली पत्नी असें मानिलें, व वरिलें; आणि नंतर हिच्या पित्यानें मजपाशीं विश्वासघात करून हीस भृगु ऋषीस दिलें; असा वास्तविक प्रकार घडलेला आहे. तेव्हां माझें हें म्हणणें सत्य आहे किंवा असत्य आहे हें तूं स्पष्ट सांग. जर माझें हें भाषण सत्य आहे, असा तुझा अभिप्राय असेल, तर ही सुंदरी येथें एकटी आहे, ही संधि साधून मी हिला हरण करून नेणार आहें. हे अग्ने, ही स्त्री खरोखरी प्रथम माझी पत्नी झाली असतां, भृगूनें हिला वरिलें ही गोष्ट एकसारखी माझ्या हृदयांत जळत आहे !"

सौति म्हणाला:—ऋषीहो, पुलोमा राक्षसानें प्रज्वलित अग्नीला ह्याप्रमाणें विचारिलें; तथापि पुलोमेविषयीं त्याचें चित्त अधिक शंकित झाल्यामुळें त्यानें पुनः त्या अग्नीला म्हटलें:—हे पावका, ह्या प्रसंगीं सत्यार्थ कथन करण्यास तूं समर्थ आहेस. तूं सर्व प्राण्यांच्या अंतर्यामीं सदासर्वकाळ संचार करीत असतोस; ह्यामुळें, कोणाचें हृद्गत कसें आहे ह्याचें तुला यथार्थ ज्ञान असतें. पापपुण्यांचा साक्षी तुझ्याप्रमाणें दुसरा कोणीही नाहीं. ह्यास्तव, हे सर्वज्ञा, तूंच मला सत्यासत्यनिर्णय सांग. माझें म्हणणें इतकेंच आहे कीं, पुलोमा ही आधीं माझी भार्या झाल्यामुळें हिजवर भृगूची कोणत्याही प्रकारची सत्ता उत्पन्न होत नाहीं; पुलोमेच्या पित्यानें प्रथम ही मला अर्पण केली, ही गोष्ट भृगु ऋषीस विदित नव्हती, असें म्हणतां येत नाहीं, कारण; त्याच्या सर्वज्ञत्वामुळें व अपरोक्ष ज्ञानामुळें हें त्यास माहीत असलेंच पाहिजे; ह्यास्तव भृगु ऋषीनें पुलोमेचा भार्यात्वानें अंगीकार केला म्हणजे केवळ परस्त्रीचा अपहारच केला, असें म्हटलें तरी चालेल. तेव्हां ह्या सर्वांचा नीट विचार करून काय सत्य असेल तें निर्भिडपणानें कथन कर. तुझ्याकडून प्रत्यंतर मिळालें म्हणजे तुझ्यासमक्ष मी हिला येथून घेऊन जाणार आहें. ज्या अर्थीं तूं सर्व स्वतः पाहिलें आहेस, त्या अर्थीं तुझा अभिप्राय माझ्या म्हणण्याशीं जुळेल, ह्यांत यत्किंचित् संशय नाहीं.

सौति म्हणाला:—ऋषीहो, त्या राक्षसाचें हें भाषण श्रवण करून अग्नि हा मोठ्या संकटांत पडला. पुलोमेच्या पित्यानें तीस पुलोमा राक्षसास अर्पण केलें ही गोष्ट सत्य असल्यामुळें, पुलोमा ही भृगूचीच पत्नी खरी असा निर्णय सांगितल्यास आपल्यावर असत्यकथनाचा दोष येईल, अशी त्यास भीति पडली; आणि पुलोमा ही वास्तविकपणें राक्षसाची पत्नी होय, असा अभिप्राय दिल्यास भृगु ऋषि आपणास शाप देतील असें मनांत आणून तो घाबरून गेला. तथापि, काय सत्य असेल तें सांगून आपण मोकळें व्हावें असें त्यानें योजिलें, आणि त्या राक्षसास उत्तर दिलें.

अग्नि म्हणाला:—हे राक्षसा, पुलोमेला तूं पूर्वीं मनानें वरिलेंस ही गोष्ट सत्य आहे; परंतु तुझें तें वरणें विध्युक्त घडलें नाहीं. पित्यानें ह्या भाग्यशाली पुलोमेला यथाविधि संस्कार करून

भृगु ऋषीला अर्पण केलें खरें; परंतु त्यानें ती तुला न देतां भृगूला दिली, ह्यांत त्या महात्म्यापासून कांहीं तरी वरप्राप्ति करून घ्यावी, असा त्याचा हेतु होता. तेव्हां जिला तूं केवळ मनानें वरिलें होतेंस, तिलाच भृगु ऋषीनें विधिपूर्वक माझ्यासमक्ष वरिलें. असा वास्तविक प्रकार घडला आहे. राक्षसा, असत्य भाषण करावें अशी माझी मुळींच इच्छा नाहीं; कारण, जगांत असत्यास कोणीही मान देत नाहींत, हें मला पूर्णपणें माहीत आहे.

अध्याय सहावा.

—:०:—

च्यवनजन्म.

सौति म्हणाला:—ऋषीहो, अग्नीचें भाषण पुलोमा राक्षसास सर्वस्वी अनुकूल नव्हतें; तथापि,' तूं पुलोमेला पूर्वी मनानें वरिलेंस ही गोष्ट सत्य आहे, असें अग्नीनें सांगतांच, त्या राक्षसाला तेवढें कारण पुरें झालें, आणि तो तात्काळ वराहरूप धारण करून मन व वायु ह्यांच्या वेगानें त्या सुंदरीस पळवून नेऊं लागला. ऋषीहो, ह्या समयीं पुलोमेच्या उदरांत भृगूचें देदीप्यमान वीर्य गर्भरूपानें वास करीत होतें, हें मीं तुम्हांस पूर्वी सांगितलेंच आहे. दुष्ट राक्षस आपल्या मातेस' घेऊन धावत आहे, असें पाहतांच तो गर्भ क्रोधायमान होऊन बाहेर पडला, आणि त्याच्या सूर्याप्रमाणें प्रखर तेजानें तो राक्षस जळून जाऊन पुलोमेची त्याच्या हातून एकदम सुटका झाली. शौनकादि मुनींनो, पुलोमेच्या कुक्षींतून भृगुपुत्राचा म्हणजे भार्गवाचा गर्भ अशा प्रकारें च्युत झाला म्हणून त्यास च्यवनभार्गव असें नांव पडलें.

ऋषीहो, पुलोमा राक्षसानें आपणास हरण केलें, व त्यामुळें आपल्या गर्भाचें असें निष्क्रमण झालें, असें पाहून पुलोमा तात्काळ दुःखमूर्छित होऊन पडली. नंतर कांहीं वेळानें सावध झाल्यावर तिनें (च्यवनभार्गव नामक) आपल्या त्या लहान बालकास बरोबर घेऊन भृग्वाश्रमाचा मार्ग धरिला. तिची ती शोकाकुल स्थिति अवलोकन करून सर्वलोकपितामह ब्रह्मदेव त्या स्थलीं अवतीर्ण झाले व त्यांनी त्या दीन अबलेचें सांत्वन केलें. मुनीश्वरहो, ती साध्वी दुःखाक्रोश करीत आपल्या आश्रमास परत गेली, तेव्हां तिच्या नेत्रांतून इतक्या अश्रुधारा वाहिल्या कीं, त्यांच्या योगानें त्या पतिव्रतेच्या मागोमाग एक मोठी नदीच वाहूं लागली. भगवान ब्रह्मदेवानें, पुलोमा नामक वधूच्या अश्रुसरितेचा ह्याप्रमाणें लोकोत्तर ओघ अवलोकन करून, च्यवनाश्रमासमीप असलेल्या त्या प्रवाहाला ' वधूसरा ' असें नांव दिलें. ऋषिवर्यहो, त्या परमप्रतापवान च्यवनभार्गवाचें जन्मवृत्त हें असें अपूर्व आहे! असो.

अग्नीस शाप.

पुलोमा ही च्यवनभार्गवास घेऊन आपल्या आश्रमास प्राप्त झाली, इतक्यांत भृगु ऋषिही तेथें आले. तेव्हां त्यांची ती हृदयभेदक अवस्था अवलोकन करून भृगु ऋषि क्रोधाविष्ट होत्साते आपल्या पत्नीस म्हणाले, " हे भार्ये, तुझ्या विवाहाचा तो गूढ वृत्तांत, तुला हरण करूं इच्छिणाऱ्या त्या राक्षसाला कोणीं सांगितला, तें मला खरें खरें कळूं दे; म्हणजे मी त्या अधमाला आतांच्या आतां शाप देतों. प्रिये, माझ्या शापास न भिणारा असा एकही प्राणी ह्या ब्रह्मांडांत नाहीं. ह्यास्तव, ज्यानें तुला हें असें दुःख दिलें, त्याचें नांव मला सांग; म्हणजे मी त्यास कडक शासन करितों."

ऋषीहो, ह्याप्रमाणें भृगु ऋषींचें भाषण श्रवण करून पुलोमा त्यांस म्हणाली:—महाराज, माझ्या विवाहाचा वृत्तांत अग्नीनें त्या पुलोमा राक्षसास विदित केला. त्या राक्षसानें अग्नीचें भाषण श्रवण करितांच वराहरूप धारण केलें, व तो मोठ्या वेगानें मला घेऊन पळून जाऊं लागला. भगवन्, त्या

असतांनी मी कुररीप्रमाणें पुष्कळ आक्रोश केला, परंतु त्या निर्घृण दुरात्म्यास यत्किंचितही द्रव उत्पन्न झाला नाहीं. प्रिया, आपल्या ह्या पुत्रानें आपल्या अद्वितीय तेजानें त्या दुष्टाचें भस्म करून टाकून मला सोडविलें, आणि नंतर मी येथें पुत्रासमवेत प्राप्त झालें.

सौति म्हणालाः—ऋषिवर्यांनो, पुलोमेचें भाषण ऐकून भृगु मुनींस अत्यंत क्रोध उत्पन्न झाला, आणि त्यांनीं लागलाच 'हे अग्ने, तूं सर्वभक्षक होशील,' असा शाप दिला.

अध्याय सातवा.

—:०:—

अग्नीचें भृगूंशीं भाषण.

सौति म्हणालाः—मुनिवर्यहो, भृगु ऋषींचें शापवचन श्रवण करितांच अग्नीस अत्यत क्रोध उत्पन्न होऊन तो म्हणालाः—हे ब्राह्मणा, तूं मला शाप दिलास, हें तुझें केवढें साहस ? ऋषे, मी धर्म प्रमाणें वागत असतां व नित्य सत्य भाषण करीत असतां तूं मला शाप द्यावास, हें अगदीं अनुचित होय. भगवंता, सत्यार्थ कोणता आहे? म्हणून जर कोणीं मला प्रश्न केला, तर सत्यास अनुसरून खरी गोष्ट निवेदन करणें हें माझें कर्तव्यच आहे; ह्यास्तव पुलोमा राक्षसास वास्तविक घडलेला प्रकार जर मीं सांगितला, तर ह्यांत माझा अपराध तो कोणता? महाराज, सत्य स्थिति विदित असतां जर त्यानें ती तशी सांगितली नाहीं, तर तो आपल्या मागच्या व पुढच्या सात सात पिढया नरकांत कोटितो, असें शास्त्रवचन आहे. आतां, तूं ह्यावर कदाचित असें म्हणशील कीं, साक्षीचा प्रसंग निराळा, परंतु अशा वेळीं सत्य किंवा असत्य ह्यापैकीं कोणतेंही न सांगतां मौन धरावें म्हणजे झालें; तर असें करणें दोषावहच आहे, कारण, एखाद्या गोष्टीचें खरें स्वरूप माहीत असतां मुग्ध बसणें म्हणजे असत्याचाच अवलंब करणें होय. म्हणून अशा कृत्यानें सुद्धां पदरीं पापाचाच संचय होतो ह्यांत संदेह नाहीं. असो. ब्राह्मणा, तुझ्या अविचाराबद्दल तुला शाप देण्यास मी समर्थ आहें, परंतु ब्राह्मण हे मला पूज्य असल्यामुळें तसें करावें अशी माझी इच्छा नाहीं; शिवाय तूं जो मला शाप दिलास, तोही तितका सुसंबद्ध आहे, असें मला दिसत नाहीं. मी असें कां म्हणतों, हें तुला विदित नाहीं असें नाहीं, तथापि तें मी तुला पुनः निवेदन करितों.

भृगु ऋषे, मी योगसामर्थ्यानें गार्हपत्यादि अनेक रूपें धारण करून बहुविध स्थलीं वास करितों. अग्निहोत्रें, सत्रें, गर्भाधानादिक संस्कार, व ज्योतिष्टोमादिक यज्ञयाग ह्यांमध्यें वैदिक विधींनीं ज्या ज्या अग्नींस अवदानें देण्यांत येतात, तीं सर्व माझींच रूपें होत. मी त्या अवदानांचा स्वीकार केला म्हणजे त्यांच्या योगें देवता व पितर ह्यांची तृप्ति होते. हे ऋषिवर्या, मजमध्यें केलेलें हवन व देवपितृगण ह्यांचा अन्योन्यसंबंध अगदीं अभिन्न आहे. सोम, आज्य, पय इत्यादिक आपरूप जीं होमद्रव्यें, तीं प्रत्यक्ष देवांचीं व पितरांचीं रूपें होत; आणि त्यामुळें, त्या होमद्रव्यांचें हवन झालें कीं तीं आपल्या मूळ रूपांत म्हणजे देवपितरांत मिळून जातात. तसेंच पितरांचे व देवांचे दर्शयाग व पौर्णमासयाग हेही वस्तुतः हवनीसपदार्थात्मकच असतात. तेव्हां देव व पितर हे जरी पर्वकाळीं भिन्न दिसले, तरी खरोखर एकच होत. ऋषे, देव व पितर हे मला अर्पण केलेलेंच द्रव्य सेवितात, ह्यामुळें मला त्यांचें मुख असें म्हणण्यांत येतें. अमावास्येस पितर व पौर्णिमेस देव आपल्या अग्निरूप मुखानेंच म्हणजे माझ्या द्वारेंच हविर्भाग ग्रहण करितात व संतुष्ट होतात. तेव्हां मी सर्वभक्षक कसा होईन?

अग्निशापविमोचन.

सौति म्हणालाः—शौनकादिक ऋषींहो, नंतर अग्नीनें थोडा वेळ मनन करून आपलें रूप गुप्त

केलें; त्यामुळें ब्राह्मणांच्या अग्निहोत्रांत, सत्रांत व यज्ञयागादिकांत अग्नीचा लोप झाला. सर्वत्र ओंकार, वषट्कार, स्वाहाकार व स्वधाकार हे बंद पडले, व अग्निविरहित होऊन सर्व प्रजा अत्यंत दुःखाकुल झाल्या. तेव्हां आतां सर्वांचा नाश होणार असें पाहून ऋषिजन उद्विग्न झाले आणि देवांकडे जाऊन त्यांस म्हणाले, "हे निष्पाप देवांनो, अग्नीचा नाश होऊन यज्ञयागादिक सर्व क्रियांचा लोप झाल्यामुळें त्रिभुवनांतील सर्व प्राणी मोठ्या विपत्तींत पडले आहेत; तर ह्या प्रसंगीं उचित तें कृत्य तुम्ही फार लवकर करा." ऋषींहो, नंतर ते ऋषि देवांस बरोबर घेऊन ब्रह्मदेवाकडे गेले,आणि त्यास त्यांनीं अग्नीस झालेला शाप व त्यामुळें घडलेला क्रियालोप विदित केला: ते म्हणाले, "महाभाग ब्रह्मदेवा, भृगु ऋषीनें अग्नीस विनाकारण शाप दिल्यामुळें हें संकट उद्भवलें आहे. हे अधिपुरुषा, अग्नीची योग्यता लहानसहान नव्हे; प्रत्यक्ष देवादिकांचेंही तोच मुख आहे. यज्ञयागादिकांत प्रथम हविर्भाग त्यासच मिळतो; आणि सर्वत्र हवनीय द्रव्यांचा तोच अधिकारी; तेव्हां असा विलक्षण सत्तावान अग्नि हा सर्वभक्षक कसा होईल?" शौनकादिक मुनिश्रेष्ठहो, ऋषींचें तें भाषण श्रवण करून विश्वस्रष्ट्या ब्रह्मदेवानें अग्नीस हांक मारिली व त्यास मोठ्या गौरवानें म्हटलें, "हे अग्ने, सर्व लोकांचा उत्पादक तूंच आहेस; त्यांचें प्रतिपालन तूंच करितोस; व त्यांचा संहारही तुझ्यामुळेंच होतो. बाबा, तूं अविनाशी आहेस; सर्व लोकांच्या यज्ञयागादिक क्रिया तुझ्यामुळेंच सिद्धीस जातात; तुझ्यामुळेंच तिन्ही लोकांचा योगक्षेम चालतो. ह्यास्तव, हे लोकनायका, यज्ञयागादिक क्रिया अविच्छिन्न चालू राहतील अशी व्यवस्था कर. हे हुताशना, तूं स्वतः ज्ञानसंपन्न असून असा मोहवश कसा झालास? तूं सदासर्वकाळ पवित्र आहेस, आणि सर्व प्राण्यांचें पर्यवसान तुझ्या ठिकाणींच होतें, तेव्हां तूं सर्व शरीरानें सर्वभक्षक कसा होशील बरें? तुझ्या अधोभागीं असलेल्या ज्वाला मात्र पवित्र किंवा अपवित्र अशा कोणत्याही पदार्थांचें भक्षण करतील; तुझी जी तनु क्रव्याद आहे, ती मात्र सर्वभक्षक होईल. बाकीची तनु तशी होणार नाहीं. ज्याप्रमाणें सूर्यकिरणांनीं स्पर्श केलेल्या प्रत्येक पदार्थास पवित्रता प्राप्त होते, त्याप्रमाणें तुझ्या ज्वालांनीं दग्ध झालेल्या प्रत्येक पदार्थास पवित्रता येईल. हे विश्वव्यापक अग्ने, तूं महान तेजस्वी आहेस. वाणीची तरी देवता तूंच होस. तेव्हां भृगुवाणीपासून निघालेला शाप हा वास्तविकपणें तुझ्यापासूनच निघाला असें म्हटलें पाहिजे; ह्यास्तव तो शाप तूं आपल्या तेजानेंच सत्य कर, आणि तुजप्रत अर्पण केलेला तुझा व देवांचा हविर्भाग स्वीकार."

सौति म्हणाला:—ऋषींहो, ब्रह्मदेवाचें बोधवचन श्रवण करून अग्नीनें त्यास मान्यता दिली, आणि तो ब्रह्मदेवाच्या आज्ञेप्रमाणें वागण्यास निघून गेला. नंतर देव व ऋषि आनंदित होऊन आपापल्या स्थानीं परत गेले, आणि ऋषींनीं पूर्ववत् क्रियानुष्ठान आरंभिलें. सर्वत्र यज्ञयागादिकांची अव्याहत परंपरा सुरू झाली, स्वर्गांत देवांना संतोष झाला, जिकडे तिकडे समृद्धि होऊन सर्व प्राण्यांना समाधान वाटलें, आणि सर्व कल्मष नाश पावून अग्नीलाही परम आल्हाद झाला. असो. च्यवनभार्गवाचें जन्म, पुलोमा राक्षसाचा नाश, अग्नीस शाप व त्या शापाचें परिमोचन ह्या सर्व गोष्टी ह्याप्रमाणें घडून आल्या त्या तुम्हांस सांगितल्या.

अध्याय आठवा.

—:०:—

प्रमद्वरा व रुरु ह्यांचा विवाहनिश्चय.

सौति म्हणाला:—शौनकादिक ऋषींहो, च्यवनभार्गव हा मोठा होऊन वेदवेदांगांत निष्णात झाला,

व त्यानें उग्र तपश्चर्या करून नंतर सुकन्या नामक स्त्रीशीं विवाह केला. त्यास सुकन्येपासून महा-दीप्तिमान व उदारधी असा प्रमति नांवाचा पुत्र झाला. पुढें त्या प्रमतीपासून घृताचीच्या उदरीं रुरु जन्मला. नंतर रुरूपासून प्रमद्वरेला शुनक झाला. शुनक हा प्रतापशाली असून त्यानें सर्व भृगुकुळाची कीर्ति दशदिशांत विख्यात केली. हा मोठा तपस्वी होता. ह्याचें दिव्य यश अद्यापही गाजत आहे. ऋषीहो, त्या महासमर्थ रुरूचें चरित्र मी तुम्हांस साद्यंत निवेदन करितों, तें तुम्ही श्रवण करा.

मुनिवर्यहो, पूर्वी स्थूलकेश नामक एक महान ऋषि होऊन गेला. तो प्रखर तपश्चर्या व गहन ब्रह्मविचार ह्यांमध्यें सदा रममाण असे. सर्व प्राण्यांचें हित कशानें होईल, ह्याचा तो नित्य निदिध्यास चालवी. त्याचा हा असा क्रम चालू असतां त्या काळांतच गंधर्वांचा अधिपति विश्वावसु ह्याजपासून मेनका नामक अप्सरेच्या ठिकाणीं गर्भस्थापना झाली. हे भृगुनंदना शौनका, पुढें योग्य काल लोटल्यावर त्या मेनकेनें स्थूलकेश ऋषीच्या आश्रमासमीप नदीतीरीं आपल्या गर्भाचें उत्सर्जन केलें, आणि भूतवात्सल्य व जनापवाद ह्यांची परवा न करितां ती आपल्या स्थानास चालती झाली ! इकडे, मेनकेनें आपला गर्भ ज्या स्थळीं टाकून दिला होता, त्या स्थळीं कर्मधर्मसंयोगानें स्थूलकेश ऋषि प्राप्त झाले असतां, त्यांस, देदीप्यमान तेजानें झळाळत असलेलें एक कन्यारत्न नदीच्या कांठीं निर्जन अशा ठिकाणीं टाकून दिलेलें आढळलें ! ऋषीहो, त्या भूतवत्सल मुनिश्रेष्ठास त्या बंधुरहित अर्भकाला पाहतांच अत्यंत करुणा उत्पन्न झाली, आणि त्यानें ती कन्या आपल्या आश्रमांत नेऊन तिचें पालनपोषण केलें. ब्राह्मणांनो, मेनकेचें तें सुंदर अपत्य तेथें हळू हळू वाढूं लागलें, आणि त्याचे जातकादि संस्कारही त्या महात्म्या स्थूलकेश ऋषीनें यथाक्रम व यथाविधि केले. पुढें ती कन्या मोठी होऊं लागली, तसतसे तिचे रूप-सत्वादिक मोहक गुण प्रकट होऊं लागले. नंतर त्या मुलीचें तें अद्वितीय लावण्य व लोकोत्तर शील पाहून स्थूलकेश ऋषीस मोठा आनंद झाला, आणि सर्व प्रमदांमध्यें ती वर म्हणजे श्रेष्ठ आहे असे मनांत आणून त्यानें तिचें प्रमद्वरा असें नांव ठेविलें.

ऋषीहो, पुढें त्या मेनकातनयेला यौवनावस्था प्राप्त झाली असतां, एके समयीं हा भगुवंशनंदन रुरु स्थूलकेशाश्रमास आला. तेथें प्रमद्वरेचें हृदयंगम सौंदर्य अवलोकन करितांच रुरु कामपीडित झाला, व त्यानें स्वाश्रमास परत गेल्यावर तो सर्व प्रकार आपल्या मित्रांकरवीं पित्यास विदित केला. नंतर पित्यानें म्हणजे प्रमतीनें स्थूलकेश ऋषीकडे जाऊन प्रमद्वरेची याचना केली व स्थूलकेशास प्रमतीचें म्हणणें मान्य होऊन, प्रमद्वरेचा व रुरूचा विवाह पुढें येणाऱ्या उत्तराफल्गुनी नक्षत्रावर होण्याचें निश्चित झालें.

प्रमद्वरेला सर्पदंश.

ह्याप्रमाणें वाग्दानप्रतिग्रह झाल्यावर त्या उभयतांचा पाणिग्रहणविधि लवकरच होणार, तों मध्यंतरीं एक महान अरिष्ट उद्भवलें ! एके दिवशीं प्रमद्वरा ही आपल्या सख्यांसहवर्तमान क्रीडा करीत असतां, क्रीडेच्या भरांत, पुढें आडवा पडलेला एक महान भुजंग तिच्या दृष्टीस पडला नाहीं, आणि कालप्रेरणेनें मरणसमय सन्निध येऊन त्या निद्रावश भुजंगाच्या विशाल धुडावर त्या सुंदरीचा पाय पडला ! आणि त्यासरसा त्या भयंकर सर्पानें तात्काळ क्षुब्ध होऊन मोठ्या आवेशानें त्या कुमारिकेला आपल्या विषदिग्ध दंतांनीं दंश केला !

ऋषीहो, त्या कालरूप दुष्ट भुजंगाचा दंश होऊन त्याचें तीक्ष्ण विष प्रमद्वरेच्या कोमल तनूंत प्रविष्ट होतांच ती तत्काळीच मूर्छित होऊन पडली, आणि तिचा देह विवर्ण व कलाहीन

होऊन अंगावरील अलंकार व मस्तकावरील केशकलाप अस्ताव्यस्त झाला! प्रमद्वरेची ती दुःखदावस्था पाहून तिच्या सख्या शोकाकुल झाल्या, व क्षणांत ती वार्ता चोहोंकडे पसरून स्थूलकेश ऋषि व दुसरे आश्रमवासी तापसगण लागलेच तेथें प्राप्त झाले. ऋषीहो, प्रमद्वरा सर्पदंशानें मृत होऊन भूमीवर पडली असतां इतर सामान्य स्त्रियांप्रमाणें तिच्यावर प्रेतकला आली नाहीं. त्या सुंदरीच्या स्वाभाविक दिव्य तेजामुळें त्या निश्चेष्ट स्थितींतही तिच्या ठिकाणीं असाधारण कांति दृग्गोचर होत होती.

शौनकादिक मुनिवर्यहो, स्थूलकेश ऋषि व त्या आश्रमांतील इतर तपोनिधि त्या स्थळीं येऊन, कमलाप्रमाणें जिचें शरीर मनोरम आहे अशा त्या प्रमद्वरेची ती मृतावस्था अवलोकन करीत आहेत, तों दुसरेही अनेक थोर थोर ऋषि शोकविव्हल होऊन त्या स्थळीं धावत आले. स्वस्त्यात्रेय, महाजानु, कुशिक, शंखमेखल, उद्दालक, कठ, श्वेत, महायश भरद्वाज, कौणकुत्स्य, आर्ष्टिषेण, गौतम, प्रमति व त्याचा पुत्र रुरु आणि त्या तपोवनांतील दुसरे अनेक जन, अहिविषानें मृत झालेल्या प्रमद्वरेला पाहून रुदन करूं लागले. रुरु तर आपल्या पत्नीची ती विपन्नावस्था पाहून आर्त होत्साता बाहेरच निघून गेला, आणि इतर सर्व ऋषि मात्र स्थूलकेशासमीप तेथेंच बसले!

अध्याय नववा.

-:०:-

प्रमद्वरेचें संजीवन.

सौति म्हणाला:—ऋषीहो, प्रमद्वरेला गतप्राण झालेली पाहून रुरु जो तेथून निघाला, तो घोर अरण्यांत जाऊन तेथें मोठमोठ्यानें आक्रोश करूं लागला. त्यानें आपल्या प्रियेच्या अनेक गुणांची आठवण करून करुणस्वरानें विलाप आरंभिले. त्या समयीं तो शोकाविव्हल होऊन म्हणाला,

"अरेरे! माझी ती चारुगात्री प्रियतमा भूतलावर काष्ठवत् पडावी ना! हे दैवा, मला व तिच्या त्या सर्व आप्तसुहृदांना ह्याहून कष्टप्रद अशी कोणती अवस्था आहे बरें! हे भगवंता, मीं जर आजपर्यंत सत्पात्रीं दानधर्म केला असेल, आजपर्यंत माझ्या हातून उत्कृष्ट तपश्चर्या घडली असेल, आजपर्यंत मीं जर भक्तिपुरस्सर सद्गुरुसेवा आचरिली असेल, अथवा जन्मापासून इंद्रियदमन करून मीं जर मनोनिग्रहानें व्रतानुष्ठान केलें असेल, तर माझ्या त्या सुकृताच्या योगें माझी प्राणवल्लभा पुनः जिवंत व्हावी."

शौनकादिक ऋषीहो, तो प्रमतिपुत्र रुरु ह्याप्रमाणें प्रमद्वरेच्या मरणामुळें आर्त होऊन आक्रंदन करीत असतां कोणी एक देवदूत त्या स्थळीं प्राप्त झाला व रुरूस म्हणाला:—हे रुरो, तूं दुःखाकुल होऊन विलाप करीत आहेस, व वाणीनें ती सजीव व्हावी या हेतूनें आपण केलेल्या पुण्यकर्माचा उच्चार करीत आहेस खरा; पण तें सर्व व्यर्थ आहे. हे धर्मात्मन्, ज्या प्राण्याचें आयुष्य संपलें, त्यास अधिक आयुष्य कसें येईल? बाबा, विश्वावसु गंधर्व व मेनका अप्सरा ह्यांच्या ह्या दीनवाण्या कन्येच्या आयुष्याचा तंतु तुटला आहे; ह्यास्तव तूं आतां निरर्थक शोक करूं नको. अशा प्रकारें चित्त दुःखाकुल करणें सर्वथा अनुचित आहे. आतां, असा प्रसंग प्राप्त झाला असतां आपत्तीचें निवारण होण्यास पूर्वीं महान महान देवांनीं एक उपाय सांगून ठेविला आहे; तो उपाय जर तूं करशील, तर मात्र ह्या लोकीं पुनः प्रमद्वरेची प्राप्ति तुला होईल!

रुरूनें प्रश्न केला:—हे देवदूता, पूर्वीं देवश्रेष्ठांनीं जो एक उपाय सांगून ठेविला आहे म्हणून तुझें म्हणणें आहे, तो उपाय तूं मला यथार्थपणें निवेदन कर, म्हणजे तो करून मी आपल्या प्रियेस उठवीन. तेव्हां देवदूत म्हणाला, "हे भृगुनंदना, तूं आपलें अर्धें आयुष्य

प्रमद्वरेस अर्पण कर म्हणजे त्या योगें ती उठेल." त्यावर रुरु म्हणाला, "हे देवदूता, मी त्या सुंदरीला अर्धें आयुष्य देण्यास सिद्ध आहें; तर त्याच्या योगानें माझी भार्या पुनः जिवंत व्हावी."

सौति म्हणाला:—शौनकादिक मुनिवर्यहो, नंतर तो देवदूत विश्वावसु गंधर्वाकडे गेला, आणि मग त्या दोघांनीं यमधर्माची भेट घेतली. ते यमधर्मास म्हणाले, "हे धर्मराजा, प्रमद्वरेचा पति रुरु हा आपल्या अर्ध्या आयुष्याच्या योगें प्रमद्वरा जिवंत व्हावी म्हणून प्रार्थना करीत आहे; तर प्रमद्वरा ही खरोखरीच मृत झाली असल्यास ती आपल्या भर्त्याच्या आयुष्यानें संजीवित व्हावी, अशी आमची विनंती आहे." ऋषिश्रेष्ठहो, तेव्हां यमधर्म म्हणाला:—हे देवदूता, रुरूची पत्नी प्रमद्वरा हिचें आयुष्य संपून जाऊन ती मरण पावली आहे; परंतु तिच्या आयुष्यतंतूस रुरूच्या अर्ध्या आयुष्याचा तंतु जर जोडिला, तर मात्र ती पुनः जिवंत होईल. कारण पति व पत्नी हीं वस्तुतः एकच असल्यामुळें पतीच्या आयुष्याचा विनियोग पत्नीच्या संजीवनार्थ केल्यास प्रत्यवाय नाहीं.

सौति म्हणाला:—ऋषीहो, ह्याप्रमाणें यमधर्मानें भाषण केलें, इतक्यांत रुरूच्या अर्ध्या आयुष्यानें प्रमद्वरा जिवंत झाली; आणि जणू काय झोंपेतून उठल्या प्रमाणें ती सुंदरी उठून बसली. मुनिवर्यहो, त्या महाभाग्यवान रुरूच्या जातकांतच असें वर्तविलें होतें कीं, ह्याच्या अति मोठ्या आयुष्यापैकीं अर्धें आयुष्य ह्याच्या पत्नीच्या संजीवनार्थ खर्चावें लागेल. ऋषीहो, पुढें स्थूलकेश व प्रमति ह्यांनीं सुमुहूर्तावर प्रमद्वरा व रुरु ह्यांचा मोठ्या आनंदानें विवाह केला आणि नंतर तीं वधूवरें नानाप्रकारचे विलास भोगून एकमेकांच्या हितासाठीं जपूं लागलीं अशा प्रकारें रुरूला त्या लोकोत्तर लावण्यवतीची महान आयासांनीं प्राप्ति झाल्यानंतर, सर्पाचा नाश करावयाचा असा रुरूनें नियम धरिला. सर्प पाहतांच त्यास अत्यंत क्रोध येई व तो तात्काळ आपल्या अंगीं असेल तितक्या पूर्ण बळानें आपला दंड त्या सर्पावर हाणून त्याचा प्राण घेई. पुढें हा क्रम चालू असतां एके वेळीं रुरु हा गहन अरण्यांत गेला. त्या वेळीं तेथें त्यास एक जरठ डुंडुभ (दुतोंड्या) आढळला. त्यास पाहतांच रुरु आपला कालदंड उगारून एकदम त्याजवर धावून गेला, आणि तो आतां त्यास मारणार, तों डुंडुभ त्यास म्हणाला:—हे तपोधना, मीं तुझा कांहींएक अपराध केला नसतां, तूं क्रुद्ध होऊन मला मारण्यास उद्युक्त झाला आहेस, तो कां बरें?

अध्याय दहावा.

-:०:-

रुरुडुंडुभसंवाद.

रुरु म्हणाला:—हे उरगा, माझ्या प्राणप्रिय भार्येला एका भुजंगानें दंश केला होता, तेव्हांपासून मीं असा कडकडीत नियम केला आहे कीं, जो जो भुजंग माझ्या दृष्टीस पडेल त्यास ठार करावयाचें. ह्यास्तव त्या नियमास अनुसरून मी तुझा वध करण्यास प्रवृत्त झालों आहें; म्हणून तूं आज जिवाला मुकलास असें समज.

डुंडुभ म्हणाला:—हे ब्राह्मणा, मानवांना दंश करणारे ते सर्प निराळे, व मी निराळा. केवळ मी सर्पासारखा दिसतों एवढ्यावरच त्वां माझा वध करूं नये. आम्हां डुंडुभांच्या ठिकाणीं विषाचा लेश सुद्धां नसतो, मग आम्हांस मारण्यांत काय अर्थ आहे बरें? ब्राह्मणा, एकाच्यां अपराधाबद्दल त्याच्या जातीच्या सर्वांचा नाश करणें हें योग्य नव्हे. कारण, व्यक्तिसमुदायापैकीं म्हणजे एका जातीपैकीं एका व्यक्तीनें कांहीं अर्थ जोडिला, तर त्या अर्थाच्या द्वारें होणारे जे सुखोपभोग ते तेवढे एकट्यालाच मिळावे, आणि एका व्यक्तीनें कांहीं अनर्थ म्हणजे अपराध केला, तर त्या अनर्थाच्या द्वारें होणारे दुष्ट परिणाम सर्व व्यक्तिसमुदायास

म्हणजे सर्व जातीस भोगणें भाग पडावें, हें सर्वथा गर्हणीय होय; म्हणून तूं न्याय्यान्याय्यविचार करून त्या दुष्ट भुजंगाच्या असद्वर्तनाबद्दल मजवर शस्त्रप्रहार करूं नको. तुला॰ हा धर्माधर्मविवेक आहे; ह्यास्तव तुझ्या हातून हा घोर अपराध घडावा हें प्रशस्त नाहीं.

सौति म्हणाला:—ऋषीहो, डुंडुभाचें तें वचन श्रवण करून रुरूच्या लागलेंच मनांत आलें कीं, हा सर्प खरोखरीचा सर्प नव्हे, हा कोणी तरी भयाकुल झालेला ऋषि असावा. असा विचार करून रुरूनें आपला दंड तात्काळ मागें घेतला, आणि तो उलट त्या ऋषीचें सांत्वन करून म्हणाला, "हे डुंडुभा, तूं वास्तविकपणें डुंडुभ आहेस, असें मला वाटत नाहीं. ह्यास्तव ह्या विपरीत अवस्थेस प्राप्त झालेला तूं कोण आहेस, हें मला निवेदन कर." ऋषीहो, ह्याप्रमाणें रुरूचें भाषण ऐकून डुंडुभ त्यास म्हणाला, "हे रुरो, मी पूर्वी सहस्रपात् नामक एक ऋषि होतों. मला ब्राह्मणाच्या शापामुळें हें डुंडुभरूप प्राप्त झालें.' त्यावर रुरूनें पुन: म्हटलें:—हे भुजंगोत्तमा, ज्या ब्राह्मणानें तुला शाप दिला, त्या ब्राह्मणास क्रोध उत्पन्न होण्यासारखें तुझ्याकडून कोणतें अनुचित कृत्य घडलें बरें! शिवाय, हें तुझें भुजंगरूप आणखी किती कालपर्यंत राहणार बरें?

अध्याय अकरावा.

—:०:—

डुंडुभाचें पूर्ववृत्त.

डुंडुभ म्हणाला:—रुरो, पूर्वी खगम नांवाचा एक द्विज माझा मित्र होता. त्याच्या ठिकाणी उत्तम तपोबल वसत होतें; परंतु त्याची वाणी फार तीक्ष्ण असे. बाळा रुरो, मी लहान असतांना माझ्या हातून एक घोर अपराध घडला: तो हा कीं, मी एक तृणाचा सर्प तयार केला, आणि तो खगम तपोनिधि अग्निहोत्रकर्मांत निमग्न असतां त्याला घाबरविण्याकरितां म्हणून मीं तो सर्प त्याजवर सोडिला. रुरो, त्या महात्म्याचें चित्त अग्निपूजेंत आसक्त असल्यामुळें, तो खरा सर्प आहे किंवा कृतीचा सर्प आहे तिकडे त्याचें अवधान गेलें नाहीं, आणि त्या सर्पास पाहतांच तो एकदम भयाकुल व मूर्छित पडला! बाळा रुरो, नंतर कांहीं वेळानें तो तपस्वी सावध होऊन त्यास सर्व प्रकार कळून आला. तेव्हां तो क्रोधाग्नीनें नखशिखांत पेटला आणि त्यानें अमोघ शब्द उच्चारून मला शाप दिला कीं, 'हे ऋषे, ज्या प्रकारचा सर्प करून तूं मला भिवविलेंस, त्याच प्रकारचा तृणतुल्य (दुर्बळ) सर्प तूं होशील.' रुरो, त्या खगम ऋषीचें तपोवीर्य मला विदित होतेंच; तेव्हां तें शापवचन श्रवण करितांच मी फार घाबरलों व तात्काळ नम्रपणें हात जोडून त्याच्यापुढें उभा राहिलों, आणि त्यास म्हणालों:—हे ऋषे, तूं माझा मित्र आहेस, म्हणून केवळ विनोदार्थ माझ्या हातून हा अतिक्रम घडला आहे, ह्यास्तव कृपा करून ह्या शापापासून माझी मुक्तता कर. हे रुरो, नंतर माझी ती दु:खविव्हल अवस्था अवलोकन करून त्या तपोधनास माझी करुणा आली आणि तो पुन: पुन: दु:खाचा उसासा टाकून मला म्हणाला:—बाळा, माझ्या मुखावाटे जे शब्द बाहेर पडले, ते केव्हांही मिथ्या होणार नाहींत. तथापि मी जें सांगतों, तें नेहमीं लक्षांत ठेव. बाळा, भृगुकुलामध्यें प्रमतीला रुरु नामक महापवित्र पुत्र होईल, त्याची व तुझी भेट झाली म्हणजे तुझ्या शापाचा अंत होऊन तूं पुन: लवकरच पूर्वपदास प्राप्त होशील. हे रुरो, त्या खगम ऋषीनें सांगितल्याप्रमाणें तुझी व माझी आज भेट झाली आहे. ह्यास्तव आतां मी पूर्वस्वरूप धारण करून, तुझें हित कशांत आहे तें तुला सांगतों.

डुंडुभशापमोक्ष.

सौति म्हणाला:—ऋषीहो, नंतर त्या खगम

ऋषीनें तें डुंडुभरूप टाकून देऊन आपलें भास्वर (महातेजस्वी) ब्राह्मणरूप धारण केलें, आणि त्या अतुलपराक्रमी रुरूस म्हटलें:—हे द्विजश्रेष्ठा, अहिंसा हा परमधर्म होय. श्रुतिस्मृत्यादिकांत जिचा निषेध केला आहे, अशी हिंसा केव्हांही करूं नये. ब्राह्मणांनीं सौम्यपणा धरावा, हें श्रुतीमध्येंही सांगितलें आहे. ब्राह्मणांचें मुख्य कर्तव्य म्हटलें म्हणजे त्यांनीं वेदवेदांगांचा अभ्यास करावा, प्राणिमात्रांस अभय द्यावें, हिंसा करूं नये, सत्य भाषण करावें, क्षमा धरावी, आणि वेदार्थाचें निदिध्यासन चालवावें, हेंच आहे. क्रोधवश होऊन सूड उगविणें हें ब्राह्मणांचें कर्म नव्हे. ह्या क्षत्रियधर्माचें तूं आचरण करूं नको. दंड धारण करून आपली सत्ता अबाधित चालवावी, आणि प्रजांचा प्रतिपाल करावा, हा क्षत्रियांचा धर्म आहे. द्विजोत्तमा, जनमेजय राजाच्या सत्रांत जेव्हां सर्पांचा भयंकर नाश होऊं लागला, तेव्हां त्या भयभीत झालेल्या सर्पांचें सरक्षण ब्राह्मणाकडूनच झालें. त्या समयीं जनमेजयानें सर्पजातीचें बीजही उरविलें नसतें, परंतु तपोवीर्यवान व वेदवेदांगनिपुण अशा त्या आस्तीक द्विजानेंच तो घोर अनर्थ निवारिला !

अध्याय बारावा.

—:०:—

सर्पसत्रप्रस्ताव.

रुरु म्हणाला:—हे सहस्रपात् ऋषे, जनमेजय राजानें सर्पांचा नाश केला तो कां बरें ? तसेंच, सर्पांचा नाश करणें हें कांहीं सुलभ कृत्य नव्हे; असें असतांना तें त्यानें कशा प्रकारें घडवून आणिलें बरें? आणि त्या महाबुद्धिमान आस्तीक ऋषीनें सर्पजातीचा समूळ विध्वंस होऊं दिला नाहीं म्हणून तूं सांगितलेंस, तर तसें करण्यास काय कारण झालें ? मुने, हें सर्व वृत्त साद्यंत श्रवण करावें अशी माझी इच्छा आहे; तर तूं कृपा करून माझी इच्छा पूर्ण कर.

सहस्रपात् ऋषि म्हणाला:–हे रुरो, आस्तीकाचें तें लोकोत्तर चरित्र तुला ब्राह्मणाकडून समजेल.

सौति म्हणाला:—शौनकादिक मुनीहो, तो सहस्रपात् ऋषि ह्याप्रमाणें बोलून एकदम अंतर्हित झाला. नंतर रुरूनें त्यास शोधण्याकरितां सर्व वन धुंडाळिलें, परंतु त्यास तो ऋषि सांपडला नाहीं. अखेरीस फिरतां फिरतां तो थकून जाऊन भूमीवर निश्चेष्ट पडला, आणि सहस्रपाताच्या भाषणांत काय मर्म आहे, ह्याचा पुनः पुनः विचार करीत असतां तो देहभान विसरला. मग देहभानावर आल्यानंतर तो आपल्या आश्रमास परत आला आणि त्यानें अरण्यांत घडलेला सर्व वृत्तांत आपल्या पित्यास निवेदन केला. तेव्हां पित्यानें (प्रमतीनें) आस्तीक ऋषीचें सर्व चरित्र रुरूस सांगितलें.

आस्तीकपर्व.

अध्याय तेरावा.

—:०:—

आस्तीकाचें आख्यान.

शौनक विचारतात:—हे सौते, त्या राजशार्दूल जनमेजयानें सत्रामध्यें सर्पांचा कां संहार केला, तें अथपासून इतीपर्यंत सांगून त्यांतील सर्व मर्म मला निवेदन कर. तसेंच, त्या महाविक्रमशाली द्विजश्रेष्ठ आस्तीकानें सत्रांतल्या प्रज्वलित अग्नी पासून सर्पांची सुटका केली ती कशी, हेंही सविस्तर सांग. हे सूतपुत्रा, सर्पसत्र करणारा जनमेजय राजा हा कोणाचा पुत्र, आणि तसाच तो विप्रश्रेष्ठ आस्तीक हाही कोणाचा पुत्र हें देखील मला कथन कर.

सौति म्हणाला:—हे शौनका, आस्तीकाचें तें महदाख्यान मीं जसें ऐकिलें आहे, तसें तुला सांगतों; तर तूं तें श्रवण कर.

शौनक म्हणाले:—सौते, बरें आहे. महाकीर्तिमान व पुरातन अशा त्या आस्तीक ऋषीची मनोरम कथा साद्यंत श्रवण करावी अशी आमची इच्छा आहे, ती त्वां पूर्ण करावी.

सौति म्हणाला:—ऋषीहो, भगवान आस्तीक ह्याचा हा इतिहास फार प्राचीन असल्याबद्दल ब्राह्मणांच्या मुखांतून मीं ऐकिलें आहे. श्रीमद्व्यासांनीं वर्णन केलेला हा इतिहास, पूर्वी नैमिषारण्यांत, व्यासांचा महाबुद्धिमान शिष्य व माझा पिता जो लोमहर्षण सूत, त्यानें, तेथील ब्राह्मणांनीं विचारल्यावरून त्यांस निरूपण करून सांगितला, आणि त्या समयीं मीं तो श्रवण केला. ऋषीहो, ह्या आस्तीकाख्यानाची गुरुपरंपरा अशी आहे. असो. आतां, मीं जसें हें ऐकिलें आहे, तसें तुम्हांस साग्र निवेदन करितों; तुम्ही लक्षपूर्वक ऐकावें. अहो, ह्या आस्तीकचरित्राचा महिमा मोठा अपूर्व आहे. ह्याच्या श्रवणानें श्रोतृसमुदायाचीं सर्व पातकें तात्काळ दग्ध होतात!

ऋषीहो, आस्तीक ऋषीच्या पित्याचें नांव जरत्कारु असें होतें. त्या भगवान जरत्कारूचा अधिकार काय वर्णावा? त्या ऊर्ध्वरेत्याच्या ठायीं ब्रह्मदेवाप्रमाणें कोकोत्तर सामर्थ्य होतें. तो कडकडीत ब्रह्मचर्य पाळीत असे. वेदाध्ययन करून ब्रह्मचिंतन चालवावें हाच काय तो त्याचा निरंतर व्यासंग होता. तो आहार वगैरे फार परिमित करी. सदासर्वकाळ उग्र तपश्चर्या करण्यांत तो निमग्न असे. तो मोठा धर्मशील होता. एकरात्रपर्यंत ग्रामांत वास करणारे जे यायावर नामक ब्राह्मण, त्यांमध्यें तो प्रमुख असे; आणि ज्या स्थळीं सायंकाल होईल, तेंच आपलें घर असें तो मानी. असो. एकदा तो महाभाग्यवान दिव्य तापसी सर्व पृथ्वीचें पर्यटन करण्यास बाहेर पडला. मुनिवर्यहो, तो महातेजस्वी ब्रह्मर्षि पृथ्वीवर संचार करीत असतां त्यास मार्गांत जीं जीं तीर्थें व पुण्यक्षेत्रें लागत, त्या त्या ठिकाणीं तो थांबे, आणि स्नानादिकांच्या योगें देहशुद्धि करुन तपोनुष्ठान व ब्रह्मचिंतन करी. त्या देदीप्यमान तपोनिधीचें व्रतपालन इतकें कडकडीत होतें कीं, ज्या पुरुषांनीं इंद्रियांचा जय केला नाहीं, त्यांच्या हातून तसें आचरण कधींही घडणार नाहीं. ब्रह्मवर्यहो, त्या जरत्कारु ऋषीनें वायूचा निरोध करून पंचप्राण आपल्या अधीन करून ठेविले होते. ऐहिक सुखोपभोगांचा त्याच्या ठायीं गंध सुद्धां नव्हता. तपश्चर्येच्या क्लेशांनीं त्याचीं गात्रें क्षीण झालीं होतीं. निद्रेला तर त्यानें पूर्ण जिंकिलें होतें; व वृक्षादिकांचीं शुष्क पर्णें हेंच काय तें त्याचें भक्ष्यभोज्य असे!

जरत्कारुपितृसंवाद.

ऋषीहो, प्रदीप्त अशा अग्निज्वाळेप्रमाणें ज्याची कांति सतेज आहे असा तो महासमर्थ जरत्कारु मुनि भूपर्यटन करीत असतां एका मोठ्या गर्ते-

समीप प्राप्त झाला, आणि त्यानें तेंत अवलोकन केलें तों खालीं डोकें वर पाय करून कांहीं पुरुष लोंबकळत असलेले त्याच्या दृष्टीस पडले. ऋषीहो, ते पुरुष त्या जरत्कारूचे पितरच होते. त्यांस पाहून जरत्कारूनें त्यांना प्रश्न केला, 'अहो, ह्या गर्तेमध्यें खालीं डोकें वर पाय असे लोंबत असलेले तुम्ही कोण आहां? अहो, तुम्ही केवळ तृणस्तवकास चिकटून आहां; पण तो तृणस्तवकही ह्या गर्तेंत दडून राहणाऱ्या मूषकानें कुरतुडून कुरतुडून चोहों बाजूंनीं खाऊन टाकिला आहे! तेव्हां अशा ह्या विपन्नावस्थेंत राहणारे तुम्ही आहां तरी कोण बरें?'

पितर म्हणाले:—हे ब्राह्मणा, आम्ही यायावर नांवाचे ऋषि मोठे कडकडीत तपस्वी आहों. आमच्या कुळाचा आतां संतानक्षय होणार, ह्यामुळें आम्ही अधोगतीस जाण्याच्या स्थितीला आलों आहों. आम्हांस प्रस्तुत जरत्कारु नामक एक पुत्र आहे; परंतु तो केवळ तपश्चर्येंत गढून गेल्यामुळें त्या करंट्याचा आम्हां दैवहीनांस कांहींएक उपयोग नाहीं. तो जर दारपरिग्रह करून संतति उत्पादन करिता, तर आम्हांवर हा घोर प्रसंग येण्याचें कांहींच कारण नव्हतें; पण तो विचार त्याच्या मनांत मुळींच येत नाहीं, आणि त्यामुळें आतां आमचा वंश खुंटण्याची वेळ येऊन ह्या गर्तेमध्यें आम्ही लोंबत राहिलों आहों. ब्राह्मणा, ह्याप्रमाणें त्या जरत्कारूची वृत्ति असल्यामुळें तो असून नसून सारखाच अशी आमची अवस्था होऊन आम्ही पातक्यांप्रमाणें अधःपतन पावत आहों. असो. हे ब्रह्मश्रेष्ठा, आमची ही हृदयभेदक दुःस्थिति पाहून बंधुजनाप्रमाणें तुला आमची करुणा आलेली दिसत आहे; तर तूं कोण आहेस व तुला आम्हांविषयीं अनुकंपा उत्पन्न होण्याचें प्रयोजन कोणतें, हें आम्हांस निवेदन कर.

जरत्कारु म्हणाला:—अहो यायावर ऋषींनो, माझ्या कुळाच्या आदिपुरुषासहित सर्वजण तुम्ही माझे पितर आहां. तुम्ही आपला पुत्र जरत्कारु म्हणून म्हटलात, तो मीच आहें. तर मी आतां काय करूं तें सांगा.

पितर म्हणाले:— बाळा जरत्कारो, तूं विवाह न केल्यामुळें आपल्या ह्या वंशाचें निर्मूलन होण्याची वेळ आली रे! ह्यास्तव ही गोष्ट टळावी व वंशाची वृद्धि व्हावी ह्याविषयीं प्रयत्न कर. आतां, हें जें त्वां करावयाचें, तें तूं पाहिजे तर आम्हांसाठीं कर किंवा आपणासाठीं कर; अथवा पितृऋणांतून मुक्त होणें हा आपला धर्म आहे असें मानून कर. बाबा, पुत्रवंतांस जी सद्गति प्राप्त होते, ती सद्गति—कितीही धर्मफळें जोडिलीं किंवा कितीही उग्र तपश्चर्या केली, तरी त्यांच्या योगानें प्राप्त होत नाहीं. ह्यास्तव दारपरिग्रह करून प्रजोत्पादनाचा विचार मनांत आण. हे पुत्रा, आम्ही जी आज्ञा तुला करीत आहों, तिच्याप्रमाणें जर तूं आमचें उद्दिष्ट कार्य सिद्धीस नेलेंस तर त्यापासून आपलें सर्वांचेंच कल्याण होईल.

जरत्कारु म्हणाला:—पितरहो, तुमची आज्ञा मी मान्य करितों; परंतु केवळ सुखोपभोगाकरितां कलत्र करणें किंवा धन मिळविणें हें सर्वथा वर्ज्य असल्यामुळें मी त्या हेतूनें म्हणजे केवळ माझ्या स्वार्थासाठीं स्त्रीचा स्वीकार करण्यास सिद्ध नाहीं; पण तुमच्या पारमार्थिक हितासाठीं म्हणून तसें करण्यास तयार आहें. ह्याशिवाय, विवाह करण्यासंबंधानें माझी आणखी अट अशी आहे कीं, मी जी स्त्री वरणार ती माझ्याच नांवाची असली पाहिजे, आणि ती तिच्या बंधुवर्गानें भिक्षेप्रमाणें मला अर्पण केली पाहिजे. अशी वधू जर मला प्राप्त झाली, तर मी तिचें यथाविधि पाणिग्रहण करीन, आणि नाहींपेक्षां अविवाहितच राहीन. पितरहो, कोणी मला दरिद्र्याला मुलगी देणारा भेटेल, असें माझें मन घेत नाहीं; पण जर कोणी भेटला, तर मी त्या मुली-

चा भिक्षा म्हणून अंगीकार करीन. पूर्वजहो, ह्याप्रमाणें जर घडून येईल, तर मी विवाह करण्यास सिद्ध आहें; परंतु जर हें घडून आलें नाहीं, तर मात्र अन्य प्रकारें विवाह करण्यास मी मुळींच सिद्ध नाहीं. असो. इतक्या ह्या अडचणी दूर होऊन दारपरिग्रह करण्याचा योग जर जुळून आला, व त्यापासून जर संतति झाली, तर तुम्ही ह्या बंधातून मुक्त होऊन शाश्वत सुखांत रममाण व्हाल.

अध्याय चौदावा.

—:०:—

जरत्कारुविवाह.

सौति म्हणाला:—शौनकादिक मुनिवर्यहो, नंतर तो महातपस्वी जरत्कारु ब्राह्मण विवाह करण्याची मनीषा धरून भूपर्यटन करूं लागला; परंतु कोणीही त्याला मुलगी देईना. पितरांचे शब्द तर त्याच्या मनांत एकसारखे घोळत होते. तेव्हां आतां करावें कसें? अशी विवंचना करीत तो एकदा वनांत गेला, आणि तेथें 'कोणी तरी मला कन्येची भिक्षा घाला' असें हळू हळू त्रिवार ओरडला. जरत्कारूचे ते शब्द श्रवण करून वासुकि सर्प हा लागलाच आपल्या भगिनीसमवेत तेथें आला, आणि त्यानें 'हे विप्रवर्या, ह्या माझ्या बहिणीचा अंगीकार कर' अशी मोठ्या नम्रतेनें त्याची प्रार्थना केली. ऋषीहो, जरत्कारु मुनीस वासुकीच्या त्या भगिनीचें नांव माहीत नव्हतें; म्हणून, ती बहुधा आपल्या नांवाची नसेल, असें मनांत आणून त्यानें वासुकीची ती प्रार्थना मान्य केली नाहीं; कारण, स्वनामधेय कन्या मिळाल्यावांचून तीस वरावयाचें नाहीं, ही जरत्कारूची अट मीं तुम्हांस पूर्वीच विदित केलेली आहे. ऋषीहो, वासुकीनें जेव्हां जरत्कारूला फारच आग्रह केला, तेव्हां जरत्कारु वासुकीला म्हणाला:—हे भुजंगमा, तुझ्या ह्या स्वसेचें नांव काय आहे, हें मला सांग. ही जर खरोखरी माझ्याच नांवाची असेल, तर हिला मी वरीन. ह्यावर वासुकि म्हणाला:—हे जरत्कारो, ह्या माझ्या धाकट्या बहिणीचें नांव जरत्कारु असेंच आहे. ही मी तुला अर्पण करीत आहें, तर तूं ह्या सुंदरीचा अंगीकार करून हिच्याशीं विवाह कर. हे विप्रश्रेष्ठा, ही कन्या मीं तुझ्यासाठीं मुद्दाम राखून ठेविली आहे. ह्यास्तव तूं हिला अवश्य वर. ऋषीहो, असें बोलून वासुकीनें आपली बहीण जरत्कारु ही जरत्कारु ऋषीच्या स्वाधीन केली, आणि त्या ऋषीनें तिचा स्वीकार करून तिच्याशी यथाविधि विवाह लाविला.

अध्याय पंधरावा.

-:०-

मातृशापप्रस्ताव.

सौति म्हणाला:—शौनकादिक ऋषीहो, वासुकि सर्पानें आपली बहीण जरत्कारु ही मुद्दाम त्या जरत्कारु मुनीस देण्यासाठीं राखून ठेविली होती, ह्याचें कारण, वासुकीची माता कद्रू हिनें आपल्या पुत्रांस म्हणजे सर्पांस 'तुम्हांस जनमेजयाच्या सत्रांत अग्नि दग्ध करील' असा शाप दिला होता, हें होय. ऋषिवर्यहो, त्या शापाच्या उपशमाकरितां सर्पराज वासुकीनें सर्पकन्या जरत्कारु ही जरत्कारु ऋषीस अर्पण केली, आणि त्यानें तिचा विधिपूर्वक प्रतिग्रह केल्यावर त्यापासून तिच्या उदरीं भगवान आस्तीक मुनि ह्यांचें जन्म झालें. ऋषीहो, त्या महान आस्तीकाचा महिमा काय वर्णावा? त्या महात्म्याचें मन मोठें उदार असून सर्व जग त्यास आत्मतुल्य वाटत असे. तो तपस्वी वेदवेदांगांत निपुण असून पितृमातृकुलांतील बंधुजनांचें भय दूर करण्याविषयीं फार तत्पर होता.

ऋषीहो, त्या लोकोत्तर पुरुषाचें जन्म होऊन बराच काळ लोटल्यावर, पांडवकुलांत परमप्रतापी

जनमेजय राजा झाला व त्यानें सर्पसत्र नामक एक महायज्ञ केला. त्या सत्राचा उद्दिष्ट हेतु सर्पांचा संहार करावा हा होता. त्या सत्रांत सर्पांचा जेव्हां भयंकर विनाश होऊं लागला, तेव्हां ह्या आस्तीकानेंच त्यांची मुक्तता केली. त्यानें आपल्या मातुलांना, मातुलवर्गीय बंधूंना व इतर दुसऱ्या अनेक सर्पांना त्या प्रदीप्त अग्नीपासून सोडविलें, आणि शिवाय आपल्या उग्र तपश्चर्येनें व संततीनें पितरांसही तारिलें. ऋषिवृंदहो, तो महात्मा नानाविध व्रतें करून व सदासर्वकाळ वेदाध्ययन चालवून जसा पितरांच्या ऋणांतून मुक्त झाला, तसा तो अनेक मोठमोठाले यज्ञ करून व त्यांत विपुल दक्षिणा वगैरे देऊन देवांच्या ऋणांतूनही मुक्त झाला.

मुनिवर्यहो, भगवान जरत्कारूच्या जीवनचरित्राचें तुम्हीं मनन करावें. तो प्रथम कडकडीत ब्रह्मचर्याचें अनुष्ठान करून ऋषिऋणांतून मुक्त झाला, व पुढें संतति निर्माण करून त्यानें पितृऋणांतून आपली सुटका करून घेतली, आणि संतानविच्छेदरूप महान दुःखाचा जो भार त्याच्या पितरांवर पडला होता, तो दूर करून त्यांस त्यानें सद्गति मिळवून दिली व आपल्या जन्माचेंही सार्थक्य संपादिलें. असो. ऋषीहो, भगवान आस्तीकांचें जन्म झाल्यानंतर बहुत काळपर्यंत मुनिपुंगव जरत्कारु ब्राह्मण धर्माचरण करीत ह्या जगांत राहिला होता. पुढें तो यथाकालीं हा लोक सोडून स्वर्गलोकास निघून गेला. शौनकादिक विप्रांनो, हें आस्तीकाख्यान मी जसें ऐकिलें होतें, तसें तुम्हांस निवेदन केलें आहे. आतां आणखी काय सांगूं त्याची आज्ञा व्हावी.

अध्याय सोळावा.

—:०:—

आस्तीकाख्यान.

(विस्तृत निरूपण)

शौनक म्हणाले:—हे सूतनंदना, हें आस्तीकचारित्रच तूं आम्हांस विस्तारानें पुनः सांग. कारण त्या महासमर्थ पुण्यपुरुषाचें आख्यान साद्यंत ऐकण्याची आम्हांस फारच उत्कंठा आहे. हे लौमहर्षणे, तुझी विवेचनशैली किती मनोहर आहे म्हणून सांगावें? तूं जी पदयोजना करितोस, ती इतकी समर्पक असते कीं, तिच्या योगें आमच्या मनोवृत्ति उच्छृंखल होऊन त्या तुझ्या व्याख्यानांत अगदीं तल्लीन होतात, आणि मग त्यांस कोणताही अन्य विषय आवडत नाहीं. हे सौते, ह्याशिवाय, तुझ्या ठायीं पुण्यकथा निवेदन करण्याविषयीं जी अपूर्व कळकळ वास करीत आहे, तिच्यावरून तर आम्हांस, तूं आमचा केवळ पिताच आहेस, असा भास होतो! लौमहर्षणे, तुझ्या ठिकाणीं हे जे विशिष्ट गुण आहेत, ते पूर्वपीठिकेस अनुसरूनच आहेत. तुझा पिता सच्चरितामृतपानानें आम्हांस तृप्त करण्याविषयीं नेहमीं तत्पर असे, तेव्हां तोच गुण तुझ्या ठायीं मूर्तिमंत वसत आहे, हें युक्तच होय. असो. सौते, हें आस्तीकाख्यान तूं आपल्या पित्यापासून जितक्या विस्तारानें ऐकिलें असशील, तितक्या विस्तारानें तें तूं आम्हांस सांग.

सौति म्हणाला:—शौनकादिक विप्रवर्यहो, मी माझ्या पित्यापासून हें आस्तीकचरित्र जसें श्रवण केलें आहे, तसें तुम्हांस सांगतों. तुम्हीं तें सावधान चित्तानें ऐकावें.

सर्पोत्पत्ति.

महापावन मुनीवर्यांनो, पूर्वी सत्ययुगांत प्राचेतस दक्ष प्रजापतीला अत्यंत गुणवान व विलक्षण रूपवान अशा कद्रू व विनता नांवाच्या दोन मुली झाल्या. त्या त्यानें कश्यप ऋषीस दिल्या. त्या दोन्ही बहिणींचें शुद्ध शील व अकृत्रिम पातिव्रत्य अवलोकन करून त्यांचा पति कश्यप मुनि ह्यास परम संतोष झाला, व प्रत्यक्ष पित्याप्रमाणें म्हणजे प्राचेतस दक्षाप्रमाणें त्यांजवर प्रसन्न होऊन त्यानें त्यांस म्हटलें:—अहो धर्मपत्न्यांनो

तुम्हांस कोणता वर पाहिजे असेल तर तो मागून घ्या? तेव्हां त्या स्त्रियांनीं प्रमुदित अंतःकरणानें कश्यपापासून वर मागून घेतले: 'माझ्या उदरीं सहस्र सर्प जन्मावे व ते सगळे एकसारखे पराक्रमी असावे' अशी कद्रूनें प्रार्थना केली; आणि 'कद्रूच्या पुत्रांपेक्षां अधिक बलवान, अधिक तेजस्वी, अधिक सुंदर व अधिक प्रतापी असे दोन पुत्र मला व्हावे' अशी विनतेनें प्रार्थना केली. कश्यप ऋषींनीं आपल्या भार्यांच्या ह्या प्रार्थना श्रवण करून 'तुमचें अभीष्ट सिद्ध होईल,' असा वर त्यांस दिला, व त्या स्त्रियांनीं 'तथास्तु' असें म्हणून त्या वराचा प्रतिग्रह केला.

ऋषीहो, ह्याप्रमाणें त्या कश्यपस्त्रियांचे मनोरथ परिपूर्ण झाले; आणि त्यांस मोठा संतोष वाटला. आपणास समानवीर्य असे सहस्र पुत्र होतील, असें मनांत आणून कद्रूनें आपल्या जन्माचें साफल्य मानिलें; आणि रूप, गुण, पराक्रम इत्यादिकांनीं कद्रूच्या पुत्रांपेक्षां बळवत्तर असे दोन पुत्र आपणास होतील, असें पाहून विनतेस धन्यता वाटली. असो. पुढें भगवान कश्यपाच्या अमोघ वीर्यापासून ह्या उभय स्त्रियांच्या उदरीं गर्भस्थापना झाली, आणि नंतर 'हे स्त्रियांनो, ह्या गर्भांचें मोठ्या काळजीनें संरक्षण करा बरें!' असें त्यांस सांगून तो महात्मा तपश्चर्येकरितां वनांत चालता झाला.

सौति म्हणाला:—मुनिवर्यहो, पुढें पुष्कळ काळ गेल्यावर कद्रू सहस्र अंडीं व विनता दोन अंडीं प्रसवली. तीं अंडीं अवलोकन करून त्यांच्या दासींस फार आनंद झाला, व त्यांनीं ऊबदार भांड्यांत तीं जतन करून ठेविलीं. ऋषीहो, पुढें पांचशें वर्षे लोटल्यानंतर कद्रूचीं अंडीं फुटून त्यांतून सहस्र नाग बाहेर पडले; परंतु तितक्या काळांत विनतेचीं अंडीं परिपक्क न झाल्यामुळें तीं तशींच राहिलीं. विप्रवर्यहो, सवतीमत्सर मोठा कठिण आहे! कद्रूचे सहस्र पुत्र इतस्ततः परिभ्रमण करूं लागले, परंतु आपल्या अंड्यांतून एकही पुत्र बाहेर पडला नाहीं, असें पाहून विनतेस परम विषाद वाटला, आणि ती अत्यंत लज्जित झाली. ऋषीहो सवतीमत्सरानें विनतेची विवेकबुद्धि अगदींच मावळली, आणि अखेरीस तिनें आपल्या दोन अंड्यांपैकीं एक अंडें बलात्कारानें फोडून आंत काय आहे तें पाहिलें, तों त्यांत अपरिपक्क अवस्थेंत असलेलें एक अपत्य तिच्या दृष्टीस पडलें. तीं त्याजकडे न्याहाळून पाहूं लागली तों त्याच्या कमरेपासून वरील भाग मात्र परिणत झालेला असून कमरेपासून खालचा भाग केवळ पूर्वावस्थेंतच आहे, असें तिला आढळलें. मुनिश्रेष्ठहो, विनतेनें अंडभेद केल्यावर त्यांतून पुत्र बाहेर पडला, व त्यानें क्रोधाविष्ट होऊन आपल्या मातेस (विनतेस) शाप दिला कीं, 'हे माते, तूं क्रोधाविष्ट होऊन ह्या अपरिपक्क अंड्याचा स्फोट केल्यामुळें मला ह्या अर्धवट शरिरानें जन्म घेणें भाग पडलें, आणि त्यामुळें मी कायमचा व्यंग व पंगु झालों! ह्या तुझ्या निंद्य कृत्याचें मूळ कारण तुझ्या मनांतील सवतीमत्सर, हेंच होय. जर तुझ्या चित्तांत कद्रूविषयीं स्पर्धा उत्पन्न झाली नसती, तर तुझ्या हातून हा घोर अनर्थ कधींही घडला नसता. ह्यास्तव ह्या तुझ्या अपराधाबद्दल तुला शासन हेंच कीं, जिच्या असूयेनें तूं हें अनुचित कर्म केलेंस, त्या कद्रूची तूं पांचशें वर्षेपर्यंत दासी होशील. हे जननी, आतां हें जें दुसरें अंडें अवशिष्ट आहे, त्याचा तूं असा अविचारानें भेद करूं नको. ह्याला जर तूं सुपरिपक्क होऊं दिलेंस, तर ह्याच्यांतून उत्पन्न होणारा पुत्र तुला कद्रूच्या दास्यांतून मुक्त करील; आणि जर ह्याच्याही वाटेस तूं जाशील, तर महान अनर्थ उद्भवेल. ह्यास्तव तूं स्वस्थ ऐस; आणि मोठ्या धैर्यानें आणखी पांचशें वर्षे वाट पहा. हे माते, इतक्या काळांत ह्या अंड्यांतील तुझ्या

पुत्रास लोकोत्तर बळ प्राप्त होईल आणि तो तुझें अभीष्ट परिपूर्ण करील.'

ऋषीहो, विनतेचा तो प्रथम पुत्र आपल्या मातेस याप्रमाणें शाप देऊन अंतरिक्षांत निघून गेला. तो प्रत्यहीं प्रभातसमयीं अरुणरूपानें दृष्टिगोचर होतो. भगवान सूर्यनारायणाच्या रथावर बसून तो सदोदीत सारथ्य करीत आहे. असो. अरुणाच्या जन्मानंतर पांचशें वर्षे अतिक्रांत झाल्यावर विनतेच्या दुसऱ्या अंड्यांतून पन्नगभुग् पक्षिराज गरुड प्रकट झाला; आणि जन्मतांक्षणींच क्षुधित होत्साता विनतेचा त्याग करून विधात्यानें नेमून दिलेलें अन्न सेवन करण्यासाठीं आकाशांत उडून गेला.

अध्याय सतरावा.

—:०:-

अमृतमंथनविचार.

सौति म्हणाला:—शौनकादिक ऋषीहो, पुढें लवकरच त्या दोघी बहिणी कद्रू व विनता ह्या, उच्चैःश्रवा नामक अश्व पाहण्याकरितां सूर्यलोकास गेल्या, आणि त्यांनीं तेथें तो दिव्य अश्व अवलोकन केला. महाभागहो, त्या उच्चैःश्रव्याची योग्यता काय वर्णावी! अमृतप्राप्त्यर्थ उदधिमंथन प्रवृत्त झालें असतां त्यांतून तो लोकोत्तर अश्व प्रकट झाला, आणि त्याची ती प्रसन्न मुद्रा व अश्रुतपूर्व कांति पाहून देव त्याची एकसारखी प्रशंसाच करूं लागले! ऋषीहो, त्या उच्चैःश्रव्याच्या अंगीं इतकें विलक्षण बळ आहे कीं, त्याचा कधींही अपकर्ष म्हणून होत नाहीं; त्याच्या ठायीं इतकें उत्कृष्ट तेज वसतें कीं, त्यास जरा किंवा क्षीणता केव्हांही प्राप्त होत नाहीं; विप्रहो, तो अप्रतिम अश्व म्हणजे केवळ सर्व श्रेष्ठ लक्षणांचें निधानच होय!

शौनक म्हणाले:—हे सूतपुत्रा, ज्या अमृताकरितां देवदानवांनी सागराचें मंथन केलें व त्यांतून तो महादेदीप्यमान अश्वराज आविर्भूत झाला, तें अमृत देवांना कोठून व कसें मिळालें, तें कथन कर.

मेरूची योग्यता.

सौति म्हणाला:—शौनकादिक ऋषीहो, देवांनीं अमृतप्राप्तीकरितां पहिल्यानें श्रेष्ठ मेरु पर्वताच्या शिखरावर बसून मसलत केली. मुनिपुंगवहो, त्या गिरिराज मेरूची योग्यता तशीच अपूर्व आहे! तो आपल्या दिव्य कांतीनें केवळ झळाळत आहे; त्याच्या ठिकाणीं जें विलक्षण तेज वसत आहे, तसें तेज ह्या अखिल विश्वामध्यें अन्यत्र कोठेंही आढळत नाहीं. त्या महागिरीच्या सुवर्णशिखरांपासून प्रसृत होणारीं किरणमंडळें अवलोकिलीं असतां प्रत्यक्ष भगवान दिनराजाचाच भास होतो; त्या महाद्युतिमान अचलाधिपतीच्या देहप्रांतावर दृष्टि फेंकिली असतां, त्यावर नवरत्नांचें सुवर्णमंडित चित्रविचित्र कोंदणकाम केलें आहे, असा भास होतो. ऋषीहो, त्या नगाधिपतीच्या योग्यतेप्रमाणेंच त्याजवर महान महान थोर पुरुष वास करितात; तेथें मुख्य 'वसति म्हटली म्हणजे देव व गंधर्व यांची आहे. त्या हेमाचलाची विशालता, सौंदर्य व मोहकपणा हीं इतकीं असाधारण आहेत कीं, त्यांचें मान करणें बहुधा अशक्यच म्हटलें पाहिजे. जे कोणी महापुण्यवान प्राणी असतील, त्यांसच त्या स्थानाचा लाभ घडेल; इतर प्राकृत जनांनीं त्या स्थलीं जावयाचें मनांत सुद्धां आणूं नये. अधर्मशील जनांस तर ह्या स्थानीं जातां येणें सर्वथा दूरापास्तच आहे. मुनिवर्यहो, ह्या पर्वतावर नानाविध भयंकर पन्नगही राहतात; तेथें नानाप्रकारच्या दिव्यौषधि असल्यामुळें त्यांच्या प्रभेनें गिरिपृष्ठावर विलक्षण छटा लकाकत असते; तो महापर्वत इतका उंच आहे कीं, त्याचीं शिखरें स्वर्गलोकास भिडलीं आहेत; आणि त्यावर नद्या व

वृक्ष अनेक असून नानाविध सुंदर पक्षी तेथें मंजुळ शब्द करीत असतात.

शौनकादिक विप्रश्रेष्ठहो, त्या मेरु पर्वताच्या अत्यंत उच्च, अंतरिक्षोपम विशाळ, बहुरत्नमय व मंगळकारक अशा शृंगप्रदेशीं महान महान तपोनिधि देव एकत्र जमले, आणि अमृताची प्राप्ति कशी होईल, ह्याचा विचार करूं लागले. त्यांनीं अमृतप्राप्तीचे अनेक उपाय सुचविले व तेथें पुष्कळ भवति न भवति चालू झाली. तेव्हां भगवान नारायणांनीं ब्रह्मदेवास म्हटलें:—हे ब्रह्मदेवा, अमृत मिळविण्याकरितां देव व असुर ह्यांनीं क्षीरसमुद्राचें मंथन करावें. त्या महोदधीचें मंथन झालें असतां त्यांतून अमृत निघेल. ह्याकरितां, तुम्ही सकळ औषधि व संपूर्ण रत्नें जमवून तीं समुद्रांत मिसळा आणि त्याचें मंथन करून त्यांतून अमृत काढा.

अध्याय अठरावा.

—:०:—

अमृतमंथनाची तयारी.

सौति म्हणाला:—शौनकादिक ऋषीहो, भगवान नारायणांचा अभिप्राय श्रवण करून देवांनीं उदधिमंथन करण्याचा विचार ठरविला, आणि त्यांनीं असुरांनाही ती गोष्ट विदित केली. नंतर, मंदर पर्वत उपटून समुद्रांत मध्यंतरीं उभा करावा आणि त्या मंथनदंडानें महोदधि घुसळावा, असें त्या उभयवर्गांनीं योजिलें; आणि ते देवासुर त्या श्रेष्ठ पर्वतासमीप प्राप्त झाले. ऋषीहो, तो मंदर पर्वत लहानसहान नाहीं. त्याचीं शिखरें म्हणजे जणू काय अंतरिक्षांतील मेघांचीं उत्तुंग शृंगेंच होत. त्याजवर पुरातन काळापासून वाढलेल्या वेलींचीं प्रचंड वळीं जिकडे तिकडे दृग्गोचर होतात. त्या पर्वतावर बहुविध पक्षी नित्य शब्द करितात. अनेक प्रकारचे हिंसक पशु त्याजवर सर्वत्र फिरत असतात. किन्नर, देव व अप्सरा ह्यांची ती विलासभूमि होय. त्याची उंची अकरा सहस्र योजनें आहे; आणि भूमीच्या उदरांत तो अकरा सहस्र योजनें खोल गेला आहे. ऋषीहो, असा तो महान पर्वत उपटून सागरतीरीं नेऊन ठेवावा म्हणून देव व दैत्य ह्यांनीं अतिशय प्रयत्न केला; परंतु त्यास तो उपटेना. अखेरीस देवांनीं भगवान विष्णूची व त्याच्या समीप अधिष्ठित असलेल्या ब्रह्मदेवाची भेट घेतली, आणि ते त्या उभयतांस उद्देशून म्हणाले:—अहो देवाधिदेवांनो, आतां तुम्हीच आमच्या कल्याणाचा उपाय योजा. तुमच्या साहाय्यावांचून कांहींएक करण्यास आम्ही समर्थ नाहीं. ह्यास्तव आतां तुम्हीच हा मंदर गिरि उचला व आमचें हित साधा.

सौति म्हणाला:—ऋषीहो, देवांचें तें काकुळतीचें भाषण श्रवण करून भगवान महाविष्णु व ब्रह्मदेव ह्यांनीं 'बरें आहे' असें म्हणून देवांस उत्तेजन दिलें, आणि नंतर त्या कमललोचन विश्वव्यापक विष्णूंनीं मंदर गिरीचें उत्पाटन करण्यास श्रीमच्छेषास आज्ञा केली. ऋषीहो, ह्याप्रमाणें भगवान लोकनायक नारायण व आदिपुरुष ब्रह्मदेव ह्यांची आज्ञा होतांच तो महापराक्रमी व बलसागर अनंत (शेष) उठला, आणि त्यानें त्या पर्वतावरील वनें व त्या वनांतील वसतिस्थानें ह्यांसहित तो सर्व पर्वत एकदम जोरानें उपटला!

ऋषीहो, मंदराचलास शेषानें उपटून बाहेर काढिलें, तेव्हां देव व दैत्य ह्यांस मोठा आनंद झाला. नंतर शेष हा, तो मंदर गिरि उचलून घेऊन समुद्रतीरास गेला, आणि देव व दैत्य हे त्याजबरोबर तेथें प्राप्त झाले. पुढें देव समुद्रास म्हणाले:—हे जलनिधे, अमृताच्या प्राप्तीकरितां ह्या मंदराचलरूप रवीनें आम्ही तुझ्या जलाचें मंथन करीत आहों. त्यावर तो जलनिधि म्हणाला,

'अहो देवांनो, ह्या महान पर्वताच्या परिभ्रमणांत मला जे क्लेश होतील, त्याचें काय वर्णन करूं? वास्तव, मंथनापासून प्राप्त होणाऱ्या अमृताचा जर मला कांहीं अंश द्याल, तर मी हे क्लेश सोसण्यास तयार आहें.' असो. ऋषीहो, नंतर देव आणि दानव ह्यांनीं कूर्मराजाची (कूर्मरूप विष्णूची) प्रार्थना केली कीं, 'हे भगवन्, तूं ह्या समयीं समुद्रामध्यें मंदर पर्वतास उचलून धर.' सुरासुरांची प्रार्थना ऐकून भगवान कूर्मानें 'बरें आहे' असें म्हणून तो पर्वत आपल्या पृष्ठावर धारण केला, आणि नंतर कूर्मपृष्ठावरील त्या महान पर्वतास इंद्रानें घट्ट जखडून बांधिलें.

समुद्रमंथन.

ऋषीहो, ह्याप्रमाणें सर्व सिद्धता झाल्यावर देवांनीं वासुकि सर्पाचें दोर त्या मंदररूप मंथनदंडाच्या सभोंवतीं गुंडाळिलें, आणि मग देव व दैत्य ह्यांनीं समुद्र घुसळण्यास प्रारंभ केला. त्या समयीं दैत्य व दानव हे नागराज वासुकीचा मुखप्रदेश धरून आणि सर्व देव हे पुच्छप्रदेश धरून तो मंथनरज्जु ओढीत होते. भगवान महाविष्णु हे ज्या अंगास होते, त्या अंगासच शेष हा होता; आणि तो, तिकडे वासुकीनें मान उचलून पाहिलें म्हणजे त्याची फडा खालीं वर आपटून त्यांतून विष बाहेर पडेल, तें स्वतः खाऊन टाकीत असे. असो. देव आणि दैत्य हे मंदराद्रि जोरानें फिरवूं लागले. वासुकीचें पुच्छ देवांनीं अतिशय आवेशानें ओढितांच त्याच्या मुखांतून एकसारखे वाऱ्याचे झोत व सधूम ज्वाला बाहेर पडूं लागल्या, आणि त्यांच्या योगानें आकाशांत विजेसहवर्तमान मेघपंक्ति तयार होऊन त्यांनीं श्रांत व संतप्त झालेल्या देवसमुदायावर जलवृष्टि केली! त्याप्रमाणेंच, त्या मंदराचलाच्या शिखरांवर ज्या लता, पादप वगैरे होते, त्यांपासून, तो पर्वत गरगर फिरत असतां, एकसारखी पुष्पवृष्टि होऊं लागली; आणि तिनें देव व दैत्य ह्यांस अगदीं व्याप्त करून टाकिलें! तो महापर्वत सागरामध्यें परिभ्रमण करूं लागला, तेव्हां त्याच्या योगें मेघगर्जनेसारखा गंभीर व मोठा शब्द सुरू झाला, आणि उदकाचा अत्यंत क्षोभ होऊन नानाविध जलचरांचा निःपात उडाला. ऋषीहो, मंदर गिरीच्या संघर्षणानें समुद्रांतील जलचरें मात्र शतशः खंडित होऊन मृत्युमुखीं पडलीं, असें नव्हे; तर पाताळतळीं वास करणाऱ्या वरुणलोकस्थ अनेक प्राण्यांचीही तीच अवस्था झाली. अहो, मंदराचलाच्या भ्रमणानें केवढाले अनर्थ घडले म्हणून सांगूं! तो फिरूं लागला, तेव्हां त्याच्या शिखरांवरील मोठमोठे वृक्ष एकमेकांवर घांसून पक्षिसमूहासहित उन्मळून पडले. पुढें ते संघर्षणजन्य अग्निज्वाळांनीं पेटले, व ज्याप्रमाणें नीलवर्ण मेघांना विद्युल्लतेनें पुनःपुनः वेष्टून टाकावें, त्याप्रमाणें त्या मंदर गिरीला अग्निज्वाळांनीं वेष्टून टाकिलें. ऋषीहो, ह्या प्रकारें मंदराचलास अग्नि लागल्यावर जो संहार झाला, तो काय वर्णावा? त्या अग्नीमध्यें अनेक कुंजर, अगणित सिंह व असंख्य श्वापदें दग्ध झालीं, आणि सर्वत्र एकच हाहाकार उद्भवला! पुढें इंद्रानें त्या प्रलयाग्नीचा उपशम करण्यासाठीं चोहींकडून मेघवृष्टि केली, तेव्हां तो अग्नि शांत झाला!

ऋषीहो, मंदराचलाचें परिभ्रमण चालू असतां त्या पर्वतावरील लतापादप एकसारखे फिरत होते, व त्यांपासून पुष्पांची वृष्टि होत होती, हें तुम्हांस मीं आधींच सांगितलें आहे. त्याशिवाय त्या लतादिकांपासून बहुविध निर्यास (चीक) व ओषधीरस ह्यांचे प्रवाह एकसारखे लवणांबुधींत मिसळत होते. मुनिवर्यहो, देवांना अमरत्व कां प्राप्त झालें, ह्याचें बीज ह्यांतच आहे. ते अमृतवीर्य ओषधीरस जेव्हां त्या सागरोदकांत मिश्रित झाले, तेव्हां त्या मिश्रणापासून दुग्ध सिद्ध झालें, आणि तें दुग्ध व त्या मणिमय सुवर्णपर्वतापासून उद्भत झालेला जलप्रवाह ह्यांच्या प्राशनानेंच देव अमर झाले. ऋषीहो, ओषधीरसाच्या मिश्रणानें उदकाचें दूध

कसें बनलें, ही गोष्ट आश्चर्य वाटण्याजोगी नाहीं. पहा—गाय ही उदकच प्राशन करिते, पण त्या उदकांत गाईनें सेवन केलेल्या तृणादिक ओषधींचा रस मिश्रित झाला म्हणजे त्याचें दुग्ध बनतें, हें आपण जाणतच आहां. असो. समुद्रोदकापासून दुग्ध निर्माण झाल्यावर त्या दुग्धापासून पुढें घृत सिद्ध झालें. ऋषिवर्यहो, ह्याप्रमाणें त्या मंथनक्रियेच्या योगें मंथनीय जलावर भिन्न भिन्न परिणाम घडत होते; परंतु मंथनदंड ओढतां ओढतां ते देवदानव अगदीं थकून गेले, आणि ते भगवान ब्रह्मदेवास म्हणाले, "ब्रह्मदेवा, भगवान महाविष्णूशिवाय आम्ही सर्व श्रांत झालों आहों. आम्ही किती तरी काळपर्यंत हा उदधि एकसारखा घुसळीत आहों; तरी ह्यापासून अमृताची उत्पत्ति होत नाहीं; तेव्हां आतां काय करावें ?" ऋषीश्वरहो, देवदानवांचें तें दीन भाषण श्रवण करून ब्रह्मदेवानें महाविष्णूस प्रार्थिलें:—हे भगवन्, तूं ह्या देवदानवांच्या ठायीं सामर्थ्य उत्पन्न कर. ह्या प्रसंगीं तूंच सर्वांचा महाश्रय आहेस. त्यावर भगवान महाविष्णु म्हणाले:—हे ब्रह्मदेवा, ज्यांनीं हें मंथनकर्म आरंभिलें आहे, त्यांस मी सामर्थ्य उत्पन्न करितों. ह्या देवदैत्यांनीं मंदर गिरि जोरानें फिरवून समुद्राचा क्षोभ करावा.

अमृतोत्पत्ति.

सौति म्हणाला:—शौनकादिक मुनींनो, भगवान विष्णूचें भाषण श्रवण करून त्या महाबलवान देवदानवांनीं मंथनदंड जोरानें फिरवून महोदधीचें उदक अत्यंत क्षुब्ध केलें, आणि मग त्यांतून प्रसन्नात्मा शीतांशु शतसहस्ररश्मि सोम बाहेर निघून त्याच्या प्रकाशानें सर्वत्र उज्ज्वलता प्राप्त झाली. पुढें त्या उदकापासून, जिनें श्वेत वस्त्र परिधान केलें आहे अशी लक्ष्मी प्रकट झाली. नंतर सुरादेवी व श्वेत हय हीं बाहेर पडलीं. मग त्या उदकांतून कौस्तुभ नामक दिव्य रत्न उदय पावलें. ऋषीहो, ह्या [illegible] अनुपम मण्यानेंच भगवान नारायणाचें वक्षस्थल शोभत आहे. लक्ष्मी, सुरा, सोम व मनोजव अश्व हीं आदित्यमार्गाचा आश्रय करून जिकडे देव होते तिकडे निघून गेलीं. मुनिवर्यहो, नंतर शुभ्र असा अमृतकलश हातांत घेऊन मूर्तिमान धन्वंतरी त्या लवणांबुधींतून प्रकट झाला. त्या वेळीं तो चमत्कार पाहून 'ही वस्तु आमची, ही वस्तु आमची' असा एकच कल्होळ दैत्यांनीं केला, आणि ते तो कलश बळकावून बसले. ऋषीहो, पुढें त्या उदकांतून ऐरावत गज उत्पन्न झाला. त्याचा देह मोठा विशाल असून त्यास चार शुभ्र दंत होते. ऋषीहो, त्या महागजाला इंद्रानें धरिलें. नंतर तें उदक आणखी घुसळलें, तों त्यांतून कालकूट विष आविर्भूत झालें. त्यानें तात्काळ ब्रह्मांडास व्यापिलें, आणि सधूम अग्नीप्रमाणें त्याचा दाह सुरू झाला. ऋषीहो, त्या उग्र हालाहलाच्या केवळ गंधामुळेंच सर्व त्रैलोक्य मूर्छित झालें, आणि अखेरीस विश्वरक्षक ब्रह्मदेवाच्या आज्ञेवरून शंकरानें तें प्राशिलें! भगवान मंत्रमूर्ति महेश्वरानें तें विष कंठाच्या ठिकाणीं धारण केलें, त्यामुळें त्याचा कंठ निळा होऊन तेव्हांपासून त्यास नीलकंठ अशी संज्ञा प्राप्त झाली आहे. ऋषीहो, सर्व ब्रह्मांडास मूर्छित करून टाकणारें तें भयंकर विष भगवान शंकर जेव्हां खुशाल प्राशन करून बसला, तेव्हां तो चमत्कार पाहून दैत्य हे निराश झाले, आणि त्यांनीं अमृताकरितां व लक्ष्मीकरितां देवांशीं मोठी स्पर्धा आरंभिली, व त्या योगें पुढें घोर अनर्थ घडून आले. ऋषीहो, नंतर भगवान विष्णूंनीं मायेचा आश्रय करून अद्भुत स्त्रीरूप धारण केलें, आणि ते दैत्यदानवांकडे गेले. भगवंतांचें तें मोहिनीरूप अवलोकितांच त्या मूर्खांच्या मनांत त्या मोहिनीविषयीं आसक्ति उत्पन्न झाली, आणि तिच्या प्राप्त्यर्थ त्यांनीं तो अमृतकुंभ तिच्या स्वाधीन केला!

अध्याय एकोणिसावा.

—:०:—

अमृतमंथनसमाप्ति.

सौति म्हणाला:—ऋषीहो, ह्याप्रमाणें आपल्या हातचें अमृत गेलें असें पाहून दैत्य व दानव ह्यांस मोठा विषाद वाटला, आणि ते मोठमोठीं चिलखतें चढवून व नानाविध शस्त्रास्त्रें घेऊन एकदम देवांवर धावून गेले. इकडे नरासहवर्तमान नारायणानें मोहिनीरूप घेऊन दैत्यांपासून अमृतकलश काढून नेला, तो पुनः दैत्यांच्या हातीं लागूं दिला नाहीं. भगवंतांनीं मोठ्या वेगानें दूर जाऊन तेथें तो कलश ठेविला. इतक्यांत तेथें देव व दैत्य ह्यांची एकच गर्दी झाली; तरी तितक्या गर्दीतही देवांनीं भगवान नारायणापासून अमृत मागून घेऊन तें प्राशन केलें!

राहूचा कंठच्छेद.

ऋषीहो, ह्याप्रमाणें देव अमृत पीत असतां राहु नामक दानव देवाचें रूप घेऊन त्यांमध्यें मिसळला, आणि भगवंतापासून अमृत मागून घेऊन तो पिऊं लागला. पण त्या दानवाच्या कंठाखालीं तें अमृत उतरणार, तों सूर्य व चंद्र ह्यांनीं देवांचें हित करण्याच्या बुद्धीनें राहूचें तें कपट उघडकीस आणिलें. नंतर भगवंतानें लागलेंच मोठ्या वेगानें सुदर्शन चक्र फेकून राहूचें तें अलंकृत मस्तक तोडून टाकिलें; आणि पर्वतशिखराप्रमाणें महाविशाल असें तें मस्तक तात्काळ आकाशांत उडून जाऊन भयंकर ध्वनि उत्पन्न झाला, व मस्तकरहित धड तडफड करीत भूपृष्ठावर आपटून पर्वत, अरण्यें व द्वीपें ह्यांसहवर्तमान ही सर्व पृथ्वी दणाणून गेली! ऋषीहो, त्या वेळेपासून राहूचें मुख सूर्यचंद्रांशीं नित्य वैर करीत आहे, आणि तें आजमित्तीसही त्यांस ग्राशीत असतें! असो.

देवदैत्यांचा संग्राम.

ऋषीहो, देवांकडून अमृताचें पान करविल्यावर भगवंतांनीं त्या अपूर्व मोहिनीरूपाचा त्याग केला, आणि नानाविध भयंकर शस्त्रास्त्रांनीं असुरांस भयभीत केलें. नंतर क्षारसमुद्रतीरीं सुर व असुर ह्यांचा महाभयानक संग्राम सुरू झाला; आणि सहस्रावधि मोठमोठाले तीक्ष्ण प्रास, प्रखर टोंकाचे तोमर व नानाविध आयुधें ह्यांचे एकसारखे प्रहार होऊं लागले. अखेरीस सुदर्शन चक्र, खड्ग, शक्ति व गदा ह्यांच्या प्रहारांनीं छिन्नविच्छिन्न व घायाळ झालेले असुर धरापृष्ठीं धडाधड पतन पावून रक्त ओकूं लागले; तसेच, पट्टिशादि दारुण आयुधांनीं तोडून टाकलेल्या सुवर्णमालाभूषित मस्तकांची एकच वृष्टि सुरू झाली; आणि रक्तानें नाहून मोठमोठाले असुर पृथ्वीवर मरून पडले, तेव्हां जणू काय खनिज धातूंच्या आरक्त रंगांनीं माखविलेलीं पर्वतांचीं मोठमोठालीं शिखरें समरभूमीवर शयन करीत आहेत, असा भास झाला! ऋषीहो, इतक्यांत भगवान आदित्यही लाल दिसूं लागला; उभयपक्षांतील सहस्रावधि वीर एकमेकांवर लोहदंड हाणूं लागले; कित्येकांनीं मुष्टिप्रहार आरंभिले; कित्येक शस्त्रास्त्रांनीं परस्परांस मारून पाडूं लागले; आणि सर्वत्र हाहाकार होऊन तो घोर शब्द जणू काय स्वर्गमंडलापर्यंत जाऊन पोंहोचला! आणि तेथें तोडा, फोडा, धावा, पाडा, मारा, हेच घोर शब्द चोहोंकडून ऐकूं येऊं लागले!

शौनकादिक ऋषीहो, ह्याप्रमाणें घनघोर युद्ध चालू असतां भगवान नरनारायण देव युद्धभूमीवर प्राप्त झाले. त्या समयीं भगवान नराच्या हातांत दिव्य धनुष्य अवलोकन करून भगवान नारायणांनीं दैत्यसंहारक अशा आपल्या सुदर्शन चक्राचें स्मरण केलें. त्यांनीं सुदर्शन चक्राचें स्मरण करितांच, तें महादेदीप्यमान, शत्रुसंतापक, घोरदर्शन, अकुंठगति व अग्नितुल्य असें चक्र आकाशांतून खालीं उतरलें.

नंतर, प्रज्वलित अग्नीसारखें जळणार,

शत्रूंच्या नगरांचें विदारण करणारें, महासामर्थ्यवान व अत्यंत भयंकर असें तें चक्र घेऊन भगवान नारायणांनीं मोठ्या वेगानें व आवेशानें शत्रूंवर टाकिलें. . ऋषीहो, भगवान पुरुषोत्तमानें, समरंगणींत प्रलयकालच्या अग्नीप्रमाणें निःपात उडविणारें तें दिव्य अस्त्र जेव्हां शत्रूंवर फेंकिलें, तेव्हां त्यानें हजारों दानवांचा मोठ्या आवेशानें पुनः पुनः संहार चालविला. तें चक्र केव्हां केव्हां अग्नीप्रमाणें दैत्यांस जाळी, केव्हां केव्हां तें त्यांचे तुकडे तुकडे करी, आणि केव्हां केव्हां तें अंतरिक्षांतून खालीं झडप टाकी व पिशाचाप्रमाणें रणभूमीवरील रक्त पिई. ऋषीहो, इतकें झालें तरी त्या दैत्यांची उमेद कायम होती. ते सहस्रावधि बलिष्ठ दैत्य आकाशांत जाऊन तेथून पुनः पुनः देवांवर पर्वत टाकूं लागले. नानाविध रूपें धारण करणाऱ्या मेघमंडलाप्रमाणें दिसणारे ते महान महान धातुमान पर्वत पृथ्वीवर मोठ्या वेगानें पडूं लागले, तेव्हां ते एकमेकांवर आपटून भयंकर शब्द होऊं लागला, त्यांजवरील वृक्ष कडकडूं लागले, त्यांचीं शिखरें कोसळूं लागलीं, व सर्वत्र महाभय उद्भवलें ! ऋषीहो, पृथ्वीवर ही अशी भयंकर पर्वतवृष्टि चोहोंकडून सुरू झाली, तेव्हां अरण्यांसहित सर्व पृथ्वी कंपायमान होऊन डळमळूं लागली, आणि देव व दैत्य ह्यांनीं मोठमोठ्या गर्जना करून निकराचें युद्ध आरंभिलें. इतक्यांत भगवान नरानें कनकाभरणमंडित बाणांनीं अंतराल व्यापून टाकिलें, व गिरिशिखररूप दैत्यशस्त्रांचा संपूर्ण उच्छेद केला. नंतर देवांनीं जर्जर केलेले ते दैत्य भूमीच्या उदरांत व समुद्राच्या तळीं शिरले, आणि क्रोधाविष्ट होऊन आकाशांत संचार करणाऱ्या सुदर्शनाच्या भीतीनें बाहेर पडले नाहींत.

ऋषीहो, ह्याप्रमाणें देव व दैत्य ह्यांचें घनघोर युद्ध होऊन अंतीं देवांस विजयश्रीनें माळ घातली. पुढें त्यांनीं मंदराचलाची उत्तम प्रकारें पूजा करून त्यास स्वस्थानीं प्रतिष्ठित केलें, आणि अंतरिक्ष व स्वर्ग हीं जयशब्दानें दुमदुमून टाकून अंतरांतील मेघमालेप्रमाणें ते आपल्या स्वस्थानीं अमृत घेऊन निघून गेले, आणि मग इंद्रप्रमुख देवांनीं अमृताचें उत्तम प्रकारें संरक्षण करण्याकरितां तो अमृतकुंभ मोठ्या आनंदानें भगवान नराच्या स्वाधीन केला.

अध्याय विसावा.

सौपर्णाख्यानें.

सौति म्हणाला:—शौनकादिक ऋषीहो, सुरासुरांनी समुद्रमंथन करून ज्याप्रमाणें अमृत मिळविलें, तें अमृत देवांना कसें मिळालें, ह्याविषयीं सविस्तर कथा ही अशी आहे. तो देदीप्यमान अतुलपराक्रमी उच्चैःश्रवा अश्वही त्या मंथन केलेल्या महोदधींतूनच प्रकट झाला, हें मीं तुम्हांस पूर्वी सांगितलें आहेच. ऋषीहो, त्या हयश्रेष्ठाचा वृत्तांत जेव्हां कद्रूनें ऐकिला, तेव्हां ती विनतेला म्हणाली, ' हे भद्रे, उच्चैःश्रव्याचा वर्ण कोणता आहे, तें लवकर सांग पाहूं ! ' तेव्हां विनतेनें उत्तर दिलें, ' गडे कद्रू, त्या अश्वराजाचा वर्ण पांढराच आहे; तुला जर त्याचा वर्ण दुसराच कांहीं आहे असें वाटत असेल, तर तसेंच सांग म्हणजे आपण पैज मारूं. ' त्यावर कद्रू म्हणाली, ' हे सुंदरी, त्या हयवराचा रंग पांढरा आहे खरा; पण पुच्छ कांहीं पांढरें नाहीं: तें कृष्णवर्णच आहे. ये, मजबरोबर पैज कर; जर तो तेजोनिधि खरोखरी कृष्णपुच्छ असेल, तर त्वां माझें दास्य करावें; आणि जर तो सर्व श्वेतवर्ण असेल, तर मी तुझें दास्य करीन. '

सौति म्हणाला:—ऋषीहो, ह्याप्रमाणें, जी हरेल तिनें दुसरीचें दास्य करावें, असा त्या दोघी सवतींनीं पण लाविला; आणि ' आतां आपण उद्यां तो अश्व समक्ष पाहूं ' असें ठरवून त्या

आपआपल्या गृहीं चालत्या झाल्या. शौनकादिक मुनिश्रेष्ठहो, स्वगृहास गेल्यावर कद्रू ही स्वस्थ बसली नाहीं. कपट करून पण जिंकावा व विनतेस दासी करून सोडावें, असें तिनें मनांत योजिलें; आणि आपल्या सहस्र पुत्रांस (सर्पांस) हांक मारून त्यांस तिनें आज्ञा केली कीं, ' तुम्ही सत्वर काजळासारखें काळें कुळकुळीत रोमरूप घ्या, व त्या उच्चैःश्रव्याच्या पुच्छास घट्ट चिकटून बसा; म्हणजे त्या पुच्छाचा रंग काळाच आहे असें दिसेल, आणि मग माझें म्हणणें सत्य भासून मला माझ्या सवतीचें दास्य करण्याची पाळी येणार नाहीं ! '

सर्पांना मातृशाप.

ऋषीहो, कद्रूचा हा दुष्ट विचार त्या सर्व सर्पांस रुचला नाहीं; त्यांपैकीं कित्येकांनीं आपल्या मातेच्या आज्ञेचा अनादर केला; आणि त्यामुळें कद्रूस अत्यंत संताप उत्पन्न होऊन तिनें तात्काळ त्या अविनयशील पुत्रांस शाप दिला कीं, ' हे पुत्रांनो, मात्राज्ञेचा तात्काळ अंगीकार करणें हें सुपुत्रांचें कर्तव्य होय; तुम्हीं माझ्या आज्ञेचा भंग केला, हा तुमचा घोर अपराध आहे; ह्यास्तव पांडवकुलोत्पन्न बुद्धिमान जनमेजय भूपतीच्या सर्पसत्रांतील वैश्वानर तुम्हांस भस्म करून टाकील ! '

ऋषिश्रेष्ठहो, दैवयोग मोठा विचित्र असतो; त्यामुळें, जी गोष्ट केवळ असंभवनीय म्हणून दिसते, तीही केव्हां केव्हां सहज घडून येते. पहा—कद्रू ही त्या सर्पांची प्रत्यक्ष माता; आणि असें असतांना तिनें आपल्या पुत्रांना शापदग्ध केलें; तेव्हां हा विचित्र दैवयोगच नव्हे काय ? असो. ऋषीहो, कद्रूचें तें महाभयंकर शापवचन स्वतः ब्रह्मदेवानें ऐकिलें, आणि तात्काळ त्यानें त्यास आपलें अनुमोदन दिलें, व त्याबरोबर अखिल देवगणांनाही परम संतोष वाटला. ऋषीहो, त्या समयीं भगवान ब्रह्मदेवानें असें म्हटलें:—अहो, ह्या बलिष्ठ सर्पांची संख्या किती तरी मोठी ! ह्यांच्या ठिकाणीं उग्र विष म्हणजे एक मोठें दुःसह शस्त्रच आहे; दुसऱ्या प्राण्यांना नित्य पीडा करावी, हाच ह्यांचा स्वभाव होय; ह्यास्तव सर्पांच्या ह्या अनिवार समुदायाचा संकोच करणेंच सर्वथैव इष्ट आहे. तेव्हां ह्या दुष्टांच्या मातेनें ह्यांस शाप देऊन प्राणांतिक दंड केला, हें फार उत्तम घडलें; ह्यांचा नाश झाल्यानें प्रजाजनांचें मोठें हित होईल, ह्यांत संदेह नाहीं.

शौनकादिक ऋषीहो, ह्याप्रमाणें उद्गार काढून ब्रह्मदेवानें मनापासून कद्रूची प्रशंसा केली, आणि तो कश्यप प्रजापतीस हांक मारून म्हणालाः— हे निष्पाप, तुझ्यापासून निर्माण झालेले हे महान महान सर्प अत्यंत विषारी असून दुसऱ्यास दंश करून त्याचा प्राण घेण्यामध्यें अतिशय निष्णात आहेत; तेव्हां कद्रूनें त्यांस शाप दिला ही गोष्ट फार चांगली झाली; म्हणून तूं कद्रूवर क्रुद्ध होऊं नको. यज्ञांत सर्पांचा विध्वंस होणें, हें आतां पहिल्यानेंच घडणार आहे असें नाहीं. तें ह्यापूर्वी अनेक वेळां घडून आलेलें आहे. ऋषीहो, विश्वस्रष्ट्या ब्रह्मदेवानें अशा प्रकारें कश्यपाचें सांत्वन केलें, आणि त्या महात्म्यास त्यानें विषहरी विद्या समर्पण केली.

अध्याय एकविसावा.

—:०:—

सौपर्णाख्यान.

सौति म्हणालाः—शौनकादिक ऋषीहो, पुढें रात्र संपून प्रभातसमय प्राप्त झाला, व भगवान आदित्याचीं किरणें उदयाचलावर दृग्गोचर होऊं लागलीं, असें पाहून त्या दोघी बहिणींची (कद्रू व विनता ह्यांची) एकच लगबग उडाली. उच्चैःश्रव्यास समक्ष जाऊन पहावयाचें व दुसरीस आपल्या दास्यांत ओढावयाचें, ह्या ईर्षेनें प्रत्येकजण तळमळूं लागली, आणि अखेरीस त्या दोघी

बहिणी त्या अश्वश्रेष्ठाला समक्ष पाहण्याकरितां घरांतून बाहेर पडल्या. ऋषीहो, मार्गांत त्यांस

एक महान समुद्र

लागला. तो अपरंपार विस्तीर्ण असून फार अगाध होता. सोसाटयाच्या वाऱ्यांनीं व जलचरांच्या भ्रमणांनीं तो एकसारखा उसळत असून त्याचा भयंकर गंभीर शब्द आसमंताद्भागीं कित्येक योजनेंपर्यंत दणाणत होता. तिमिंगिलादिक मत्स्य व मकरादिक घोर जलचरें त्यांत सर्वत्र इतस्ततः व्याप्त होतीं. ह्याशिवाय दुसरे सहस्रावधि चित्रविचित्र भयंकर प्राणीही त्यांत एकसारखे संचार करीत होते. कासवें व सुसरी तर त्यांत किती होत्या, हें सांगतांच येत नाहीं. सारांश, त्या महान जलनिधींत सर्वत्र भयानक प्राण्यांचें वास्तव्य असल्यामुळें त्यांत प्रवेश करण्याची कोणाचीही छाती नव्हती!

शौनकादिक मुनिवर्यहो, त्या महासागराचें बाह्यरूप अत्यंत उग्र होतें खरें; परंतु त्याचें अंतःस्वरूप व अन्य परिस्थिति मोठी रमणीय व चित्ताकर्षक होती. अहो, त्यास जलाचा निधि म्हणण्यापेक्षां सर्व रत्नांचा निधि असेंच म्हणणें प्रशस्त; भगवान वरुणाचें तर तो निवासस्थानच होता; नागांचें तर तें सुंदर मंदिर होतें; सरिद्रूप प्रमदांनीं तर त्यास सर्व बाजूंनीं गाढ आलिंगन दिलें होतें; आणि वडवाग्नीचें तर तें शाश्वत अधिष्ठानच होय.

ऋषिश्रेष्ठहो, त्या महासागराचें वर्णन काय करावें? त्याच्या त्या विशाल व खोल उदरांत असुरांना लपून बसण्यास जागा मिळे. त्याच्या ठिकाणीं लोकोत्तर पवित्रता वास करीत होती. देवांना त्याच दिव्य जलनिधीच्या मंथनापासून अमृताची प्राप्ति झाली. त्याच्या विस्ताराची इयत्ता ठरविणें किंवा अटकळ बांधणेंही दुर्घट आहे. ब्रह्मांडांतील सर्व पुण्यजलांचा तो मुख्य आधार होय. मोठमोठ्या गंभीर भोंवऱ्यामुळें त्याचा पृष्ठभाग चक्राकार गरगर फिरत होता; व त्यामुळें, सर्व प्राण्यांना, आपण एकदम गडप होऊं कीं काय अशी भीति वाटे. त्यास नित्य भरतीओहोटी येत असे, व त्या योगें पृष्ठभागावरील वातस्तंभाचा क्षोभ होऊन त्यावर पर्वतप्राय लाटा उसळत, आणि त्या पाहिल्या म्हणजे जणू काय समुद्र हा लहरीरूप हातांनीं सर्व दिशांच्या अग्रभागीं अभिनव करीत नाचतच आहे, असा भास होई! ऋषीहो, त्या महासागरामध्यें नित्य विषमता वास करीत होती: भगवान कलानिधीचा क्षय झाला म्हणजे, त्या महासागराचाही क्षय होई; व त्या कलानिधीची वृद्धि झाली म्हणजे त्या महासागराचीही वृद्धि होई! ऋषीहो, त्या पांचजन्याचें जन्म झालें, तें त्या लोकोत्तररत्नाकरापासूनच; पृथ्वीचा उद्धार करण्याकरितां इंद्रियाधिपति, अमोघ वीर्यवान व वराहरूपधारी भगवंतानें अंतर्भागीं क्षोभ केला, तो त्या अगाध अंबुधीच्याच जलाचाच; भगवान अत्रि ऋषींनीं शंभर वर्षेंपर्यंत उग्र तपश्चर्या करून ठाव काढण्याचा प्रयत्न केला असतांही ज्याचा ठाव लागला नाहीं, तोच हा जलनिधि; ज्याच्या तळाशीं पाताळ आहे, तोच हा अविनाशी उदधि; व भगवान अमितवीर्य महाविष्णूच्या मनांत केवळ सच्चिन्मयःरूपांत लीन होऊन योगनिद्रा घेण्याचा विचार उत्पन्न झाला म्हणजे ते कल्पकालास प्रारंभ होई पर्यंत जेथें स्वस्थपणें शयन करितात, तेंच तें दिव्य अधिष्ठान!

ऋषीहो, वज्रपातामुळें भिऊन गेलेल्या मैनाक पर्वताला त्या महोदधीनेंच अभय दिलें; तुमुल युद्ध होऊन चोहोंकडे हाहाकार झाला असतां असुरांना ह्याच्याच उदरीं निर्भयपद मिळालें; व वडवाग्नीला तोयरूप हव्य ह्याच पुण्यनिधीपासून मिळतें. सारांश, त्या कद्रू व विनता ह्या दोघी बहिणी, आकाशासारखा विस्तीर्ण, अगाध, गंभीर, मकरादिकांनीं व्याप्त, मेघाप्रमाणें गर्जना करणारा

व सर्वतोपरी भयंकर अशा ह्या महासागराच्या तीराप्रत प्राप्त झाल्या.

अध्याय बाविसावा.

:०:-

समुद्रदर्शन.

सौति म्हणाला:—शौनकादिक ऋषीहो, कद्रूच्या कांहीं पुत्रांनीं मातेच्या आज्ञेचा अवमान केला, आणि त्यामुळें त्यांस तिनें 'तुम्ही जनमेजयाच्या सर्पसत्रांत दग्ध व्हाल' असा शाप दिला; तेव्हां पुढें त्या सर्पांनीं आपसांत विचार केला कीं, 'मातेची इच्छा सिद्धीस न्यावी हेंच आपलें कर्तव्य होय. आपण जर तिचे मनोरथ परिपूर्ण केले नाहींत, तर ती निष्ठुरपणानें आपला अंत करील. परंतु जर आपण तिच्या इच्छेप्रमाणें वर्तन केलें, तर ती कदाचित् आपणांवर प्रसन्न होईल, आणि मग आपल्यास दिलेल्या शापांतून ती आपणांस मुक्त करील. ह्यास्तव आपण आपल्या मातेच्या इच्छेप्रमाणें त्या उच्चैःश्रव्याचें पुच्छ खरोखरीच कृष्णवर्ण करूं चला.' ऋषीहो, ह्याप्रमाणें निश्चय करून ते सर्व सर्प तेथून निघाले, व अतिशय सूक्ष्म रूप घेऊन बारीक कृष्णवर्ण रोमांप्रमाणें त्या दिव्य अश्वाच्या पुच्छास घट्ट चिकटून बसले. असो. इकडे पैज मारून बसलेल्या त्या दोघी सवती सूर्योदयाची वाट पाहत असतां, तिकडे सूर्योदयाच्या पूर्वींच त्या उच्चैःश्रव्याचें पुच्छ कृष्णवर्ण होऊन गेलें!

ऋषीहो, कद्रू व विनता, मार्गांत महोदधीतीरावर प्राप्त झाल्या म्हणून मीं तुम्हांस सांगितलेंच आहे. तेथें आल्यावर त्यांनीं अंतरिक्षांतून ह्या भयानक सागरावर दृष्टि फेंकिली. मीं पूर्वीं वर्णिल्याप्रमाणें[१] त्यांस त्या महासागराचें भयप्रद रूप दृष्टिगोचर झालें. पुढें सत्वर दोघींनीं अंतरिक्षमार्गानें त्या अफाट जलधीचें उल्लंघन केलें, व त्या परतीरास जाऊन पोहोंचल्या.

१ महासागराचें वर्णन मागील अध्यायांत जसें आहे, तसेंच येथें आलें आहे, त्यासाठीं त्याची द्विरावृत्ति केली नाहीं.

अध्याय तेविसावा.

-:०:-

उच्चैःश्रव्याचें दर्शन.

सौति म्हणाला:—शौनकादिक ऋषीहो, कद्रू व विनता ह्या नभोमार्गानें लवणांबुधीच्या परतीरीं गेल्यावर तात्काळ उच्चैःश्रव्याच्या सन्निध उतरल्या, आणि त्यांनीं तो महावेगवान दिव्य अश्व स्वतः अवलोकिला, तों त्याचें सर्व शरीर अमृतरश्मीच्या किरणांप्रमाणें धवल असून त्याचें पुच्छ मात्र कृष्णवर्ण आहे, असें त्यांच्या दृष्टीस पडलें! उच्चैःश्रव्याच्या पुच्छावर कृष्णवर्णाचे अनेक रोम चिकटलेले पाहून विनतेस फार विषाद वाटला; आणि आपलें म्हणणें खरें झालेलें अवलोकन करून कद्रूनें तत्क्षणीं विनतेस आपलें दास्य करावयास लाविलें, व विनतेनें मोठ्या कष्टानें कद्रूच्या दास्याचा स्वीकार केला!

ऋषीहो, ह्याप्रमाणें विनता कद्रूच्या गृहीं दास्य करीत असतां, इकडे यथाकालीं विनतेच्या गृहीं महातेजस्वी गरुड हा आपलें अंडें विदारण करून बाहेर पडला; अर्थात् त्या समयीं त्याची माता विनता ही त्यासमीप नव्हतीच. असो. ऋषीहो, त्या गरुडाचें दिव्य सामर्थ्य काय वर्णावें! जन्मास येतांच त्या महाविभूतीच्या अलौकिक कांतीनें दशदिशा उज्ज्वलित झाल्या; धैर्याचा तर तो केवळ निधिच होता; व त्याचें बळ तर अगदीं निस्सीम होतें; तो पक्षी पाहिजे तें रूप धारण करी, व आपल्या इच्छेनुरूप वाटेल तिकडे जाई; त्याच्याकडे अवलोकन केलें असतां, तो केवळ प्रज्वलित अग्नीचा महाभयंकर राशिच भासे, आणि त्याचे नेत्र विद्युल्लतेप्रमाणें अति-

शय पिंगट असून अंगकांति प्रलयकाळच्या अग्नीप्रमाणें अत्यंत तप्त व दुःसह अशी होती.

ऋषीहो, तो अपूर्व विहंगम अंड्यांतून बाहेर येतांच भराभर वाढला, व विशाल देह धारण करून अंतरिक्षांत चालता झाला; त्याच्या रौद्र स्वरानें दशदिशा हादरून गेल्या; आणि तो प्रत्यक्ष वडवानळ सर्व ब्रह्मांड जाळून टाकणार, असें सर्वांस भासलें ! ऋषीहो, त्या प्रसंगीं, 'हा साक्षात् अग्निनारायणच ब्रह्मांड व्यापीत वाढत चालला आहे,' असें देवांस वाटलें, आणि ते सर्व तात्काळ विभावसूस शरण गेले व त्यास प्रणिपात करून हात जोडून प्रार्थू लागले: ते म्हणाले:—हे अग्ने, तूं आतां वाढूं नको; अरे, तूं आम्हांस जाळणार कीं काय! पहा, तुझा हा प्रज्वलित शिखाकलाप आम्हांकडे मोठ्या वेगानें धाव घेत आहे!

ऋषीहो, देवांचें तें भाषण श्रवण करून अग्नि म्हणाला:—अहो असुरघ्न देवाधिदेवांनो, तुम्ही भिऊं नका. तुम्ही समजत आहां तसा वास्तविक प्रकार नाहीं. हा वर्धमान व नभोविहारी तेजोनिधि भगवान गरुड होय. ह्याच्या अंगीं माझ्याप्रमाणें दिव्य तेज व अमोघ शक्ति असल्यामुळें तुम्हांस माझा भास होत आहे. अहो, हा पक्षिराज गरुड कश्यपभार्या विनता हिचा पुत्र होय. ह्याची लोकोत्तर कांति अवलोकन करून तुम्हांस भ्रांति उत्पन्न झाली, आणि त्यामुळें तुम्ही असे गांगरून गेलां. पण असें गांगरण्याचें कांहींएक प्रयोजन नाहीं. अहो, हा पक्षिराज सर्पांचा विध्वंस करील, व जनतेस (प्रजांस) अत्यंत सुख देईल; देवांचें हित करण्याविषयीं हा कश्यपपुत्र सदोदीत उद्युक्त राहील; आणि दैत्य व राक्षस ह्यांचा तर ही भयंकर संहार उडवील. अमरांनो, इकडे या; आतां भीति सोडा; व माझ्यासमवेत त्या लोकोत्तर पुरुषाची मूर्ति अवलोकन करा.

सौति म्हणाला:—शौनकादि ऋषीहो, नंतर सर्व देव व ऋषिगण हे अग्निसहवर्तमान त्या भगवान गरुडाच्या समीपभागीं गेले, व त्यांनीं दुरूनच त्या दिव्य पुरुषाची स्तुति केली.

गरुडाची स्तुति.

देव म्हणाले:—हे महाभागा खगेश्वरा, तूं मूर्तिमान प्रणवमंत्र आहेस. तूंच सर्व यज्ञयागांचा उपभोग घेतोस. तुझ्या दिव्यतेजापासूनच जीवरूप पाक्षिमात्रास चालना मिळते. ब्रह्मांडांतील सकल स्थावरजंगम पदार्थ तुझ्याच ठिकाणीं अधिष्ठित आहेत. अखिल विश्वाचा उपक्रम व उपसंहार हे तुझ्यापासूनच होतात. हिरण्यगर्भरूपानें सर्व सृष्टीचें आदिबीज तूंच होस; दक्षादि प्रजापतिरूपानें निमित्तकारणही तूंच आहेस; व देवांचा अधिपति इंद्र ही तुझीच विभूति होय. हे जगत्पते, तो हयग्रीवावतार तूंच घेतलास; व त्रिपुरासुरयुद्धप्रसंगीं महादेवाच्या बाणांत तूंच प्रवेश केलास. हे देवाधिदेवा, ब्राह्मण, ब्रह्मदेव, विज्ञानवान, अग्नि, वायु, चिदात्मा व माया हीं तुझींच अपररूपें आहेत. हे व्यापका, सृष्टिविधायक जें महत्तत्त्व, तें तूंच; ब्रह्मांडवर्ती जो अहंकार, तो तूंच; आणि जगांत सदासर्वकाळ निर्गुणनिर्विकाररूपानें ओतप्रोत व्याप्त असलेलें जें परब्रह्मतत्त्व, तें तरी तूंच! हे नारायणा, ह्या विश्वामध्यें कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं-शक्ति एक तुझ्याच ठायीं; सूर्यादिकांना प्रभाप्रमुख जे विशिष्ट गुण प्राप्त झाले आहेत, ते तुझ्यामुळेंच; प्राणिमात्राच्या ठिकाणीं असलेली जी ज्ञानकला, ती तुझेंच कार्य; आणि ह्या भवबंधांतून आमचें परित्राण करणारा तरी तूं एकटाच. हे परमेश्वरा, तूं विज्ञानाचा केवळ निधि व सकल ऐश्वर्याचें केवळ निधान आहेस; सत्त्वादिक गुणांपासून तुला केव्हांही उपसर्ग नाहीं; तुझ्याशीं विरोध करून कोणीही विजयी होणार नाहीं; आणि पुण्यशील पुरुषांमध्यें आजवर जे जे गुण उत्पन्न झाले किंवा ह्यापुढें जे जे

गुण उत्पन्न होतील, ते ते सर्व साक्षात् तुझींच रूपें आहेत. हे भगवंता, सच्चिन्मय जें परब्रह्मतत्त्व, तें तूंच होस. अखिल चराचर विश्वांत तूंच भरलेला आहेस. सूर्य ज्याप्रमाणें प्रत्येक किरणशलाकेंत दृग्गोचर होतो, त्याप्रमाणें तूंही ब्रह्मांडवर्ती ह्या अनंत वस्तुरूप किरणशलाकांमध्यें दृग्गोचर होत आहेस. हे परब्रह्ममूर्ते, प्रत्येक कल्पांत सूर्याला प्रकाश देणारा तूंच, व त्याचा उपसंहार करणारा तरी तूंच होस. हे समर्था, हें प्रकृतिपुरुषात्मक सर्व विश्व प्रत्यक्ष तूंच आहेस. हे परमेशा, ज्याप्रमाणें दिवाकर कुपित झाला असतां तो सर्व प्रजांना दग्ध करील, त्याप्रमाणें तूं आम्हांस आतां दग्ध करणार, असें भासतें. हे विश्वाधिपते, तुझें हें विद्यमान स्वरूप प्रलयकालीन अग्नीपेक्षां भयंकर आहे. हे देवाधिदेवा, तूं काळाचाही काल होस ह्यांत संदेह नाहीं. तेव्हां आतां आम्हांस हें तुझें अपूर्व तेज कसें सहन व्हावें बरें! ह्यास्तव, तुझी अद्वितीय शक्ति, अमोघ वीर्य, पूर्ण विज्ञान, विलक्षण ओज, अपूर्व पराक्रम, परम वात्सल्य व परम पावनता हीं अवलोकन करून आम्ही तुला शरण आलों आहों; तर तूं आम्हांवर अनुग्रह कर. हे पक्षिराजा, तुझ्या दुःसह कांतीनें आमची काय स्थिति झाली आहे ती पहा. तप्त सुवर्णाप्रमाणें प्रखर अशा तुझ्या कांतीनें ह्या सर्व विश्वाचा दाह होत आहे; आणि विमानांत बसून अंतरिक्षमार्गी गमन करणारे आम्ही देव भयभीत होऊन इतके भ्रांत झालों आहों कीं, आम्हांस आमचा उद्दिष्ट मार्ग कळत नसून आम्ही भलत्याच मार्गी जात आहों. ह्यासाठीं, हे प्रभो कश्यपपुत्रा, तूं आपल्या त्या उदारधी पित्याप्रमाणें ह्या जगतावर दया कर आणि तूं आपला क्रोध आवरून धरून शांत हो व आम्हांस राख. हे अपूर्व विहंगमा, विद्युत्पात झाला असतां जसा भयंकर ध्वनि होतो, तसा तुझ्या ह्या भरान्यांच्या योगानें भयंकर ध्वनि होतें असून त्यामुळें दशदिशा, अंतराळ, स्वर्ग, पृथ्वी व आमचीं हृदयें हीं हादरून जाऊन एकसारखीं थरथर कांपत आहेत; ह्याकरितां तूं ह्या अग्नितुल्य भयंकर देहाचा संकोच कर. हे ईश्वरा, जर तूं आतां असें लवकर करणार नाहींस, तर आमची दशा मोठी कठिण आहे; ह्यास्तव आम्हां याचकांवर प्रसन्न होऊन तूं आमचें कल्याण करावेंस हीच प्रार्थना आहे.

शौनकादिक ऋषीहो, ऋषिगणांसमवेत देवांची ही अशी स्तुति श्रवण करून त्या भगवान सुपर्णानें (गरुडानें) आपलें तेज संकुचित केलें, व त्या योगें सर्वांस मोठा आनंद झाला !

अध्याय चोविसावा.

:०:-

अरुणाची सूर्यरथीं योजना.

सौति म्हणालाः—शौनकादिक मुनिवर्यहो, ऋषिजनांसहवर्तमान देवांनीं स्तुति केली ती ऐकून भगवान सुपर्णानें आपल्या दिव्य देहाकडे नीट अवलोकन केलें, आणि आपलें दुर्धर तेज प्रजाजनांस खरोखरीच सहन होणार नाहीं, असें मनांत आणून त्यानें आपला देह आटोपून घेतला. तेव्हां सुपर्ण म्हणालाः—देवादिकहो, तुम्ही भिऊं नका; मी आपलें हें लोकोत्तर तेज संकुचित करितों; माझ्या ह्या उग्र तेजानें प्राणिमात्र घाबरून उद्विग्न झाले आहेत ह्यांत संदेह नाहीं.

सौति म्हणालाः—ऋषीहो, इच्छेस येईल तिकडे संचार करणारा, व मनास वाटेल ती गोष्ट घडवून आणणारा तो पक्षिराज गरुड, अरुणास पाठीवर घेऊन कश्यपाश्रमांतून निघाला, आणि अंतरिक्षमार्गानें महोदधीच्या परतीरास आपल्या मातेच्या समीप प्राप्त झाला. तेथें आल्यावर त्यानें त्या महाद्युतिमान अरुणाची पूर्वदिग्भागीं स्थापना केली, आणि सूर्याच्या मनांत आपल्या उग्र तेजानें सर्व ब्रह्मांड दग्ध करावयाचें होतें तो त्याचा विचार सिद्धीस जाऊं दिला नाहीं.

रुरु म्हणाला:—हे प्रमते भगवान सूर्यानें सर्व ब्रह्मांडास दग्ध करण्याचा विचार केला, तो कां बरें ? तो स्वर्गलोकास सुद्धां जाळण्यास सिद्ध झाला; तेव्हां देवांनीं त्याचा असा कोणता अपराध केला होता कीं ज्यामुळें त्यास इतका क्रोध चढला, तें आम्हांस सांग.

प्रमति म्हणाला:—हे रुरो, अमृतप्राशनाच्या समयीं राहु नामक दैत्यानें देवरूप धारण केलें व मोहिनीरूप महाविष्णूपासून अमृत मागून घेऊन तो प्राशन करूं लागला; तेव्हां तें त्याचें कपट सूर्यचंद्रांनीं उघडकीस आणून देवांना ती गोष्ट कळविली, त्यामुळें पुढें भगवंतांनीं त्या राहूचा कंठच्छेद केला वगैरे कथा तूं ऐकिली आहेसच. हे निष्पापा, हें कृत्य घडल्यापासून त्या दुष्ट राहूनें सूर्यचंद्रांशीं हाडवैर आरंभिलें, आणि तो त्यांस एकसारखा पीडा करूं लागला. चंद्र हा सौम्य असल्यामुळें त्यानें ती राहुकृत पीडा सहन केली; परंतु प्रतापनिधि भानूला ती सहन होईना ! तो म्हणाला, 'अरे, मीं राहूचें तें कपट उघडकीस आणिलें हें मीं आपल्या स्वार्थाकरितां केलें काय ? माझ्या त्या कृत्यापासून सर्व देवांचें हित झालें, आणि असें असतां राहूपासून होणारी पीडा मात्र मीं एकट्यानें भोगावी, हा केवढा अन्याय ! अहो, ह्या प्रसंगीं माझी आपत्ति निवारण करण्यास एकही देव मला साहाय्य नाहीं. राहु हा मला प्राशीत आहे आणि हे सर्व देव तें खुशाल पहात आहेत; तेव्हां ह्यांस म्हणावें काय ! ह्यास्तव आतां सर्व लोकांच्या नाशास प्रवृत्त होणें, हेंच श्रेयस्कर होय, ह्यांत संदेह नाहीं.' रुरो, ह्याप्रमाणें विचार करून सूर्य पुढें अस्तास गेला आणि नंतर रात्रीं त्यानें सर्व लोक इतके तप्त केले कीं, सर्व त्रैलोक्य क्षणकरांत दग्ध होईल, असें सर्वांस वाटलें. रुरो, रात्रीच्या समयीं असा भयंकर दाह जेव्हां होऊं लागला, तेव्हां मोठमोठे ऋषि भूतदयेनें प्रेरित होत्साते देवांकडे गेले व त्यांस म्हणाले:—अहो देवांनो, आज मध्यरात्रीं भयंकर दाह होऊन सर्व त्रिभुवनाचा अंत होणार, ह्यांत संदेह नाहीं; ह्यास्तव ह्या अरिष्टाचा प्रतिकार करण्याकरितां कांहीं तरी उपाय योजा. तेव्हां लागलेच ते ऋषि व देव तेथून ब्रह्मदेवाकडे गेले व त्यास म्हणाले:—हे भगवंता, हें काय अरिष्ट उत्पन्न झालें आहे बरें ? पहा, सूर्य तर अस्तंगत आहे; आणि दाहास तर कांहीं मर्यादा नाहीं; तेव्हां निःसंशय हा क्षय होण्याचाच समय आहे; अशा ह्या रात्रीच्या वेळीं जर ही अवस्था, तर दिवसास सूर्योदय झाल्यावर काय अनर्थ ओढवेल, हें काय सांगावें ?

ब्रह्मदेव म्हणाला:—ऋषिप्रमुख देवांनो, त्रैलोक्याचा नाश करण्यास उद्युक्त झालेल्या सूर्याचें हें सर्व कृत्य आहे. तो उदित झाल्यावर त्रिभुवनाची रक्षा करणार ह्यांत मुळींच संशय नाहीं; परंतु ह्या अरिष्टावर मीं पूर्वींच उपाय योजून ठेविला आहे. तो कोणता तो ऐका: अहो, कश्यप प्रजापतीचा महाबुद्धिमान पुत्र अरुण म्हणून आहे. त्याचा देह मोठा विशाल असून त्याच्या अंगीं तेजही मोठें दुर्धर आहे, तो महाविख्यात अरुण सूर्याच्या अग्रभागीं उभा राहून त्याचें सारथ्य करील, आणि तो आपल्या स्वतांच्या तेजानें सूर्याच्या तेजाची उग्रता हरण करून सर्व लोकांचें, ऋषींचें व देवांचें कल्याण करील.

प्रमति म्हणाला:—रुरो, नंतर भगवान ब्रह्मदेवानें अरुणास सूर्याच्या अग्रभागीं उभें राहून त्याचें सारथ्य करण्यास आज्ञा दिली, व अरुणानें तात्काळ तसें केलें. पुढें सूर्य उगवला तो त्या अरुणासहितच उगवला आणि त्या भयंकर अनर्थाचें निवारण झालें. रुरो, सूर्याला क्रोध येण्याचें व अरुणानें त्याचें सारथ्य करण्याचें कारण हें असें आहे. असो. आतां पूर्वकथेचा भाग पुढें चालेल, तो तूं ऐक.

अध्याय पंचविसावा.

—:०:—

सर्पवहन.

सौति म्हणाला:—शौनकादिक ऋषीहो, तो स्वच्छंदगामी, विजयशाली व महाबलिष्ठ पक्षिराज सुपर्ण, महोदधीच्या परतीरीं आपली माता विनता ही पणामध्यें पराभूत होऊन ज्या स्थळीं दास्यत्वांत पडली होती, त्या स्थळीं प्राप्त झाला; आणि त्यानें तिजकडे अवलोकन केलें, तों ती अत्यंत खिन्न व दुःखाकुल आहे, असें त्यास दृष्टीस पडलें. पुढें तो भगवान गरुड तेथेंच आपल्या मातेच्या सन्निध राहिला असतां कोणे एके समयीं कद्रूनें तिला हाक मारिली; तेव्हां ती लागलीच हात जोडून कद्रूच्या पुढें उभी राहिली, व 'काय आज्ञा असेल, ती सांगावी,' असें तिनें कद्रूस विनविलें. ऋषीहो, तेव्हां कद्रूनें म्हटलें, 'हे सुंदरी, समुद्राच्या कुक्षीमध्यें अगदीं एकांतस्थानीं नागांचें सुंदर व मनोहर भुवन आहे, तेथें तूं मला घेऊन चल.'

नंतर विनतेनें कद्रूस आपल्या स्कंधावर धारण केलें; आणि तिनें कद्रूच्या पुत्रांस (सर्पांस) उचलून घेण्याविषयीं गरुडास सांगितलें, त्याप्रमाणें त्यानेंही त्या कद्रूच्या पुत्रांस आपल्या पाठीवर वाहून तो चालूं लागला. ऋषीहो, पुढें तो विनतापुत्र विहंगम गरुड सूर्याच्या समोर प्राप्त झाला असतां त्या दिनराजाच्या तीव्र किरणांनीं संतप्त होऊन सर्पांस एकदम मूर्छा आली! त्या प्रसंगीं आपल्या पुत्रांची ती दीन अवस्था अवलोकन करून तात्काळ कद्रूनें इंद्राची स्तुति करण्यास आरंभ केला.

कद्रूकृत इंद्रस्तुति.

कद्रू म्हणाली:—हे देवाधिदेवा, मी तुला नमस्कार करितें. हे बलसूदना, नमुचिघ्ना, सहस्राक्षा, शचीरमणा, माझ्यावर करुणा कर, आणि सूर्याच्या तापानें मूर्छित झालेल्या माझ्या ह्या पुत्रांना राख. हे अमरोत्तमा, ह्या प्रसंगीं तूंच आमचें अभयस्थान आहेस. देवाधिदेवा, तुझें सामर्थ्य काय वर्णावें ? विपुल जलाची वृष्टि करणारे मेघ तूंच होस. वायुरूपानें त्या मेघांची दाणादाण करणाराही तूंच आहेस. अग्नि हें तुझेंच अपर स्वरूप होय. अंतरिक्षगामी विद्युल्लता ही सुद्धां तुझ्याव्यतिरिक्त नाहीं, आणि वज्राला महाघोर शक्ति व मेघांना महास्वर तुझ्याच सामर्थ्यामुळें प्राप्त झाला आहे. हे अपराजिता, त्रैलोक्याची घडामोड तूंच करितोस. प्राणिमात्राची ज्ञानज्योति तूंच आहेस. सूर्याचा प्रकाश व अग्नीची दीप्ति हीं तुझ्याव्यतिरिक्त नाहींत. जगाचा मुख्य अधिपति तूंच आहेस. तुझ्या कर्तुमकर्तुशक्तीचा विचार केला म्हणजे केवळ विस्मयच वाटतो. विश्वाचा अंतःसाक्षी परमात्मा तूंच होस. ब्रह्मांडांतील सर्व पदार्थांचें अधिष्ठान तूंच आहेस. अमृत हें तुझेंच रूप होय. सर्वांस सुपूज्य असलेला नक्षत्राधिप चंद्र हा तुझीच कला आहे; आणि कला, काष्ठा, त्रुटि, लव, क्षण, मुहूर्त, रात्रि, दिवस, तिथि, शुक्लपक्ष, कृष्णपक्ष, मास, ऋतु व संवत्सर हीं सर्व तूंच होस. हे परमेश्वरा, पर्वत व अरण्यें ह्यांसहवर्तमान लोकांस आश्रय देणारी ही वसुंधरा, भास्करासहित रमणीय असें हें अंतरिक्ष, आणि तिमितिमिंगिलादिक व ग्राहमत्स्यादिक जलचरांनीं व्याप्त असलेला हा महोर्मिमान उदधि हेंही तुझेंच अन्य स्वरूप होय. हे भगवंता, तुझा हा अतुल पराक्रम अवलोकन करून महान महान ज्ञानी पुरुष तुझी पूजा करितात, व तूं त्यांच्या त्या पूजेनें संतुष्ट होऊन यज्ञामध्यें त्यांनीं वौषट म्हणून समर्पण केलेल्या सोमरसाचें व हविर्भागाचें ग्रहण करितोस, आणि त्या योगें सर्व विश्वाला अभीष्ट प्राप्त करून देतोस. हे देवाधिदेवा, कर्मफलांच्या लालसेनें ह्या लोकीं विप्र तुझीच सतत उपासना चालवितात. वेदांगांमध्यें वर्णन केलेलें

आहे, तें तुझेंच होय. केवळ तुझ्याच संतोषाकरितां महान महान ब्राह्मण यज्ञयागादिकांत निमग्न होतात, आणि केवळ तुझ्याच प्रीतीसाठीं ते अहर्निश उद्योग करून इतरांस वेदांगांचें अध्यापन करितात.

अध्याय सव्विसावा.

—:०:—

इंद्रानें केलेली जलवृष्टि.

सौति म्हणाला:—अशा प्रकारें कद्रूनें भगवान इंद्राची स्तुति केल्यानंतर, त्या इंद्रानें, नीलमेघांनीं सर्व आकाश भरून टाकून निर्मळ जळाची वृष्टि करण्याविषयीं मेघांस आज्ञा केली तेव्हां एकमेकांची सरशी लागल्याप्रमाणें गर्जना करणारे, व विद्युल्लतेच्या योगानें प्रकाशमान झालेले, अशा त्या मेघांनीं जळाची वृष्टिच वृष्टि करून सोडली. त्या वेळीं अत्यंत विशाळ मेघांनीं सर्व आकाश अगदीं गजबजून गेलें. मुसळधार वृष्टि करणाऱ्या त्या मेघांचा गडगडाट तर केवळ अद्भुत होता. असंख्य जलधारा ह्याच कोणी ताळांच्या गति, गर्जनेचा घनघोर शब्द हाच तंबुऱ्याचा सूर, आणि विद्युल्लता व वायु ह्यांच्या योगानें मेघास येणारा कंप हेच अंगविक्षेप, अशा थाटानें आकाशानें जणू काय नृत्यच मांडलें आहे असा भास होऊं लागला. त्या समयीं एकसारखा धो धो धो धो पर्जन्य पडूं लागल्यामुळें, त्या मेघांच्या योगानें आकाशामध्यें चंद्राचा किंवा सूर्याचा एक किरणही दृष्टीस पडेनासा झाला! अशा प्रकारें इंद्र वृष्टि करूं लागला तेव्हां नागांना अतोनात आनंद झाला; जिकडे तिकडे पाणीच पाणी होऊन गेल्यामुळें सारी पृथ्वी जलमय होऊन गेली; आणि तें निर्मळ व थंडगार उदक पृथ्वीच्या अगदीं तळापर्यंत जाऊन पोहोंचलें. अशा रीतीनें त्या वेळीं अनेक जळप्रवाहांनीं पृथ्वी ही अच्छादित झाली असतां ते भुजंग आपल्या मातेला घेऊन रामणीयक नांवाच्या द्वीपाकडे गेले.

अध्याय सत्ताविसावा.

—:०:—

दास्यत्वनिरसनापाय.

सौति म्हणाला:—अशा रीतीनें पर्जन्याच्या जळधारांनीं ते नाग भिजून गेले, तेव्हां त्यांस अत्यानंद झाला; व ते गरुडावर बसून जात असल्यामुळें लवकरच 'रामणीयक' द्वीपाला जाऊन पोहोंचले. तें द्वीप विश्वकर्म्यानें निर्माण केलेलें असून तेथें मकरांची मोठी वस्ती होती. तेथें गरुडासहवर्तमान नाग आले तेव्हां, पहिल्याच तोंडाला त्यांना लवणासुर ह्या नांवाचा एक भयंकर राक्षस, आणि समुद्रजळानें वेढा दिलेलें, व पक्ष्यांच्या समुदायानें नादयुक्त झालेलें असें एक मनोहर वन त्यांच्या दृष्टीस पडलें. तें चित्रविचित्र फलपुष्पांनीं गजबजून गेलेलें होतें; त्यांत अनेक वृक्षांच्या हारी लागून राहिल्या होत्या; इतकेंच नव्हे, तर सुंदर सुंदर घरें, व विकसित कमळांनीं भरलेलीं सरोवरें हीं ठिकठिकाणीं दृष्टिगोचर होत होतीं. तेथील दिव्य तलाव व त्यांचें स्फटिकासारखें निर्मळ जळ ह्यांच्या योगानें त्या द्वीपाला फारच शोभा आलेली होती; आणि सुगंध वाहून नेणारे पवित्र वायु तेथें वाहत होते. गगनचुंबित चंदनाचे वृक्ष, आणि वाऱ्यानें हालत असल्यामुळें पुष्पवृष्टि करणारे दुसरे वृक्ष ह्यांच्या योगानें तर तें वन अतिशयच खुलत होतें. ज्यांचीं फुलें वायूमुळें गळून पडत आहेत असे दुसरेही कित्येक वृक्ष त्या नागांवर पुष्पजळाची वृष्टि करित होते. ब्रह्मदेवानें केवळ आपल्या मनाच्याच उल्हासानें उत्पन्न केलेलें तें वन गंधर्वांना व अप्सरांना फारच प्रिय झालेलें होतें; व मत्त भ्रमरांचा गुंजारव त्या वनामध्यें घुमत असून तें पहातांच मन केवळ तल्लीन होऊन जात

असे. अत्यंत रमणीय, सुखोत्पादक, निर्मळ, सर्व जनांना अत्यंत मनोहर व नानातऱ्हेच्या पक्ष्यांच्या मंजुळ ध्वनीनें आल्हाद देणारें असें तें वन पाहून कद्रूपुत्रांनाही फार आनंद झाला, व त्या वनांत आल्यानंतर ते सर्प इतस्ततः विहार करूं लागले; आणि त्या महापराक्रमी पक्षिराज गरुडाला म्हणाले, "हे खगा, जेथें स्वच्छ उदक असेल अशा दुसऱ्या एखाद्या रमणीय द्वीपाकडे तूं आम्हांला घेऊन चल. कारण, तूंही रमणीय असे अनेक देश अवलोकन करीत जात असतोस." त्यावर विचार करून तो गरुड पक्षी आपली माता विनता हीस म्हणाला, "आई, ह्या सर्पांच्या तोंडातून जें जें निघेल, तें तें मीं काय म्हणून करीत असावें?" तेव्हां विनता म्हणाली, "हे पक्षिराया! पूर्वी एका पणामध्यें ह्या सर्पांनीं दुष्टपणानें कपट केल्यामुळें मी दुर्दैवानें हरलें, आणि आपल्या सवतीची दासी झालें आहें. म्हणून ते सांगतील तें तुला व मला ऐकलें पाहिजे." ह्याप्रमाणें आईनें सांगितलेलें कारण ऐकून त्या गरुडाला फार वाईट वाटून तो त्या सर्पांस म्हणाला, "अहो सर्पहो! तुम्हांला मीं काय आणून दिलें असतां, किंवा मीं कोणता पराक्रम केला असतां, अथवा मला कोणतें ज्ञान झालें असतां मी आपल्या दास्यत्वापासून मुक्त होईन, हें तरी एक निश्चयात्मक मला सांगा."

सौति म्हणाले:—तें ऐकून सर्प त्यास म्हणाले, "हे गरुडा, तूं आपल्या शौर्यानें आम्हांला अमृत आणून दे, म्हणजे तूं आमच्या दास्यत्वापासून मुक्त होशील."

अध्याय अठ्ठाविसावा

—:०:—

गरुडाच्या खाण्याची तरतूद.

सौति म्हणाले:—ह्याप्रमाणें सर्पांनीं गरुडाला सांगितल्यानंतर तो आपल्या आईस म्हणाला, "आई! तर मग मी आतां अमृत आणावयास जातों. पण मार्गामध्यें मला खावयाला काय?" विनता म्हणाली, "समुद्राच्या किनाऱ्यावर एकांतस्थळीं निषादांची [कोळ्यांची मच्छिमारांची] एक मोठी वस्ती आहे, त्यांतील हजारों निषाद भक्षण कर, आणि अमृत घेऊन ये. ब्राह्मणाला मारण्याची दुर्बुद्धि मात्र तूं कधीं मनांत सुद्धां आणूं नको. कारण, ब्राह्मण हे अग्नीसारखे तेजस्वी असल्यामुळें त्यांचा कोणीच वध करतां कामा नये. ब्राह्मण रागावला तर तो नाश करण्यामध्यें निखालस अग्नीसारखा, सूर्यासारखा, विषासारखा किंवा शस्त्रासारखाच बनतो. ब्राह्मण हा सर्व प्राण्यांचा गुरु असें म्हटलेलें आहे. अशा प्रकारचीं ब्राह्मणाचीं लक्षणें असल्यामुळें ब्राह्मण हा सज्जनांनाही वंद्य झालेला आहे. ह्याकरितां, बाबा! तूं रागाच्या आवेशांत असलास तरी सुद्धां त्याचा घात करूं नको. हे निष्पापा! ब्राह्मणांचा कधींही द्रोह करूं नये. कडकडीत व्रताच्या आचारविचारानें चालणारा ब्राह्मण क्रुद्ध झाला तर तो जशी राखरांगोळी करून टाकील, तशी अग्नीच्यानें किंवा सूर्याच्यानेंही होणार नाहीं. ह्याकरितां, ह्या नानाप्रकारच्या लक्षणांनीं उत्तम ब्राह्मण तो कोणता हें लक्षांत आण. सर्व प्राण्यांमध्यें ब्राह्मण हा अग्रगणी; सर्व वर्णांमध्यें ब्राह्मण हा श्रेष्ठ; म्हणून तो सर्वांचा पिता व गुरु होय."

विनतेचें हें भाषण श्रवण करून गरुडानें तिला प्रश्न केला, "आई! ह्या ब्राह्मणाचें स्वरूप कसें असतें? त्याचा स्वभाव कसा असतो? त्याचें सामर्थ्य किती? तो अग्नीसारखा कसा भासतो? त्याची सौम्य मुद्रा कशी असते? आई, ब्राह्मणाचीं उत्तम लक्षणें कशीं असतात, तीं मला समजून घ्यावयाचीं आहेत, म्हणून मी विचारतों; तर तीं मला सकारण सांग."

तेव्हां विनता सांगूं लागली:—बाळा, माशानें गळ

गिळल्याप्रमाणें जो तुझ्या गळ्यांत शिरला असतां अग्नीप्रमाणें जाळील, तोच ब्राह्मणश्रेष्ठ आहे असें समज. ह्याकरितां, तुला कितीही राग आला तरी तूं ब्राह्मणाला म्हणून कधींही मारूं नको." पुत्र-प्रेमानें बद्ध झालेली ती विनता असें सांगून पुनः म्हणाली कीं, "पोटामध्यें ज्याचें पचन होणार नाहीं, तोच ब्राह्मण असें समज." आपल्या पुत्राचा अतुल पराक्रम जरी तिला माहीत होता तरी, नागांनीं पीडा दिल्यामुळें अत्यंत दुःखित झालेल्या त्या विनतेनें ममतेनें व पुत्रस्नेहानें पुनः त्याला आ-शीर्वाद दिलाः ती म्हणाली, "मुला! वायु तुझ्या पंखांचें संरक्षण करो; व चंद्रसूर्य तुझ्या पाठीवर असोत. अग्नि तुझ्या मस्तकाचें संरक्षण करो; आणि अष्टवसु तुझ्या सर्व शरिराचें संरक्षण करोत! हे पुत्रा! तुझीं विघ्नें टळावीत, व तुझें कल्याण असावें अशी मी सदासर्वदा इच्छा करतें. इतकेंच नव्हे, तर मी येथें बसून अहोरात्र तुझें क्षेमकल्याण चिंतन करीत राहीन. तर, बाळा, तूं आतां आपल्या इष्टकार्यसिद्धीकरितां निर्विघ्न-पणें आपल्या मार्गाला लाग."

सौति म्हणालाः—ह्याप्रमाणें आईचें भाषण श्र-वण केल्यानंतर त्या गरुडानें आपले पंख पसरून आकाशांत भरारी मारली, आणि जणूं काय अं-तकाळीं येणारा मृत्युच असा तो महाबलाढ्य पक्षी खा खा करीतच निषादांच्या वस्तीपाशीं जाऊन पोहोंचला; आणि त्या साऱ्या निष-दांस एकत्र जमविण्यासाठीं त्यानें जवळ असलेले वृक्ष हालवून असा कांहीं धुरोळा उठविला कीं, तो आकाशास जाऊन भिडला. त्याच्या योगानें तेथील समुद्रतीरचें पाणी सुद्धां वर उसळलें! नंतर त्या पक्षिराजानें निषादांच्या मार्गामध्यें मोठा थोरला जबडा वासून त्यांचा मार्ग बंद करून टाकला. तेव्हां सारे निषाद जे घाई-घाईनें निघाले, ते त्या सर्पभक्षक पक्ष्याच्या तोंडाकडेच चालले; आणि जंगलांतील अर-ण्यांतील झाडें अगदीं पडावयाच्या बेतांत आलीं म्हणजे घाबरलेले पक्षी जसे आकाशांत उडून जाऊं लागतात, तद्वत् त्या वावटळीनें भांबावून गेलेले ते हजारों निषाद त्या अकटोविकट प-सरलेल्या मुखांत शिरले. तेव्हां त्या क्षुधेनें व्याकु-ळ झालेल्या, शत्रूस संताप देणाऱ्या, अत्यंत चपळ व बलाढ्य पक्षिराजानें त्या असंख्य नि-षादांचा म्हणजे कोळ्यांचा संहार करण्याकरितां आपलें तोंड मिटलें.

अध्याय एकुणतिसावा.

—:०:—

गरुडकश्यपसंवाद.

सौति म्हणालाः—शौनकादिक मुनिवर्यहो, त्यानें आपलें तोंड मिटलें तों त्या तोंडामध्यें आपल्या पत्नीसहवर्तमान एक ब्राह्मण सांपडला; व तो त्याला पेटलेल्या अग्नीसारखा भाजूं ला-गला. तेव्हां त्यास गरुड म्हणाला, "हे ब्राह्मण-श्रेष्ठा! मी हें तोंड पसरतों, त्यांतून तूं लवकर बाहेर नीघ. ब्राह्मण कितीही पातकी असला तरी सुद्धां त्याचा घात करणें हें मला उचित नाहीं."

हें ऐकून ब्राह्मणानें गरुडाला उत्तर दिलें, "तर मग माझी स्त्री कोळीण आहे, तीही माझ्या बरोबर येऊं दे." गरुडानें उत्तर दिलें, "त्या कोळिणीलाही घे, पण लव-कर एकदाचा बाहेर पड; अजून माझ्या जठरा-ग्नीनें तूं दग्ध झाला नाहींस, तों लवकर बाहेर पडून आपलें संरक्षण कर."

गरुडानें असें सांगितल्यावर तो ब्राह्मण आपल्या त्या कोळ्याच्या जातीच्या स्त्रीसह त्याच्या तोंडांतून बाहेर पडला, आणि गरुडाची स्तुति करून आपल्या इष्ट देशाला निघून गेला. भार्येसहवर्तमान तो ब्राह्मण बाहेर पडतांच तो मनाप्रमाणें वेगवान पक्षिराज गरुडही आपले पंख पसरून आकाशांत उडाला, तों पुढें त्याचा

पिता कश्यप ऋषि ह्याच्या दृष्टीस पडला, व त्यानें विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरेंही त्यानें यथायोग्य दिलीं: त्या उदार अंतःकरणाच्या ऋषिश्रेष्ठानें बोलण्यास आरंभ केला. कश्यप ऋषि म्हणतात, "हे पुत्रा, का? कुशल आहेस ना? खायाप्यायाला यथेष्ट मिळतें ना? मृत्युलोकीं तुझें भक्ष्य विपुल आहे कीं नाहीं?" त्यावर गरुडानें उत्तर केलें, "आई, भाऊ व मी तिघेंही आम्ही सर्वकाळ सुखी आहों. परंतु, बाबा! मला मात्र नेहमीं यथेच्छ खायाला मिळत नसल्यानें माझी अवस्था मात्र ठीक नाहीं. मला आज सर्पांनीं उत्तम अमृत आणण्याकरितां पाठविलें आहे; व मातेला दास्यत्वांतून मुक्त करण्याकरितां मीही तें आणणार आहें. भूक लागली तर निषादांना भक्षण कर, असें आईनेंही मला सांगितलें होतें. पण निषाद ते काय! हजारों खाल्ले तरी पोट म्हणून कांहीं भरलें नाहीं. ह्याकरितां, हे भगवन्! मला खावयाला दुसरें कांहीं तरी दाखवून द्या. हे प्रभो! तें असें पाहिजे कीं, तें खाल्लें असतां अमृत आणण्यास मी समर्थ होईन. तर आपण माझी तहानभूक हरेल असें कांहीं तरी भक्ष्य मला सांगा."

हें ऐकून कश्यप म्हणाले:—बाळा, हें सरोवर अत्यंत पवित्र असून देवलोकांतही प्रसिद्ध आहे. ह्यामध्यें एक कासव असून त्याचा धाकटा भाऊ हत्ती झालेला आहे; आणि तो आपल्या थोरल्या भावाला-कासवाला-नेहमीं आपल्या सोंडेनें ओढीत असतो. त्यांचें जन्मांतरीचें हाडवैर कसें आहे तें मी तुला इत्थंभूत सांगून देतों. तें, व त्या उभयतांचे आकार केवढे आहेत हेंही तूं नीट समजून घे.

हत्ती व कासव ह्यांचें पूर्ववृत्त.

विभावसु ह्या नामेंकरून एक महान कोपिष्ट असा महर्षि होता. त्याला एक धाकटा भाऊ असे, त्याचें नांव सुप्रतीक. तोही महान तपस्वी होता. त्या महामुनि विभावसूला एकत्र असलेलें धन वाटून घेण्याची इच्छा नव्हती; परंतु सुप्रतीक होता तो, माझी वाटणी मला पाहिजे म्हणून नित्यशः कुरकुर करीत असे. तेव्हां विभावसु हा आपला धाकटा भाऊ सुप्रतीक ह्याला म्हणाला, "पुष्कळ लोक लोभाला गुंतून नेहमीं वांटणी करण्याची इच्छा करीत असतात; आणि मग द्रव्याच्या आशेनें विभक्त होऊन एकमेकांवर दांतओंठ खात बसतात. मग ते अप्पलपोटे मूर्ख आपआपल्या द्रव्याच्या वांटण्या घेऊन वेगळे वेगळे झाले असें समजलें कीं, त्यांचे शत्रु असतात, ते आपण मित्र आहों असें भासवून त्यांच्या मनांत अधिकाधिकच विकल्प आणून देतात; व त्या उभयतांच्या मनांत पक्का भेदभाव उत्पन्न झाला कीं त्यांच्या नाशाला सुरवात होते; आणि मग हां हां म्हणतां ते रसातळास जातात. गुरुमर्यादानियमांनीं जे बद्ध झालेले असतात, व परस्परांची अमर्यादा होण्याची ज्यांच्या मनांत भीति असते, अशा पुरुषांनीं बंधुविभाग घेऊन विभक्त होणें बरें नव्हे, असें सज्जनांचें मत आहे. असो. सुप्रतीका! तुला आतां आपल्या ताब्यांत ठेवणें मला शक्य नाहीं; कारण, तूं आतां माझ्या ठिकाणीं परकीयभाव धरून द्रव्याची इच्छा करतोस. ह्याकरितां तूं हत्तीच्या जन्माला जाशील!"

महर्षि कश्यप सांगतात:—ह्याप्रमाणें विभावसूनें सुप्रतीकाला शाप दिला, तेव्हां तोही विभावसूला म्हणाला, "तर मग तूंही जलामध्यें संचार करणारा कासव होशील." ह्याप्रमाणें, केवळ द्रव्याच्या लोभांत गुंतून विभावसु व सुप्रतीक ह्या उभयतांनीं एकमेकांस शाप देऊन ते अनुक्रमें कासव व हत्ती होऊन बसले. असे क्रोधाच्या पाशांत सांपडल्यामुळें ते दोघेही तिर्यग्योनीला गेले; आणि आतां आपल्या शरीरांच्या स्थूल आकारानें व बळानें गर्विष्ठ होऊन परस्पराचा द्वेष करीत बसले आहेत! ते पूर्वजन्मींच्या वैर्‍यांप्रमाणें विशाळ

देह धारण करून येथें ह्या सरोवरांत रहातात त्यांपैकीं तो मोठा भव्य व देखणा असलेला हत्ती सरोवराजवळ येतो. तो आला कीं त्याचा चीत्कार ऐकून ह्या सरोवराच्या आंत राहणारा अजस्र कासवही सारें सरोवर खवळून सोडीतच वर येतो. त्याला पाहतांच हत्तीही आपली सोंड मुरडून वेगानें पाण्यांत उडी घालतो; आणि दांत, सोंड, शेपटीचा गोंडा व पाय ह्यांच्या तडाक्यांनीं त्या सरोवराला अधिकच खळबळून सोडतो. अशा प्रकारें त्या हत्तीनें तें सरोवर अतिशय खवळलेलें दृष्टीस पडलें म्हणजे तो बलाढ्य कासवही आपलें डोकें वर काढून त्याच्याशीं युद्ध करावयास लागतो. हत्तीची उंची सहा योजनें असून लांबी तर त्याच्या दुप्पट आहे. कासवाची उंची तीन योजनें असून पाठीचा घेर दहा योजनें आहे. ते दोघेही, युद्धामध्यें एकमेकांचा प्राण घेऊं ह्या इर्षेनें सध्या अगदीं बेफाम होऊन राहिले आहेत; तर त्यांना तूं भक्षण करून आपलें कार्य शेवटास ने. विशाळ मेघपटलासारख्या त्या कासवाला आणि प्रचंड पर्वतासारख्या त्या हत्तीला भक्षण करून तूं अमृत घेऊन ये.

गरुडाचें अमृतार्थ गमन.

सौति म्हणाला:—ह्याप्रमाणें कश्यपांनीं गरुडास सांगितल्यानंतर ते त्यास मंगलप्रद असे आशीर्वाद देऊं लागले: ते म्हणाले, "तूं देवांबरोबर युद्ध करूं लागलास म्हणजे त्या युद्धांत तुला विजय प्राप्त होवो.' हे पक्ष्या! भरलेली घागर, ब्राह्मण, गाई, किंवा असेच जे जे कांहीं चांगले व मंगलकारक पदार्थ असतील, ते ते सर्व तुझ्यासमोर येतील. अर्थात् तुला उत्तम शकुन होतील. हे बलवंता! तूं समरांगणामध्यें देवांशीं युद्ध करूं लागलास म्हणजे ऋक, यजुं, साम, पवित्र हवि, सर्व उपनिषदें, आणि सारे वेद तुला सामर्थ्य देतील."

मुनिवर्यहो, ह्याप्रमाणें पित्यानें गरुडाला आशीर्वाद दिल्यानंतर तो गरुड त्या सरोवराकडे गेला, आणि निर्मळ जलानें भरलेलें व नानाप्रकारच्या पक्ष्यांनीं युक्त असें तें सरोवर त्यानें अवलोकन केलें. इतक्यांत त्याला पित्याच्या भाषणाची आठवण झाली. तेव्हां त्या अत्यंत वेगवान पक्षिराजानें, एका नखानें तो हत्ती व दुसऱ्या नखानें तो कासव धरून आकाशामध्यें उंच भरारी मारली; आणि तो आकाशमार्गानें एका पुण्यतीर्थावर येऊन, तेथें असलेल्या कल्पवृक्षांवर बसण्याकरितां त्यांच्या जवळ गेला. तेव्हां आतां आपल्या पंखांच्या वायूच्या तडाक्यानें हा आम्हांस मोडून टाकील, असें वाटून ते वृक्ष भयानें थरथर कांपूं लागले. मनोरथरूप फलांनीं लवलेले ते दिव्य सुवर्णशाखेचे वृक्ष भयभीत होऊन कांपत आहेतसें पाहून, त्यांस आपण मोडूं नये असें मनांत येऊन, तो पक्षी, ज्याच्या अजस्रपणाला दुसरी जोडच नाहीं, अशा दुसऱ्याच मोठ्या विशाळ वृक्षांकडे गेला. ते मोठमोठाले वृक्ष सोन्यारुप्याच्या फलपुष्पांनीं लकाकत असून त्यांच्या शाखा वैदूर्य रत्नांच्या होत्या; आणि त्यांच्या सभोंवार समुद्रजलाचा वेढा पडलेला होता. त्यांपैकीं एक फार जुना अत्यंत विस्तृत असा वटवृक्ष, त्या मनोवेगानें येत असलेल्या पक्षिराजास म्हणाला, "ही माझी डहाळी शंभर योजनें लांब आहे; हिच्यावर बसून तूं त्या हत्तीला व कासवाला भक्षण कर." तेव्हां तो महान वेगवान पक्षिराज त्या वृक्षाच्या जवळ आला, आणि ज्याच्यावर हजारों पक्षी आश्रम करून राहिले होते, व ज्या वृक्षाचा आकार केवळ पर्वतप्राय दिसत होता, त्याच्या त्या गर्द पानांनीं भरून गेलेल्या शाखेवर पाय ठेवतो न ठेवतो तोंच ती शाखा मोडून गेली!

अध्याय तिसावा.

—:०:—

वालखिल्य ऋषींचें रक्षण.

सौति म्हणाला:—त्या बलाढ्य गरुडानें त्या

वृक्षाच्या फांदीला पाय लाविले मात्र, तों ती फांदी मोडली ! ती मोडलेली फांदी गरुडानें धरली, आणि त्या मोडलेल्या प्रचंड फांदीकडे तो आश्चर्यानें पाहूं लागला, तों तिच्यावर खालीं डोकें वर पाय करून लोंबत असलेले वालखिल्य ऋषि त्याच्या दृष्टीस पडले. ह्या लोंबत असलेल्या ऋषींचा घात होतां कामा नये, असा विचार करून त्या तपोनिष्ठ ब्रह्मर्षींकडे त्यानें अवलोकन केलें. हे ह्या झाडाच्या फांदीपासून सुटून खालीं पडले तर प्राणास मुकतील, हें मनांत आणून त्या वीरानें तो हत्ती व कासव ह्यांस नखांनीं घट्ट धरिलें. आतां ह्या ऋषींचा नाश होईल ही भीति मनांत येऊन त्या पक्षिराज गरुडानें उड्डाण केलें; आणि त्याच विवंचनेनें ती डहाळी तोंडांत धरली. देवांनाही दुष्कर असें तें अचाट कर्म पाहून महर्षींचीं हृदयें आश्चर्यानें अगदीं उचंबळूं लागलीं; आणि त्यांनीं त्यास एक नांव दिलें: ते म्हणाले, "अहो, येवढें गुरु (जड) ओझें घेऊन हा पक्षी उड्डाण करीत आहे, ह्यावरून हा सर्पभक्षक पक्षिश्रेष्ठ गरुड होय." नंतर पंखांच्या झडपीनें पर्वतांना हालवीत हालवीत तो हळू हळू घिरट्या घालूं लागला, आणि वालखिल्य ऋषींची पोटामध्यें दया आणून त्या हत्तीसहवर्तमान व कासवासहवर्तमान अनेक देश फिरला, परंतु त्याला बसावयाला नीटसें स्थानच मिळालें नाहीं. पुढें तो तसाच फिरतां फिरतां थेट गंधमादन नांवाच्या श्रेष्ठ पर्वतावर गेला, तों तेथें त्याचा पिता कश्यप ऋषि तपश्चर्या करीत असलेला त्याच्या दृष्टीस पडला; व पित्यानेंही, मन व वायु ह्यांप्रमाणें वेगवान असून तेज, वीर्य व बल ह्यांनीं युक्त व दिव्य रूप धारण करणाऱ्या त्या पक्ष्याला अवलोकन केलें. तो पक्षी म्हणजे जणू काय उगारलेला साक्षात् ब्रह्मदंडच, किंवा एखाद्या पर्वताचें अवाढव्य शिखरच की काय, ज्याचा आकार केवळ कल्पनेच्या बाहेर, ज्याला सर्वतोपरी मनांत आणणें सुद्धां कठीण, आणि जो पाहिला असतां प्राणिमात्रास भय उत्पन्न व्हावें, असा होता. महान वीर्यवान, अत्यंत भेसूर, भडकलेला जणू काय अग्निच, देव, दानव व राक्षस ह्यांना सुद्धां आटोपणारा नव्हे, मग सामान्य जन त्याच्यापुढें उभा तरी कसा राहणार ? पर्वतशिखरांचा भुगा करून सोडणारा, समुद्राचें पाणी आटवून टाकणारा, साऱ्या भूगोलाला हालवून सोडणारा, व दिसण्यांत साक्षात् काळासारखा भयंकर असा आपला पुत्र भगवान कश्यप ऋषींनीं आलेला पाहून त्याच्या मनांतील हेतु जाणला, आणि ते त्यास म्हणाले, "हे पुत्रा ! तू असें साहसही करूं नको, आणि आपल्याला असा त्रासही करून घेऊं नको. सूर्यकिरणांचेंच पान करून तृप्त असणारे वालखिल्य ऋषि क्रोधायमान होऊन तुला दग्ध न करोत."

सौति म्हणाला:—ऋषीहो, नंतर, पुत्राकरितां कश्यप ऋषींनीं, तपश्चर्येनें निष्पाप झालेल्या त्या वाल्यखिल्य ऋषींना प्रसन्न करून घेतलें: ते वालखिल्य ऋषींना म्हणाले, "हे तपोधनहो ! गरुडाचा जन्म लोकहिताकरितां झालेला आहे, आणि तो एका महत्कार्याची इच्छा करीत आहे. तर आपणही त्यास आज्ञा द्यावी."

ह्याप्रमाणें भगवान कश्यप मुनींनीं सांगितल्यावर त्या तपश्चर्येची अपेक्षा करणाऱ्या वालखिल्य ऋषींनीं ती वृक्षाची शाखा सोडून देऊन ते पवित्र अशा हिमालय पर्वतावर गेले. ते ऋषि निघून गेल्यानंतर, ती वृक्षाची डहाळी तोंडांत धरूनच, गरुडानें आपला पिता जो कश्यप ऋषि त्यास विचारिलें, "हे भगवन् ! ही वृक्षाची डहाळी मी कोठें बरें टाकूं ? जेथें कोणीही मनुष्य नाहीं, असा एखादा प्रदेश आपण मला सांगावा."

गरुडाचें हें भाषण ऐकून, केवळ हिमानें व ज्याच्या गुहा बर्फांनीं अगदीं भरून गेल्या

आहेत, व ज्या ठिकाणीं जाण्याचें मनांत आणणें सुद्धां अशक्य असा एक पर्वत कश्यप ऋषींनी त्यास सांगून दिला. तेव्हां प्रचंड गुहा असलेल्या त्या पर्वताकडे जाण्याच्या उद्देशानें तो पक्षिराज तो हत्ती व कासव ह्यांसहवर्तमान मोठ्या वेगानें निघाला. तो पक्षी जी प्रचंड शाखा घेऊन आला, ती शाखा कांही सामान्य नव्हती. शंभर बैलांच्या कातड्याची केलेली तात त्या शाखेच्या भोंवती एक वेढा देण्यास सुद्धां पुरली नसती. असो. नंतर तो पक्षिराज गरुड थोड्याच वेळांत एक लक्ष योजनें निघून गेला; पुढें तो पित्याच्या आज्ञेप्रमाणें त्या पर्वतावर जाऊन पोहोंचला, आणि मोठ्यानें गर्जना करीत करीत त्यानें ती शाखा तेथें फेकून दिली. परंतु त्या गरुडाच्या पंखांच्या वाऱ्याचा तडाका लागल्यामुळें तो विशाल पर्वतही डळमळूं लागला, आणि त्याच्यावरील वृक्षांचीं पुष्पें गळून पडूं लागल्यामुळें, तो गरुडावर पुष्पवृष्टिच करीत आहे असें वाटलें. त्या पर्वताचीं रत्नखचित चित्रविचित्र शोभा देणारीं शिखरें इतस्ततः मोडून पडलीं. विद्युत्प्रभेनें ज्याप्रमाणें मेघ हे शोभिवंत दिसतात, त्याप्रमाणें सुवर्णपुष्पांनी लकलकणाऱ्या अनेक शाखा असलेले दुसरेही अनेक वृक्ष, त्या विशाल शाखेचा धक्का लागल्यामुळें उन्मळून पडले! आणि पर्वतावरील धातु त्यांत मिश्र झाल्या असल्यामुळें, व सुवर्णाप्रमाणें देदीप्यमान दिसणाऱ्या त्या वृक्षावर आणखी सूर्याचे किरण पडल्यामुळें ते फारच खुलूं लागले. तेव्हां त्या पक्षिराज गरुडानें त्या पर्वताच्या शिखरावर बसून तो हत्ती व कासव ह्या दोघांसही भक्षण केलें. ह्याप्रमाणें त्या हत्तीला व कासवाला भक्षण केल्यानंतर तो महान वेगवान गरुड त्या पर्वतशिखरावरून उडाला.

स्वर्गांतील उत्पात.

ह्या पक्षिराज गरुडानें जेव्हां उड्डाण केलें, तेव्हां देवांना अनिष्टसूचक असे उत्पात होऊं लागले. स्वर्गाधिपति इंद्राचें आवडतें शस्त्र जें वज्र, तेंही त्या वेळीं प्रज्वलित झालें. ज्वाला व धूर ह्यांसहवर्तमान दिवसा ढवळ्या उल्कापात होऊं लागले. त्याप्रमाणेंच अष्टवसु, एकादशरुद्र, द्वादशादित्य, साध्य, मरुद्गण, आणि इतरही ह्याहून साऱ्या देवतागणांचीं अस्त्रें एकमेकांकडे धावूं लागलीं. देवांचा व दैत्यांचा पूर्वी एवढा मोठा घनघोर संग्राम झाला खरा; पण त्या वेळेसही अनुभवास आलेले नाहींत असे सोसाट्याचे वारे वाहूं लागले, आणि उल्कांचा तर काय केवळ सडा झाला! आकाशांत एकही ढग नसतां मेघांच्या गडगडानें तें सारें दणाणून गेलें. पर्जन्याधिपति हा रक्ताचा वर्षाव करूं लागला! देवांच्या पुष्पमाळा कोमेजून जाऊन तेही स्वतः निस्तेज पडले. प्रलयकालचे भयंकर मेघ रक्ताच्या मुसळधारा सोडूं लागले. धूळ तर इतकी उडत होती कीं, तिचे देवांच्या मुकुटांवर थरचे थर बसले! असे भयंकर उत्पात होऊं लागल्यामुळें सर्व देवांसहवर्तमान इंद्राची अगदी पांचावर धारण बसली; आणि तो बृहस्पतीला म्हणाला, "हे भगवन्! युद्धामध्यें आमचा पराभव करणारा शत्रु तर कोठें दिसत नाहीं, असें असतां एकाएकीं हे भयंकर उत्पात कां बरें होत आहेत?"

बृहस्पतींनीं उत्तर दिलें:—देवेन्द्रा! तुझे अपराध व प्रमाद ह्यांमुळें, आणि महात्मे ऋषिश्रेष्ठ वालखिल्य ह्यांच्या तपःप्रभावामुळें, कश्यप ऋषींच्या विनतेच्या ठिकाणीं झालेला पक्षिरूप महाबलाढ्य व इच्छित रूपें धारण करणारा पुत्र गरुड अमृत नेण्याकरितां इकडे येत आहे. तो पक्षी सर्व बलवंतांमध्यें श्रेष्ठ असून अमृत घेऊन जाण्याला समर्थ आहे. तो पाहिजे ती गोष्ट साध्य करील;—त्याला अशक्य असें त्रैलोक्यामध्यें सुद्धां कांहीं नाहीं.

देवांनीं केलेली युद्धाची तयारी.

सौति म्हणालाः—हें बृहस्पतीचें वाक्य श्रवण

करून अमृताचें रक्षण करणाऱ्या देवांस इंद्र म्हणाला, "मोठा बळाढ्य व शूर असा एक पक्षी अमृत घेऊन जाण्याच्या खटपटींत आहे. तर त्याला तें बलात्कारानें नेतां येऊं नये म्हणून आधींच मी तुम्हांस सावध करून ठेवतों. बृहस्पति म्हणतात कीं, त्याचें बळ केवळ अप्रतिम आहे."

हें इंद्राचें भाषण श्रवण करून देवांनाही मोठें आश्चर्य वाटलें, व ते त्या अमृताभोंवतीं वेढा देऊन बसले. महाप्रतापी इंद्रही आपलें वज्र घेऊन तयार झाला. त्या विचारवान देवांनीं वैदूर्य रत्नें बसविलेलीं अत्यंत मौल्यवान सुवर्णाचीं चित्रविचित्र कवचें धारण केलीं. हातांमध्यें बळकट व लकलकीत ढाली अडकविल्या आणि तशींच अनेक प्रकारचीं शस्त्रें हातांत घेतलीं. मुख्य मुख्य देव, ज्यांच्यांतून चोहोंकडे ठिणग्या व धूर पसरत आहे अशीं, व पाजळ-ल्यामुळें ज्यांच्या धारा व टोंकें तीक्ष्ण झालीं आहेत अशीं शस्त्रें उगारून बसले. चक्रें, परिघ, त्रिशूळ, परशु, अनेक प्रकारच्या तीक्ष्ण शक्ति, चकचकीत तरवारी, दिसण्यांतही भयंकर अशा गदा इत्यादि आयुधें आपआपल्या शरिरास शोभतील तसतशीं घेऊन सारे देव सज्ज झाले. देवगण हे मूळचेच निष्पाप असल्यामुळें स्वयंसिद्धच देदीप्यमान, त्यांत त्यांनीं आणखी दिव्य अलंकार धारण केलेले, आणि लकलकीत शस्त्रें परजलेलीं, ह्यामुळें ते फारच सुप्रभ दिसूं लागले. अमृताचें संरक्षण करण्याविषयीं त्यांनीं दृढ निश्चय केला होता; व जे राक्षसांचीं ठाणीं विध्वंस करून टाकणारे, त्या देवांचें बल, वीर्य व तेज केवळ अनुपमेय होतें, त्यामुळें त्यांचीं शरिरें अग्निप्रमाणें तेजःपुंज दिसूं लागलीं. ह्याप्रमाणें ते देव कडेकोट तयारीनें उभे राहिले असतां, हजारों परिघांनीं व्याप्त झालेलें तें भव्य समरांगण, सूर्यकिरणांनीं सुप्रकाशित झालेलें दुसरें आकाशच एकदम पसरलें कीं काय, असें भासूं लागलें!

अध्याय एकतिसावा.

-:०:-

गरुडाची उत्पत्ति.

शौनकांनीं प्रश्न केलाः—हे सूतपुत्रा! महेंद्राचा अपराध कसला होता? व प्रमाद तरी काय? आणि वालखिल्यांच्या तपानें गरुड तरी कसा उत्पन्न झाला? कश्यप ऋषि हे जातीचे ब्राह्मण होते; असें असतां त्यांस हा पक्षिराज पुत्र कसा झाला? आणि तो सर्व प्राण्यांना अजिंक्य व अवध्य तरी कसा झाला? तसेंच, तो पक्षी वाटेल तिकडे संचार करणारा व अतुलपराक्रमी कशानें झाला? सौते, हें जर पुराणांत सांगितलेलें असेल, तर तें आम्हांस ऐकण्याची इच्छा आहे.

सौति म्हणालाः—शौनकादि मुनिश्रेष्ठहो, आपण विचारीत आहां, तो विषय पुराणांतीलच आहे. तो मी सारा संक्षेपानें सांगतों, श्रवण करा.

पुत्रप्राप्तीची इच्छा धरून कश्यप प्रजापति यज्ञ करूं लागले, त्या वेळीं त्या यज्ञाला ऋषींनीं, देवांनीं व गंधर्वांनींही साह्य केल्याचें प्रसिद्ध आहे. त्या यज्ञामध्यें कश्यपांनीं इंद्र, वालखिल्य मुनि, व इतर देवगण यांजकडे समिधा आणण्याचें काम सोंपविलें होतें. त्या वेळीं इंद्रानें आपल्या सामर्थ्याप्रमाणें पर्वतासारखा एक समिधांचा भारा सहज उचलून आणला. तो आणीत असतां मार्गामध्यें अगदीं ठेंगणे—केवळ आंगठ्याच्या पेरायेवढे—वालखिल्य ऋषि, एका जुटीनें पळसाची एक लांब काडी मोठ्या प्रयासानें आणीत असलेले त्याच्या दृष्टीस पडले. ते ऋषि मोठे तपस्वी असून त्यांनीं आहार वर्ज्य केला असल्यामुळें ते अत्यंत कृश झाले होते; आणि गाईच्या उमटलेल्या पाऊलभर पाण्यामध्येंच गटकळ्या खात होते! परंतु इंद्राला आपल्या बळाचा गर्व असल्यामुळें, त्यांना पाहून इंद्राला मोठा चमत्कार वाटून तो हसूं

लागला; आणि त्या कृचमत असलेल्या वालखिल्य ऋषींचा अपमान करून तो लवकर लवकर पुढें चालता झाला. तेव्हां ते वालखिल्य ऋषि रागानें संतप्त झाले, आणि अत्यंत व्याकूळ होऊन, इंद्रावर मोठें संकट गुदरेल अशा महत्कर्मास त्यांनीं प्रारंभ केला. आतां, हे विप्रहो! त्या महान तपस्वी वालखिल्य ऋषींनीं कोणती मनीषा धारण करून लहानमोठया मंत्रांनीं अग्नींत विधिपूर्वक हवन केलें तें श्रवण करा. पाहिजे तितकें वीर्य व हवें तिकडे जाण्याचें सामर्थ्य ज्याच्या अंगीं आहे, व जो ह्या प्रांतांत असलेल्या इंद्राला केवळ 'दे माय धरणी ठाय' करून सोडील, असा एखादा नवाच इंद्र ह्या सर्व देवांना उत्पन्न करून द्यावा असा त्यांचा कृतनिश्चय होता. शौर्यामध्यें व वीर्यामध्यें ह्या सांप्रतच्या इंद्रापेक्षां शतपटीनें श्रेष्ठ, आणि मनाप्रमाणें वेगवान असा भयंकर दुसराच इंद्र आपल्या तपश्चर्येच्या फलानें उत्पन्न व्हावा असा त्यांचा मनोदय होता. तो त्यांचा उद्देश ऐकून देवांचा राजा इंद्रही रागानें संतप्त झाला, आणि त्या वेळीं तो उत्तम तपश्चर्या करणाऱ्या कश्यप ऋषींला शरण गेला. तेव्हां कश्यप प्रजापतींनीं इंद्राचा सर्व वृत्तांत ऐकून घेतला, आणि तसेंच वालखिल्य ऋषींकडे जाऊन 'आमचें एक काम होईल काय?' असा त्यांनीं त्यांस प्रश्न केला. वालखिल्य ऋषिही परमसत्यवादीच होते. त्यांनीं "होय, होईल." असेंच त्यांस उत्तर दिलें. तेव्हां ते कश्यप प्रजापति, त्यांच्या क्रोधाचें सांत्वन होईल अशा रीतीनें बोलूं लागले कीं, "हा त्रिभुवनावर सत्ता करणारा इंद्र ब्रह्मदेवाच्या आज्ञेवरूनच झालेला आहे; आणि, हे तपोधनहो! आपणही पुनः नवा इंद्र होण्याची खटपट करीत आहां; परंतु, हे सज्जनश्रेष्ठहो! त्या ब्रह्मदेवाचें वाक्यही मिथ्या करणें आपणांस योग्य नाहीं; व आपण मनांत योजिलेला बेतही मिथ्या होणार नाहीं. ह्याकरितां, आपला हा अत्यंत बलाढ्य व पराक्रमी इंद्र पक्ष्यांचा व्हावा, आणि हा देवांचा राजा इंद्र याचना करीत आहे, ह्यावर कृपा करावी."

सौति सांगतोः—हे शौनकादिक मुनिवर्यहो, ह्याप्रमाणें कश्यपांनीं त्या तपोधन वालखिल्य ऋषींना सांगितलें, तेव्हां त्या मुनिश्रेष्ठ कश्यप प्रजापतींना अत्यंत सन्मानपूर्वक व पूज्य बुद्धीनें त्यांनीं उत्तर दिलें कीं, "हे प्रजापते! आमचा हा सारा खटाटोप केवळ इंद्राकरितांच आहे; व आपणही पुत्राकरतांच हा उद्योग आरंभिलेला आहे. तर आमचें हें कर्माचें प्राप्त झालेलें फल आपणच ग्रहण करावें, आणि सर्वांस कल्याणकारक काय ती आपणच योजना करावी."

सौति म्हणालेः—ऋषीहो, ह्याच वेळीं शुभ, कल्याणी, यशस्विनी, मनांत पुत्रप्राप्तीची लालसा धरणारी व निरंतर नियमधर्माविषयीं तत्पर अशी दक्षकन्या विनता देवी ऋतुस्नात होऊन शुचिर्भूत झालेली असून, अपत्याच्या प्राप्तीकरितां आपला भर्ता जो कश्यप, त्याच्या जवळ आली असतां तो तिला म्हणाला, "हे देवी! तूं ज्या व्रताचा आरंभ केला होतास, त्याची सफलता होऊन तुझे मनोरथ पूर्ण झाले. तुझ्या उदरीं त्रैलोक्याधिपति असे दोन वीर पुत्र जन्मास येतील; आणि ते दोन्ही वालखिल्य ऋषींच्या तपोबलेंकरून माझ्या मनोरथाप्रमाणें महान भाग्यवान होऊन त्रैलोक्यालाही पूज्य असे निपजतील." इतकें सांगून भगवान कश्यप ऋषि पुनः म्हणाले, "हे पुत्र परमभाग्यास चढणारे आहेत. ह्याकरितां त्यांचें गर्भामध्यें सुद्धां तूं फार काळजीनें संरक्षण कर. ते दोघेही सर्व पक्ष्यांचे राजे होऊन त्यांच्यावर स्वामित्व चालवितील; आणि ते दोघेही पक्षी इच्छित रूप धारण करणारे व शूर असल्यानें सर्व लोकांस पूज्य होतील. ह्याप्रमाणें पत्नीला सांगितल्यानंतर ते कश्यप प्रजापति मोठ्या

वालखिल्यानें इंद्राला म्हणाले कीं, " ते तुला साह्य करणार महापराक्रमी असे बंधुच होतील. ह्याकरितां, हे इंद्रा ! तुझ्याकडून त्यांना कधींही अपाय घडूं नये. आतां, इंद्रा, ह्या इंद्रपदावर तूंच कायम राहशील. ह्याकरितां, मनांतील राग आतां सोडून दे; आणि ह्यापुढें ब्रह्मवेत्त्यांचा कधींही उपहास करीत जाऊं नको. जे अतिशय रागीट असून शापवाणीरूप वज्र ज्यांच्या हातांत असतें, त्यांचा गर्वानें अपमान करणें तुला योग्य नाहीं."

ह्याप्रमाणें कश्यपानीं भाषण केल्यावर तो इंद्र निर्धास्त होऊन स्वर्गाला निघून गेला, व विनताही आपले मनोरथ सिद्धीस गेले म्हणून आनंदित झाली. नंतर तिला अरुण व गरुड असे दोन पुत्र झाले. त्यांपैकीं, शरिरानें व्यंग असलेला अरुण हा सूर्याचा सारथि झाला; आणि दुसऱ्या—गरुडाला ब्रह्मदेवानें पक्ष्यांच्या प्रमुखत्वाचा अभिषेक केला. हे भृगुनंदना ! असा जो महापराक्रमी गरुड, त्यानें केलेलें महत्कृत्य आतां तूं श्रवण कर.

अध्याय बत्तिसावा.

-:०:--

गरुडाचें व देवांचें युद्ध.

सौति म्हणालाः—हे विप्रवर्य हो ! अशा प्रकारें देवसेना संग्रामाला सिद्ध झाली असतां, पक्षिराज गरुडही तत्काल देवांपुढें जाऊन उभा राहिला. त्या महाबलाढ्य गरुडाला पहातांच देवांची अगदीं गाळण झाली. ते भयानें अगदी थरथर कांपूं लागले. त्यामुळें त्यांच्या हातांत असलेलीं शस्त्रें एकमेकांवर आदळूं लागलीं ! त्यांत, केवळ अलोट बुद्धीचा, अग्नि किंवा विद्युल्लता ह्यांच्यासारखा तेजःपुंज, आणि अत्यंत पराक्रमी असा 'विश्वकर्मा' ह्या नांवाचा एक अमृताचा संरक्षक होता. त्याचें आणि पक्षिराज गरुडाचें एक मुहूर्तभर तुमुल युद्ध झालें. त्यामध्यें त्याला गरुडाच्या चोंचीच्या, नखांच्या व पंखांच्या जखमा लागून त्या युद्धामध्यें तो विव्हळ होऊन पडला. नंतर त्या गरुडानें आपल्या पंखांच्या वायूनें इतका कांहीं धुरळा उडवून दिला कीं, सर्व लोक निखालस आंधळे होऊन गेले, आणि देवांच्या तर नाकांतोंडांतून धुरळाच भरून राहिला. अशा प्रकारें देवांना त्या धुळीनें अगदीं घाबरें केल्यामुळें ते भांबावले; आणि त्यांच्या सभोंवार जिकडे तिकडे धूळच धूळ भरून राहिल्यामुळें, अमृताचे रक्षक होते तेही त्यांस दिसतनासे झाले. अशा प्रकारें त्या गरुडानें स्वर्गामध्यें धुळीचा अगदीं कहर करून सोडला, आणि पखांनीं व चोंचीनें बोचून बोचून देवांना अगदीं फाडफाडून घेतलें. तेव्हां इंद्रानें लवकर वायूला हाक मारून आज्ञा केली कीं, 'हे वायो, हा धुळीचा वर्षाव बंद करून टाक. कारण तें काम तुझें आहे.'

इंद्रानें ह्याप्रमाणें सांगितल्यानंतर त्या बलशाली वायूनें तो सर्व धुरळा नाहींसा करून टाकला. धुरळा नाहींसा होतांच अंधारही नाहींसा झाला. तेव्हां देवांनीही गरुडावर हल्ला करण्यास सुरवात केली. जगड्व्याळ मेघ आकाशामध्यें ज्याप्रमाणें गर्जना करतो, त्याप्रमाणें त्या बलवान गरुडानें मोठी गर्जना केली; आणि देव ज्याच्यावर मारा करीत आहेत असा सर्व प्राणिमात्रास गर्भगलित करून टाकणारा तो महापराक्रमी पक्षिराज गरुड आकाशामध्ये उडाला, तेव्हां आकाशांत देवांच्या वर असलेल्या त्या गरुडावर कवचें धारण केलेल्या इंद्रासहवर्तमान सर्व देवांनीं मिळून एकदम पट्टे, परिघ, शूल, गदा, अर्धचंद्र बाण, सूर्यासारखीं जळजळीत असणारीं चक्रें इत्यादि नानाप्रकारचीं शस्त्रें सोडून त्याला अगदीं वेढून टाकलें. आपल्या सभोंवार अशा प्रकारच्या असंख्य घातक शस्त्रांचा सारखा वर्षाव होत असतांही, घनघोर युद्ध करणारा तो गरुड यत्किंचितही डगमगला नाहीं. आकाशाला केवळ जा-

ळीत असणारा महापराक्रमी जो गरुड, त्यानें आपल्या पंखांनीं व छातीनें धक्के देऊन देवांची अगदीं दाणादाण करून दिली. गरुडाच्या नखांनीं व पंखांनीं झालेल्या जखमांतून भळभळां रक्त वाहत असलेले ते देव गरुडाच्या मारानें जर्जर होऊन दाही दिशांनीं पळत सुटले! पक्षिराजानें पराजित केलेले साध्य नामक देव गंधर्वासहवर्तमान पूर्वेकडे पळूं लागले; रुद्रासहवर्तमान अष्टवसूंनीं दक्षिणेचा मार्ग धरला; वारंवार गरुडाशीं सामना देऊन नेटानें लढणाऱ्या महाबलाढ्य अशा द्वादशादित्यांनीं पश्चिम दिशा सुधारली; आणि अश्विनीकुमारांनीं उत्तर दिशेला आश्रय दिला! ह्यानंतर वीर अश्वक्रंद, रेणुक, शूरक्रथन, तपन, उलुक, श्वसन, निमेष, प्ररुज आणि पुलीन ह्या नऊ यक्षांशींही त्या आकाशगामी पक्षिराजानें रणसंग्राम केला. प्रळयकाळच्या वेळीं खवळलेल्या रुद्राप्रमाणें त्या शत्रुतापन गरुडानें त्यांनाही नखांच्या व चोंचीच्या टोंकानें जखमी केलें. मोठे बलशाली व धैर्यशाली असे जे यक्ष, त्यांच्या आंगाला चाळणीप्रमाणें भोंकें पडून जेव्हां सारखें रक्त वाहूं लागलें, तेव्हां ते रक्ताचा वर्षाव करणारे मेघच आहेत कीं काय असें वाटूं लागलें! ह्याप्रमाणें तो पक्षिराज गरुड सर्वांचा वध करून अमृत आणण्याकरितां निघाला, तों जिकडे तिकडे त्याला अग्निच दिसूं लागला. त्रैलोक्यास दग्ध करणाऱ्या सूर्याप्रमाणें त्याच्या प्रज्वलित झालेल्या ज्वाला प्रचंड वायूनें भडकल्या होत्या; आणि त्यांच्या योगेंकरून चहूंकडून आकाश भरून गेलें होतें. तें पाहून महात्म्या तपस्वी गरुडानें शेंकडों मुखें धारण करून, शेंकडों मुखांनीं शेंकडों नद्या प्राशन करून टाकल्या; आणि फिरून लागलाच तो त्या ठिकाणीं आला, व त्या प्रज्वलित झालेल्या अग्नीवर त्या नद्यांचें दडपण घालून त्याला अगदीं होता कीं नव्हता असें करून टाकलें; आणि तो सर्व अग्नि विझल्यावर त्या अमृताजवळ जाण्याकरितां त्यानें फिरून लहानसें स्वरूप धारण केलें.

अध्याय तेहतिसावा.

—:०:—

गरुडाचें अमृतासह उड्डाण.

सौति म्हणाला:—त्या पक्ष्यानें सुवर्णमयी सूर्यकिरणांप्रमाणें देदीप्यमान समुद्रांत घुसणाऱ्या ओघाप्रमाणें अमृताजवळ मुसंडी दिली. परंतु त्या अमृताच्या भोंवतीं एक तीक्ष्ण धारेचें चक्रासारखें लोखंडाचें यंत्र असलेलें त्याच्या दृष्टीस पडलें. त्या यंत्राला तीक्ष्ण धारेचे हजारों वस्तरे लावलेले असून तें वेगानें एकसारखें फिरत होतें. तें सूर्य किंवा अग्नि ह्यांसारखें धगधगत असून, कोणी अमृत नेऊं लागला तर त्याचे तुकडे तुकडेच व्हावयाचे, इतकें तें भयंकर होतें. देवांनींही तेवढ्या कामाकरितांच महत्प्रयासानें तें घातक यंत्र तयार करून ठेविलें होतें. त्या पक्ष्यानें बराच वेळ त्या यंत्राभोंवतीं घिरट्या घालून त्या यंत्राच्या आंत काय आहे तें नीट न्याहाळून पाहिलें, आणि मग एकाएकीं अत्यंत सूक्ष्म रूप धारण करून त्याच्या आरांतूनच हां हां म्हणतां तो आंत शिरला. त्या चक्राच्या खालीं गरुड जातो न जातो तों, तेथें अमृताच्या संरक्षणाकरितां मुद्दाम ठेवलेले दोन मोठमोठाले भुजंग त्याच्या दृष्टीस पडले. ते पेटलेल्या अग्नीप्रमाणें जाज्वल्य होते. त्यांच्या जिव्हा विजेसारख्या चपळ व तेजस्वी असून मुखें व नेत्र ही देदीप्यमान दिसत होतीं. त्यांच्या डोळ्यांत विष भरलेलें असून ते मोठे भयंकर व सदासर्वदा क्रुद्ध झालेले असून मोठे चपळ होते. त्यांचे नेत्र सदासर्वदा लालबुंद असून डोळ्यांची पापणीही लवत नसे. त्या दोघांपैकीं एका सर्पानें जरी कोणाकडे पाहिलें, तरी त्याचें तत्काल भस्म होऊन जात असे! त्यांना पहातांच गरुडानें एकाएकीं

धूळ उडविली, आणि तिनें त्यांचे डोळे अगदीं भरून टाकले; व आपण त्यांस दिसेनासा झाल्यावर त्यांच्यावर चहूंकडून एकसारखा मारा चालू केला; आणि त्या आकाशांत संचार करणाऱ्या गरुडानें त्यांच्या अंगावर झडप घालून त्यांचे तुकडे तुकडे केले; आणि मोठ्या वेगानें तो मध्यभागीं असलेल्या अमृताच्या जवळ गेला! नंतर त्या बलाढ्य व पराक्रमी गरुडानें तें यंत्र मोडून टाकलें, आणि अमृताचा घट उपटून काढून तो झटकर उडून गेला. सारें अमृत हस्तगत झालें तरी सुद्धां त्यांतील एक बिंदुही प्राशन न करतां तें घेऊन गरुड झटकर बाहेर निघाला, आणि इतकें करण्यांत त्याला यत्किंचितही श्रम पडले नाहींत. हें सारें कृत्य त्यानें केवळ लीलेनेंच केलें, आणि सूर्याच्या प्रभेलाही आपल्या तेजानें मागें सारून तो आकाशामध्यें उडाला.

गरुडाची व महाविष्णूंची भेट.

इतक्यांत तेथें—त्या आकाशांत—त्याची व महाविष्णूंची गांठ पडली. तेव्हां त्याचें तें निर्लोभाचें कृत्य पाहून नारायण त्याच्यावर प्रसन्न झाले; आणि ते अक्षय्य असणारे भगवान नारायण त्या पक्ष्याला म्हणाले कीं, "मी तुला वर देण्यास सिद्ध आहें." तेव्हां त्या पक्ष्यानें "मी तुझ्यावर असावें" असा वर मागितला; आणि तो पुनः नारायणास असें म्हणाला कीं, "हे भगवन्! मीं अमृतावांचूनच अजरामर व्हावें." हें त्याचें भाषण श्रवण करून विष्णु त्या गरुडाला म्हणाले कीं, "त्याप्रमाणेंच होईल." ते विष्णूनें दिलेले दोन वर ग्रहण केल्यानंतर गरुडही विष्णूस म्हणाला कीं, "मीही आपल्यास वर देतों. आपण भगवान आहां, तरी त्याचा स्वीकार करावा." तेव्हां त्या बलाढ्य गरुडापाशीं "तूं आमचें वाहन हो" असा विष्णूंनीं वर मागितला, आणि त्या भगवंतांनीं "तूं ध्वजावर राहशील" असें सांगून आपल्या ध्वजावर त्याची योजना केली.

तेव्हां त्या देवाधिदेव नारायणाला 'तथास्तु' असें म्हणून, वेगामध्यें वायूशींही स्पर्धा करणारा तो गरुड मोठ्या वेगानें चालता झाला.

गरुडाचें व इंद्राचें सख्य.

तो पक्षिराज गरुड अमृत घेऊन चालला असतां इंद्रानें रागारागानें त्या पक्षिश्रेष्ठावर वज्राचा प्रहार केला. परंतु तो वज्राघात जणू काय झालाच नाहीं, अशा रीतीनें सहन करून तो पक्षिश्रेष्ठ गरुड गालांतल्या गालांत हसून सौम्य शब्दांनीं इंद्राला म्हणाला, "हे इंद्रा! ज्या ऋषीच्या अस्थींपासून हें वज्र झालेलें आहे, त्या ऋषींचा, ह्या वज्राचा, व तुझाही मी मान राखतों; आणि माझें एक पीस मी येथें टाकून देतों. पण त्याचा तुला अंतही लागणार नाहीं. तुझ्या वज्राच्या आघातानें मला यत्किंचितही इजा झालेली नाहीं." असें बोलून त्या पक्षिराजानें आपलें एक पीस काढून तें टाकून दिलें. तें पीस इतकें सुंदर व मनोरम होतें कीं, त्याला दुसरी उपमाच नाहीं. तें सुंदर पीस पहातांच सर्व प्राणिमात्रास अत्यानंद झाला; व हें पीस इतकें उत्तम आहे, ह्या अर्थीं हा सुपर्ण—उत्तम पंखांचा—होवो, असें म्हणून त्यांनीं त्याचें "सुपर्ण" असेंच नांव ठेवलें. हा विलक्षण चमत्कार पाहून इंद्राला वाटलें कीं, हा कांहीं पक्षी नव्हे, तर हें एक महद्भूतच निर्माण झालेलें आहे. तेव्हां तो त्यास म्हणाला, "हे पक्षिवर्या, तुझें जें परमावधीचें बळ असेल, तें जाणण्याची मला उत्कंठा लागली आहे; व तुझ्याशीं निरंतर सख्य ठेवावें अशी माझी इच्छा आहे."

अध्याय चौतिसावा.

—:०:—

इंद्रगरुडसंवाद.

गरुड म्हणाला:—हे देवा पुरंदरा, तुझ्या इच्छेप्रमाणें माझें तुझ्याशीं सख्य राहील. आतां

माझें मोठें असह्य बळ किती आहे, तें ऐकण्याची तुला इच्छा आहे, तर तेंही श्रवण कर. हे शंभर यज्ञ करणाऱ्या इंद्रा! खरोखर, सज्जन आहेत ते आपल्या शरीरसामर्थ्याची, किंवा बुद्धिसामर्थ्याची स्तुति करीत नाहींत. किंवा आपल्या गुणांचे पवाडे गायलेलेही त्यांना आवडत नाहींत. परंतु, इंद्रा! तूं मला मित्र करून घेतलेंस; आणि आतां मित्रत्वाच्या नात्यानेंच तूं मला विचारीत आहेस, म्हणूनच तें मी तुला सांगतों. कारणावांचून आत्मस्तुति करणें बरें नव्हे. इंद्रा! फार काय सांगूं? परंतु हे सारे पर्वत, झाडून सारीं अरण्यें, हे भरलेले चट सारे समुद्र, हेंचसें काय? पण तुझ्यासहवर्तमान ही सारी पृथ्वी मी माझ्या एकाच पंखावर वाहून नेईन! इतकेंच नव्हे, तर स्थावरजंगमात्मक सारे लोक जरी एके ठिकाणीं केले, तरी तेही मी उचलीन. आणखी चमत्कार हा कीं, ते उचलतांना मला यत्किंचितही श्रम पडणार नाहींत. इतकें माझें बळ आहे, हें तूं लक्षांत ठेव."

सौति म्हणतोः—हे शौनकादि मुनिवर्यहो, असें भाषण करणाऱ्या त्या शूर वीर गरुडाला, सर्व लोकांचें हित करणारा, सर्वांचा प्रभु व सर्व ऐश्वर्यवंतांमध्यें अग्रगणी असा जो देवेंद्र तो म्हणाला, "तूं म्हटलेंस तें अगदीं यथार्थ आहे. तूं सांगितलेंस तें तें सारें तुझ्यामध्यें असणारच यांत संशय नाहीं. तर आतां ह्या माझ्या अत्युत्तम मैत्रीचाही तूं स्वीकार कर; आणि अमृताचें तुला जर कांहीं कारण नसेल, तर तें मला परत दे. कारण, तूं हें ज्यांना नेऊन देणार, ते आम्हांला अत्यंत पीडा देतील."

इंद्राचें हें भाषण ऐकून गरुड म्हणाला, "मी हें अमृत थोडयाशा कामाकरितां नेत आहें. पण तें मी कोणालाही प्यावयास देणार नाहीं. तर, हे सहस्रनेत्रा, तें मी ज्या ठिकाणीं ठेवीन, तेथून, हे स्वर्गाधिपते, तूं मोठ्या शिताफीनें हरण करून आण." तेव्हां इंद्र म्हणाला, "हे पक्ष्या! तूं आतां जी युक्ति मला सांगितलीस, ती ऐकून मी तुझ्यावर प्रसन्न झालों आहें. तर, हे पक्षिश्रेष्ठा! तुझ्या इच्छेस येईल तो वर तूं माझ्यापासून मागून घे."

ह्याप्रमाणें इंद्रानें गरुडास सांगितलें, तेव्हां त्याला कद्रुपुत्रांचें स्मरण होऊन व मातेच्या दास्यत्वासाठीं केलेलें कपट मनांत उभें राहून त्यानें इंद्राला प्रत्युत्तर दिलें कीं, "हे इंद्रा! मीही सर्वसमर्थ आहें. पाहिजे तें करण्याचें माझ्या अंगीं सामर्थ्य आहें. तरी, तूं ज्या अर्थी वर देण्यास तयार झाला आहेस, त्या अर्थी, मदोन्मत्त झालेले भुजंग माझें भक्ष्य व्हावे." ह्यावर 'तथास्तु' असें म्हणून तो दैत्यनाशक इंद्र, महात्मा व योगीश्वर जो श्रीहरि त्याच्याकडे गेला; आणि त्याची अनुज्ञा घेऊन गरुडानें मागितलेल्या त्यानें गोष्टीस अनुमोदन दिलें; आणि पुनः तो भगवान स्वर्गाधिपति इंद्र त्याला म्हणाला, "हे गरुडा! तूं ठेवलेलें अमृत मी हरण करून आणीन."

सर्पांच्या तोंडाला पानें पुसलीं!

ह्याप्रमाणें इंद्राचें भाषण श्रवण केल्यावर तो गरुड मोठ्या त्वरेनें आपल्या मातेजवळ आला; आणि जणूं काय मोठा आनंदच झाला आहे असें दाखवून तो त्या सर्पांस म्हणाला, "हें आणलेलें अमृत मी येथें ह्या दर्भांवर ठेवतों. हें तुमचें आहे बरें. सर्पांनो! तुम्ही स्नान करून व मंगल पदार्थ ग्रहण करून नंतर तें प्राशन करा; आणि मी जातेवेळीं तुम्हीं बसून जें बोललां, त्याप्रमाणें आजपासून ही माझी माता 'तुमच्या दास्यत्वापासून मुक्त होऊं द्या. कारण, तुम्ही सांगितल्याप्रमाणें मी तुमचें म्हणणें शेवटास नेलें आहें." ह्यावर "फार उत्तम आहे." असें उत्तर देऊन ते सर्प स्नानाला निघून गेले. इकडे इंद्रही ती संधि साधून तेथें आला, आणि तेथें असलेलें अमृत घेऊन पुनः स्वर्गास निघून

गेला. नंतर, अमृताकरितां हापापलेले सर्प स्नान करून, जपजाप्य आटपून व मंगळ पदार्थासहवर्तमान मोठ्या आनंदानें, आतां आपल्याला अमृत प्राशन करावयास मिळेल, असें मनांत म्हणत, जेथें दर्भावर अमृत ठेविलें होतें, त्या ठिकाणीं आले, आणि पाहतात तों तें तेथून कोणीं चोरून नेल्याचें दिसून आलें. तेव्हां आपण जसें पूर्वी कपट केलें होतें, तसेंच कपट करून आपणांस ठकविल्याचें त्यांस दिसून आलें. तेव्हां आतां अमृत ठेविलेली जागा हीच; ही तरी चाटावी, असा विचार करून त्यांनीं ते दर्भच चाटले ! पण तशा करण्यानें [दर्भास धार असल्याकारणानें] त्या सर्पांच्या जिव्हा मात्र कापून दुभंग झाल्या ! व त्या ठिकाणीं अमृताचा स्पर्श झाल्यामुळें, तेथें असलेले दर्भही अमृतमयच झाले ! ह्याप्रमाणें तेथें आणलेलें अमृत तर इंद्र घेऊन गेलाच; आणि त्या महात्म्या गरुडानें त्या सर्पांना द्विजिव्ह करून सोडलें, हें वर. इतकें झालें तेव्हां, मातेसहवर्तमान त्या गरुडाला परम आनंद होऊन तो त्या अरण्यामध्यें विहार करूं लागला. तो भुजंगांस भक्षण करून आपला निर्वाह करीत असे. इतर सर्व पक्षीही त्यास मोठा मान देऊं लागले. त्याच्या कीर्तीला कधींच न्यूनता आली नाहीं; आणि आपली माता जी विनता तिला तो परमानंद देऊं लागला.

कथेची फलश्रुति.

ही कथा जो कोणी पुरुष निरंतर श्रवण करील, किंवा ब्राह्मणांच्या मुख्य समाजामध्यें जो कोणी पठन करील, तो पुण्यवान पुरुष महात्म्या पक्षाधिपति गरुडाच्या गुणसंकीर्तनामुळें निःसंशय स्वर्गाला जाईल.

अध्याय पसतिसावा.

—:०:—

सर्पनामकथन.

शौनक म्हणतातः—हे सूतपुत्रा, आईनें व विनतेचा पुत्र जो गरुड त्यानें सर्पांना शाप कां दिला, तें त्वां सांगितलें. तसेंच कद्रू आणि विनता ह्यांस त्यांच्या भर्त्यानें दिलेला वर, व विनतेचे पुत्र जे पक्षी त्या दोहोंचींही नांवें तूं निवेदन केलीस. परंतु, हे सूतपुत्रा, सर्पांचीं नांवें तू सांगितलीं नाहींस. तीं–निदान त्यांतलीं मुख्य मुख्य तरी–आम्हांला ऐकावयास मिळावीं, अशी आमची इच्छा आहे.

सौति म्हणतोः—हे तपोधना, सर्प पुष्कळच प्रकारचे आहेत. त्या सगळ्यांचींच नांवें मी कांहीं सांगत नाहीं. परंतु त्यांतलीं मुख्य मुख्य सांगतों, तेवढीं ऐकून घ्या. प्रथमतः शेष जन्मास आला. त्यानंतर वासुकि, ऐरावत व तक्षक, तसेंच कर्कोटक, धनंजय, कालिय, मणिनाग, आपूरण, पिंजरक, एलापत्र, वामन, नील, अनील, कल्माष, शबल, आर्यक, उग्रक, कलशपोतक, सुमन, तसाच दधिमुख, विमलपिंडक, आप्त, कर्कोटक, शंख, वालिशिख, निष्टानक, हेमगुह, नहुष, पिंगल, बाह्यकर्ण, हस्तिपद, मुद्गरपिंडक, कंबल, अश्वतर, कालीयक, वृत्त व संवर्तक नांवाचे दोन नाग ज्यांना पद्म अशी संज्ञा आहे ते, शंखमुख, कूष्मांडक, क्षेमक, पिंडारक, करवीर, पुष्पदंष्ट्र, बिल्वक, बिल्वपांडुर, मूषकाद, शंखशिरा, पूर्णभद्र, हरिद्रक, अपराजित, ज्योतिक, श्रीवह, कौरव्य, धृतराष्ट्र व वीर्यवान असा शंखपिंड, विरजा, सुबाहु, व वीर्यशाली असा शालिपिंड, हस्तिपिंड, पिठरक, सुमुख, कौणपाशन, कुठर, कुंजर, प्रभाकर, कुमुद, कुमुदाक्ष, तित्तिरि हलक, कर्दम, बहुमूलक, कर्कर, अकर्कर, कुंडोदर, महोदर इत्यादि मुख्य मुख्य सर्प मीं नि

वेदन केले. हे द्विजवर्य, त्यांहून इतर पुष्कळच पुढें असल्यामुळें त्यांचीं नांवें मीं सोडून दिलीं आहेत. त्यांजपासून जन्मलेले व आणखी त्यांची जन्मलेली प्रजा ह्यांची तर मोजदादच होणें कठिण. म्हणून, हे तपोनिधे, मी ती सांगत बसत नाहीं. येथें सहस्रावधि, लक्षावधि—नव्हे कोट्यवधि सर्प असल्यामुळें त्या सर्वांचीं नांवें सांगतां येणें कठिणच आहे.

अध्याय छत्तिसावा.

—:०:—

शेषाचा वृत्तांत.

शौनक ऋषि प्रश्न करतातः—हे सूतपुत्रा! वीर्यशाली व जिंकण्यास कठिण असे हे सर्प तूं सांगितलेस खरे; परंतु पुढें त्यांनीं तें शापवचन ऐकिल्यानंतर काय बरें केलें?

सौति सांगतोः—त्यांतला महान यशस्वी सर्प जो भगवान शेष, त्यानें कद्रूचा त्याग करून व वायु भक्षण करून घोर तप आरंभिलें, आणि गंधमादन पर्वत, बदरिकाश्रम, गोकर्ण, पुष्करारण्य, त्याचप्रमाणें हिमालय पर्वताच्या आसपास असलेलीं तीं तीं नानाप्रकारचीं पुण्यक्षेत्रें व तीर्थें ह्या स्थानीं जाऊन तो नियमशील, सदोदीत जितेंद्रिय व एकांतप्रिय अशा व्रतानें तपाचरण करण्यांत अगदीं गढून गेला. नंतर मांस, त्वचा व स्नायु हीं अगदीं सुकून गेलीं आहेत, आणि ज्यानें जटा व वल्कलें धारण केलीं आहेत, असें हें घोर तप आचरण करीत असलेला तो शेषरूप मुनि ब्रह्मदेवाच्या अवलोकनांत आला. तेव्हां ब्रह्मदेव त्या सत्यनिष्ठ तपोव्रताला म्हणाला, "हे शेषा, अरे! हें तूं काय आरंभिलें आहेस? लोकहिताकडे कांहीं पहा! हे पुण्यपुरुषा! उलट आपल्या प्रखर तपोव्रतानें तूं लोकांना तापवीत आहेस. अरे बाबा! तुझ्या हृदयांत असा हेतु तरी कोणता खेळत आहे तें मला एकवार कळूं दे."

शेष म्हणतोः—एकाच खाणींत जन्मलेले हे माझे सर्व भाऊ अगदीं मूढ आहेत. मला त्यांच्यांत मिळून मिसळून रहावेंसें वाटत नाहीं. तरी, भगवन्, ह्यास आपली अनुमति असावी. हे सदासर्वदा एखाद्या वैऱ्यासारखे एकमेकांवर जळफळत असतात. त्यांचें तोंड सुद्धां पाहूं नये म्हणून मीं हें तप आरंभिलें आहे. विनता व तिचे पुत्र ह्या उभतांसही ते अगदीं पाण्यांत पाहत असतात. तसाच विनतेचा पुत्र गरुड पक्षी हा माझा आणखी एक भाऊ आहे, त्याला हे कधींच बरें पहात नाहींत; आणि पित्याच्या म्हणजे महात्म्या कश्यप ऋषींच्या वरप्रसादानें तो तर ह्यांना भारी होऊन बसला आहे ह्याकरितां, ही कुडी सोडल्यावर तरी ह्यांचा संग होणार नाहीं म्हणून मी तपाचरण करून देहत्याग करूं इच्छीत आहें.

शेषाचें हें भाषण ऐकून ब्रह्मदेव म्हणतात, "हे शेषा, तुझे सर्व भाऊ कसे वागतात, तें मी जाणून आहें. आईच्या अपराधामुळें तुझ्या भावांना मोठें संकट उद्भवलें आहे; आणि, हे भुजंगा, त्याच्या परिहाराची योजनाही पूर्वीच झालेली आहे. तर, हे शेषा! तूं आपल्या एकाही भावाकरितां मनाला इतकें लागून घेऊं नको; व तुला हवा असेल तो वर मजकडून मागून घे. तूं आज मागशील तो वर मी तुला देईन. माझें तुझ्यावर अतिशयित प्रेम आहे. हे पन्नगश्रेष्ठा! तुझी बुद्धि धर्माच्या ठिकाणीं गढली हें फार उत्तम झालें; व ती दिवसानुदिवस अशीच अधिकाधिक धर्मामध्यें स्थिर होत जावो!"

शेष उत्तर करितोः—हे पितामहा प्रभो! मला ह्या एकाच वराची इच्छा आहे. तो कोणता म्हणून म्हणाल तर, हे ईश्वरा! धर्म, मनःशांति, व तपाचरण ह्यांमध्येंच माझी बुद्धि अखंड रमलेली असो.

ब्रह्मदेव म्हणतातः—हे शेषा! तुझें इंद्रियदमन व मनःशांति हीं पाहून मी फार संतुष्ट झालों आहें.

तर आतां मी तुला एक लोककल्याणाची गोष्ट सांगतों, ती ऐक. बाबारे! पर्वत, अरण्यें, उपवनें, समुद्र, गांवें, नगरें इत्यादि धारण केलेली जी ही पृथ्वी, ती फार डळमळत आहे, तर तिला चांगली सावरून ती नीट स्थिर राहील असा तिला टेंका देऊन रहा.

शेष म्हणतो—प्रजापति, पृथ्वीपति, भूतपति व जगत्पति असे जे आपण ब्रह्मदेव वरदवंत होऊन मला ही आज्ञा करीत आहां, तीप्रमाणें, ही पृथ्वी स्थिर राहील अशा प्रकारें मी तिला धारण करितों. हे प्रजापते! ती उचलून माझ्या डोकीवर द्या.

ब्रह्मदेव म्हणतात:—हे सर्पश्रेष्ठा! तूं पृथ्वीच्या तळाशीं जा. म्हणजे ती तुला आपण होऊनच विवरमार्ग करून देईल. हे शेषा! तूं ही पृथ्वी एकदा धारण केलीस म्हणजे माझें एक मोठें प्रिय कार्य केल्यासारखें होणार आहे.

सौति म्हणतो:—ऋषीहो, ब्रह्मदेवाच्या त्या आज्ञेनुरूप तो सर्पश्रेष्ठ, वासुकीचा वडील बंधु व भूमंडळाचा स्वामी शेष पृथ्वीनें केलेल्या विवरांत जाऊन पृथ्वीचे तळाशीं राहिला आहे, व त्यानें ही समुद्रवलयांकित पृथ्वीरूप देवी सर्व बाजूंनीं नीट सावरून शिरावर धारण केली आहे.

ब्रह्मदेव म्हणतात:—हे सर्पश्रेष्ठा! हा एकंदर भूगोल तूं ज्या अर्थी आपल्या असंख्य फडांनीं सावरून शिरावर धारण केला आहेस, त्या अर्थी, मी किंवा इंद्र ज्याप्रमाणें धर्मप्रभु आहों, त्याचप्रमाणें तूंही एक धर्मप्रभु होस.

सौति म्हणतो:—अशा प्रकारें त्या पराक्रमी भुजंगश्रेष्ठ शेषानें एकट्यानें ब्रह्मदेवाच्या आज्ञानुरूप पृथ्वी मस्तकीं धारण करून पाताळीं वास केला आहे, असें म्हणतात. त्यानंतर, देवांमध्यें श्रेष्ठ असे जे भगवान ब्रह्मदेव, त्यांनीं गरुडास (विनतेच्या दुसऱ्या पुत्रास) शेषाच्या साह्यार्थ दिलें.

अध्याय सदतिसावा.

—:०:—

सर्पांचे शापनिवारणार्थ चाललेले बेत.

सौति म्हणाला:—ऋषीहो, इकडे, सर्पांत श्रेष्ठ जो वासुकि, त्यास, आईचा तो शाप ऐकल्यापासून, ह्या शापाची निवृत्ति कशी होईल हा मोठा विचार पडला. ह्यास्तव, ऐरावत आदिकरून आपले एकुणएक बंधु जमवून त्यानें सर्वतोपरी ह्या गोष्टीचा खल चालू केला.

वासुकि म्हणाला:—हे पवित्र बंधुहो! हा शाप कशा हेतूनें देण्यांत आला आहे, हें सर्व तुम्हांला विदित आहेच; तेव्हां आपण ह्या शापाच्या निवारणाचा विचारपूर्वक प्रयत्न करूं. इतर कोणत्याही शापावर तोड म्हणून असतेच; परंतु मातृशाप झालेल्यांस कोठेंच सुटणूक नाहीं. सनातन, अगाध व सत्यस्वरूप असे जे ब्रह्मदेव, त्यांच्या देखत शाप दिला हें ऐकून तर माझ्या हृदयानें ठाव सोडला आहे. ज्या अर्थी सनातन ब्रह्मदेवांनीं त्या शापाला कांहींच प्रतिबंध केला नाहीं, त्या अर्थी आपल्या सर्वांचा विनाशकाल समीप आला आहे, यांत कांहीं शंका नाहीं. याकरितां, आतां सर्व सर्पांच्या हिताचा कांहीं तरी विचार योजिला पाहिजे. ही आपली चालढकल कांहीं कामाची नाहीं. आपण सर्व बुद्धिवंत व विचारी आहों. प्राचीन काळीं ज्याप्रमाणें देवांनीं गुप्त ठिकाणीं लपून बसलेला अग्नि शोधून काढिला, त्याचप्रमाणें विचारांतीं शापनिवारणाची कांहीं तरी युक्ति आपल्यास दिसून येईल. म्हणजे, जनमेजय राजाचें सर्पविनाशक सत्र मुळीं नच होईल, किंवा होऊं लागलेंच तर त्यास मध्येंच कांहीं तरी खो बसेल, अशा तऱ्हेची मसलत आपणांस योजिली पाहिजे.

सौति म्हणतो:—वासुकीचें हें भाषण ऐकून, मसलत देण्यांत निपुण असे ते सगळे कद्रूचे पुत्र एकेठायीं जमून एकमतानें मसलत योजूं लागले:

त्यांतील कांहीं म्हणूं लागले, "आपण ब्राह्मणवेष धारण करून जनमेजय राजापाशीं जाऊन याचना करूं कीं, राजा, तुझा यज्ञ न होवो." यावर, त्या सर्पांत कित्येक पंडित होते ते म्हणाले कीं, "आपण सर्वजण त्याचे सल्लामसलतगार होऊन त्याच्या गळ्यांतील ताईत बनूं, म्हणजे जनमेजय राजा आपणांस हरएक कामांत हें कसें ठरवावयाचें म्हणून सल्ला विचारील, व मग आपण यज्ञास खो येईल अशी कांहीं मसलत सांगूं. आपण त्याच्या मर्जीस उतरलों म्हणजे तो बुद्धिवानांत श्रेष्ठ असा राजा यज्ञासंबंधानें आपण होऊनच आम्हांस प्रश्न करील, म्हणजे आपण साफ नन्नाचा पाढा वाचूं; आणि इहपरलोकीं उत्पन्न होणारीं पुष्कळच भयंकर संकटें व तो यज्ञ न करण्याचे हेतु व कारणें हीं राजाच्या निदर्शनास आणून देऊं. किंवा, हें सर्पसत्र चालविण्यांत जो पुरा माहितगार, व राजकल्याणाविषयीं तत्पर असा जो कोणी उपाध्याय होणार असेल, त्यालाच जाऊन कोणा एखाद्या सर्पानें दंश करून तो मरेल असें करावें; म्हणजे याजक नाहींसा झाल्यावर त्या यज्ञावरही पण पाणी पडेल. तसेंच, आणखीही जे कोणी सर्पसत्रांतले जाणते म्हणून ऋत्विज असतील, त्या सर्वांनाही दंश केला म्हणजे आपण कृतकार्य होऊं."

दुसरे कांहीं धर्मशील सदय अंतःकरणाचे सर्प होते ते म्हणाले:—छे! छे! ही तुमची दुर्बुद्धि होय. ब्राह्मणाची हत्या करणें उचित नाहीं. उत्तम व सन्मान्य धर्मास अनुसरून संकट निवारण करणें हा उत्तम मार्ग होय. अधर्मानें वागू लागल्यास दिवसानुदिवस सारें जगच अस्तास जाण्याची वेळ येईल."

ह्यावर आणखी कांहीं सर्प म्हणूं लागले, "आपण विजेसह मेघाचें रूप घेऊन यज्ञकुंडांत पेटलेला अग्नि मेघवृष्टि करून पार नाहींसा करूं."

दुसरे कांहीं श्रेष्ठ सर्प म्हणूं लागले:—आपण रात्रीचें जावें, आणि याज्ञिकाचें चित्त दुसऱ्या कशांत वेधलें आहे असें पाहून, स्रुचीसारखीं यज्ञांतलीं भांडींच झटकन् लांबवावीं म्हणजे यज्ञांत खो आलाच! नाहीं तर असें करावें कीं, यज्ञमंडपांत जाऊन तेथल्या सहस्रावधि लोकांना डसावें, म्हणजे आपला सर्वच त्रास चुकला! किंवा सर्पांनीं जाऊन पक्कान्नांचे सर्व पदार्थ मलमूत्रोत्सर्गानें अमंगल करून ठेवावे, म्हणजे सर्व तयार केलेल्या अन्नाचें मातेरें उडेल. नंतर त्यांतले इतर कांहीं सर्प म्हणूं लागले:—आपण त्या सत्रांत ऋत्विजाचाच वेष धरून जाऊं, व राजास दक्षिणा मागून यज्ञांत बाध आणूं; आणि ऋत्विजाची मर्जी संपादून तो एकदा आमच्या हातचें बाहुलें बनला, कीं आपणांस हवें तेंच तो करील.

नंतर आणखी कोणी म्हणूं लागले कीं, "जनमेजय राजा जलक्रीडेला आला कीं त्याला घरीं धेऊन पेऊं व बांधून ठेवूं; म्हणजे मुळीं सारें सत्रच आटोपलें!" त्यावर, त्यांतलेच पंडितंमन्य असे कांहीं भुजंग म्हणूं लागले:—आपण त्यासच धरून लगोलग दंश करावा, म्हणजे आपला कार्यभाग उरकला, आणि तो गेला म्हणजे त्याबरोबरच अनर्थाचें मूळही पण तोडून टाकलें, असें झालें! नंतर सगळेच सर्प, डोळेच ज्याचे कान आहेत अशा वासुकीला म्हणाले, "हे सर्पराजा! हीच आमची सर्वांची ठाम सल्ला आहे. आतां, यांत आपणांस गोड दिसेल तो उपाय ताबडतोब अमलांत आणावा." असें म्हणून ते सर्व सर्प सर्पश्रेष्ठ वासुकीकडे पाहूं लागले, तेव्हां वासुकि त्या सर्पांस विचारपूर्वक म्हणतो, "तुमच्या ह्या ठाम सल्लेप्रमाणें करावेंसें मला वाटत नाहीं. ह्यांपैकीं एकही मसलत मला पसंत नाहीं. ह्यांत आपलें कल्याण करितां येईल असें काय आहे? मला तर वाटतें कीं, महात्मे कश्यप ऋषि ह्यांना ह्या वेळीं संतुष्ट करून घ्यावें हाच मार्ग उत्तम!

हे भुजंगहो! ज्ञातिवर्गाची व तशीच मला माझीही कळकळ असल्यामुळें तुमच्या एकाच्याही म्हणण्याप्रमाणें करावयाला मला माझें मन सांगत नाहीं. आपलें ज्यांत कल्याण आहे असाच उपाय मला योजिला पाहिजे; आणि ज्ञातीच्या हिताहिताचा सर्व बोल मजवरच येणारा आहे, ह्या विचारानें मला अतिशय त्रास होत आहे."

अध्याय अडतिसावा.

—:०:—

एलापत्रकथित उपाय.

सौति म्हणतो:—अशा प्रकारें त्या सर्व सर्पांचें व वासुकीचें भाषण ऐकून तेथें एलापत्र नांवाचा एक सर्प बोलूं लागला, "तें सत्र व्हावयाचेंच, चुकावयाचें नाहीं. पांडवकुलांत जन्मलेला, व ज्याचा आम्हांस धाक पडला आहे, तो जनमेजय राजाच मुळीं तशा प्रकारचा नाहीं. याकरितां, हे वासुके! जो नशिबाच्या सपाट्यांत सांपडलेला असतो, तो नशिबावरच सारा हवाला ठेवतो. त्यावांचून त्याला गत्यंतरच नसतें. म्हणून, सर्पश्रेष्ठहो! हाही आपल्यावर असाच प्रसंग आहे. तेव्हां माझें ऐकाल तर मी म्हणतों कीं, आपणही नशिबावरच हवाला ठेवून चालूं. पन्नगश्रेष्ठहो! जेव्हां शाप झाला, त्या वेळीं मी मातेच्या मांडीवर जाऊन बसलेला होतों. आपवचन ऐकतांक्षणींच मला मोठी भीति पडली; तों, दुःखानें त्रस्त झालेल्या व करुणा आलेल्या देवांच्या तोंडून, "हे महातेजस्वी देवा! स्त्रिया कठोर! कठोर!" असे ब्रह्मदेवाजवळ निघालेले उद्गार माझ्या कानीं पडले. देव विचारूं लागले, "हे देवाधिदेवा ब्रह्मदेवा! प्रियपुत्र लाभले असून आपल्या देखत त्यांना शाप देणारी कैदाशीण कद्रूशिवाय इतर कोणी स्त्री मिळेल का? आणखी, ब्रह्मदेवा! आपणही तिच्या शब्दाला 'तथास्तु' म्हणून मान डोलविली, तर तिचें निवारण करावयाचें टाकून आपण असें कां केलें, हें समजून घेण्याची जिज्ञासा आम्हांस झाली आहे."

ब्रह्मदेव म्हणाले:—तीव्र, भयंकर व विषारी असे पुष्कळच प्रकारचे सर्प असल्यामुळें लोकहिताकडे लक्ष देऊन मीं त्या वेळेस तिला वारण्याचा यत्न केला नाहीं. कारण क्षुद्र, पापाचरण करणारे, जहर विषाचे, व लोकांस डसणें हेंच ज्यांचें व्रत आहे असे जे कोणी असतील, त्यांचाच ह्यांत फडशा पडणार आहे; आणि जे धर्मशील, त्यांना ह्यांत कांहींही इजा पोहोंचणार नाहीं.

ब्रह्मदेव म्हणतात:—देवहो, आतां ह्या मोठ्या प्रसंगांतून त्या धर्मशीलांचा बचाव कोणत्या निमित्तानें होईल तें श्रवण करा. यायावर[1] नामक कुलामध्यें जरत्कारु नामेंकरून कोणी एक सुप्रसिद्ध, विचारशील, जितेंद्रिय व तपाचरण करणारा असा महान ऋषि अवतीर्ण होईल; आणि आस्तीक नांवाचा एक महातपस्वी पुत्र त्या जरत्कारूच्या उदरीं येऊन तो त्या समयीं यज्ञांत हरकत घेईल; आणि अशा रीतीनें, त्या वेळीं, जे धर्माचरण करणारे सर्प असतील, त्यांची सुटका होईल."

देव विचारूं लागले:—ब्रह्मदेवा! त्या वीर्यवंत व तपोनिधि महामुनि जरत्कारूला कोणत्या स्त्रीच्या उदरीं हा महात्मा पुत्र होईल, बरें?

ब्रह्मदेव कथन करितात:—त्या वीर्यसंपन्न मुनिवर्यास त्याच (जरत्कारु) नांवाच्या स्त्रीच्या पोटीं हें वीर्यवान अपत्य होईल. सर्पश्रेष्ठ वासुकीला जरत्कारु नांवाची एक बहीण आहे, तिच्या पोटीं हा पुत्र जन्मास येऊन तो सर्पांना त्यांच्या शापापासून मुक्त करील.

एलापत्र म्हणतो:—हें ऐकून देव ब्रह्मदेवाला म्हणाले, "ठीक आहे, तसेंच होवो.' असो. ह्याप्रमाणें ही कथा देवांस निवेदन करून ब्रह्म-

१ नेहमीं फिरत असणारे.

देवांनीं स्वर्गी प्रयाण केलें. हे वासुके, तुझी जरत्कारु नांवाची प्रख्यात बहीण आहे, ती त्याचकरितां आहे, असें मला वाटतें. तर तूं काय कर कीं, ते भिक्षा मागावयाला येत असलेले जे सद्धर्मशील जरत्कारु मुनि आहेत, त्यांसच शापनिवारणार्थ भिक्षा म्हणून ही मुलगी तूं समर्पण कर, म्हणजे झालें. अशा रीतीनेंच आपण शापमुक्त होऊं, असें मीं ऐकिलें आहे.

अध्याय एकुणचाळिसावा.

—:०:—

जरत्कारूचा शोध.

सौति म्हणतोः—हे मुनिश्रेष्ठ शौनक ऋषे ! हें एलापत्राचें भाषण ऐकून सर्व सर्पांचीं मनें आनंदित झालीं, व ते त्यास "शाबास ! शाबास !" म्हणूं लागले. तें ऐकल्यापासून वासुकि फार आनंदित होऊन आपल्या जरत्कारु नांवाच्या बहिणीस जपूं लागला. त्यानंतर थोड्याच अवकाशांत त्या नेमानेमाच्या गोष्टी घडून आल्या. एकदा सगळ्या देवांनीं व दैत्यांनीं मिळून, सागर हें जें वरुणाचें राहतें ठिकाण त्याचें मंथन केलें. त्यांत, बलिष्ठांत बलिष्ठ जो वासुकि, तो त्यांतील दोरी झाला होता. नंतर तो कार्यभाग उरकून देव ब्रह्मदेवाकडे आले; आणि त्यास म्हणालेः— देवा, शापाचें भय उत्पन्न झालेल्या ह्या वासुकीच्या मनास फार ताप झालेला आहे. तर प्रभो ! स्वजातीचें कल्याण चिंतणारा जो हा वासुकि, त्याच्या मनाचें तेवढें मातृशापाचें कुसळ नाहींसें करा. हा सर्पांचा राजा, सदोदीत आपल्या मनासारखें व आपलें कल्याण करणारा आहे. तर, हे देवाधिदेवा ! आपण ह्यावर प्रसन्न होऊन ह्याच्या हृदयांतील तळमळ निववून टाका.

ब्रह्मदेव म्हणालेः—पूर्वी एलापत्र नामक सर्पानें वासुकीला जी हकीकत निवेदन केली होती, तिची प्रेरणा मींच माझ्या इच्छेनें त्याच्या हृदयांत केली होती. ह्यास्तव, त्याच्या सांगण्याप्रमाणें ह्या नागेंद्रानें प्रसंगीं वर्तन ठेवावें. म्हणजे, जेवढे दुराचारी तेवढेच नाश पावतील; व धर्मशील असतील ते वांचतील. तो जरत्कारु अवतीर्ण झालेला असून घोर तपाचरणांत अगदीं गढून गेला आहे. ह्यानें आपली जरत्कारु नामक बहीण समयानुरूप त्यास दान करावी. देवहो ! एलापत्रानें सर्पांच्या कल्याणास्तव जें कार्य सांगितलें, तें अगदीं तसेंच व्हावयाचें ! अन्यथा होणार नाहीं !

ब्रह्मदेवाचें हें भाषण ऐकून, शापानें गोंधळून गेलेल्या सर्पश्रेष्ठ वासुकीनें सगळ्या सर्पांना तें श्रुत केलें; आणि आपली बहीण जरत्कारु ही जरत्कारु ऋषीस नेमस्त करून त्यास शोधण्याच्या कामी त्यानें सदोदीत चांगली कळकळ बाळगणाऱ्या अशा सर्पांची योजना केली; आणि त्यांस सांगून ठेविलें कीं, "जरत्कारु महाराजांस जेव्हां भार्या वरावीशी वाटेल, तेव्हां आम्हांस तावडतोब येऊन वर्दी द्यावी. कारण, आपल्या हिताचा मार्ग तोच होणार आहे."

अध्याय चाळिसावा.

—:०:—

जरत्कारुनामव्युत्पत्ति.

शौनक विचारतातः—हे सौते, जरत्कारु म्हणून ज्याचें नांव तूं कथन केलेस, त्या महात्म्या मुनीला असें कां म्हणत, तें समजून घ्यावें असें मला वाटत आहे. तर, जरत्कारु हें नांव जगप्रसिद्ध कां झालें, त्याची समजूत पडण्याकरितां त्या शब्दाची यथातथ्य व्युत्पत्ति मला सांग.

सौति म्हणतोः—जरा म्हणजे क्षय होय; व कारु म्हणजे दारुण अशी संज्ञा आहे. त्याचें शरीर कारु म्हणजे दारुण होतें, तें त्या विचारशील ऋषीनें दिवसानुदिवस घोर तप आचरून क्षीण करून टाकिलें. यासाठीं, हे द्विजवर्या ! त्याला

व तसेंच वासुकीच्या बहिणीला जरत्कारु असें नांव पडलें.

सौतीनें असें सांगितलेलें ऐकून धर्मात्मे शौनक मुनि उग्रश्रव्यास हांक मारून हसूं लागले, व म्हणाले, 'वय, नाम व रूप हीं ज्यांचीं सारखीं आहेत त्यांचा परस्पर विवाह झाला हें ठीकच झालें. पुढें शौनक म्हणतातः—बा सौते! तूं नांवाची व्याख्या बरोबर सांगितलीस ती मीं श्रवण केली; पण आतां, जरत्कारूचा पुत्र आस्तीक कसा जन्मला, तें समजून घेण्याची जिज्ञासा मला झाली आहे. तर तेवढें सांग. तें त्यांचें भाषण ऐकून सौति शास्त्राधारें कथन करूं लागला.

परिक्षिताचें उपाख्यान.

सौति म्हणतोः—शौनकादिक ऋषीहो, सारखे डोळे लावून बसलेल्या त्या वासुकीनें सगळ्या सर्पांस वर्दी देऊन व जरत्कारूकरितां आपली बहीण सिद्ध करून बहुत काळ गेला, तरी त्या कडकडीत आचरण करणाऱ्या विचारशील तपोनिष्ठाला भार्या वरण्याची इच्छाच होईना. कारण, तपाचरण करण्यांत अगदीं गढून गेलेला व वेदाध्ययनशील असा तो मुनि उर्ध्वरेता असल्यामुळें निर्भय होत्साता सर्व पृथ्वीभर फिरत असे, आणि त्यामुळेंच त्या महात्म्याच्या 'हृदयांत भार्येचा विचार सुद्धां कधीं येत नसे. हे ब्रह्मन्, नंतर कोणे एके समयीं कुरूच्या वंशांत परिक्षित नामेंकरून एक राजा झाला. ह्याचा पणजा महाप्रतापवान व श्रेष्ठ धनुर्धर असा जो पंडुराजा, त्याला जसा मृगयेचा फार शोक असे, तसाच ह्या राजासही असून हरिण, डुकर, तरस, गवे व आणखीही परोपरीचीं जंगली जनावरें ह्यांची पारध करीत करित तो वनांत फिरत असे. एके समयीं परिक्षित राजा आनतपर्व (गुढघे टेंकून सोडलेल्या) बाणानें एका हारिणास वेधून धनुष्यासहवर्तमान त्याच्या पाठोपाठ घोर जंगलांत निघून गेला; जणू काय यज्ञरूप मृगाला वेधून भगवान रुद्र पाठोपाठ धनुष्यासहवर्तमान त्याच्या शोधार्थ इतस्ततः फिरत आहे. त्याच्या बाणानें विद्ध झालेल्या कोणत्याही हरिणास जीव घेऊन वनांत जातां येत नसे; परंतु या वेळीं परिक्षिताच्या बाणानें विद्ध झालेला हरिण निसटून गेला, हेंच आधीं त्या राजाच्या पुढें लवकरच ओढवणाऱ्या मृत्यूचें पूर्वचिन्ह होय. त्या हरिणाच्या मागें लागून पुष्कळच लांब गेल्यामुळें तो अगदीं थकून तहानेनें व्याकुल होऊन जाऊन वनांत एका ऋषीसमीप आला. त्या वेळीं तो ऋषि, वत्स गाईस पीत असतांना त्याच्या तोंडांतून गळलेला पुष्कळसा फेंस प्राशन करीत होता. त्या घोर तपाचरण करणाऱ्या ऋषीसमीप लगबगीनें येऊन व धनुष्य उचलून घेऊन त्या भुकेलेल्या व थकलेल्या राजानें विचारलें, 'हे ब्रह्मन्, मी अभिमन्यूचा मुलगा परिक्षित् आहें. मीं बाणानें विद्ध केलेल्या हरिणाचा कोठें पत्ता नाहीं, तो आपल्या पाहण्यांत आला काय?' तो ऋषि मूकव्रत धरून बसला होता, त्यामुळें तो कांहीं बोलेना. तेव्हां राजास राग येऊन त्यानें एक मृत सर्प धनुष्याच्या टोंकानें उचलून त्याच्या खांद्यावर टाकून दिला, तरीही तो बोलेना, किंवा हें बरें अथवा हें वाईट कांहीं चकारशब्द सुद्धां त्यानें काढिला नाहीं. तेव्हां राजाचा राग वितळला, व तो त्रासून आपल्या नगराला निघून गेला. तरी देखील तो मुनि जशाचा तसाच होता.

आपली विडंबना झाली असूनही त्या क्षमाशील महर्षीनें त्या धर्मशील राजशार्दूल नृपाला दुखविलें नाहीं. पण भरतवंशांत श्रेष्ठ अशा त्या राजशार्दूलाला, तो ऋषि इतका धर्मपरायण आहे हें ठाऊक नसल्यामुळें त्यानें त्याचा अवमान केला! त्या ऋषीला एक प्रखर तेजाचा व महान तपाचरण करणारा असा तरुण पुत्र होता. तो मोठा कोपिष्ट, प्रसन्न करून घेण्यास फार कठिण, व महान व्रतस्थ असे. तो परमाजितेंद्रिय असा शृंगी सर्व भूतांच्या कल्याणांत गढून

गेलेल्या ब्रह्मदेवाची उपासना त्रिकाळ करीत असे. हे द्विजवर्य! तो ब्रह्मदेवाच्या अनुज्ञेप्रमाणें घराकडे येत असतां, त्याचा एक संवगडी ऋषिपुत्र तेथें खेळत होता. तो धर्माचे पायीं कृश झालेला होता. तो हसत हसत त्याच्या पित्याचें वर्तमान त्यास सांगूं लागला. तें ऐकतांच रागाच्या भरांत लाल होणारा तो तामसी ऋषिपुत्र शृंगी क्रोधायमान झाला. तेव्हां कृश म्हणालाः-हे शृंगी! तूं फारसा गर्व वाहूं नको. तूं तेजस्वी व तुझा पिताही तेजस्वी आहे. पण असें असतां, तुझ्या पित्यानें खांद्यावर सर्पाचें कलेवर वाहिलें आहे. ह्याकरितां आमच्यासारखे सिद्ध, ब्रह्मवेत्ते व तपस्वी ऋषिपुत्र बोलूं लागले असतां तूं चकारशब्द मुद्धां काढीत जाऊं नको. आपल्या पित्यानें मृत सर्प वाहिलेला असतां जो तूं तें खुशाल पाहत आहेस, त्या तुझा तो पौरुषाभिमान व तशाच तुझ्या त्या गर्वोक्ति आतां कोठें गेल्या? हे मुनिवर्या! असा अवमान होण्यासारखें तुझ्या पित्यानेंही कांहीं केलें नव्हतें; व त्यामुळें, जणू काय माझ्या पित्याचाच अवमान झाला असें मला वाटत असून माझ्या मनास फार खेद होत आहे!

अध्याय एकेचाळिसावा.

—:०:—

परिक्षितास शाप.

सौति सांगतोः—कृशानें तें वर्तमान सांगितल्यावर, तेजस्वी व मोठा रागीट असा तो शृंगी, आपल्या पित्यानें सर्पाचें कलेवर धारण केलें आहे हें ऐकून रागानें फारच संतप्त झाला; आणि कृशाकडे पाहून त्यानें त्यास सौम्य शब्दांनी विचारिलें, " माझ्या पित्यानें हें मृत कलेवर कसें धारण केलें तें सांग. "

तेव्हां कृश म्हणालाः—बा शृंगी! परिक्षित राजा या वनांत मृगयेस आला असतां त्यानें तुझ्या पित्याच्या खांद्यावर मृत सर्प टाकिला.

शृंगी म्हणालाः—हे कृशा, त्या दुष्ट राजाचें माझ्या पित्यानें असें काय वाकडें केलें होतें, तें मला स्पष्ट सांग; आणि मग पहा माझें तपोबळ कसें आहे तें! हें ऐकून कृश सांगूं लागला, "बा शृंगी, तो अभिमन्यूचा पुत्र परिक्षित राजा मृगया करीत असतां वेगानें जात असलेल्या एका हरिणास त्यानें बाणानें वेधिलें, व तो एकटाच त्याचे पाठोपाठ जाऊं लागला. त्या महावनामध्यें तो राजा भटकूं लागला; परंतु तो हरिण कांहीं त्याच्या दृष्टीस पडेना. इतक्यांत, मौन धरून बसलेला तुझा पिता त्याचे दृष्टीस पडला. तेव्हां त्यानें त्यास हरिणाविषयीं प्रश्न केला. तो राजा तहान, भूक व श्रम यांनीं अगदीं थकून गेला होता. त्यानें तुझ्या मुखस्तंभ बसलेल्या पित्यास 'हरिण कोठें गेला' म्हणून पुनः पुनः विचारून पाहिलें, परंतु तुझ्या पित्यानें त्यास कांहींच उत्तर दिलें नाहीं. हें पाहून त्या राजानें सर्पाचें कलेवर धनुष्याच्या टोकानें उचलून तुझ्या पित्याच्या खांद्यावर टाकिलें. तथापि, बा शृंगी! तो तुझा तपोनिष्ठ पिता जशाचा तसाच बसलेला असून राजा आपल्या हस्तिनापुर नगरास निघून गेला."

सौति म्हणतोः—ह्याप्रमाणें आपल्या पित्याच्या खांद्यावर सर्पाचें कलेवर टाकिलेलें ऐकून त्या ऋषिपुत्राचे डोळे क्रोधानें लाल झाले, व त्याच्या अंगाची अगदीं लाही लाही होऊन गेली; आणि क्रोधानें संतप्त झालेल्या त्या तेजस्वी ऋषिपुत्रानें स्नान करून क्रोधावेशांत त्या राजास शाप दिलाः शृंगी म्हणाला, "मौन धरून बसलेल्या माझ्या पित्याच्या खांद्यावर ज्यानें मृत सर्प आणून टाकिला, त्या, ब्राह्मणाचा अवमान करणाऱ्या व कुरुकुळास कलंक लावणाऱ्या राजास, सर्व श्रेष्ठ सर्पांत ज्याचें विष अत्यंत प्रखर असून ज्याच्या दाढा विषानें भरलेल्या आहेत, त्या क्रोधानें लाल झालेल्या तक्षकाला माझ्या शापबळानें

प्रेरणा होऊन तो आजपासून सातव्या दिवशीं यमलोकास नेईल."

सौति म्हणतो:—तो क्रोधानें लाल झालेला श्रृंगी, असा शाप देऊन, गाईच्या गोठ्यांत जेथें आपला पिता मृत सर्प धारण करून बसला होता तेथें गेला; आणि त्यास पाहिल्यावर, त्याच्या खांद्यावर तो मृत सर्प पाहून तर त्यास अधिकच क्रोध चढला; तेव्हां दुःखाचे अश्रु टाकून श्रृंगी आपल्या पित्यास म्हणाला, "हे तात! त्या दुष्ट परिक्षित राजानें आपला हा अवमान केल्याचें ऐकून, तो कुरुकुलाधम प्रखर शापच देण्यास योग्य आहे असें वाटून मीं त्यास रागारागानें शाप दिला कीं, सर्पश्रेष्ठ जो तक्षक तो आजपासून सात दिवसांनीं त्या पातक्याला अत्यंत दारुण अशा यमलोकास नेईल."

शमीक मुनींचा उद्वेग.

ऋषीहो, क्रोधाविष्ट झालेल्या त्या श्रृंगीचें हें बोलणें ऐकून शमीक मुनि म्हणाले:—मुला, तूं कांहीं हें बरें केलें नाहींस. हा तपस्व्यांचा धर्म नव्हे. त्या नरपालाच्या देशांत आपण राहात असून त्यानें न्यायानें व नीतीनें आपला सांभाळ केला आहे, याकरितां त्याचा द्रोह करणें योग्य नाहीं. त्यानें आपल्याशीं कसेंही वर्तन केलें असलें, तरी तें आपण नेहमीं पोटांतच घातलें पाहिजे. मुला, धर्माचा आपण नाश करूं लागलों तर धर्मही आपला नाश करूं लागतो ह्यांत कांहीं संशय नाहीं; कारण, राजानें जर आपलें रक्षण न केलें, तर आपणांस अतोनात त्रास भोगावा लागेल; आणि मग आपणास हवें तसें धर्माचरण करतां येणें शक्य नाहीं. बाबारे! सद्धर्मी राजे आपला सांभाळ करीत असतात, म्हणूनच आपणांस हवें तसें धर्माचरण करितां येतें. धार्मिकदृष्ट्या पाहिलें तर त्यांचाही त्यांत थोडाबहुत वांटा आहेच. तात्पर्य, आपल्याशीं राजाचें वर्तन कसेंही असलें, तरी आपण त्याची क्षमाच केली पाहिजे; आणि विशेषतः परिक्षिताला तर क्षमा करणें भागच आहे. कारण, ह्याचा पणजा पंडुराजा जसें आपल्या प्रजेचें रक्षण करीत असे, तसेंच हाही आपलें करीत आहे. प्रिय पुत्रा, प्रजेचा सांभाळ राजानेंच केला पाहिजे. भुकेनें व श्रमानें थकून गेलेल्या त्या राजाला माझें मौनव्रत न समजून, केवळ अजाणपणानें त्यानें हें कृत्य केलें असें वाटतें. बाबा! देशांत स्वामी नाहींसा झाला म्हणजे तेथें नेहमीं अनर्थ उद्भवूं लागतात; राजा दुष्ट लोकांस नेहमीं दंडानें शासन करीत असतो, त्यामुळें त्यांना दहशत बसते, व त्यायोगानें देशांत शांतता राहते. उद्विग्न पुरुषाला धर्मही करितां येत नाहीं आणि कर्मही करितां येत नाहीं. राजामुळें धर्माची व धर्मामुळें स्वर्गाची प्रतिष्ठा होते. राजामुळेंच सर्व यज्ञक्रिया चालतात; व त्या चालतात म्हणून देवांचें जीवन चालतें. देवांपासून वृष्टि व वृष्टीपासून औषधि उत्पन्न होतात हें प्रसिद्धच आहे. त्या औषधींच्या योगानें राजा मनुष्यांचें निरंतर कल्याण करीत असतो. मनुष्यांचें पालनपोषण करणारा आणि त्यांतही राज्यकर्ता असा जो राजा—ज्याची योग्यता वेदाध्ययन केलेल्या दहा ब्राह्मणांइतकी असल्याचें मनूनें सांगितलेलें आहे—त्या बिचाऱ्या श्रमानें व भुकेनें व्याकूळ झालेल्या राजाला माझें तपस्व्याचें हें व्रत माहित नसल्यामुळें त्याच्या हातून हें कृत्य घडलें असावें असें मला वाटतें; त्या अर्थी, हे पुत्रा, तूं हें अविचाराचें कृत्य कां केलेंस? बाबा, राजाची योग्यताच अशी आहे कीं, त्यास कोणत्याही प्रकारें आम्हीं शाप देऊं नये.

अध्याय बेचाळिसावा.

—:०:—

शमीक मुनींचा श्रृंगीस उपदेश.

श्रृंगी म्हणतो:—हे तात! मीं केलेलें हें कृत्य साहसाचें असो वा दुष्कृत्य असो; ह्याचप्रमाणें,

तें आपणांस योग्य वाटो वा न वाटो, मीं जी वाणी उच्चारिली आहे, ती कधींही असत्य होणार नाहीं. बाबा, मी थट्टेंत सुद्धां कधीं खोटें बोलत नाहीं, मग शाप देत असतांना कसें बोलेन !

शमीक मुनि म्हणतात:—अरे, तूं महातेजस्वी व सत्यवचनी असून आजपर्यंत कधींही असत्य भाषण केलें नाहींस, तेव्हां तुझी वाणी मिथ्या होणार नाहीं हें मी जाणतों. परंतु तुला कांहीं सांगावें अशी माझी इच्छा आहे, व तें माझें कर्तव्यही आहे. पुत्र मोठा झाला असला तरी सुद्धां तो सद्गुणी व महायशस्वी व्हावा म्हणून त्याच्या पित्यानें त्याला तशा प्रकारचा उपदेश करावा असा धर्म आहे. त्यांतून, तूं तर अद्याप लहानच आहेस; तेव्हां तुला उपदेशाच्या दोन गोष्टी सांगितल्या पाहिजेत यांत शंका नाहीं. तूं तपामध्यें नेहमीं निमग्न असतोस, व जे योगी असतात त्यांच्या ठिकाणीं नेहमीं क्रोधाची वृद्धि होत असते; आणि क्रोध हा तर तपाचा नाश करणारा आहे. हे पुत्रा, तूं उत्तम प्रकारें धर्माचरण करणारा आहेस, परंतु तूं लहान असल्यामुळें अज्ञान असून साहसी आहेस. तेव्हां पुत्रप्रेमानें मी तुला सांगतों कीं, तूं वनांतील फळमूलांवर उपजीविका करून रहा, आणि शांतीचें अवलंबन करून क्रोधाचा नाश कर; म्हणजे तुझ्या हातून धर्मत्याग होणार नाहीं. अरे, स्वर्गप्राप्तीकरितां जें पुण्य संपादन करावें लागतें, तें अत्यंत कष्टसाध्य होय; व अशा प्रकारानें संपादन केलेलें पुण्यही क्रोधाच्या योगानें नाश पावतें, व पुण्य नाश पावलें असतां इष्ट गति प्राप्त होत नाहीं. म्हणून यतींना क्षमा आणि शांतिच सिद्धिदायक होत. अशा क्षमाशीलांना ऐहिक व पारलौकिक सुख प्राप्त होतें. याकरितां तूं क्षमावान आणि इंद्रियनिग्रही होशील अशा प्रकारचें वर्तन नेहमीं करीत जा. कारण, क्षमेच्या योगानें क्रमेंकरून ब्रह्मलोकापर्यंत असलेले सर्व लोक तुला प्राप्त होतील. बाबा, मी तर शांतीचें अवलंबन करून आज यासंबंधानें शक्य तो उपाय करितों. मी राजाला असा निरोप पाठवितों कीं, तूं माझ्याशीं जें उद्धटपणाचें वर्तन केलेंस, तें पाहून माझ्या अल्पमति लहान मुलानें क्रोधानें तुला शाप दिला आहे.

शापनिवेदन.

सौति सांगतो:—ऋषीहो, याप्रमाणें त्या मुलाला सांगून त्या सदाचरणी, दयाळू व महातपस्वी शमीक मुनींनीं गौरमुख नामक सुशील शिष्याला बोलाविलें, व राजाला सांगावयाचा निरोप तो त्याजजवळ सांगून त्याला राजाकडे पाठविलें. तेव्हां तो शिष्य लागलीच तेथून निघाला, आणि हस्तिनापुरांत आला. त्यानें प्रथम द्वारपालाबरोबर आपण आल्याची वर्दी राजाकडे पाठविली; व राजाकडून परवानगी आल्यावर तो वाड्यांत गेला, आणि त्यानें राजाची भेट घेतली. तेव्हां राजानें त्याचा योग्य सत्कार करून यथाविधि पूजा केली. नंतर थोडी विश्रांति घेऊन त्यानें राजाला शमीक ऋषींनीं सांगितलेला सर्व भयजनक वृत्तांत सांगितला. त्यावेळीं राजाचे मंत्रीही तेथेंच होते.

गौरमुख म्हणाला:—हे नृपवरा, तुझ्या देशांत शमीक नामक ऋषि राहत असतात हें तुला माहीत आहेच. ते परम धार्मिक असून जितेंद्रिय व क्षमाशील आहेत. हे नरपुंगवा, ते मौनव्रत धारण करून बसले असतां तूं आपल्या धनुष्याच्या टोकानें एक मृत सर्प त्यांच्या स्कंधावर ठेविलास. तें त्यांनीं सहन केलें, परंतु त्यांच्या पुत्राला तें सहन न होऊन, "आजपासून सात दिवसांनीं तक्षकापासून तुला मृत्यु येईल" असा त्यानें तुला शाप दिला. हा प्रकार घडून गेल्यानंतर तो शमीक ऋषींना कळला. तेव्हां तूं आपल्या रक्षणाचा कांहीं उपाय कर म्हणून त्याचें तुला आग्रहाचें सांगणें आहे. कारण, त्या मुलाची वाणी कोणाच्यानेंही असत्य करवणारा

नाहीं, व तेही आपल्या कोपायमान झालेल्या त्या पुत्राला आवरून धरण्यास समर्थ नाहींत. म्हणून, हे राजा, तुझें हित करण्याचा उद्देश मनांत धरून त्यांनीं मला तुजकडे पाठविलें आहे.

सौति म्हणतोः—ऋषीहो, हें भयजनक भाषण श्रवण करून, आपल्या हातून घडलेल्या पापाबद्दल त्या महातपस्वी कुरुकुलश्रेष्ठ राजा परिक्षिताला अत्यंत पश्चात्ताप झाला; आणि त्यांतूनही, आपण ती गोष्ट केली त्या वेळीं ते ऋषि मौनव्रत धारण करून बसले होते असें ऐकिल्यामुळें तर त्याच्या मनाला अधिकच दुःख झालें; व आपण खरोखर अपराधी असतांही शमीक मुनींच्या अंतःकरणांत आपणाविषयीं दया उत्पन्न झाली, हें कळल्यावर तर त्याच्या दुःखाला पारावारच नाहींसा झाला! एकंदरींत, आपण त्या ऋषींचा अपराध केला म्हणून जितकें त्या राजाला वाईट वाटलें, तितकें स्वतःच्या मृत्यूच्या वार्तेनेंही त्याला वाईट वाटलें नाहीं!

असो; नंतर, भगवान शमीक मुनींनीं फिरूनही मजवर दया करावी, असें सांगून त्या गौरमुख नामक शिष्याला राजानें परत पाठविलें. गौरमुख गेल्यानंतर, उद्विग्नचित्त झालेल्या त्या परिक्षित राजानें आपल्या मंत्रिजनांबरोबर या गोष्टीसंबंधानें विचार केला. राजा परिक्षित मोठा मुत्सद्दी होता. त्यानें त्या मंत्रिमंडळाच्या विचारानें आपणास राहण्याकरितां सुरक्षित असा एकखांबी वाडा बांधविला, व तेथें सर्व प्रकारचा उत्तम बंदोबस्त करून आणि वैद्य, औषधि व मांत्रिक यांची सर्व तयारी ठेवून आपण तेथें रहावयास गेला. अशा प्रकारच्या त्या सुरक्षित जागेंतच तो धर्मवेत्ता राजा आपल्या मंत्रिजनांसह राज्यसंबंधी सर्व कामें पाहूं लागला. तेथें जाऊन राजदर्शन घेण्यास कोणीही समर्थ नव्हता; इतकेंच नव्हे, तर त्या देशांत संचार करणाऱ्या वायूचाही तेथें शिरकाव होऊं नये इतका कडेकोट बंदोबस्त केलेला होता. याप्रमाणें सहा दिवस जाऊन सातवा दिवस प्राप्त झाला.

काश्यपतक्षकसंवाद.

इकडे, राजा तक्षकदंश होऊन मृत्यु पावणार ही बातमी काश्यप नामक एका विद्वान ब्राह्मणास समजली. तेव्हां त्या विषापासून राजाचें संरक्षण करण्याच्या उद्देशानें तो राजाकडे यावयास निघाला. तक्षकानें राजाला दंश केला असतां त्यापासून राजाला निर्भय करण्याविषयींची त्याची खातरी होती. शिवाय, त्यानें असाही विचार केला कीं, या कृत्यापासून आपणास धर्म व अर्थ ह्या दोन्ही गोष्टी प्राप्त होतील. मार्गक्रमण करीत असतांही त्याच्या मनांत हेच विचार चाललेले होते. इतक्यांत त्या एकाग्रचित्त ब्राह्मणास नागराज तक्षकानें पाहिलें. त्याबरोबर त्यानें वृद्ध ब्राह्मणाचें रूप घेतलें, आणि त्या मुनिश्रेष्ठ काश्यपाजवळ जाऊन, "आपण इतक्या घाईघाईनें कोणीकडे जात आहां, व मनांत काय कार्य योजिलें आहे" असें त्याला विचारलें. तेव्हां काश्यप म्हणालाः—हे वृद्ध ब्राह्मणा, कुरुकुलोत्पन्न शत्रुंजय राजा परिक्षित यास नागराज तक्षक आज आपल्या तेजानें दग्ध करून टाकणार आहे; तेव्हां अग्नीप्रमाणें तेजस्वी, महापराक्रमी व कुरुकुलवर्धक अशा त्या परिक्षित राजाला तक्षकानें दंश केल्याबरोबर त्यापासून त्याला निर्भय करण्याकरितां मी घाईनें तिकडे चाललों आहें.

तक्षक म्हणतोः—हे ब्राह्मणा, राजाला दग्ध करणारा तक्षक तो मीच आहें; तेव्हां तूं परत जा. कारण, मीं दंश केला असतां त्याचा प्रतिकार करण्यास तूं समर्थ नाहींस.

काश्यप म्हणतोः—अरे, माझ्या विद्येचा प्रभाव असा आहे कीं, तूं जरी त्या राजाला दंश केलास, तरी मी निःसंशय त्यास निर्भय करीन!

अध्याय त्रेचाळिसावा.

-:०:-

काश्यपमंत्रप्रभाव.

तक्षक म्हणतो:–हे ब्राह्मणा, मी एखाद्याला दंश केला असतां त्यास बरा करण्यास मी समर्थ आहे म्हणून तूं म्हणतोस, तर आतां मी ह्या वृक्षाला दंश करितों, तूं त्याला जिवंत कर आणि तुझें जें अत्युत्तम मंत्रबल आहे तें मला दाखीव. हें पहा–मी आतां ह्या जवळच असलेल्या वटवृक्षाला तुझ्या समक्ष जाळून टाकितों, आणि तूं त्यास जिवंत करण्याचा प्रयत्न कर.

काश्यप म्हणतो:–हे नागश्रेष्ठा, तुला असें जर वाटत असेल, तर तूं ह्या वृक्षाला दंश कर, व मी त्याला जिवंत करितों.

सौति म्हणाला:–ह्याप्रमाणें महात्म्या काश्यपानें नागेंद्राला सांगितलें, तेव्हां तो सर्पश्रेष्ठ वटवृक्षाजवळ आला; आणि त्यानें वृक्षाला दंश केला. त्याबरोबर सर्व वृक्षामध्यें विष भिनून जाऊन तो चोहोंकडून पेटला! ह्याप्रमाणें तो वृक्ष जळून त्याची राख झाल्यावर तो सर्पराज पुनः काश्यपाला म्हणाला, "हे ब्राह्मणश्रेष्ठा, आतां तूं यत्न करून या वृक्षाला जिवंत कर."

सौति म्हणाला:–ह्याप्रमाणें नागराजाचें भाषण ऐकून, सर्पविषानें जळून भस्म झालेल्या त्या वृक्षाची सर्व राख काश्यपानें गोळा केली, आणि तो म्हणाला, "हे पन्नगेंद्रा, आतां माझ्या विद्येचा प्रभाव कसा काय आहे तो पहा! हे भुजंगश्रेष्ठा, तुझ्यासमक्ष मी ह्या वृक्षास आतां जिवंत करितों." याप्रमाणें भाषण करून त्या षड्गुणैश्वर्यसंपन्न व विद्वान द्विजश्रेष्ठ काश्यपानें आपल्या विद्येच्या प्रभावानें त्या भस्मरूपी वृक्षास सजीव केलें! प्रथमतः भस्मराशीला त्यानें अंकुर उत्पन्न केला. नंतर त्या अंकुरास दोन पानें आणिलीं. पुढें पुष्कळ पल्लव व डहाळ्याही उत्पन्न केल्या; आणि अशा रीतीनें पुनः तो वृक्ष पूर्वीप्रमाणें सजीव केला!

काश्यपनिवारण.

ह्याप्रमाणें काश्यपानें वृक्ष जिवंत केलेला पाहून तक्षक म्हणाला:–तुझा हा पराक्रम अद्भुत तर खराच. तूं माझें विष तर नाहींसें केलेंच आहेस, आणि माझ्यासारख्या दुसऱ्या कोणाचेंही नाहींसें करशील यांत शंका नाहीं. परंतु मी तुला असें विचारितों कीं, तूं जो राजाकडे जात आहेस, यांत तुझा उद्देश काय आहे? राजाकडे जाऊन जें कांहीं मिळवावयाची तुझी इच्छा असेल, तें दुर्लभ असलें तरी मी तुला येथेंच देतों. याकरितां, तूं विनाकारण राजापर्यंत जाण्याचे श्रम घेऊं नको. आतां, असें मी म्हणत असतांही जर तूं आग्रहानें जाशील, तर त्यांत तुझा तोटा आहे. कसा तो पहा: ब्राह्मणाच्या शापानें राजाचें आयुष्य संपलें आहे; आणि अशा स्थितींत जर तूं त्याला वांचविण्याचा प्रयत्न करशील, तर "ब्राह्मणाचें वचन कधींही अन्यथा होत नाहीं" या सिद्धांतानें कदाचित् तुझा प्रयत्न निष्फळ होण्याचा संभव आहे; आणि प्रसंगवशात् जर तसेंच घडून आलें, तर राहूच्या योगानें सूर्याचें तेज ज्याप्रमाणें नष्ट होतें, त्याप्रमाणें त्रैलोक्यांत प्रसिद्ध असलेली तुझी कीर्ति नाहींशी होईल.

काश्यप म्हणतो:—हे नागराजा, मी जो राजाकडे जात आहें, त्यांत माझा दुसरा उद्देश कांहींएक नसून मला फक्त द्रव्याची इच्छा आहे. तें तूं मला दिलेंस तर मी तें घेऊन येथून परत जाईन.

तक्षक म्हणतो:—हे द्विजश्रेष्ठा, इतकेंच जर आहे, तर राजापासून जितकें द्रव्य मिळावें अशी तुझी इच्छा असेल, त्यापेक्षांही मी तुला जास्त देतों. तर तूं आतां परत फीर.

सौति म्हणाला:—असें हें तक्षकाचें भाषण ऐकून तो बुद्धिशाली व अंतर्ज्ञानी ब्राह्मणश्रेष्ठ काश्यप किंचित् ध्यानस्थ झाला. तेव्हां त्याला त्या पांडुकुलोत्पन्न राजाचें आयुष्य खरोखरच संपलें

आहे असें समजलें. नंतर त्यानें ध्यान विसर्जन केलें, आणि पाहिजे होतें तेवढें द्रव्य तक्षकापासून घेऊन तो तेथूनच परत फिरला.

ह्याप्रमाणें विचार करून व इच्छित द्रव्य घेऊन महात्मा काश्यप परत आपल्या घरीं जाण्यास निघाला; आणि तक्षकानें आपला हस्तिनापुराचा मार्ग धरिला. तेव्हां जातां जातां वाटेनें त्यास असें कळलें कीं, राजाचें संरक्षण व्हावें म्हणून कित्येक मांत्रिक आणिले असून नानाप्रकारच्या विषहारक औषधिही पुष्कळ सिद्ध ठेविल्या आहेत.

परिक्षिताला तक्षकदंश.

सौति म्हणाला:—हें ऐकल्यावर तक्षकास मोठी चिंता उत्पन्न झाली. तो मनांत म्हणाला, "मला तर या राजाला मोह उत्पन्न करून फसवावयाचें आहे; आणि यानें तर मोठी तयारी केली आहे; तेव्हां आतां कोणता उपाय करावा?" शेवटीं त्याला एक युक्ति सुचली. त्यानें तत्काळ कांहीं भुजंगांना तपस्व्यांचे वेष दिले; आणि त्यांच्याजवळ फळें, दर्भ व उदक देऊन त्यांना राजाकडे जाण्यास सांगितलें. त्यानें त्यांस अशी सूचना देऊन ठेविली कीं, राजापुढें जाल तेव्हां 'तुम्ही आपल्या मुद्रा मोठ्या गंभीर ठेवा, आणि हरप्रयत्नानें, राजा तुमच्याकडून फळें वगैरे घेईल असें करा; म्हणजे माझें कार्य साध्य होईल.

सौति म्हणाला:—तक्षकाची आज्ञा घेऊन ते भुजंग राजाकडे गेले; आणि मोठ्या प्रेमदर्शक अभिनयानें बरोबर आणिलेलीं फळें, दर्भ व उदक ह्यांचा राजानें स्वीकार करावा अशा आशयानें त्यांनीं तें राजापुढें केलें. राजानेंही त्यांचा अत्यादरानें स्वीकार केला, आणि त्यांची उत्तम संभावना करून परत रवानगी केली. ते कपटवेषधारी नाग गेल्यावर राजा आपल्या मित्रांना आणि मंत्रिजनांना म्हणाला, "अहो, तपस्वीजनांनीं जीं हीं मधुर मधुर फळें आणिलेलीं आहेत, त्यांपैकीं तुम्ही कांहीं भक्षण करा, आणि मीही करितों."

सौति म्हणाला:—ऋषीहो, ब्रह्मलिखित कधीं चुकत नाहीं! ऋषीच्या शापानें आणि प्रारब्धयोगानें बद्ध झाल्यामुळें परिक्षित राजाला मंत्रिजनांसह तीं फळें खाण्याची बुद्धि झाली; आणि शेवटीं, ज्या फळांत तो दुष्ट तक्षक आळीच्या रूपानें राहिला होता, तेंच फळ त्यानें स्वतः खाण्याकरितां हातीं घेतलें. तें तो खाऊं लागला असतां त्यांतून एक लहानशी आळी निघाली! ऋषीहो, ती आळी आखूड असून तांबड्या रंगाची होती. तिचे नेत्र कृष्णवर्ण होते. त्या कुरुवंशभूषण नृपश्रेष्ठ परिक्षितानें ती हातीं घेतली, आणि तो मंत्र्यांना म्हणाला:—अहो, आज बरोबर सातवा दिवस आहे, व सूर्यही अस्तास जात चालला आहे. असें असतांही अजून मला विषापासून भय प्राप्त झालें नाहीं. याकरितां, ही आळीच तक्षक होवो, आणि मला दंश करून मुनिवाक्य खरें ठरो. म्हणजे, मीं जो ब्राह्मणाचा अपराध केला आहे, त्या दोषांतून मुक्त होईन.

राजाचें हें भाषण ऐकून, काळानें प्रेरणा केली असल्यामुळें मंत्रिजनांनींही त्याच्या बोलण्यास अनुमोदन दिलें! असो; शौनकादिकहो, परिक्षित राजा मरणोन्मुख झाला असल्यामुळें त्याचें देहभान नष्ट झालें होतें. त्यानें मोठ्या आनंदानें हसत हसत ती आळी धरली, आणि आपल्या मानेवर ठेविली! तेव्हां तात्काळ त्या आळीचें रूप धारण केलेल्या तक्षकानें आपलें भव्य स्वरूप प्रकट केलें; आणि राजाचें सर्व शरीर वेढून टाकून व उच्च स्वरानें गर्जना करून, पृथ्वीचें परिपालन करणाऱ्या त्या परिक्षित राजाला त्यानें कडकडून दंश केला!

अध्याय चवेचाळिसावा.

-:०:-

जनमेजयाला राज्याभिषेक.

ह्याप्रमाणें सर्पानें राजाला पूर्णपणें वेढून टाकलेलें पाहतांच सर्व मंत्रिजनांचीं मुखें म्लान होऊन ते अत्यंत शोकाकुल झाले. त्याचप्रमाणें, तेथें जे मांत्रिक जमले होते, तेही, तक्षकाची गर्जना ऐकतांच 'आपल्या मंत्राचा येथें मुळींच प्रभाव चालणार नाहीं' असें वाटून तेथून पळून गेले. ते पळत असतां वरचेवर मागें पाहत; तों एक अद्भुत सर्प आकाशमार्गानें जात असलेला त्यांच्या दृष्टीस पडला; त्या वेळचा तो देखावा फारच विलक्षण होता! आकाश नीलवर्ण असून त्यांत गमन करणारा तक्षक रक्तकमलवर्णाचा असल्यामुळें, जणू काय एखादी स्त्री आपल्या नीलवर्ण केशकलापांत शेंदुरानें भांगच करीत आहे कीं काय असा भास होत होता! असो; इकडे, सर्पाच्या विषापासून उत्पन्न झालेल्या अग्नीनें राजा परिक्षिताचें तें एकस्तंभी मंदिर जळूं लागलें, तेव्हां तेथें असलेले मंत्रिजन वाट सांपडेल तिकडून बाहेर पडले, आणि विजेचा धडाका बसल्याप्रमाणें राजा परिक्षित खालीं पडला!

याप्रमाणें तक्षकाच्या विषापासून राजा मृत्यु पावल्यानंतर, त्याला उत्तम लोकाची प्राप्ति व्हावी म्हणून राजोपाध्याय, ब्राह्मण व सर्व मंत्री यांनीं उक्त कर्में केलीं, व ते मोकळे झाले. नंतर सर्व नगरवासी जनांनीं एकमतानें परिक्षिताचे मुलास राज्याभिषेक केला. तो वयानें अगदीं लहान होता. त्या कुरुकुलश्रेष्ठ शत्रुदमन परिक्षिताच्या पुत्राचें नांव जनमेजय होय. तो वयानें लहान होता तरी बुद्धीनें पोक्त होता. त्यानें बापाच्याच वेळचे मंत्री व पुरोहित कायम ठेविले, आणि त्यांच्या सल्लामसलतीनें सर्व राज्यकारभार चालविला. कौरवकुलश्रेष्ठ वीर धर्मराज हा याचा पणजा होय. त्यानें ज्याप्रमाणें राज्य केलें, त्याचप्रमाणें प्रजेचें पुत्रवत् पालन करून यानें राज्यकारभार चालविला.

जनमेजयाचा विवाह.

पुढें तो बालराजा सर्व विद्यांमध्यें पारंगत होऊन शत्रूंचें मर्दन करण्यास योग्य झाला. तें पाहून सर्वांना मोठा आनंद वाटला; आणि त्याच्या लग्नाविषयींचे विचार मंत्रिजनांच्या मनांत घोळूं लागले. नंतर त्यांनीं सुवर्णवर्मा नामक काशीच्या राजाकडे त्याच्या वपुष्टमा नांवाच्या कन्येविषयीं मागणी केली. तेव्हां सर्व प्रकारें हा संबंध उत्तम आहे असें पाहून सुवर्णवर्म्यानें आपली मुलगी कौरवकुलावतंस जनमेजयाला दिली. या गोष्टीनें जनमेजयालाही आनंद झाला. तो मोठा सद्वर्तनी होता. त्यानें परस्त्रीकडे पापदृष्टीनें कधीं ढुंकूनही पाहिलें नाहीं. पूर्वी पुरूरव्याला उर्वशी प्राप्त झाल्यानंतर ज्याप्रमाणें तिजशीं त्यानें विहार केला, त्याचप्रमाणें, अनेक प्रकारच्या पुष्पांनीं प्रफुल्लित झालेल्या वनांत व सरोवरांत प्रसन्न अंतःकरणानें आपल्या प्रिय पत्नीबरोबर जनमेजयानें विहार केला. वपुष्टमाही अत्यंत रूपवती असून महान पतिव्रता होती. सर्व राजांमध्यें श्रेष्ठ व गुणवान असा पति आपल्यास मिळाल्याबद्दल तिलाही मोठा आनंद वाटत असे. ती क्रीडाभुवनसुंदरी विहारसमयीं आपल्या प्रिय पतीबरोबर मोठ्या प्रेमभावानें रममाण होत असे.

अध्याय पंचेचाळिसावा.

—:०:—

जरत्कारुपितृसंवाद.

सौति सांगतोः—ह्याप्रमाणें जनमेजय राजा राज्यकारभारांत दक्ष राहून आपल्या प्रिय पत्नीसहवर्तमान कालक्रमणा करीत असतां, दुसरीकडे एक निराळीच गोष्ट घडत होती! जरत्कारु नामक एक महातपस्वी मुनि होता. जेथें सायंकाळ होईल, तेथेंच वस्ती करावयाची असा

त्याचा नियम असे. त्या जितेंद्रिय पुरुषाचें आणखी एक मोठें कठिण व्रत होतें. तें हें कीं, तो फक्त वायुभक्षण करून आपला चरितार्थ चालवीत असे. परंतु यामुळें तो दिवसानुदिवस क्षीण होत चालला होता. पृथ्वीपर्यटन व तीर्थस्नानें करण्याचा त्याचा क्रम चालला असतां, एके ठिकाणीं एक खंदक त्याच्या दृष्टीस पडला. त्या खंदकांत अधोमुख असे लोंबत असलेले आपले पितर त्यानें पाहिले. त्या खंदकाच्या कडेच्या एका बाजूस, कडयावर एक वाळ्याचें झुडूप उगवलेलें होतें. त्याला फक्त एकच तंतु राहिला होता. त्या तंतूस धरून त्याच्याच आधारावर ते पितर लोंबत राहिले होते; आणि त्या तंतूच्याही मुळाला, तेथेंच बिळांत असलेला एक उंदीर हळू हळू कुरतडीत होता. तेथें खावयाला कांहींएक न मिळाल्यामुळें ते पितर अत्यंत कृश होऊन गेले होते; व आपलें रक्षण व्हावें अशी त्यांस प्रबल इच्छा असल्यामुळें त्या काळजीनें ते अगदीं दीनवाणे झालेले दिसत होते. त्यांची ती शोचनीय स्थिति पाहून जरत्कारु त्यांच्या जवळ गेला; आणि दयार्द्र अंतःकरणानें त्यांना म्हणाला, "अहो! ह्या वाळ्याच्या निर्जीव तंतूला धरून राहिलेले असे तुम्ही आहां तरी कोण? ह्या तंतूचीं मुळें तर उंदरानें सर्व खाऊन टाकलीं आहेत. आतां नाहीं म्हणायाला काय तें एकच मूळ अवशिष्ट राहिलें असून तें सुद्धां तो उंदीर आपल्या तीक्ष्ण दांतांनीं कुडतडीत आहे; यामुळें तेंही आतां लवकरच तुटेल; आणि आधींच दीन झालेले तुम्ही खातरीनें या खंदकांत पडाल. तुमची ही स्थिति पाहून मला अत्यंत दुःख होत आहे. या दुर्धर संकटांतून तुम्हांला सोडविण्यास कांहीं उपाय असला तर तो मला सांगा, तो करण्यास मी सिद्ध आहें. मीं आजपर्यंत जी तपश्चर्या केली आहे, तिचा चतुर्थांश, तृतीयांश, अथवा अर्धा भाग दिला असतां तुम्हांस या संकटांतून मुक्त होतां येण्यासारखें असेल, तर विलंब न करितां मला तसें सांगा. मी आपली तेवढी तपश्चर्या तुमच्याकरितां खर्ची घालीन; इतकेंच नव्हे, तर सर्व तपश्चर्या द्यावी लागली तरी देखील ती देण्यास मी सिद्ध आहें; परंतु तुम्ही या संकटांतून पार पडावें अशी माझी फार इच्छा आहे."

पितर म्हणतातः—हे विप्रश्रेष्ठा, तूं ब्रह्मचारी असून वृद्ध झाला आहेस, तरी आपली सर्व तपश्चर्या खर्चून आमची मुक्तता करण्याची तुझी इच्छा आहे; परंतु आमचें हें संकट तपाच्या योगानें निवारण होण्यासारखें नाहीं; तसें असतें तर या स्थितीस आम्ही पोहोंचलोंच नसतों. कारण आम्हींही पुष्कळ तप केलेलें आहे. परंतु, हे श्रेष्ठा, आम्हांस ही दशा संतानक्षयामुळें प्राप्त झालेली आहे, व संतानवृद्धीचा जर कांहीं उपाय न झाला, तर आम्हांस याहीपेक्षां अत्यंत अपवित्र असा नरकवास भोगावा लागणार आहे! संतान असणें हें अत्यंत पुण्यप्रद आहे असें पितामह ब्रह्मदेवानें म्हटलें आहे. आतां प्रथमतः तूं आम्हांस एवढेंच सांग कीं, आम्हा वृद्धांना अत्यंत दुःखित व शोचनीय स्थितींत पाहून दयार्द्र बुद्धीनें दुःखित झालेला असा तूं कोण आहेस? आम्हांस तर याचें कांहींच ज्ञान होत नाहीं. खरोखर तूं मोठा उदार मनाचा असून लोकविख्यात पुरुष असावास असें आम्हांस वाटतें. हे द्विजश्रेष्ठा, आम्ही यायावर नामक ऋषि असून मोठे कडकडीत आचरण करणारे आहों; परंतु, हे मुनिवर्य, संतानक्षयामुळें आम्ही पुण्यलोकापासून भ्रष्ट होऊन या स्थळीं प्राप्त झालों आहों. संतानहीनत्वामुळें आमचें सर्व पुण्य नष्ट झालें आहे. प्रस्तुत आम्हां भाग्यहीनांस कसेंबसें एक संतान आहे; परंतु तें असून नसल्यासारखेंच आहे. त्याचें नांव जरत्कारु होय. तो वेदवेदांगपारंगत असून सदाचरणी व जितेंद्रिय

असा अत्यंत प्रख्यात महातपस्वी आहे. त्यास तप करणें हेंच श्रेष्ठ वाटत असल्यामुळे त्यानें लग्न केलेंच नाहीं. त्यास बंधु वगैरे कोणी नसून त्याचें लग्न न झाल्यामुळें त्याला पुत्र होण्याचीही आशा नाहीं; परंतु या त्याच्या तपोलोभामुळें आम्ही मात्र या संकटांत पडलों आहों! तेव्हां या गोष्टीस सर्वस्वी तोच कारण आहे, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. प्रस्तुत आम्ही ज्ञानशून्य होऊन अनाथांप्रमाणें या भयंकर खंदकांत लोंबत राहिलों आहों. याकरितां, तो जरत्कारु जर तुझ्या कोठें दृष्टीस पडला, तर कृपा करून तूं आमची ही सर्व स्थिति त्याला सांग, आणि 'योग्य भार्येशीं विवाह करून प्रजोत्पादन कर,' असा आमचा त्याला निरोप कळीव. शिवाय, "आमच्या कुळाचा तूंच काय तो एक तंतु राहिला आहेस, व आमचा उद्धार होण्यास आधार काय तो तुझाच आहे," असेंही त्याला सांग.

याप्रमाणें निरोप सांगितल्यानंतर ते पितर पुनः त्या ब्राह्मणाला म्हणाले:—हे ब्रह्मन्! आम्ही ज्याचा आश्रय करून राहिलों आहों असें तुझ्या दृष्टीस पडत आहे, तें वाळ्याचें झुडूप म्हणजे आमच्या कुळाची वृद्धि करणारा कुलस्तंभ होय. त्याचीं खालिलीं मुळें जीं तुला दिसत आहेत, ते मूळतंतु म्हणजे कालानें भक्षण केलेले आमचे वंशज होत; त्याचप्रमाणें, आम्ही ज्याच्या आधारावर या खंदकांत राहिलों आहों, व जो तंतु उंदरानें अर्धामुर्धा कुरतुडलेला तुला दिसत आहे, तो, तपाचे ठिकाणीं स्थिर असलेला आमचा वंशज जरत्कारु होय. आतां उंदीर जो तुझ्या दृष्टीस पडला, तो महाबलाढ्य काळ असून तो त्या मंद, मूढमति, तपोलोभी व विचारशून्य जरत्कारूस हळू हळू कुरतुडून क्षीण करीत आहे. हे पुरुषश्रेष्ठा, तें त्याचें तप आम्हांस तारणार नाहीं. आतां असाच जर त्याचा हा क्रम सतत सुरू राहिला, तर बहुतेक क्षीण झालेला जरत्कारुरूप तंतु तुटेल, आणि आमचा सर्व आधार नाहींसा होईल व संतान नसल्यामुळें पुण्यलोकापासून भ्रष्ट होऊन, जे आम्ही मूढ होऊन या तंतूच्या आधारावर आशा धरून बसलों आहों, ते आम्ही सर्व पाप्यांप्रमाणें अधोगतीस जाऊं; आणि आमच्याबरोबर तो जरत्कारुही नरकांत पडेल. बाबा! तप, यज्ञ व दुसरीं कित्येक पवित्र कर्में उत्तम असलीं, तरी त्यांची आणि संततीची बरोबरी कधींही होणार नाहीं. याकरितां, हे तपोधना, आमच्यावर जर उपकार करण्याची तुझी इच्छा आहे, तर कसेंही करून त्या जरत्कारूची भेट घे; आणि येथील सर्व वृत्तांत त्याला सांग, व तो विवाह करण्यास प्रवृत्त होऊन प्रजोत्पादन करील असा प्रयत्न कर. म्हणजे आमच्याकरितां तूं सर्व कांहीं केलेंस असें होईल.

याप्रमाणे भाषण केल्यानंतर ते पितर त्या ब्राह्मणाला म्हणाले, "हे ब्राह्मणश्रेष्ठा, आम्हीं आपला सर्व वृत्तांत तुला सांगितला आहे. आतां तूं कोण आहेस हें आम्हांला सांग. आमच्याविषयीं तुझ्या मनांत जी इतकी दया उत्पन्न झाली, तिजवरून तूं कोणी तरी आमचा बंधु, आप्त, किंवा वंशज असावास असें आम्हांस वाटतें.

अध्याय शेचाळिसावा

—:०:—

वासुकि आणि जरत्कारु ह्यांची भेट.

सौति सांगतोः—ह्याप्रमाणें पितरांचें भाषण ऐकून, आपण ज्यांना अत्यंत दुःखद स्थितींत पहात आहों, ते आपलेच पूर्वज असून त्यांना दुःख देण्यास आपणच कारण झालों, असें लक्ष्यांत आल्यामुळें जरत्कारु अत्यंत शोकाकुल झाला. त्याचे नेत्र अश्रूंनीं भरून आले; कंठ सद्गदित झाला; आणि तोंडांतून स्पष्ट शब्दोच्चार

होईना. शेवटीं मोठ्या कष्टानें अडखळत अडखळत त्यानें पितरांना म्हटलें, "तुम्हांस अत्यंत दुःख देणारा जो तुमचा वंशज जरत्कारु, तो मीच; तुम्ही माझेच पूर्वज आहां. तुमच्या वंशांत जन्म घेऊन मी तुम्हांस दुःख देण्यास प्रवृत्त झालों, याबद्दल पाहिजे तो दंड मला करा; आणि आतां तुमचें प्रिय करण्याकरितां मी काय करूं तेंही मला आज्ञा द्या."

पितर म्हणतातः—मुला, तूं सहज इकडे आलास ही गोष्ट फार चांगली झाली. बरें, तूं लग्न कां केलें नाहीस?

जरत्कारु म्हणतोः—पितरहो, उर्ध्वरेतस्थितींतच परलोकप्राप्ति करून घ्यावी अशी माझी इच्छा असल्यामुळें मीं लग्न केलें नाहीं. परंतु, हे पूर्वजहो, पक्ष्यांप्रमाणें तुम्ही लोंबत आहां हें पाहून मीं ब्रह्मचर्यानें राहण्याचा आपला निश्चय आतां फिरविला आहे. आतां मी खरोखर लग्न करीन, आणि तुमचा इष्ट हेतु सिद्धीस नेईन. यांत माझी अट इतकीच आहे कीं, माझ्या नांवासारखेंच जिचें नांव आहे, अशी मुलगी असून तीही कोणी तरी आपण होऊन भिक्षा म्हणून मला अर्पण केली पाहिजे; तर मी तिचा स्वीकार करीन. शिवाय तिचें पोषणही मी करणार नाहीं. असें कधीं घडून येईल, तरच मी विवाह करीन, नाहीं तर करणार नाहीं. याप्रमाणें घडून आल्यास जो पुत्र होईल त्यापासून तुमचा उद्धार होईल. याकरितां, तोंपर्यंत आपण स्वस्थ असावें.

सौति सांगतोः—शौनका, याप्रमाणें पितरांना सांगून जरत्कारु पृथ्वीवर संचार करूं लागला. परंतु तो वृद्ध असल्यामुळें त्यास भार्या प्राप्त झाली नाहीं. तेव्हां त्याला अत्यंत दुःख झालें; व अरण्यांत जाऊन त्यानें अत्यंत आक्रोश केला; आणि पितृहिताची कामना धरून वनांत गेलेल्या त्या जरत्कारूनें तीन वेळां हळू हळू असे शब्द उच्चारिले कीं, "अहो येथें असणाऱ्या स्थावर, जंगम व गुप्त प्राण्यांनो, माझें म्हणणें ऐका! माझे पितर उग्र तपश्चर्या करीत आहेत, परंतु पुढें संतानवृद्धीचा मार्ग त्यांस दिसेना म्हणून ते दुःखित झाले आहेत, व त्यासाठीं त्यांनीं मला लग्न करण्याविषयीं आज्ञा केली आहे; याकरितां मला कोणी कन्या द्या. मी दरिद्री असून दुःखी आहें, परंतु लग्न करण्याविषयीं पितरांनीं मला आज्ञा केल्यामुळें कन्येची भिक्षा मिळविण्याकरितां मी पृथ्वीवर हिंडत आहें; तर हें माझें भाषण ऐकणाऱ्यांपैकीं ज्या कोणास कन्या असेल, त्यानें, दशदिशा हिंडणारा जो मी त्या मला ती द्यावी. तिचें नांव माझ्या नांवासारखेंच असून ती भिक्षेप्रमाणें मला अर्पण केली पाहिजे, आणि तिचें पोषण मी करणार नाहीं."

इकडे, वासुकीनें जरत्कारूला शोधण्याकरितां जे अनेक सर्प पाठविले होते, ते या वेळीं त्या अरण्यांत होते. त्यांच्या कानीं हें जरत्कारूचें भाषण पडलें, तेव्हां त्यांनीं तात्काळ जाऊन ती हकीकत वासुकीस सांगितली. त्यावरून सर्पराज वासुकीनें आपल्या जरत्कारु नामक भगिनीस उत्तम प्रकारचे अलंकार घातले, व तिला बरोबर घेऊन जरत्कारु होता त्या अरण्यांत तो गेला; आणि भिक्षेप्रमाणें त्यानें ती कन्या त्या महात्म्याला अर्पण केली. परंतु ही आपल्याच नांवाची नसेल आणि अर्पण करणाऱ्यानें तिच्या पोषणाचाही विचार केला नसेल, असें समजून त्यानें तिचा स्वीकार केला नाहीं; कारण, त्याला मोक्षप्राप्तीची इच्छा होती, व लग्न करणें हें मुमुक्षूला दुःखदायक असल्यामुळें त्याच्या तो विरुद्ध होता; परंतु पितृकार्य करण्याकरितांच तो या गोष्टीस प्रवृत्त झाला होता; तरी पण कुटुंबपोषणाची खटपट करण्यास तो सिद्ध नव्हता. म्हणून तिच्या पोषणाविषयींचा खुलासा झाल्याखेरीज तो तिचा स्वीकार करीना.

हे शौनका, नंतर त्या जरत्कारूनें वासुकीस त्या कन्येचें नांव विचारिलें, आणि आपण हिचें पोषण करणार नाहीं असेंही त्यास सांगितलें.

अध्याय सत्तेचाळिसावा.

—:०:—

जरत्कारुपरिणय.

सौति सांगतोः—याप्रमाणें जरत्कारूचें भाषण ऐकून वासुकि त्यास म्हणाला, "ही वधू धर्माचरणी असून हिचें नांव आपल्या नांवासारखेंच आहे; आणि ही माझी बहीण आहे. हे द्विजश्रेष्ठा, या भार्येचें पोषण मी करीन. हे तपोधन, मी आपल्या सर्व सामर्थ्यानें हिचें रक्षण करीन; आपण हिचा स्वीकार करावा. मुनिवर्य, आपल्याकरितांच मीं आजपर्यंत हिचें रक्षण केलें आहे."

वासुकीचें हें भाषण ऐकून जरत्कारूनें आणखी त्याला असें सांगितलें कीं, "मी हिचें पोषण तर करणार नाहींच, पण हिनें मला न आवडेल अशी कोणतीही गोष्ट करतां उपयोगी नाहीं; केल्यास मी हिचा त्याग करीन अशी माझी प्रतिज्ञा आहे."

सौति सांगतोः—याप्रमाणें जरत्कारूचें बोलणें ऐकल्यावर वासुकीनें सर्व गोष्टी कबूल केल्या. तेव्हां तो मंत्रविदश्रेष्ठ, तपोवृद्ध व सदाचारी जरत्कारु मुनि त्याच्या घरीं गेला, व त्या धर्मात्म्यानें वासुकीच्या भगिनीचें विधियुक्त व समंत्रक पाणिग्रहण केलें. त्या वेळीं मोठमोठे ऋषि त्याची स्तुति करूं लागले. पुढें नागराज वासुकीनें दाखविलेल्या रमणीय मंदिरांत जरत्कारु मुनि भार्येसह गेले. त्या मनोहर मंदिरांत उत्तम प्रकारच्या वस्त्रांनीं शय्या अलंकृत केली होती; तेथें तीं दोघें राहिलीं. तेथें गेल्यावर साधुश्रेष्ठ जरत्कारूनें आपल्या भार्येला सांगितलें कीं, "मी येथें राहिलों आहें खरा, परंतु माझ्या इच्छेविरुद्ध तूं कांहींएक करतां कामा नये, किंवा बोलतांही कामा नये; आणि जर तूं माझ्या इच्छेविरुद्ध वागलीस, तर मी येथून लागलाच चालता होईन. हें माझें म्हणणें तूं लक्षांत ठेव."

हें पतीचें भाषण ऐकून नागराजाची भगिनी जरत्कारु हिचें मन उद्विग्न झालें, व तिला अतिशय दुःख वाटलें. तरी तिनें त्यास 'बरें' असें उत्तर दिलें. असो. जगत्कारु मोठी पतिव्रता होती. पतीच्या मर्जीप्रमाणें वागावें अशीच त्या यशस्विनी जरत्कारूची इच्छा होती. पतीची मर्जी जाईल कीं काय म्हणून तिला नेहमीं भय वाटत असल्यामुळें ती फार जपून वागत असे. ऋषीहो, तिचा भर्ता जरी दुःखदायक होता, तरी नित्य जागरूक असणें, यत्किंचित् गोष्टीनेंही भयचकित होणें, व इंगित जाणणें ह्या अनुक्रमें कुत्रा, हरिण व कावळा ह्यांच्या गुणरूप स्वभावांचें अवलंबन करून तिनें त्याची उत्तम प्रकारें सेवा चालविली. असो. कांहीं दिवसांनीं तिला ऋतु प्राप्त झाला. तेव्हां योग्य दिवशीं स्नान करून शुद्ध झाल्यानंतर ती पतिसेवेस तत्पर झाली असतां तिच्या ठिकाणीं अग्नीप्रमाणें अत्यंत तेजस्वी असा गर्भ राहिला. तो गर्भ शुक्लपक्षांतील चंद्राप्रमाणें दिवसानुदिवस वाढूं लागला.

जरत्कारुनिर्गमन.

पुढें एके दिवशीं तो कीर्तिमान जरत्कारु श्रमल्यासारखा होऊन आपल्या स्त्रीच्या अंकावर डोकें ठेऊन निजला, तों भगवान सूर्यनारायण अस्ताचलास जाऊं लागला तरी जागा झाला नाहीं. तेव्हां तिला मोठी चिंता पडली. तिला वाटलें, "आतां जर हे जागे झाले नाहींत, तर सायंकाळ होऊन गेल्यास धर्माचा लोप होईल; बरें, जर मुद्दाम यांस उठवावें, तर त्याचा परिणाम चांगला होईल कीं नाहीं कोण जाणे? हे धर्मात्मे आहेत खरे; परंतु बायकोवर कांहीं तरी निमित्त ठेवून, तिला दुःख देऊन निघून जावयाचें हें तर यांचें ठरलेंच

आहे. तेव्हां आतां करावें तरी काय ? कोणत्या उपायानें मी यांची अपराधी होणार नाहीं बरें ?" याप्रमाणें विचार करून, त्या धर्मशीलाचा कोप आणि त्याचा धर्मलोप, या दोन गोष्टींमध्यें धर्मशीलाचा धर्मलोप होणें हें फार वाईट आहे असें तिच्या मनांत आलें; आणि सध्याकाल होऊन गेला असतां याचा खचीत धर्मलोप होणार, व याला उठविलें तरी हा रागावणार; [तथापि याचा धर्मलोप होण्यापेक्षां हा आपल्यावर रागावला तरी चालेल] असा विचार करून ती सर्पकुलोत्पन्न मधुरभाषिणी जरत्कारु, आपल्या महातपस्वी निद्रित पतीला सौम्य शब्दांनी जागृत करूं लागली: ती म्हणाली, "हे महाभागा, पश्चिमेकडे आकाशांत संध्याकालचीं पूर्ण चिन्हें दिसूं लागलीं असून भगवान सूर्यनारायण अस्तास जात आहे, व अग्नीला होम देण्याची वेळ झाली असून जिकडे तिकडे अग्नि दृग्गोचर होऊं लागला आहे. ही वेळ भूतपिशाचादिकांच्या संचाराची असल्यामुळें भयंकर आहे, तरी ती धर्मसाधनास योग्य असल्यामुळें रम्य दिसत आहे. ह्याकरितां, हे प्रभो, आपण जागे व्हा, आणि स्नान करून संध्योपासना करा."

तिचें हें भाषण ऐकून, आपणास जागृत केल्याबद्दल महातपस्वी भगवान जरत्कारूला अतिशय राग आला; त्याचे ओठ थरथर कांपूं लागले आणि तो आपल्या भार्येला म्हणाला, "हे सर्पिणी! तूं माझा अपमान केलास, तेव्हां आतां मी येथें रहाणार नाहीं; जसा आलों तसा परत जाईन. अग, माझी अशी खातरी आहे कीं, संध्याकाळ झाला असला तरी मी निजलों असतां अस्तास जाण्याचें सूर्याचें सामर्थ्य नाहीं. असें असून तूं मला जागें केलेंस, हा तूं माझा फार मोठा अवमान केलास. अवमान झाला असतां येथें राहणें कोणालाही रुचणार नाहीं; मग मज धर्मशीलाची किंवा माझ्यासारख्या इतराची गोष्ट काय विचारावी ?"

पतीचें हें भाषण ऐकून जरत्कारूच्या उरांत धडधडूं लागलें; आणि ती मोठ्या नम्रतेनें व करुणस्वरानें त्याला म्हणाली, "महाराज, आपला अपमान करावा ह्या हेतूनें खरोखर मीं आपणांस जागें केलें नाहीं! आपला धर्मलोप होऊं नये म्हणून मीं आपणांस जागें केलें!" ऋषीहो, इतकें तिनें सांगितलें तरी, भार्येचा त्याग करण्याविषयीं त्याचा पूर्वींपासूनच निश्चय झालेला असल्यामुळें, त्या कडकडीत व्रताचरणी जरत्कारूच्या मनांत यत्किंचितही दया आली नाहीं. त्यानें तिला साफ सांगितलें कीं, "माझी वाणी कधींही असत्य होणार नाहीं. मी जाणार. मी पूर्वी तुझ्याशीं असाच करार केला असून तो तूं कबूल केल्यावरूनच मी येथें राहिलों. हे भीरु, हे भद्रे, आतां मी येथून गेल्यावर 'तो भगवान गेला' असें तूं आपल्या भावाला सांग, व माझ्या मागें तूंही शोक करूं नको."

भर्त्याचें हें भाषण ऐकून ती कोमलांगी चिंतेनें व शोकानें व्याप्त झाली; तिचे नेत्र पाण्यानें भरून आले, कंठ सद्गदित होऊन तोंडाला कोरड पडली, आणि तिचें काळीज कांपूं लागलें; तरी तसेंच धैर्य धरून ती भीत भीत आपल्या पतीला पुनः म्हणाली, "हे धर्मज्ञ, मी निरपराधी व धर्मनिष्ठ असून पतिहिताविषयीं नेहमीं तत्पर असतां माझा त्याग करणें आपणांसारख्या धर्मनिष्ठांना योग्य नाहीं. हे द्विजश्रेष्ठ, माझ्या भावानें ज्या हेतूनें आपणांस मला दिली, तो त्याचा हेतु माझ्या हातून अद्याप सिद्धीस गेला नाहीं; तेव्हां तो मला काय म्हणेल बरें! हे साधुश्रेष्ठा, मातेनें शाप दिल्यामुळें भयभीत झालेल्या माझ्या ज्ञातिबांधवांना, आपणांपासून मला झालेलें अपत्य पाहिजे आहे; आणि तें तर अद्याप झालें नाहीं! 'मला अपत्यलाभ झाला असतां माझ्या सर्व ज्ञातीचें कल्याण होणार आहे; म्हणून, महाराज! मी आपणांस प्रार्थना करितें कीं, आपणांशीं झालेला माझा संबंध व्यर्थ

होऊं नये. हे सत्पुरुषा, माझ्या ठिकाणीं आपण गर्भ स्थापित केला आहे खरा; परंतु त्याचें स्वरूप अद्याप व्यक्त झालें नाहीं; तेव्हां अशा स्थितींत आपण मला टाकून कसे जातां?"

हें तिचें बोलणें ऐकून महातपस्वी जरत्कारु मुनीनें योग्य व प्रसंगाला अनुरूप असें उत्तर दिलें: तो म्हणाला, "हे सुभगे, हा तुझा गर्भ अग्नीप्रमाणें तेजस्वी असून तो परम धर्मनिष्ठ व वेदवेदांगपारंग असा ऋषि आहे."

ऋषीहो, असें सांगून तो कृतनिश्चयी धर्मात्मा जरत्कारु महर्षि उग्र तपश्चर्या करण्याकरितां निघून गेला!

अध्याय अठेचाळिसावा.

—:०:—

वासुकिजरत्कारुसंवाद.

सौति सांगतो:—हे तपोधनहो, ह्याप्रमाणें सांगून भर्ता निघून गेल्याबरोबर जरत्कारूनें झालेली सर्व हकीकत आपल्या भावाला सांगितली. ती अत्यंत अप्रिय वार्ता ऐकून त्यास फार वाईट वाटलें; आणि तो सर्पराज वासुकि खिन्नवदन व दीन झालेल्या आपल्या भगिनीला म्हणाला, "हे भद्रे तुला त्या जरत्कारूला कां अर्पण केलें, व त्यांत कोणतें कार्य साधावयाचें होतें, हें तुला ठाऊक आहेच. त्याच्यापासून तुला पुत्र झाला तर तो आम्हां सर्पांचा हितकर्ता होईल, व तो पराक्रमी पुत्र आम्हांस सर्पसत्रापासून मुक्त करील, असें पूर्वीं ब्रह्मदेवानें सर्व देवांसमक्ष सांगितलें आहे. तस्मात्, हे सुभगे, त्या मुनिश्रेष्ठापासून तुझ्या ठिकाणीं गर्भ राहिला आहे का? तुझ्याशीं जो त्याचा विवाहसंबंध झाला, तो फलद्रूप व्हावा अशी माझी फार इच्छा आहे. आतां, वास्तविक पाहिलें तर, मीं तुला हें असें विचारणें योग्य नाहीं; परंतु कार्याच्या महत्त्वामुळें मीं तुला विचारलें; तर कृपा करून आमची कार्यसिद्धि झाली आहे किंवा नाहीं तें सांग. आतां ह्याविषयीं तुझ्या भर्त्यालाच विचारण्याकरितां मी त्याच्या मागें गेलों असतों, परंतु तो मोठा कोपिष्ट असल्यामुळें कदाचित् शाप देईल, म्हणून माझ्यानें तसें करवत नाहीं. ह्यास्तव, हे कल्याणी, तुझ्या पतीचें सर्व वृत्त मला सांग; आणि माझ्या हृदयांत जें भयंकर शल्य चिरस्थायी झालें आहे, तें काढून टाक."

वासुकीचें हें भाषण ऐकून, आपली सर्व हकीकत समजून घेण्याविषयीं अत्यंत उत्सुक झालेल्या आपल्या भावास 'सर्व कांहीं सांगतें' असें म्हणून जरत्कारूनें आश्वासन दिलें; आणि ती म्हणाली, "आपल्या संबंधाचा प्रश्न मीं त्या महात्म्या तपस्व्यांना विचारला, तेव्हां त्यांनीं मला 'होय' म्हणून उत्तर दिलें, व नंतर ते निघून गेले. हे सर्पराजा, विनोदांत सुद्धां त्यांनी कधीं असत्य भाषण केलेलें मला स्मरत नाहीं, तेव्हां मजवर आलेल्या पतिवियोगरूप संकटकालीं मीं विचारिलेल्या प्रश्नाचें उत्तर ते खोटें कधींही देणार नाहींत. ते जातांना मला असें म्हणाले कीं, 'हे भुजंगमे, कार्यासंबंधानें तूं काळजी करूं नको. तुला अग्नि व सूर्य यांच्याप्रमाणें तेजस्वी असा पुत्र होईल.' तर, बंधुराया, तुला आतां दुःख करण्याचें कारण नाहीं."

आस्तीकजन्म.

सौति सांगतो:—भगिनीचें हें भाषण ऐकून नागराज वासुकीला अत्यानंद झाला. त्यानें तिचें सांत्वन केलें, आणि तिला अलंकारादिक देऊन तिचा योग्य सत्कार केला. पुढें त्या भुजंगभगिनीचा गर्भ शुक्लेंदूप्रमाणें वाढूं लागला. नंतर योग्य समयीं उभय कुळांचें भय दूर करणारा असा दिव्य सुपुत्र ती प्रसवली. तो नागराज वासुकीच्याच घरीं लहानाचा मोठा झाला. त्यानें च्यवनभार्गव ऋषींपाशीं सांग वेदाध्ययन केलें. तो मोठा सत्त्वगुणी होता. त्याची धर्मकर्मांवर उत्तम निष्ठा

होती. लहानपणींच त्यानें अनेक व्रतानुष्ठानें केलीं. ह्या ज्ञानवैराग्यसंपन्न पुत्राचें नांव आस्तीक असें होतें.

आस्तीकनामोत्पत्ति.

हा आस्तीक गर्भस्थ असतांना त्याचा पिता वनांत निघून गेला, तेव्हां तो जातेवेळीं ह्याच्या मातेनें आपल्याविषयीं त्यास प्रश्न केला असतां "आस्ति" असें तो म्हणाला. त्यावरून या मुलाचें नांव 'आस्तीक' असें पडलें. ह्या परम बुद्धिमान बालकाचें संगोपन त्याच्या मातुलानें फार आस्थेनें केलें. देवाधिदेव भगवान शूलपाणी शंकराप्रमाणें कांतिमान असा तो आस्तीक जसजसा मोठा होऊं लागला, तसतसा त्याला पाहून त्या सर्व सर्पांना मोठा आनंद वाटूं लागला!

अध्याय एकुणपन्नासावा.

—:०:—

परिक्षिच्चरितकथन.

शौनक म्हणतातः—हे सौते, राजा जनमेजयानें आपल्या पित्याच्या मरणाविषयींचें वृत्त आपल्या मंत्रिजनांना विचारिलें असतां त्यांनीं सविस्तर सांगितलेलें तें वृत्त तूं आम्हांस सारांशरूपानें कथन केलेंस, तें फिरून एकवार सविस्तर सांग. तो चमत्कारिक इतिहास ऐकण्याची आमची फार इच्छा आहे.

सौति सांगतोः—हे ब्रह्मन, राजानें मंत्र्यांस काय विचारिलें व त्यांनीं परिक्षिताच्या मरणाचा वृत्तांत कसा सांगितला, तो. मी आपणांस सविस्तर सांगतों, श्रवण करा.

जनमेजय म्हणालाः—मंत्रिजनहो,माझ्या पित्याचें सर्व चरित्र आपण जाणत आहां, व तो महायशस्वी नृपति कसा मरण पावला हेंही आपणांस माहीत आहे. तर तो सर्व वृत्तांत मला सांगा. म्हणजे त्याबद्दलचा मी योग्य सूड घेईन. परंतु त्यापासून लोकांचें कोणत्याही प्रकारचें अकल्याण न होतां कल्याणच होत असेल, तर मी या कार्यास प्रवृत्त होईन.

सौति सांगतोः—ह्याप्रमाणें त्या महात्म्या जनमेजयानें विचारिलें असतां धर्मवेत्ते आणि शहाणे असे ते मंत्रिजन त्यास म्हणाले, "राजा, तुझा पिता नृपश्रेष्ठ परिक्षित याचें चरित्र, व त्याचा शेवट कसा झाला तें तूं श्रवण कर. तुझा पिता मोठा पराक्रमी असून मनाचा उदार होता. त्यानें प्रजेचें पुत्रवत् पालन केलें. ज्यानें त्यानें आपापल्या धर्माप्रमाणें वागावें अशी त्याची इच्छा असे. त्याप्रमाणें त्यानें सर्वांस आपापल्या धर्माप्रमाणें वागावयास प्रवृत्त केलें. तो मूर्तिमंत धर्मच होता म्हटलें तरी चालेल. त्या भाग्यशाली व अतुलपराक्रमी राजानें चारी वर्णांचें व पृथ्वीचें उत्तम प्रकारें रक्षण केलें. तो सर्वांशीं दयाळूपणें वागत असल्यामुळें त्याच्यावर आबालवृद्ध प्रीति करीत. प्रजापति ब्रह्मदेवाप्रमाणें त्याची सर्वांचे ठिकाणीं समबुद्धि होती. याप्रमाणें तो प्रजेचें पालन करीत असल्यामुळें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हे चारही वर्ण प्रसन्न अंतःकरणानें आपापल्या धर्माचरणांत निमग्न असत. तो विधवांचें योग्य रक्षण व अनाथांचें संगोपन करून दरिद्र्यांचा परामर्ष घेत असे. चंद्राचें दर्शन घेण्यास जसा कोणासच प्रत्यवाय नसून त्या अमृतकिरणमय शितांशूच्या दर्शनानें जसा ताप हरण होऊन आनंद होतो, तसें त्याचें दर्शन सर्वांस सुलभ असून आनंदजनक असें होतें त्याच्या राज्यांत संतोष मूर्तिमंत नांदत असे. तो राजा मोठा वैभवशाली असून सत्यवचनी व अतुलपराक्रमी होता. जनमेजया, तो तुझा पिता परिक्षित कृपाचार्यांजवळ धनुर्विद्या शिकला. भगवान श्रीकृष्ण परमात्म्याचें त्याच्यावर फार प्रेम होतें. त्या महायशस्वी व लोकप्रिय राजाचें जन्म कौरवांचा क्षय झाल्यानंतर उत्तरेच्या उदरीं झालें. सर्व कौरव "परिक्षिण" झाल्यानंतर म्हणजे क्षय

पावल्यावर हा जन्मास आला, म्हणून या अभिमन्यु-पुत्राचें "परिक्षित" असें नांव पडलें. तो सर्वगुणसंपन्न असून राजधर्मग्रंथांचें त्यानें उत्तम परिशीलन केलें होतें. कामक्रोधादिक षड्रिपूंना जिंकून त्यानें अंतर्बाह्य इंद्रियांचें दमन केलें होतें. तो मोठा बुद्धिमान असून त्याची धारणाशक्ति अपूर्व होती. धर्मावर त्याची निःसीम निष्ठा असे. तो नीतिनिपुण असून चांगला मुत्सद्दी होता. त्यानें आपल्या वयाचीं साठ वर्षें होत तोंपर्यंत प्रजेचें उत्तम प्रकारें परिपालन करून राज्य केलें; आणि नंतर तो मृत्यु पावला. त्याच्या मृत्यूमुळें सर्वांना अत्यंत दुःख झालें. राजा, पुढें, हजारों वर्षें कुरुकुलाकडे चालत आलेलें हें राज्य धर्मानें तुला प्राप्त झालें. हा राज्याभिषेक तुला तुझे लहानपणींच झाला; आणि पित्याच्या मागें सर्व प्राण्यांचें परिपालन करण्याचा अधिकार तुझ्याकडे आला."

जनमेजय म्हणतोः—तुम्हीं सांगितलेल्या एकंदर चरित्रावरून पाहतां, सर्व कौरवकुलांत आणि विशेषतः सदाचरणतत्पर अशा माझ्या पूर्वजांच्या कुलामध्यें प्रजेला अप्रिय व अहितकर्ता असा राजा केव्हांही झाला नाहीं असें दिसतें. असें असतां माझ्या पित्याला अशा प्रकारचें मरण कसें आलें, तें इत्थंभूत मला सांगा. तें ऐकण्याची माझी फार इच्छा आहे.

सौति सांगतोः—ऋषीहो, याप्रमाणें राजा जनमेजयानें मंत्र्यांना विचारिलें. ते त्याचे मंत्री, आपल्या राजाला जें प्रिय असेल व ज्या योगानें त्याचें हित होईल तें करण्याविषयीं नेहमीं उत्सुक असत. राजाचे इच्छेप्रमाणें त्यांनीं त्याला परिक्षिताच्या मरणाची हकीकत, जशी झाली तशी सांगितली: ते म्हणाले, "हे राजा, तुझा पृथ्वीपालक पिता सर्व शस्त्रधरांमध्यें अग्रेसर असून त्याला मृगयेचें फार व्यसन असे. पांडु राजालाही असेंच मृगयेचें व्यसन होतें. तो आपला राज्यकारभार मंत्रिजनांवर सोंपवून नेहमीं शिकारीस जाई. त्याचप्रमाणें एके दिवशीं तुझा पिता सर्व राज्यकारभार आमच्यावर सोंपवून शिकारीकरितां वनांत गेला. तेथें एक मृग त्याच्या दृष्टीस पडला, तेव्हां त्यानें त्यास बाण मारिला. परंतु तो मृग त्याच्या हातीं न लागतां तसाच पळत सुटला, तो गहन अरण्यांत गेला. तेव्हां राजाही त्याच्या मागोमाग गेला. त्या वेळीं त्याजवळ घोडा वगैरे कांहीं नसून तो पायींच त्या मृगाच्या मागें पळत सुटला त्याच्या कमरेस तरवार, हातांत धनुष्य, आणि पाठीवर पुष्कळ बाण भरलेला एक भाता इतकीच सामुग्री होती. त्यानें त्या मृगाचा पुष्कळ पाठलाग केला, परंतु एकदा तो जो राजाच्या दृष्टीआड झाला, तो सांपडला नाहीं. त्याच्या वयाला साठ वर्षें झालीं होतीं; वार्धक्याची छाया त्याच्यावर पूर्णपणें आली होती; त्यांतून त्याला क्षुधाही फार लागली होती; अशा स्थितींत त्याला फार श्रम झाल्यामुळें तो अगदीं थकला, इतक्यांत त्या वनांत एक मुनि त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां राजानें त्यास 'इकडून एखादा मृग गेला का?' म्हणून प्रश्न विचारला, परंतु ते मुनिश्रेष्ठ मौनव्रत धारण करून बसले असल्यामुळें त्यांनीं त्याच्या प्रश्नास उत्तर दिलें नाहीं. ते एखाद्या खांबाप्रमाणें स्तब्ध बसले होते. राजा आधींच क्षुधेनें व श्रमानें व्याकुळ झाला होता, व तशा स्थितींत त्याच्या प्रश्नाचें उत्तर त्याला न मिळाल्यामुळें त्याला त्या शांत मुनीविषयीं अतिशय संताप आला, आणि ते व्रतस्थ आहेत ही गोष्ट लक्षांत न येऊन संतप्त झालेल्या त्या तुझ्या पित्यानें त्या मुनीशीं अतिशय उद्धटपणाचें वर्तन केलें! तेथें जवळच एक मृत सर्प पडला होता, तो त्यानें धनुष्याच्या टोकानें उचलून त्या मुनीच्या खांद्यावर ठेविला! इतकें झालें तरी त्या मुनींनीं मुखावाटे एक अक्षरही काढलें नाहीं, व त्या गोष्टीचा त्यांना रागही आला नाहीं. राजानें ठेवलेला

मृत सर्प तसाच खांद्यावर राहूं देऊन ते स्वस्थ बसले होते ! ”

अध्याय पन्नासावा.

—:०:—

काश्यपतक्षकसंवादोपलब्धि.

मंत्री सांगतातः—ह्याप्रमाणें त्या मुनींच्या खांद्यावर सर्प ठेवून तो भुकेनें व्याकूळ झालेला राजा आपल्या नगराला परत गेला. त्या ऋषीला गाईपासून झालेला एक शृंगी नांवाचा पुत्र होता. तो महायशस्वी, महातेजस्वी व प्रखर वीर्यवान असून अत्यंत कोपिष्ट होता. ही गोष्ट घडली त्यावेळीं तो ब्रह्मदेवाकडे गेला असून त्यानें त्याचें पूजन वगैरे केलें होतें. तो ब्रह्मदेवाची आज्ञा घेऊन परत निघाला, तों राजा परिक्षितानें आपल्या पित्याचा अवमान केल्याचें साद्यंत वर्तमान त्याच्या मित्राकडून त्याला समजलें. तेव्हां आपला पिता मौनव्रत धारण करून बसला असतां त्याच्या खांद्यावर राजानें मृत सर्प ठेविला असून तो अद्यापिही तसाच आहे, हें कळतांच तो अतिशय संतापला, आणि जितेंद्रिय, शुद्ध, कर्मनिष्ठ, अद्भुत तपांच्या योगांनें उज्ज्वल देह धारण करणारा, वाक् आदिकरून इंद्रियांचें दमन केलेला, सदाचारसंपन्न, शुभ भाषण करणारा, शांत, निर्लोभी, गंभीर, निर्मत्सर, वृद्ध, मौनव्रतस्थ आणि सर्व भूतांचें आश्रयस्थान अशा आपल्या पित्याचा तुझ्या पित्यानें अपराध केला हें जाणून त्या महातेजस्वी शृंगीनें क्रुद्ध होऊन तुझ्या पित्याला शाप दिला. तो अत्यंत कांतिमान ऋषिपुत्र वयानें लहान होता तरी त्याचें तेज मोठें प्रखर होतें. त्या वेळीं त्याच्याकडे पहाणाराला तो तेजानें जळतच आहे कीं काय असा दिसत होता. त्यानें रागारागानें हातांत उदक घेतलें, आणि तुझ्या पित्याला उद्देशून तो म्हणाला, “ माझ्या तपाचें सामर्थ्य कसें आहे तें तूं आतां पहा ! ” आणि लागलीच त्यानें शापवाणीचा उच्चार केलाः तो म्हणाला, “ ज्यानें माझ्या निरपराधी पित्याच्या खांद्यावर मृत सर्प ठेविला, त्या दुष्ट पाप्याला माझ्या वचनाच्या बळानें आजपासून सात दिवसांनीं अत्यंत प्रखर व विषारी असा तक्षक क्रुद्ध होऊन दंश करील, व त्या योगानें तो दग्ध होईल ! ” राजा जनमेजया, ह्याप्रमाणें बोलून तो तेथून निघाला व जेथें त्याचा पिता होता तेथें गेला आणि त्यानें आपण दिलेला शाप पित्याला निवेदन केला. पुढें त्या मुनिश्रेष्ठानें एक गुणशीलसंपन्न गौरमुख नामक आपला शिष्य तुझ्या पित्याकडे पाठविला, आणि “ माझ्या मुलानें तुला ‘ तक्षक आपल्या तेजानें जाळून भस्म करील ’ असा शाप दिला आहे, याकरितां आपलें रक्षण करण्याचा काहीं प्रयत्न करावयाचा असेल तर कर, ” असा निरोप तुझ्या पित्याला सांगण्याविषयीं त्याला आज्ञा केली. तो शिष्य लागलीच तुझ्या पित्याकडे आला, आणि थोडी विश्रांति घेतल्यावर त्यानें ऋषींचा इत्थंभूत निरोप राजास सांगितला. जनमेजया, तें त्याचें भाषण ऐकून, सर्पराज तक्षकापासून आपणास भय प्राप्त होऊं नये अशा बंदोबस्तानें तो राहिला; तों सातवा दिवस आला.

इकडे काश्यप नामक एक ब्रह्मर्षि राजाकडे येण्याच्या इच्छेनें घरून निघाला असतां वाटेंत नागराज तक्षकाची व त्याची गांठ पडली. तेव्हां त्यानें काश्यपास विचारिलें, “ अहो ब्राह्मणश्रेष्ठ, आपण इतक्या घाईनें कोणीकडे जात आहां व मनांत काय योजिलें आहे ? ”

काश्यपानें सांगितलें:—हे द्विजा, कुरुश्रेष्ठ परिक्षित नामक राजाला आज सर्पराज तक्षक दंश करून दग्ध करणार आहे, तेव्हां त्यापासून त्याला निर्भय करण्याकरितां मी जात आहें. कारण, मीं त्याचें संरक्षण केलें असतां त्याचा नाश खचीत होणार नाहीं

तक्षक म्हणतोः—हे ब्रह्मन्, त्याला तक्षक दंश करणार म्हणून जें तूं म्हणतोस, तो तक्षक मीच आहें, आणि मीं दंश केल्यावर त्याला जिवंत करण्याचें तुझें सामर्थ्य नाहीं, याकरितां ती इच्छा तूं व्यर्थ कां करितोस ?

याप्रमाणें भाषण करून तो त्या ब्राह्मणास म्हणाला, "माझा पराक्रम कसा आहे तो तूं पहा." असें बोलून त्यानें तेथेंच एक वृक्ष होता त्याला दंश केला. त्याबरोबर तो वृक्ष जळून भस्म झाला! परंतु राजा, काश्यपानें आपल्या मंत्रसामर्थ्यानें तो वृक्ष लागलीच जिवंत केला. तक्षकानें जेव्हां हें पाहिलें, तेव्हां ब्राह्मणाच्या सामर्थ्याविषयीं त्याची खातरी झाली. आतां ह्या गोष्टीला कांहीं तरी उपाय केला पाहिजे असें मनांत आणून, त्याची लोभाकडे प्रवृत्ति व्हावी या युक्तीनें त्यानें ब्राह्मणास म्हटलें की, 'आपली काय इच्छा आहे ती सांगा.'

ब्राह्मण म्हणालाः—मला द्रव्याची इच्छा आहे, व त्याकरितां मी राजाकडे जात आहें.

हें त्या महात्म्याचें भाषण ऐकून तक्षक मधुर शब्दांनीं म्हणाला, "हे पुण्यपुरुषा, राजापासून जितक्या द्रव्याची तूं इच्छा करीत आहेस, त्याहीपेक्षां मी तुला जास्त देतों तें तूं घे आणि परत जा."

ह्याप्रमाणें तक्षकानें सांगितल्यावर काश्यपानें इच्छेस वाटेल तितकें द्रव्य तक्षकापासून घेतलें व तो परत गेला.

असो; तो ब्राह्मण परत गेल्यावर, तुझा धर्मनिष्ठ पिता राजा परिक्षित अत्यंत सुरक्षित ठिकाणीं राहिला होता, तरी तेथें तो नागराज तक्षक कपटवेषानें गेला, आणि आपल्या विषरूप अग्नीच्या योगानें त्यानें त्याला जाळून टाकिलें! नंतर, हे पुरुषश्रेष्ठा, विजयाकरितां तुला राज्याभिषेक केला. हे राजाधिराज, ह्याप्रमाणें त्या भयंकर प्रसंगासंबंधी आम्हीं जें जें ऐकिलें व पाहिलें, तें सर्व तुला सांगितलें आहे. आतां, हे नरश्रेष्ठा, तुझ्या पित्याचा आणि उत्तंक ऋषीचा झालेला पराभव ऐकून तुला काय कर्तव्य असेल तें तूं कर.

सौति सांगतोः—अशा प्रकारें मंत्र्यांनीं राजा परिक्षिताच्या मृत्यूची हकीकत सांगितली, त्याच वेळीं त्या शत्रुदमन जनमेजयानें मंत्र्यांना आणखी विचारिलें, "तुम्हीं मध्यंतरीं वृक्षासंबंधानें जी हकीकत सांगितली, ती तुम्हांस कशी कळली ? तक्षकानें जाळून भस्म केलेल्या वृक्षाला काश्यपानें पुनः सजीव केलें म्हणतां ही गोष्ट खरोखर अपूर्व होय! मला असें वाटतें, काश्यपाच्या मंत्रसामर्थ्यानें माझा पिता निर्विष होऊन खचीत नष्ट झाला नसता! परंतु आपण दंश केला असतां ब्राह्मणानें राजाला जिवंत केलें ही वार्ता जर लोकांत पसरली, तर लोक आपणाला हसतील आणि आपण निर्विष झालों असें ते लोक म्हणूं लागतील, असें त्या दुष्टबुद्धि नीच सर्पाला वाटलें असावें, आणि खरोखर याच विचारानें त्यानें त्या ब्राह्मणाची इच्छा पूर्ण करून त्यास वाटेंतून परत फिरविलें असावें. असो; कांहीं असलें तरी मी त्याचा सूड घेतल्यावांचून कधींही राहणार नाहीं. परंतु, हे मंत्रिजनहो, तक्षकाचा आणि काश्यपाचा संवाद झाला तेव्हां तेथें तिसरें कोणी असल्याचें तुम्हीं सांगितलें नाहीं; मग तें कोणी कसें पाहिलें व पुढें तें तुम्हांस कसें कळलें, तेवढें समजण्याची मुख्यत्वेंकरून मला इच्छा आहे. ती तृप्त झाल्यावर मग सर्पनाशाचा काय विचार करावयाचा तो करूं.

मंत्री सांगतातः—राजन्, सर्पराज तक्षक व ब्राह्मणश्रेष्ठ काश्यप यांची वाटेंत गांठ पडली; तें वर्तमान आम्हांस कोणीं व कसें सांगितलें तें आम्ही आपणास सांगतों. कोणा एका ब्राह्मणाचा एक सेवक होता, तो लांकडें आणण्याकरितां त्या रानांत गेला होता. ज्या वृक्षास तक्षकानें दंश करून तो जाळून टाकिला, त्यावर तो वाळलेल्या

फांद्या तोडण्याकरितां चढलेला होता. ही गोष्ट तक्षक व ब्राह्मण यांस मुळींच माहीत नसून वृक्षाबरोबर तोही जळून गेला. पुढें काश्यपानें जेव्हां तो वृक्ष आपल्या मंत्रसामर्थ्यानें सजीव केला, तेव्हां त्याबरोबर तो सेवकही जिवंत झाला; आणि त्यानें तेथील सर्व हकीकत आम्हांस सांगितली, तीच हकीकत जशी त्यानें आम्हांस सांगितली तशीच आम्हीं तुला सांगितली. तेव्हां आतां तुला जें करावयाचें असेल तें तूं कर.

सौति सांगतो.—ह्याप्रमाणें तक्षकाच्या दुष्टपणाची हकीकत ऐकून,आधींच संतप्त झालेल्या जनमेजय राजानें त्वेषानें हात चोळले, आणि तो दीर्घ उच्छ्वास टाकूं लागला. त्याच्या डोळ्यांतून अश्रुपात होऊं लागला, तो त्याच्यानें आवरेना ! नंतर थोडा विवेक करून अश्रु बंद झाल्यावर तो क्षणभर स्वस्थ बसला, आणि आपणास काय करावयाचें त्याचा मनांत निश्चय करून तो आपल्या मंत्र्यांना म्हणाला, " अहो मंत्रिजनहो, माझ्या पित्याच्या मृत्यूसंबंधानें तुम्हीं जें मला सांगितलें, तें ऐकून माझ्या मनाचा जो निश्चय झाला आहे तो मी तुम्हांस सांगतों. मला असें वाटतें, ज्यानें माझ्या पित्याचा वध केला आहे, त्याचा तावडतोब सूड घ्यावा. त्यानें शृंगीचें निमित्त करून माझ्या पित्याला दग्ध केलें आणि काश्यपालाही परतविलें हा त्याचा खरोखर अत्यंत दुष्टपणा होय. जर तो ब्राह्मण आला असता, तर माझा पिता वांचला असता यांत शंकाच नाहीं. अहो ! काश्यपाच्या प्रसादानें व मंत्राच्या प्रभावानें जर तो राजा जिवंत राहिला असता, तर याचें काय खर्च झालें असतें ? परंतु राजाला जिवंत करण्याकरितां आलेल्या द्विजश्रेष्ठ काश्यपाला त्यानें परत फिरविलें हा त्याचा खोडसाळपणा होय. त्यानें माझ्या सामर्थ्याचा विचार केला नाहीं. राजाला जिवंत करण्याकरितां आलेल्या ब्राह्मणाला द्रव्य देऊन परत फिरविला हा त्या दुष्ट तक्षकाचा महान अपराध होय. वास्तव, उत्तंक, मी आणि तुम्ही या सर्वांचें अत्यंत प्रिय होण्याकरितां मी पित्याबद्दल तक्षकाचा सूड घेणार !

अध्याय एकावन्नावा.

—:०:-

सर्पसत्रोपक्रम.

सौति म्हणाला:—ब्रह्मन् , पृथ्वीपति जनमेजय राजाच्या या बोलण्यास मंत्रिमंडलाचें अनुमोदन मिळून त्यानें सर्पांचा नाश करण्याची प्रतिज्ञा केली; आणि तीप्रमाणें ऋत्विज व पुरोहित यांस बोलावून तो भाषणपटु राजर्षि मोठ्या आवेशानें म्हणाला, ' ऋषिश्रेष्ठहो, ज्या दुष्टानें माझ्या पित्यास दंश करून त्याचा प्राण घेतला, त्या तक्षक सर्पाचा जेणेंकरून पुरा सूड उगवितां येईल असा कांहीं तरी उपाय तुम्ही मला सांगा. ज्यापेक्षां त्या दुरात्म्यानें माझ्या पित्याला विषरूप अग्नीनें भाजून काढिलें आहे,त्यापेक्षां त्यासही अग्नींत दग्ध करून कृतापराधाबद्दल योग्य दंड करावा, असें माझ्या मनांत येतें. तर ज्यांतील प्रदीप्त अग्नींत त्या दुष्टास सपरिवार टाकितां येईल, असा एखादा यज्ञ आपणांस विदित असल्यास तो मला कृपा करून सांगा.'

ते ऋषि म्हणाले:—राजा, ईश्वरानें हें पुढील भवितव्य मनांत आणून, सर्पसत्र नामक एक मोठा यज्ञ केवळ तुजसाठींच निर्माण करून ठेविला आहे. त्याचें माहात्म्य पुराणांतरीं वर्णन केलें असून, तो क्रतु करण्याचा अधिकार तुजवांचून दुसऱ्या कोणासही नाहीं, असें पौराणिक सांगतात. त्याच्या विधानाची आम्हांस पूर्ण माहिती आहे.

ब्राह्मणांचें हें भाषण श्रवण करतांच जनमेजय राजास अत्यानंद झाला; पितृघातक तक्षक प्रदीप्त अग्नींत पडून दग्ध झालाच असें त्यास वाटलें; आणि तें सत्र करण्याविषयींचा आपला निश्चय त्यानें त्या वेदवेदांगवेत्त्या ब्राह्मणांस निवे-

दन करून, तत्संबंधी सर्व सिद्धता करण्यास सांगितलें. नंतर ब्राह्मणांनीं यज्ञमंडपासाठीं प्रथम यथाशास्त्र भूमापन केलें, आणि त्या ठिकाणीं विधिपूर्वक यज्ञमंडप उभारिला. वेदार्थाचें उत्तम परिशीलन केलेले कित्येक महाबुद्धिमान ब्राह्मण या यज्ञासाठीं मुद्दाम बोलावून आणिले. धन, धान्य इत्यादिकांची समृद्धि करून सर्व प्रकारची सिद्धता केली, व जनमेजय राजानें यज्ञदीक्षा घेतली. आतां सर्पसत्रास प्रारंभ होणार, इतक्यांत त्या यज्ञास विघ्न करणारी एक मोठी गोष्ट घडून आली: तेथें कोणीएक बुद्धिवान स्थपति (सुतार) होता; कोणतें घर कशा प्रकारें जयास येईल हें ज्यावरून समजतें, त्या वास्तुशास्त्रांत तो निष्णात होता. त्यानें त्या यज्ञमंडपाविषयीं असें भविष्य सांगितलें कीं, "हा यज्ञमंडप ज्या स्थलावर उभारण्यांत आला आहे, व ज्या वेळेवर भूमापनास आरंभ झाला त्या स्थलाच्या व त्या वेळेच्या गुणांनीं या यज्ञास मोठेंच विघ्न येईल. त्यास कोणीएक ब्राह्मण कारणीभूत होईल; व यज्ञ पूर्ण होणार नाहीं." यज्ञास प्रारंभ होण्यापूर्वींच जनमेजय राजास हें भविष्य समजलें; तेव्हां आंत येऊन कोणीही यज्ञास विघ्न करूं नये म्हणून, आपल्या आज्ञेशिवाय कोणासही आंत न येऊं देण्याविषयीं त्यानें द्वारपालास सक्त ताकीद केली.

अध्याय बावन्नावा.

—:०:—

सर्पसत्रारंभ.

सौति म्हणाला:—ऋषीहो, अशा प्रकारें बंदोबस्त केल्यावर यज्ञमंडपांत सर्पसत्रास प्रारंभ झाला. ऋत्विज आपआपलीं कामें यथाविधि करूं लागले. त्या ऋत्विजांनीं कृष्णवस्त्रें परिधान केलीं होतीं; होमधूम्रानें त्यांचे नेत्र आरक्त झाले होते; आणि उच्च स्वरानें मंत्रोच्चार करून ते यज्ञकुंडांतील प्रदीप्त अग्नींत आहुति टाकीत होते. त्यांनीं त्या अग्नींत सर्पांचें आव्हान करण्यास प्रारंभ केला, तेव्हां सर्व सर्पांचीं अंतःकरणें भीतीनें थरारून गेलीं! कांहीं अत्यंत दीन होऊन केविलवाण्या स्वरानें एकमेकांस हांका मारूं लागले; व भीतीनें मूर्छित होऊन धडाधड त्या प्रदीप्त अग्नींत येऊन पडले! सर्वांगास कंप सुटून ज्यांचीं अंतःकरणें धडाडून गेलीं आहेत, असे दीर्घ निश्वास टाकणारे शेंकडों सर्प, पुच्छ व मस्तक यांनीं एकमेकांस शेवटचें आलिंगन देत त्या अग्नींत प्रवेश करूं लागले! श्वेत, कृष्ण व नील वर्णांचे सर्प—कित्येक वयोवृद्ध तर कित्येक बाल्यावस्थेंत असलेले—नानाप्रकारें विलाप करीत त्या अग्नींत देह अर्पण करूं लागले. हे श्रोत्रियश्रेष्ठा शौनका, त्या वेळचा तो अनर्थ काय वर्णन करावा! कोसकोस, चारचार कोस लांबीचे सर्प, परंतु ते देखील गाईच्या कानाइतके आखूड होऊन वरचेवर त्या अग्नींत वेगानें येऊन पडूं लागले! याप्रमाणें, ज्यांस कोणत्याही प्रकारचा तरणोपाय राहिला नाहीं व जे निराधार झाले आहेत, असे ते सर्प निरुपाय होऊन त्या सत्रांत किती लक्ष किंवा किती कोटि नष्ट झाले,. याची गणती करणेंही अशक्य आहे! कित्येकांचीं शरीरें घोड्यासारखीं होतीं; कित्येक हत्तींच्या सोंडेप्रमाणें दिसत होते; कित्येक महाद्वाराच्या अडसराप्रमाणें लांब व लठ्ठ असे होते; कित्येक तर मत्त गजांप्रमाणें स्थूलदेही असून बलानेंही त्यांसारखेच होते. सारांश, मातेच्या आज्ञेविरुद्ध वागणारे मोठ्यापासून तों अति सूक्ष्म सर्पापर्यंत सर्व प्रकारचे व सर्व रंगांचे भयंकर विषारी सर्प मातेनें दिलेल्या शापाच्या प्रभावानें पीडित होऊन त्या वेळीं अग्नींत येऊन पडले!

अध्याय त्रेपन्नावा.

—:०:—

सर्पसत्रांतील ऋत्विजादिकांचीं नांवें.

शौनक विचारितात:—ज्याच्या योगानें सर्पांस

अति भयंकर अवस्था प्राप्त झाली, त्या बुद्धिमान जनमेजय राजाच्या या दारुण सर्पसत्रांत यज्ञकर्म करण्यास ऋत्विज तरी कोणकोण महर्षि होते, तो सर्पांचा भयंकर देखावा पाहण्यास त्या ठिकाणीं सभासद कोण होते, व या सत्राचा विधि ज्यांस उत्तम प्रकारें अवगत आहे त्यांमध्यें मुख्य असे महर्षि तरी त्या प्रसंगीं कोण होते, हें सर्व सविस्तर श्रवण करण्याची आमची इच्छा आहे.

सौति म्हणालाः—ऋषीहो, जनमेजय राजाच्या त्या यज्ञांत असलेल्या ऋत्विजांचीं व सभासदांचीं नांवें तुम्हांस सांगतों. वेदार्थ जाणणाऱ्या सर्व ब्राह्मणांमध्यें वरिष्ठ व च्यवनाच्या कुलांत उत्पन्न झालेल्या अशा चंडभार्गव नामक ब्राह्मणानें या यज्ञांत होत्याचें काम स्वीकारिलें होतें, कौत्सकुलोत्पन्न जैमिनी नामक वयोवृद्ध व विद्वान ब्राह्मण उद्गाता झाला होता, शार्ङरव नामक ऋषीनें ब्रह्मत्व पतकरिलें होतें, आणि पिंगळ नांवाचा ऋषि अध्वर्यु होता. तसेंच, पुत्र व शिष्य यांसहवर्तमान व्यास मुनि, उद्दालक, प्रमतक, श्वेतकेतु, पिंगळ, असित, देवल, नारद, पर्वत, आत्रेय, कुंड, जरठ, कालघट, वात्स्य, वेदाध्ययन व तपश्चर्या करतां करतां वृद्ध झालेला श्रुतश्रवा, कोहल, देवशर्मा, मौद्गल्य आणि समसौरभ हे व दुसरे पुष्कळ वेदवेत्ते ब्राह्मण जनमेजयाच्या त्या सत्रांत सदस्य होते. असो.

ऋषीहो, त्या महायज्ञाच्या हवनास ऋत्विजांनीं प्रारंभ करतांच, सर्व प्राण्यांस भयभीत करून सोडणारे सर्प दीन होऊन तेथें येऊन पडूं लागले; सर्पांची वसा व मेद यांचे पाट वाहूं लागले; आणि याप्रमाणें सर्पांचें दहन एकसारखें चालू असल्यामुळें चोहींकडे दुर्गंध पसरला ! त्या यज्ञकुंडापासून तों अंतराळापर्यंत सर्पांची सारखी रांग लागली होती. त्या सर्वांचे दुःखोद्गार व अग्नींत होरपळणाऱ्यांचे ते विलाप यांचा तर त्या ठिकाणीं हलकल्लोळ माजून राहिला !

तक्षकाला इंद्राचें आश्वासन.

मुनिवर्यहो, जनमेजय राजाच्या सर्पसत्राची वार्ता सर्पराज तक्षकास समजतांच तो अत्यंत भयभीत झाला. आपण पूर्वीं केलेल्या अपराधामुळेंच हा दुर्धर प्रसंग ओढवला हें तात्काळ त्याच्या ध्यानांत आलें; व केवळ आपल्या पारिपत्याकरितांच हें सर्व चाललें आहे, असें मनांत येऊन त्याचा थरकांप झाला. तेव्हां आश्रय मागण्यासाठीं स्वर्गांत इंद्राकडे जाऊन त्यानें त्यास घडलेलें सर्व वर्तमान कळविलें; व त्यास शरण जाऊन आपलें रक्षण करण्याविषयीं त्याची प्रार्थना केली. त्याच्या विनवणीनें संतुष्ट होऊन इंद्र त्यास म्हणाला, " तक्षका, या सत्रापासून तुझ्या केंसासही धक्का लागणार नाहीं. अरे, हें पुढील भविष्य मनांत आणून, तुझ्यासाठीं मीं पूर्वींच ब्रह्मदेवास प्रसन्न करून घेतलें आहे. या सत्रांत तुझा नाश होणार नाहीं असें त्यांनीं सांगितलें असल्यामुळें, आतां तुला भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. तूं अगदीं निश्चित अंतःकरणानें रहा. "

वासुकीचें जरत्कारूशीं भाषण.

सौति म्हणालाः—शौनकादिक मुनिश्रेष्ठहो, इंद्राकडून अशा प्रकारचें आश्वासन मिळतांच तक्षकास अत्यानंद झाला; व तो इंद्राच्या घरीं सुखानें राहिला. इकडे अग्नींत सर्प येऊन पडण्याचा एकसारखा तडाका चालला होता; त्यामध्यें वासुकीचा बहुतेक सर्व परिवार नष्ट झाल्यामुळें त्यास अत्यंत दुःख होऊन मोठी काळजी पडली. त्याचें काळीज तीळतीळ तुटूं लागलें; आणि त्याला भयंकर मूर्छा आली. नंतर थोड्या वेळानें सावध होऊन तो आपल्या जरत्कारु नामक भागिनीस म्हणाला, "ताई, आम्हांवर कोणता भयंकर प्रसंग येऊन गुजरला आहे, हें तुला विदित आहेच. माझ्या सर्वांगाचा दाह होत असून हृदय धडधडत आहे. दिशांचेंही भान नाहींसें होऊन, मला वेड लागल्यासारखें झालें आहे; आणि डोळ्यांपुढें

अंधारी येत असून हृदय विदीर्ण होत आहे असें वाटतें. आमचा समूळ उच्छेद करण्यासाठींच परिक्षित्पुत्र जनमेजयानें चालविलेल्या त्या सत्रांतील प्रदीप्त अग्नींत आज मलाही निःसंशय जाऊन पडावें लागणार ! मला आपल्या रक्षणाचा कांहींएक उपाय करतां येणें शक्य नाहीं, तेव्हां आज मला यमसदनीं जावें लागणार हें उघड दिसतें. ताई, हें पुढील भविष्य मनांत आणून या भावी संकटाच्या निरसनार्थ म्हणून जरत्कारु मुनींशीं तुझें जें आम्हीं लग्न करून दिलें, त्याची सफलता करून दाखविण्याची वेळ आज येऊन ठेपली आहे. या प्रसंगीं माझें व आपल्या गणगोताचें संरक्षण करणें तुझ्या स्वाधीन आहे. पूर्वी ब्रह्मदेवानें आम्हांस असा उश्शाप दिला आहे कीं, जनमेजयाचें हें सत्र चाललें असतां त्यास जरत्कारुपुत्र आस्तीक अडथळा करील. यास्तव, भगिनी, कौमार अवस्थेंतच वेदवेत्त्यांत वरिष्ठ होऊन जो वयोवृद्धांसही सन्माननीय झाला आहे, त्या तुझ्या आस्तीक नामक पुत्रास आमचें व आमच्या कुलाचें संरक्षण करण्यास सांग."

अध्याय चौपन्नावा.

-:०:-

आस्तीकजरत्कारुसंवाद.

सौति म्हणाला:—भुजंगराज वासुकीचें तें भाषण श्रवण करून त्या जरत्कारु नामक भुजंगीनें आस्तीक नामक आपल्या मुलास जवळ बोलाविलें व म्हटलें, "पुत्रा, वासुकी दादानें माझें तुझ्या पित्याशीं लग्न लाविलें यांत त्यांचा कांहीं विशेष हेतु होता; तो सिद्धीस नेण्याची वेळ आज आलेली आहे; यास्तव तूं त्याचें कार्य योग्य प्रकारें तडीस ने."

आस्तीक म्हणाला:—माते, तुझ्या लग्नाच्या वेळीं माझ्या मामानें कोणता हेतु मनांत योजिला होता, हें तर मला पुरतेपणीं कळूं दे; मग तें कार्य कितीही बिकट असलें, तरी तें करण्याचें माझ्याकडे लागलें.

सौति म्हणाला:—जरत्कारूचें आपल्या भावांवर विलक्षण प्रेम असल्यामुळें त्यांचें हित करण्याची तीस उत्कट इच्छा होती. भावांवर संकट आल्यामुळें तिला फार काळजी लागली होती; परंतु पुत्राच्या त्या उत्साहयुक्त भाषणानें ती तिच्या मनांतील भीति तत्क्षणीं नष्ट होऊन ती म्हणाली, " बाळा, कद्रू मातेपासून सर्व सर्पांची उत्पत्ति झाली, हें तर तुला ठाऊक आहेच. एकदा ती कद्रू व तिची सवत विनता यांच्यामध्यें, उच्चैःश्रवा अश्वाच्या रंगाविषयीं पण लागला. 'तो सर्व पांढरा आहे,' असें विनतेचें म्हणणें असून, 'त्याचें पुच्छ काळें आहे' असें कद्रूचें म्हणणें होतें. जिचें म्हणणें खोटें ठरेल, तिनें दुसरीचें दास्यत्व पतकरावें, असा करार झाला होता. त्या वेळीं कद्रूनें आपल्या पुत्रांस त्या अश्वाच्या पुच्छाच्या ठिकाणीं कृष्णवर्णानें राहण्यास आज्ञा केली; परंतु कांहीं सर्पांकडून तें न घडल्यामुळें ती संतप्त होऊन म्हणाली, 'कुलांगारांनो, ज्यापेक्षां तुम्ही माझी आज्ञा मान्य करीत नाहीं, त्यापेक्षां तुम्ही पुढें जनमेजय राजाच्या सर्पसत्रांत प्राणांस मुकाल, व यमसदनीं जाल!' याप्रमाणें तिनें त्यांस शाप दिला, इतक्यांत त्रैलोक्य निर्माण करणाऱ्या ब्रह्मदेवांनीं, सर्पांचें जालिम विष प्राणिमात्रास त्रास देणारें आहे हें मनांत आणून 'तथास्तु' म्हणून त्या शापास अनुमोदनही दिलें !

"बाळा, तो शाप व त्यास मिळालेलें तें ब्रह्मदेवांचें अनुमोदन ऐकून वासुकि अति उद्विग्न झाला. पुढें समुद्रमंथनाच्या वेळीं त्यानें स्वतः रज्जु होऊन देवांस मदत केल्यामुळेंच देवांस अमृत प्राप्त झालें; व समुद्रमंथनाचा हेतु सफल झाला; यास्तव देव त्यावर प्रसन्न झाले. तेव्हां त्यांस शरण जाऊन वासुकीनें आपली सर्व हकीकत

त्यांस निवेदन केली. तेव्हां सर्व देव माझा भाऊ वासुकि यास पुढें करून कमलोद्भव ब्रह्मदेवांकडे गेले; व त्या सर्वांनीं विनती करून ब्रह्मदेवांस प्रसन्न करून घेतलें: देव म्हणाले, 'हे कमलोद्भवा, हा सर्पांचा राजा वासुकि आपल्या चरणांस शरण आला आहे. सर्पजातीस झालेल्या मातृशापामुळें हा अत्यंत दुःखित झाला आहे. आपण याजवर कृपादृष्टि करून त्या शापाची निवृत्ति होण्यास कांहीं तरी उपाय सांगावा.'

"देवांचें हें भाषण श्रवण करून ब्रह्मदेव म्हणाले:—जरत्कारु मुनीचा त्याच नांवाच्या कन्येशीं विवाह होईल, आणि त्या दोघांपासून झालेला पुत्र या शापापासून सर्पांची मुक्तता करील."

जरत्कारु म्हणते:—हे पुत्रश्रेष्ठा, ब्रह्मदेवाच्या या भाषणाच्या अनुरोधानें, माझें तेंच नांव असलेमुळें, सर्पराज वासुकीनें माझें तुझ्या थोर पित्याशीं लग्न लाविलें; व तो दारुण काल यावयाच्या पूर्वीच सुदैवानें त्या ऋषीपासून माझे उदरीं तुझें जन्म झालें. असो. तो भीतिप्रद काल सांप्रत प्राप्त झाला आहे. तेव्हां त्या भयंकर अग्नीपासून माझ्या बंधूंची सुटका करून आमची भीति नाहींशीं करणें हें तुझें कर्तव्य आहे. कारण, पुढें आपला बचाव व्हावा ह्याच उद्देशानें तुझ्या वासुकि मामानें माझें त्या ज्ञानधन मुनींशीं लग्न केलें असल्यामुळें, त्याचा तो उद्देश विफल न होऊं देणें हें आपलें कर्तव्य आहे, असें मला वाटतें. तेव्हां, बाळा, तुला यासंबंधानें कसें काय वाटतें?

सौति म्हणाला:—ऋषीहो, मातेचें तें भाषण श्रवण करतांच आस्तीकानें तिच्या म्हणण्यास अनुमोदन दिलें; आणि दुःखानें संतप्त झालेल्या वासुकीकडे पाहून त्यास धीर देणारें असें भाषण केलें: तो म्हणाला, "हे सर्पश्रेष्ठा वासुके, त्या भयंकर शापापासून तुमची मी निःसंशय मुक्तता करीन. महाशया, तुझें अंतःकरण स्वस्थ असूं दे. आतां तुला यत्किंचितही भीति बाळगावयास नको. जेणेंकरून तुमचें कल्याण होईल, असा उद्योग मी करीन. नागराजा, मी जरी सहज कांहीं बोलून गेलों, तरी तें देखील असत्य होणें नाहीं, मग या वेळचें हें माझें प्रतिज्ञावचन अन्यथा होण्याची वार्ता कशाला पाहिजे? मातुला, जनमेजय राजा फार थोर आहे. तो यज्ञदीक्षा घेऊन बसला असेल त्या ठिकाणीं मी जाईन, त्यास अनेक प्रकारचे मंगलप्रद आशीर्वाद वगैरे देऊन त्याचें अंतःकरण संतुष्ट करीन, आणि त्या नृपतीकडून तें सत्र बंद करवीन. सर्पराजा, आपल्या भावी स्थितीबद्दल तूं करून ठेवलेल्या एकंदर योजनेवरून तुझें बुद्धिवैभव व्यक्त होत आहे. 'हा आपली पुढें मुक्तता करील' अशा प्रकारचा मजविषयीं जो तुझा फार दिवसांचा मनोरथ आहे, तो कदापि अन्यथा होणार नाहीं. तेव्हां आतां सर्व गोष्टींविषयीं मजवर पूर्ण भरंवसा ठेऊन तूं अगदीं स्वस्थ ऐस."

आस्तीकाचें हें भाषण ऐकून वासुकि म्हणाला:—बाळा आस्तीका, मी भीतीनें अगदीं गांगरून गेलों आहें. माझें हृदय विदीर्ण होत आहेसें मला वाटतें. 'मातेची आज्ञा पाळणें हें पुत्राचें कर्तव्य होय' या वेदाज्ञेचें परिपालन न घडल्यामुळें आम्हांस मातृशापरूप ब्रह्मदंड झाला आहे. त्यामुळें माझें मन भ्रमिष्ट होऊन मला दिशाभानही राहिलें नाहीं!

आस्तीक म्हणाला:—नागराजा, तूं मुळींच कष्टी होऊं नको. सर्पसत्रांतील त्या प्रदीप्त अग्नीची तुला फार भीति वाटत आहे; परंतु तिचा नाश मी तेव्हांच करीन. मातेच्या आज्ञेचा भंग करणें म्हणजे वेदाज्ञा मोडणें होय; तेव्हां तूं वेदाज्ञा अवमानिल्यामुळें तुला जो मातृशापरूप ब्रह्मदंड झाला आहे, तो प्रलयकालच्या अग्नीप्रमाणें प्रखर असून अतिभयंकर आहे खरा; तथापि मी त्याचें निवारण करीन. त्याबद्दल तूं तिळप्रायही भीति बाळगूं नको.

आस्तीकाचें यज्ञमंडपीं आगमन.

सौति म्हणाला:–आस्तीकानें याप्रमाणें प्रतिज्ञा करून वासुकीस चिंतामुक्त केलें; आणि त्या चिंतेचा सर्व भार आपणावर घेतला. परंतु आपली प्रतिज्ञा शेवटास कशी न्यावी याचा त्यास मोठाच विचार पडला. भुजगेंद्रांची मुक्तता करण्यासाठीं तो तात्काळ तेथून निघाला; व मोठ्या त्वरेनें त्या जनमेजय राजाच्या यज्ञासन्निध येऊन पोहोंचला. तो यज्ञमंडप अप्रतिम असून, त्यांत सूर्य व अग्नि यांसारखे तेजस्वी असे अनेक सदस्य बसले आहेत, असें त्याच्या दृष्टीस पडले. आस्तीक यज्ञमंडपांत प्रवेश करूं लागला, तेव्हां राजाज्ञेप्रमाणें द्वारपालांनीं त्यास प्रतिबंध केला. परंतु आस्तीक मोठा चतुर असून, शत्रूंस वश करण्याची कला त्यास उत्तम साधलेली होती; तेव्हां त्यानें या वेळीं त्या यज्ञाची अशी कांहीं प्रशंसा केली कीं, तेणेंकरून संतुष्ट झालेल्या राजाची अनुज्ञा मिळून त्याचा आंत प्रवेश झाला. यज्ञमंडपांत शिरतांच त्या द्विजश्रेष्ठानें त्या यशस्वी जनमेजय राजाची, तेथील ऋत्विज व सदस्य यांची, आणि अग्निनारायणाची स्तुति करून आपल्या अपार पुण्यबलानें त्या सर्वांस संतुष्ट केलें.

अध्याय पंचावन्नावा.

—:०:—

आस्तीककृत राजस्तुति.

आस्तीक म्हणाला:—हे भरतर्षभा जनमेजय राजा, प्राचीनकाळीं सोम, वरुण व प्रजापति यांनीं प्रयागक्षेत्रीं केलेल्या यज्ञाच्या योग्यतेचा हा तुझा यज्ञ आहे. यापासून आपलें सर्वांचें व आपल्या इष्टमित्रांचें कल्याण व्हावें. इंद्रानें शंभर अश्वमेध यज्ञ केले, त्यांच्या शंभरपट म्हणजे इंद्राच्या दहा हजार क्रतूंबरोबर हा तुझा यज्ञ आहे. याच्या योगानें तूं, तुझे ऋत्विज, आणि आपले प्रियजन या सर्वांचें हित होवो; आणि त्याबरोबर माझेंही होवो. परिक्षिता, पूर्वीं यम, हरिमेधा व राजा रंतिदेव यांनीं थोर थोर यज्ञ केले, तशाच प्रकारचा हा तुझा यज्ञ आहे. यापासून आपलें व आपणास प्रिय असलेल्यांचें कल्याण असो. राजा, तुझ्या या यज्ञाची योग्यता गय, शशबिंदु व कुबेर यांनीं केलेल्या महायज्ञाहून यत्किंचितही कमी नाहीं. यापासून आपण व आपले प्रियजन यांपैकीं कोणासही अपाय न व्हावा. हे भरतश्रेष्ठा, नृग, अजमीढ व दाशरथि रामचंद्र यांनीं केलेल्या यज्ञांप्रमाणें अतिश्रेष्ठ असलेल्या या तुझ्या यज्ञापासून आपलें व आपल्या इष्टमित्रांचें सर्वथा हितच व्हावें. हे भरतकुलावतंसा, तुझ्या या यज्ञाची थोरवी किती म्हणून वर्णन करावी? अजमीढ राजानें केलेला यज्ञ, किंवा धर्मराज युधिष्ठिरानें केलेला यज्ञ, यांची स्वर्गांत प्रशंसा होत असते; परंतु तुझा हा यज्ञ त्यांहून बिलकूल कमी नाहीं. त्यांच्या यज्ञांप्रमाणेंच हाही इष्टमित्रांसह आपणां सर्वांस मंगलप्रद होवो. पारिक्षिता, सत्यवतीपुत्र व्यास मुनींनीं स्वतः अनुष्ठान करून केलेला यज्ञ ज्याप्रमाणें सर्वांस मंगलकारक झाला, त्याप्रमाणेंच तुझाही हा यज्ञ आपलें व आपल्या प्रियजनांचें मंगल करो. राजा, इंद्राच्या यज्ञाप्रमाणेंच तुझ्या या यज्ञांत हे सूर्यासारखे तेजस्वी ब्राह्मण अनुष्ठान करीत आहेत. हे सर्वज्ञ असल्यामुळें आज त्यांस कोणतीही एखादी गोष्ट म्हणजे अज्ञात आहे असें नाहीं. यास्तव, परब्रह्मस्वरूप असलेल्या या ब्राह्मणांस तूं जें अर्पण करशील, तें साक्षात् परब्रह्माच्या ठिकाणीं अर्पण केल्याप्रमाणें होणार आहे; व यामुळें, त्या दानापासून मिळणाऱ्या पुण्याचा नाश कदापि होणें नाहीं. परलोकसाधनाविषयीं कृष्णद्वैपायनासारखा कुशल दुसरा ऋत्विज नाहीं हें मी निश्चयानें सांगतों. आपआपल्या कर्मांत प्रवीण असे हे पृथ्वीवर संचार करणारे सर्व ऋत्विज

त्याच व्यास मुनींचे शिष्य होते; व ते आज तुझ्या या यज्ञास आलेले आहेत. राजा, विलक्षण तेज हेंच ज्याचें धन आहे, ज्याचे किरण चित्रविचित्र आहेत, पृथ्वीतलावर विद्यमान असलेलें हिरण्य हें ज्याचें रेत, सर्व भूतांच्या ठिकाणीं अंशरूपानें जो निवास करितो, व हवनीय द्रव्यांचें भक्षण करून जो आपला मार्ग कृष्णवर्ण करितो, तो हा भगवान अग्निनारायण यज्ञकुंडांत प्रदीप्त झाला असून, त्याच्या प्रदक्षिण फिरणाऱ्या ज्वालांनीं त्याची प्रसन्नता व्यक्त होत आहे; व तीवरून, तुझ्या हवनीय द्रव्याची तो इच्छा करीत आहे हें स्पष्ट दिसतें. राजा, या पृथ्वीतलावर पुष्कळ राजे आहेत; परंतु प्रजेचें उत्तम प्रकारें पालन करणारा तुजप्रमाणें एकही नाहीं. तुला तुझीच उपमा द्यावयास पाहिजे. तुझें अप्रतिम धैर्य पाहून मला सदोदीत मोठें कौतुक वाटतें. जनमेजया, या सर्व गुणांमुळें तुला खरोखर वरुण किंवा यमधर्म यांचीच उपमा योग्य होय. हे नृपश्रेष्ठा, वज्रपाणी इंद्र या जगताचें पालन करण्यास जसा तत्पर राहतो, तद्वत् तूं आपल्या प्रजांचें दक्षतेनें रक्षण करतोस; यामुळें आम्हां सर्व प्रजाजनांस तूं अत्यंत प्रिय झाला आहेस. खरोखर तुझ्या योग्यतेचा राजा सांप्रत कोणी नाहीं; इतकेंच नव्हे, तर यामागेंही कधीं झाला नाहीं. राजा, खट्वांग, दिलीप व नाभाग यांसारखी तुझी योग्यता असून तुझा पराक्रम ययाति व मांधाता यांप्रमाणें अवर्णनीय आहे. प्रत्यक्ष सूर्याप्रमाणें तुझें तेज असून तूं आपल्या सदाचरणानें भीष्माचार्यांप्रमाणें शोभत आहेस. वाल्मीकि मुनींप्रमाणें तूं आपलें सामर्थ्य गुप्त ठेविलें आहेस, व वसिष्ठांप्रमाणें आपल्या कोपाचें नियमन करून शांतीचा अवलंब केला आहेस. राजेंद्रा, तुझी सार्वभौमसत्ता इंद्राप्रमाणें अव्याहत चालत असून, प्रत्यक्ष महाविष्णूसारखी तुझी कांति आहे. सर्व प्रकारचा धर्माधर्मविचार जाणण्यासंबंधानें तूं दुसरा यमधर्मच होस. सर्वगुणसंपन्नतेनें एक द्वारकाधिपति कृष्णच तुझी बरोबरी करूं शकेल. राजेंद्रा, तुझें भांडागार हें अष्टवसूंच्या संपत्तीचें निवासस्थान होय, तद्वत् तूं स्वतः अनेक यज्ञांचें निधान होस. दंभोद्भव राजाप्रमाणें तुझें सामर्थ्य असून, तूं अस्त्रविद्येंत व इतर सर्व शास्त्रांत परशुरामाप्रमाणें निष्णात आहेस. और्व व त्रित ऋषि, किंवा भगीरथ राजा यांप्रमाणें तूं तेजस्वी असल्यामुळें तुजकडे पाहणेंही दुष्कर आहे.

सौति सांगतोः—ऋषीहो, याप्रमाणें जनमेजय राजा, सदस्य, ऋत्विज व अग्नि यांची आस्तीकानें स्तुति केली, तेव्हां ते सर्व प्रसन्न झाले. आस्तीकाविषयीं सर्वांच्या मनांत आपल्याप्रमाणेंच आदरबुद्धि उत्पन्न झाली आहे, हें त्यांच्या मुद्रेवरून जनमेजयानें तेव्हांच ताडलें, व तो प्रसन्न होऊन बोलूं लागला.

अध्याय छप्पन्नावा.

—:०:—

आस्तीकवरयाचना.

जनमेजय म्हणालाः—विप्रहो, हा दिसण्यांत अगदीं लहान दिसत आहे, तथापि वृद्ध पंडिताप्रमाणें भाषण करीत आहे; हा वयानें बाल असला, तरी विद्वत्तेनें वृद्धच आहे, असें मला वाटतें. याची जी मनःकामना असेल, ती पूर्ण करण्याविषयीं माझ्या मनांत उत्कट इच्छा उत्पन्न झाली आहे; यास्तव याबद्दल आपण योग्य विचार करून मला एकमतानें सल्ला सांगा.

सदस्य म्हणालेः—राजन्, ब्राह्मण अल्पवयस्क असला, तथापि तो राजास पूज्यच आहे. मग याच्यासारखा जो महाविद्वान असेल, तो तर परमपूज्य होय. तुजकडून आज याचे सर्व मनोरथ परिपूर्ण झाले पाहिजेत; तथापि यास वरप्रदानानें संतुष्ट करण्यापूर्वीं तक्षक या ठिकाणीं

लवकर येईल असें करणें हें आपलें पहिलें कर्तव्य होय.

सौति म्हणाला:—त्यास वर देण्याची राजास प्रबल इच्छा होऊन ' वर माग ' असें म्हणून ती प्रकट करणार, इतक्यांत, तक्षक येथें येण्यापूर्वी यास वर देणें इष्ट नाहीं, असें होत्याचे मनांत येऊन, तें सुचविण्याच्या उद्देशानें तो कांहींसा खिन्नतेनें म्हणाला, "राजा, हा आपला यज्ञ इतके दिवस चालला आहे, परंतु अजून तक्षक येथें येत नाहीं; तेव्हां तोंपर्यंत यास तूं वर देऊं नये."

हें त्याचें भाषण ऐकतांच जनमेजय राजा खिन्न होऊन म्हणाला, "ब्रह्मन्, माझा चिरद्वेषी तक्षक येथें येऊन पडेपर्यंत हा यज्ञ चालविण्याचा माझा निश्चय आहे. यास्तव तो जेणेंकरून सत्वर येथें येईल, व हें आपलें कृत्य पूर्ण होईल, अशा प्रकारचा शक्य तितका प्रयत्न तुम्हीं सर्वांनीं करावा.

तेव्हां ऋत्विज म्हणाले:—हे महाराजा, आमच्या स्तुतीनें प्रसन्न झालेल्या मंत्रदेवता व अग्निनारायण यांकडून आम्हांस असें कळलें आहे कीं, या सत्राच्या भयानें त्रस्त झालेला तक्षक इंद्राच्या घरीं आहे. तो सूत लोहिताक्ष पौराणिक (स्थपति) खरोखर मोठा ज्ञानी आहे. त्यानें हें सर्व पूर्वींच जाणिलें होतें; व आपण त्यास विचारल्यावरून त्यानें व ब्राह्मणांनीं त्या वेळीं आपणांस जें सांगितलें, त्याप्रमाणेंच सांप्रत हें सर्व घडून येत आहे. तसेंच, कोणतीही गोष्ट मागील कल्पांत जशी घडली असेल, तशीच ती या कल्पांतही घडावयाची असा नियम आहे. त्याप्रमाणें मागील कल्पांतील आम्हांस माहीत असलेल्या वृत्तांतास अनुसरून आम्ही सांगतों. सांप्रत तक्षक इंद्रास शरण गेला असून, ' तूं या ठिकाणीं मजजवळ गुप्तपणें रहा, म्हणजे अग्नि तुला कदापि जाळूं शकणार नाहीं,' असें इंद्रानें त्यास अभिवचनही दिलें आहे.

हें त्यांचें भाषण श्रवण करून, आपण आरंभिलेलें हें सत्र व्यर्थ होतें कीं काय असें मनांत येऊन जनमेजय राजा दुःखित झाला. तथापि कर्म जोरानें चालविण्याविषयीं त्यानें होत्यास प्रेरणा केली. तेव्हां स्वकर्मांत तत्पर असलेल्या त्या चंडभार्गव होत्यानें हवन करण्यास प्रारंभ केला. तेव्हां, सर्व देव ज्याची स्तुति करिताहेत, बलाहक मेघ ज्याच्या मागून जात आहेत, आणि विद्याधर व अप्सर यांचे समुदाय ज्यासमवेत आहेत, असा तो महापराक्रमी इंद्रही विमानांत बसून स्वतः त्या ठिकाणीं येण्यास निघाला. पहा—इंद्राच्या उत्तरीय वस्त्राचा आश्रय करूनही तक्षकाचें भयव्याकुळ मन शांत झालें नाहीं. असो. इतक्यांत जनमेजय राजा अतिशय क्रुद्ध होऊन तक्षकास ठार करण्याची आपली मनीषा शेवटास नेण्याच्या उद्देशानें पुनः ऋत्विजांस म्हणाला, ' ब्रह्मन्, ज्यापेक्षां आमचा शत्रु तक्षक यास इंद्रानें आपल्या घरीं आश्रय दिला आहे, त्यापेक्षां तो इंद्रासह या प्रदीप्त अग्नींत पडेल असें करा.'

सौति म्हणतो:—ऋषीहो, जनमेजय राजाच्या मुखांतून तक्षकासंबंधानें असे शब्द निघतांच, होत्यानें इंद्रगृहीं असलेल्या तक्षकास तशा प्रकारें आव्हान केलें. त्याबरोबर तो व्यथित होऊन एका क्षणांत इंद्रासह आकाशांत दृग्गोचर होऊं लागला. तेथून इंद्रानें खालीं त्या यज्ञाकडे दृष्टि फेंकिली, तों त्याचें तें अत्युग्र स्वरूप अवलोकन करून तो भयभीत झाला; व तक्षकास एकटा सोडून अमरावतीस निघून गेला. हें पाहून ऋत्विज म्हणतात, " राजेंद्रा, इंद्र आपणास सोडून गेला हें अवलोकन करतांच, आपला सर्व आधार तुटला असें वाटून तक्षक अगदीं गोंधळून गेला आहे; व त्यास भीतीमुळें भयंकर मूर्छेनाही आली आहे; हा आमच्या मंत्रसाम-

ध्यानें बद्ध होऊन तो निरुपायानें अग्नीच्या ज्वालांसन्निध येऊं लागला आहे पहा!"

पुन: ऋत्विज जनमेजय राजास म्हणाले, "हे राजाधिराजा, आपलें हें यज्ञकृत्य सांप्रत यथासांग चाललें आहे. यास्तव या श्रेष्ठ ब्राह्मणास जो वर द्यावयाचा असेल, तो देण्यास हरकत नाहीं." तेव्हां जनमेजय राजा आस्तीकास म्हणाला, "बटो, तुझें ज्ञान इतकें अगाध आहे कीं, त्याविषयीं आम्हांस नुसती कल्पनाही करितां येत नाहीं. तुझ्या या योग्यतेस साजेल असा वर मी देतों. यास्तव, जी प्रिय गोष्ट तुझ्या अंत:करणांत वास करीत असेल, ती तूं या वेळीं मजपासून मागून घे. मग ती देण्यास अशक्य असली तथापि मी देईन." इतक्यांत पुन: ऋत्विज म्हणाले, "राजा, हा पहा तो तक्षक–तुझ्या ताब्यांत सांपडून त्वरित इकडे येत असून, भयविव्हल झाल्यामुळें मोठ्यानें फूत्कार करीत आहे! हा जो भयंकर शब्द आपणांस ऐकूं येत आहे, तो त्याचाच. त्यास इंद्रानें पूर्णपणें सोडिलें असून आमच्या मंत्रांनीं त्याचें शरीर नि:सत्त्व झालें आहे; व मूर्छना येऊन ज्याची ज्ञानशक्ति नष्ट झाली आहे असा हा नागराज तक्षक उष्ण व दीर्घ नि:श्वास टाकीत जवळ जवळ येत आहे!"

सौति पुढें सांगतो:—ऋषीहो, तक्षक त्या प्रज्वलित अग्नींत येऊन पडणार, इतक्यांत, आपला वर मागून घेण्याची हीच वेळ आहे असें जाणून, आस्तीक जनमेजय राजास म्हणाला, "राजा, तूं जर मला वर देण्यास सिद्ध झाला आहेस, तर मला हा वर दे–तुझें हें सर्पसत्र येथेंच थांबावें; आणि या ठिकाणीं इतउत्तर एकही सर्प अग्नींत पडूं नये. हेंच मागणें मी मागतों!"

आस्तीकाचें हें भाषण श्रवण करतांच जनमेजय राजास परम विषाद वाटून तो आस्तीकास म्हणाला, "भगवन्, सुवर्ण, रौप्य, गाई किंवा याहून दुसरें कोणतेंही जें मागाल, तें देण्यास मी सिद्ध आहें. परंतु, ब्रह्मन्, या माझ्या यज्ञास व्यत्यय आणूं नका." राजाचें हें भाषण ऐकून आस्तीक म्हणाला, "हे राजा, सुवर्ण, रौप्य, गाई वगैरे तूं देशील, परंतु तें घेऊन मला कांहीं कर्तव्य नाहीं; यास्तव मला तें नको. तुझें हें सत्र थांबलें म्हणजे, माझ्या मातृकुलाचा यांत विध्वंस होणार आहे तोही थांबेल. याकरितां मला हाच वर पाहिजे."

म्हणाला:—हे भृगुनंदना शौनका, याप्रमाणें आस्तीकानें सांगितलें असतां जनमेजय राजानें त्याचें मन वळविण्याविषयीं आपल्या वाक्चातुर्याची पराकाष्ठा केली; अनेक प्रकारें स्तुति करून, कल्याण इच्छून व विनवूनही पाहिलें; पण व्यर्थ! त्या आस्तीकानें दुसरा वर मागितलाच नाहीं. तेव्हां त्या ठिकाणीं असलेल्या सर्व वेदवेत्त्या सभासदांनीं एकविचार करून आस्तीकास इच्छित वर देण्याविषयीं राजास सूचना केली.

अध्याय सत्तावन्नावा.

—:०:—

सत्रदग्ध सर्पांचीं नांवें.

शौनकांनीं प्रश्न केला:–हे सूतनंदना, हें सर्पसत्र चाललें असतां जे जे सर्प अग्नींत येऊन पडले, त्या सर्वांचीं नांवें ऐकण्याची माझी इच्छा आहे.

सौति म्हणाला:—द्विजश्रेष्ठा, त्या वेळीं त्या अग्नींत हजारों कोट्यवधि सर्प पडले–इतके कीं, त्यांची गणती करणेंही शक्य नाहीं. तथापि त्यांतील मुख्य मुख्य सर्पांचीं नांवें मला आठवत आहेत, ती सांगतों; श्रवण करा. मातृशापरूप दंडानें पीडित होऊन दीन व निराश्रित निळे, तांबडे, पांढरे इत्यादिक अनेक प्रकारचे, ...च्या कुळांत जन्मलेले अति भयंकर सर्प त्या अग्नींत दग्ध झाले. त्यांपैकीं—कोटिश, मा-

नस, पूर्ण, शल, पाल, हलीमक, पिच्छल, कौणप, चक्र, कालवेग, प्रकालन, हिरण्यबाहु, शरण, कक्षक व कालदंतक हे मुख्य मुख्य होत. यांशिवाय दुसऱ्या कुलांतील अनेक धिप्पाड व बलाढ्य सर्पांची त्या अग्नींत आहुति पडली. तक्षकाच्या कुलापैकीं पुच्छांडक, मंडलक, पिंडसेक्ता, रभेणक, उच्छिख, शरभ, भंग, बिल्वतेजा, बिरोहण, शिली, शलकर, मूक, सुकुमार, प्रवेपन, मुद्गर, शिशुरोमा, सुरोमा व महाहनु हे मुख्यत्वें करून जळून मेले. पारावत, पारियात, पांडर, हरिण, कृश, विहग, शरभ, मेद, प्रमोद व संहतापन हे ऐरावतकुलोत्पन्न सर्प अग्नींत जाऊन पडले. त्याचप्रमाणें, नागांच्या कौरव्य नामक चौथ्या कुलांतील एरक, कुडल, वेणी, वेणीस्कंध कुमारक, बाहुक, शृंगवेर, धूर्तक, मातर व आतक हे मुख्य सर्प अग्नींत प्रविष्ट झाले. द्विजवरा, धृतराष्ट्रकुलांतील दग्ध झालेले सर्प वायूप्रमाणे चपळ असून अत्यंत विषारी होते. त्यांतील मुख्य मुख्य सर्पांचीं नांवें सांगतों: शंकुकर्ण, पिठरक, कुठारमुख, सेचक, पूर्णांगद, पूर्णमुख, प्रहास, शकुनि, दरि, अमाहठ, कमठक, सुषेण, मानस, अव्यय, भैरव, मुंडवेदांग, पिशंग, उद्रपारक, ऋषभ, वेगवान्, नाग, पिंडारक, महाहनु, रक्तांग, सर्वसारंग, समृद्ध, पटवासक, वराहक, वीरणक, सुचित्र, चित्रवेगिक, पराशर, तरुणक, मणि, स्कंध व अरुणि.

विप्रहो, याप्रमाणें मुख्य मुख्य सर्पांचीं नांवें मीं सांगितलीं. एकंदर संख्या फारच मोठी आहे, म्हणून मीं त्या सर्वांचीं नांवें सांगितलीं नाहींत. हे जे मुख्य मुख्य प्रख्यात सर्प सांगितले, त्या सर्वांची संतति व त्यांचे पुढें झालेले नातूपणतू इत्यादि जे जे अग्नींत जाऊन पडले, त्यांची गणना करणें अशक्य होय. त्यांपैकीं कित्येकांस तीन, तर कित्येकांस सात व कित्येकांस दहा फडा होत्या; व प्रलयकाळच्या अग्नीप्रमाणें त्यांचें विष कडक होतें. पर्वतशृंगांप्रमाणें उंच उंच, एकेक दोनदोन योजनें लांब, अत्यंत बलाढ्य असतांही विलक्षण चपल, आपलें रूप व बळ स्वेच्छेनुरूप पालटणारे, असे लाखों भयंकर विषारी सर्प, मातृशापामुळें त्या सर्पसत्र नामक महायज्ञांत दग्ध झाले!

अध्याय अठ्ठावन्नावा.

—:०:—

सर्पसत्रसमाप्ति.

सौति म्हणालाः—जनमेजय राजा आस्तीकास वर देऊन संतुष्ट करण्याच्या विचारांत आहे, इतक्यांत असा चमत्कार घडला कीं, इंद्रापासून भ्रष्ट होऊन तक्षक खालीं येत असतां मध्यें आकाशांतच थांबला. त्या प्रदीप्त अग्नींत एकसारखें बिनचूक हवन होत असूनही, तो भयभीत झालेला तक्षक त्यांत येऊन पडेना, तेव्हां जनमेजय राजास मोठीच चिंता उत्पन्न झाली.

शौनक प्रश्न करितातः—सूता, इतकें करूनही अग्नींत तक्षकाची आहुति पडली नाहीं, त्या अर्थी त्या विचारसंपन्न ब्राह्मणांचे मंत्रसमुदाय जागृतच नव्हते कीं काय?

सौति सांगतोः—हे मुनिश्रेष्ठा, अशी गोष्ट नाहीं. तक्षक न येण्याचें कारण दुसरेंच आहे: इंद्राचा आश्रय सुटून तो नागराज खालीं पडत असतां, त्यास आस्तीकानें "तिष्ठ तिष्ठ" 'थांब थांब' म्हणून त्रिवार सांगितलें. त्याबरोबर, जसा एखादा मनुष्य पृथ्वी व आकाश यांमध्यें अधांतरींच लोंबत रहावा, त्याप्रमाणें तो तक्षक अंतराळींच राहिला. असो; इकडे सर्व सभासदांनीं राजास वारंवार विनंती केल्यावरून व आपणही वचनबद्ध झाल्यामुळें, जनमेजयानें आस्तीकास इच्छित वर दिला: तो म्हणाला, "कांहीं हरकत नाहीं. आस्तीकाच्या म्हणण्याप्रमाणेंच कां होईना! ऋत्विजहो, आपलें हें सर्पसत्र इतकेंच पुरें करा.

जे सर्प इतउत्तर अवशिष्ट राहिले असतील, ते सर्व सुखी असोत, व आस्तीक मुनींस आनंद होवो. त्याचप्रमाणें, हें सर्व पूर्वींच कथन करणा ऱ्या त्या सूतकुलोत्पन्न सुताराचेंही तें भविष्य खरें होवो."

राजाच्या मुखांतून हे शब्द निघतांच सर्वत्र आनंदाचे उद्गार निघूं लागले. पांडुकुलोत्पन्न जनमेजय राजानें आस्तीकास वर देऊन, परिक्षिताच्या मृत्यूबद्दल सूड उगविण्याच्या उद्देशानें आरंभिलेला तो यज्ञ येथेंच थांबविला; आणि त्याचा कोप शांत होऊन तो संतुष्ट झाला. त्या यज्ञाकरितां आलेल्या सर्व ऋत्विजांस व सदस्यांस राजानें शेंकडों, हजारों मोहोरा दक्षणा दिली; व 'एक ब्राह्मण कारणीभूत होऊन हा यज्ञ अपूर्ण राहील' असें भविष्य ज्यानें वर्तविलें होतें, त्या सूतकुलोत्पन्न लोहिताक्ष सुताराचाही त्यानें पुष्कळ द्रव्य देऊन गौरव केला. नंतर विधिविधानानुसारें द्रव्यदान, वस्त्रदान व अन्नदान केल्यावर, त्या अतुलपराक्रमी जनमेजय राजानें मोठ्या संतोषानें विधिपूर्वक अवभृथस्नान करून यज्ञ समाप्त केला. नंतर त्यानें त्या कृतकार्य झालेल्या आस्तीकाची वस्त्रभूषणें देऊन यथायोग्य संभावना केली. नंतर, 'पुढें मला अश्वमेध यज्ञ कर्तव्य आहे, त्यांत सदस्यत्वाचा स्वीकार करण्यासाठीं आपण येथें पुनः अवश्य आलें पाहिजे,' अशी विनंती करून, त्यानें त्यास घरीं जाण्यास निरोप दिला. आस्तीक मुनिही 'ठीक आहे' असें म्हणून तेथून निघाले. आपण पतकरिलेलें अति दुर्घट काम सिद्धीस गेलें, शिवाय जनमेजय राजाही कष्टी न होतां आनंदित झाला, यामुळें आस्तीकास फारच समाधान वाटलें. त्यानें प्रफुल्लित अंतःकरणानें आपली माता व मातुल यांसंनिध जाऊन त्यांस नमन केलें, व सर्व वर्तमान इत्थंभूत निवेदन केलें.

ऋषीहो, आस्तीक आलेला पाहतांच सर्व नाग त्याच्या भोंवती जमले. ही हकीकत ऐकतांच त्यांचें सर्व दुःख नष्ट होऊन ते परमानंदांत निमग्न झाले; व आस्तीकावर प्रसन्न होऊन त्यास 'पाहिजे तो वर माग' म्हणून म्हणूं लागले. ते पुनः पुनः म्हणाले, "बाळा आस्तीका, तूं खरोखर महाविद्वान आहेस. आम्हां सर्वांस जीवदान दिल्यामुळें आम्ही तुजवर प्रसन्न झालों आहों. तर आज तुझी कोणती मनःकामना पूर्ण करून तुला आम्हीं संतोष द्यावा तें सांग."

सर्पांचें हें भाषण श्रवण करून आस्तीक म्हणाले:—मामा, हें माझें आख्यान या भूतलावरील जे प्राणी सकाळ संध्याकाळ भक्तिपुरःसर पठन करतील, त्यांस तुम्हांपासून बिलकूल बाधा होऊं नये. यावर सर्प आनंदानें म्हणाले, "आस्तीका, ही तुझी उत्कृष्ट मनीषा पूर्ण होईल. तूं केलेल्या उपकारामुळें आम्ही तुझ्या चरणीं लीन झालों आहों. तुझें हें इच्छित आम्हीं मोठ्या प्रेमानें सर्व प्रकारें परिपूर्ण करूं."

प्रसंगास *अनुसरून सर्पभयनिवारक मंत्र येथें देणें उचित आहे म्हणून दिले आहेत. ते असे:—]

सर्पभयनिवारक मंत्र.

असितं चार्तिमंतंच सुनीथं चापि यः स्मरेत् ।
दिवा वा यदि वा रात्रौ नास्य सर्पभयं भवेत् ।[1]

१ अर्थ—असित मुनि, आर्तिमंत व सुनीथ यांचें जो दिवसा किंवा रात्रीं केव्हांही स्मरण करील, त्यास सर्पबाधा होणार नाहीं. सर्पहो, जरत्कारु मुनींपासून त्यांच्या जरत्कारु नामक पत्नीच्या उदरीं जन्मलेल्या महायशस्वी आस्तीकानें जनमेजय राजाच्या सर्पसत्रांतून तुम्हांस सोडविलें आहे; यास्तव, महाभागांनो, त्या आस्तीक मुनीचें स्मरण करणाऱ्या मला दंश करणें तुम्हांस उचित नव्हे. सर्पा, पलीकडे हो. तुझें कल्याण असो. बा महाविषारी सर्पा, येथून निघून जा. जनमेजय राजानें केलेल्या सर्पसत्राचे शेवटीं आस्तीकानें काय सांगितलें आहे, त्याचें स्मरण कर. आस्तीकाचें नांव ऐकूनही जो सर्प परावृत्त होत नाहीं, त्याचें मस्तक शिंसवृक्षाच्या फलाप्रमाणें शतधा विदीर्ण होतें !

यो जरत्कारुणा जातो जरत्कारौ महायशाः ॥
आस्तीकः सर्पसत्रे वः पन्नगान्योऽभ्यरक्षत ।
तं स्मरंतं महाभागा न मां हिंसितुमर्हथ ॥
सर्पापसर्प भद्रं ते गच्छ सर्प महाविष ।
जनमेजयस्य सत्रांते आस्तीकवचनं स्मर ॥
आस्तीकस्य वचः श्रुत्वा यो न सर्पो निवर्तते ।
शतधा भिद्यते मूर्ध्नि शिंशवृक्षफलं यथा ॥

सौति म्हणाला:—मुनिवर्यहो, तेथें जमलेल्या सर्व भुजगेंद्रांनीं आस्तीकास अशा प्रकारें वचन दिल्यावर त्या महात्म्यास अत्यानंद होऊन तो तेथून निघून गेला. सर्पसत्रांतून नागांची मुक्तता करण्याचें आपलें जन्मकृत्य केल्यानंतर, त्यानें आपलें उर्वरित आयुष्य धर्मचिंतनांत घालविलें; व पुत्रपौत्रादि झाल्यानंतर तो योग्य कालीं मोक्षास गेला. अशा प्रकारचें हें आस्तीकाचें आख्यान मीं जसेंच्या तसें तुम्हांस सांगितलें. याचें श्रवण व पठन केलें असतां, सर्पापासून बिलकूल भय प्राप्त होत नाहीं.

हे भृगुकुलोत्पन्ना शौनका, तुझ्या प्रमति नामक पूर्वजास त्याच्या रुरु नामक पुत्रानें विचारल्यावरून त्यानें प्रसन्न चित्तानें त्यास ही कथा जशी सांगितली, त्याचप्रमाणें, महाज्ञानी आस्तीकाचें हें चरित्र माझ्या ऐकण्यांत जसें आलें आहे, तसेंच्या तसेंच मीं तुला प्रारंभापासून सर्व कथन केलें. हे जितेंद्रिया ब्राह्मणोत्तमा, डुंडुभाचें भाषण श्रवण करून सर्पसत्राविषयीं तुझ्या मनांत साश्चर्य जिज्ञासा उत्पन्न झाली होती, ती आतां हें पुण्यवृद्धि करणारें धार्मिक आख्यान श्रवण करून तृप्त झालीच असेल.



अंशावतरणपर्व.

अध्याय एकुणसाठावा.

भारतकथनार्थ शौनकप्रश्न.

शौनक म्हणाले:—सौते, भृगुवंशापासून जीं जीं आख्यानें सविस्तर तूं मला सांगितलींस, तीं श्रवण करून माझें अंतःकरण समाधान पावलें. आतां यापुढें, व्यास मुनींनीं ज्या ज्या कथा वर्णन केल्या असतील, त्या सर्व इत्थंभूत श्रवण करण्याची माझी इच्छा आहे; तर त्या कथा तूं सविस्तर कथन कर. तसेंच, त्या अवाढव्य सर्पसत्रामध्यें, सत्राचें नित्य कृत्य केल्यानंतर विश्रांतीच्या काळांत त्या ठिकाणीं जमलेल्या व्यासप्रभृति महाज्ञानी सभासदांमध्यें ज्या नानाप्रकारच्या कथा निघाल्या असतील, त्याही सर्व त्यांच्या प्रसंगांसह जशाच्या तशा तुझ्या मुखांतून श्रवण करण्याची आमची इच्छा आहे. तेव्हां त्या तूं विशेष स्पष्ट करून सांग.

सौति म्हणाला:—ऋषे, त्या विश्रांतीच्या वेळीं वेदज्ञ ब्राह्मणांनीं शुनःशेपाख्यानासारख्या अनेक वेदमूलक कथा सांगितल्या, परंतु विचित्रार्थ परिपूर्ण अशा ह्या अतिविस्तृत महाभारताख्यानाची योग्यता त्या वेदमूलक कथांपेक्षांही अधिक आहे हें मनांत येऊनच की काय, भगवान व्यास मुनींनीं वैशंपायनांकडून त्या प्रसंगीं तेंच सांगविलें.

शौनक म्हणाले:—पांडवांचें चरित्र ज्यांतसाद्यंत वर्णिलें आहे, असें तें यशस्कर महाभारताख्यान जनमेजय राजानें केव्हां विचारिलें, व वैशंपायनांनीं तें कसें सांगितलें, तें मला सांग. हे श्रेष्ठा, महर्षि व्यासांनीं योगाभ्यासानें आपल्या मनोरूप समुद्राचें मंथन केलें असतां त्यांतून उत्पन्न झालेली ही रत्नरूपी कथा सांगून तूं आमची इच्छा पूर्ण कर.

सौति म्हणाला:—फार उत्तम आहे. तें व्यासप्रणीत अत्युत्कृष्ट महाभारत मी प्रारंभापासून सर्व सांगतों; श्रवण करा. या पवित्र ठिकाणीं तुम्हांसारख्या योग्य श्रोत्यांस तें कथन करण्याची संधि मिळाल्याबद्दल मलाही फार आनंद होत आहे.

अध्याय साठावा.

—:०:—

कथानुबंध.

सौति सांगू लागला:—हे विप्रोत्तमा, जनमेजय राजानें सर्पसत्राची दीक्षा घेतली हें श्रवण करतांच महाज्ञानी व्यास मुनि त्या ठिकाणीं गेले. यमुनाद्वीपांत शक्तिपुत्र पराशरापासून सत्यवतीच्या कन्यकावस्थेंतच तिच्या उदरीं ज्यांचा जन्म झाला, जे पांडवांचे पितामह, ज्यांनीं उत्पन्न होतांच इच्छामात्रें करून आपला देह वाढविला, चारी वेद, षडंगें व इतिहास यांचें सांग अध्ययन करून ज्यांनीं अपार कीर्ति संपादिली, ज्यांचें तपाचरण, अध्ययन, व्रतें, उपवास इत्यादिकांची बरोबरी कोणीही करूं शकणार नाहीं, जें इतर कोणत्याही साधनांनीं प्राप्त होण्यास अशक्य तें आत्मज्ञानही ज्यांनीं जन्मतांक्षणींच संपादिलें, ज्यांनीं वेदाचे ऋक्, यजुः, साम व अथर्वण असे चार विभाग केले, जे ब्रह्माचें सोपाधिक व उपाधिरहित स्वरूप जाणणारे, जे भूत, भविष्य, व वर्तमान जाणणारे, जे सदाचारसंपन्न, ज्यांपासून पांडु, धृतराष्ट्र व विदुर यांचा जन्म झाला, शंतनूचा वंशविस्तार ज्यांच्या प्रसादानें झाला, श्रवण होतांच जिचें अनुकरण करावेंसें वाटतें अशी पवित्र ज्यांची कीर्ति, व आश्चर्यानें थक्क करून आनंदसागरांत मग्न करणारें ज्यांचें महद्यश, त्या महात्म्या व्यास मुनींनीं आपल्या वेदवेदांगपारंगत शिष्यांसहवर्तमान जनमेजय राजाच्या त्या सभेंत प्रवेश केला, तेव्हां त्या ठिकाणीं पुष्कळ सदस्य व नानादेशचे राज्याभिषिक्त भूपाल यांनीं परि-

वेष्टित असा जनमेजय राजा, देवगणांनीं परिवृत इंद्राप्रमाणें बसला आहे असें त्यांनीं पाहिलें.

व्यास मुनि सभेंत येतांच तो भरतर्षभ जनमेजय राजा व सर्व सभासद हर्षित होऊन तात्काळ उठून उभे राहिले. त्यांनीं त्यांस सुवर्णासन बसावयास देऊन, इंद्रसभेंत बृहस्पति आला असतां तेथें त्याचा जसा सन्मान होतो, तसा सन्मान केला. देव व ऋषि ज्यांस बहुमान देतात, ते वरदायक व्यास मुनि आसनावर बसल्यानंतर, जनमेजय राजानें त्यांचें विधिपूर्वक पूजन केलें. नंतर पाद्य, अर्घ्य, आचमनीय इत्यादि समर्पण करून, त्या दानार्ह ब्रह्मतुल्य मुनींस त्यानें मधुपर्कपूर्वक एक धेनुही अर्पण केली. जनमेजय राजानें केलेल्या त्या पूजेचा व्यास मुनींनीं प्रीतिपूर्वक स्वीकार केला, व 'धेनु सर्वथा अवध्य आहे' ही गोष्ट मनांत आणून त्यांनी तीस पाहिजे तिकडे निघून जाण्यास अनुज्ञा दिली. पूजन झाल्यानंतर जनमेजयानें त्यांस साष्टांग प्रणिपात केला, व नम्रपणें त्यांच्या सन्निध बसून त्यांस कुशलप्रश्न केला. तेव्हां व्यासांनीं त्याकडे सप्रेम अवलोकन करून 'खुशाल आहों' म्हणून सांगितलें. नंतर सर्व सदस्यांनीं त्यांची पूजा केली, व उलट व्यासांनींही त्या सर्वांचा गौरव केला. यानंतर जनमेजय राजानें सर्व सदस्यांसह कर जोडून व्यासांस प्रश्न केला.

जनमेजय म्हणाला:—द्विजवरा, कौरव, पांडव इत्यादि सर्वांस आपण प्रत्यक्ष पाहिलें असल्यामुळें, त्यांच्या सर्व गोष्टी आपणांस उत्तम विदित आहेत; यास्तव त्या आपल्या मुखांतून श्रवण कराव्या अशी आमची मनीषा आहे. माझ्या प्रपितामहांचें आचरण रागद्वेषादिविकारशून्य असतांही त्यांचें व कौरवांचें वितुष्ट येऊन दैवयोगानें त्यांचीं अंतःकरणें परस्परांविषयीं कशीं कलुषित झालीं, व बहुत जीवांचा संहार करणारें तें महायुद्ध कसकसें झालें, तें सर्व आम्हांस इत्थंभूत निवेदन करा.

सौति म्हणाला:—ऋषीहो, जनमेजय राजाचें हें भाषण श्रवण करतांच, भगवान व्यास मुनींनीं आपल्या सन्निध बसलेल्या वैशंपायन नामक शिष्यास तें भारताख्यान सांगण्याविषयीं आज्ञा केली: ते म्हणाले, "वैशंपायना, कौरव व पांडव यांच्यामध्यें वैरभाव कसकसा उत्पन्न होत गेला, व त्याचा कसा परिणाम झाला, तें सर्व तूं मजपासून श्रवण केलें आहेस; तें तसेंच्या तसेंच यांस कथन कर."

मुनिवर्यहो, वैशंपायनानें ही गुरूची आज्ञा शिरसा मान्य करून, जनमेजय राजा, अन्य पार्थिव, व तेथील सर्व सभासद यांस कौरवपांडवांमधील भेद व परिणामीं झालेला भयंकर विनाश या सर्वांचें साद्यंत वर्णन सांगितलें.

अध्याय एकसष्टावा.

—:०:—

संक्षिप्त भारतकथावर्णन.

वैशंपायन म्हणतात:—राजा, एकाग्र चित्त करून श्रद्धापूर्वक मनोभावानें प्रथम व्यास सद्गुरूस नमस्कार करून, आणि सर्व ब्राह्मण व दुसरे विद्वज्जन या सर्वांस सन्मानपूर्वक वंदन करून, ज्या महात्म्याचें नांव आज त्रैलोक्यांत गाजत आहे, त्या महाज्ञानी व्यास महर्षीचें संपूर्ण मत आपणांस मी विशद करून सांगतों. राजा, ही भारती कथा अवगत झाल्यानंतर, तुजसारख्या सत्पात्रास ती कथन करण्याविषयीं गुरुमुखांतून निघालेलें हें आज्ञावचन माझ्या मनास प्रोत्साहन देत आहे. राजेंद्रा, कौरवपांडवांमध्यें राज्यासाठीं कसें वाकडें आलें, द्यूत खेळल्यामुळें पांडवांस वनवास कसा प्राप्त झाला, व पृथ्वीतलावरील बहुतेक सर्व क्षत्रियांचा क्षय करणारें तें दारुण युद्ध कसकसें

घडलें, हें सर्व तुझ्या प्रश्नानुरूप मी कथन करितों, ऐक.

पांडु राजा मृत झाल्यानंतर ते वीर्यशाली पांडव अरण्यांतून स्वगृहीं परत आले, आणि अल्प काळांतच वेद व धनुर्विद्या यांत पारंगत झाले. पांडवांचें अलौकिक शरीरसामर्थ्य, उत्साह, चित्ताची व इंद्रियांची दृढता इत्यादि सद्गुणांमुळें ते पौरजनांस अत्यंत प्रिय झाले. तसेंच, त्यांचें वैभव व कीर्ति फार वाढली. हें पाहून कौरवांस त्यांविषयीं वैषम्य वाटूं लागलें. दुर्योधन, कर्ण, शकुनि वगैरे दुष्टांनीं त्यांचा निग्रह करण्यासाठीं व त्यांस दूर करण्यासाठीं नानातऱ्हा केल्या. कलिंग पक्ष्यानें सिंहाच्या दाढेंतील मांस काढून घेण्याचा प्रयत्न करावा, तद्वत् त्या साहसी दुर्योधनानें पांडवांचें राज्य हरण करण्याच्या हेतूनें त्यांस अनेक प्रकारें त्रास दिला. त्या पाप्यानें भीमसेनास विष देण्याचेंही धाडस केलें, परंतु बहुभक्षक वृक नामक अग्नि त्याच्या उदरांत असल्यामुळें त्या बहादरानें तें विष अन्नाबरोबरच पचवून टाकलें.! तथापि त्या विषाच्या अमलानें त्यास गुंगी येऊन गाढ झोंप लागली ही संधि साधून दुर्योधनानें त्याचे हातपाय बांधून प्रमाणकोटि तीर्थावर त्यास गंगेच्या उदकांत लोटून दिलें, व तो हस्तिनापुरास परत आला. इकडे तो महाबाहु भीमसेन विषाचा अंमल उतरून सावध झाल्यावर बंधन तोडून सुखरूपपणें गंगेंतून बाहेर निघाला. पुढें एकदा तर दुर्योधनानें भीमसेन निद्रित असतां त्याच्या सर्वांगास भयंकर विषारी कृष्णसर्प डसविले; तथापि शत्रूंचा निःपात करणारा तो वीर मेला नाहींच. कौरवांनीं जे जे अपकार करावे, त्यांचा प्रतिकार करून त्यांतून पांडवांची मुक्तता करण्यास महाबुद्धिमान विदुर सदोदीत तत्पर असे. स्वर्गांत राहणारा इंद्र पर्जन्यवृष्टीनें जसा सर्व प्राण्यांस सुखावह होतो, तसा विदुरही पांडवांच्या हिताविषयीं तत्पर राहून व त्यांस संद्रोध करून त्यांस सुखावह झाला. असो; भावी कौरवक्षयादि हेतूस्तव दैवानेंच ज्यांचें रक्षण केलें, त्या पांडवांचा नाश याप्रमाणें नानाप्रकारचे गुप्त व उघड उपाय योजूनही जेव्हां करतां येईना, तेव्हां कर्णदुःशासनप्रभृति मंत्र्यांनीं विचार करून व धृतराष्ट्राचें अनुमोदन घेऊन पांडवनाशार्थ लाक्षागृह निर्माण केलें. राज्योपभोगाच्या अतितृष्णेनें व आपल्या पुत्रांचें कल्याण व्हावें या इच्छेनें त्या अंबिकासुत धृतराष्ट्र राजानें पांडवांस नगराबाहेर हांकून दिलें. ते सर्वजण हस्तिनापुरांतून बाहेर पडले, तेव्हां त्यांबरोबर महात्मा विदुरही गेला. त्यानें पांडवांस या संकटांतून सुटण्याची युक्ति सांगितली, व तीप्रमाणें ते मध्यरात्रीच्या सुमारास जतुगृह सोडून अरण्यांत शिरले, आणि तेथून वारणावतीस जाऊन ते अहितांतक पांडव मातेसह तेथेंच गुप्तपणें राहिले. धृतराष्ट्राच्या आज्ञेप्रमाणें ते जतुगृहांत राहिले असतां त्यांनीं पुरोचनापासून एक वर्षपर्यंत मोठ्या सावधगिरीनें आपलें संरक्षण केलें, आणि विदुराच्या युक्तीप्रमाणें विवर तयार झाल्यानंतर त्या लाक्षागृहास आग लावून त्यांनीं त्यांत पुरोचनासच दग्ध केलें! ह्याप्रमाणें शत्रूचा नाश केल्यावर ते पांडव तेथून मातेसह निघून गेले. पुढें ते वनांतून प्रवास करीत असतां एका जलप्रवाहासन्निध हिडिंबासुर नामक भयंकर राक्षसाची व त्यांची गांठ पडली. पांडवांनीं तात्काळ त्यास ठार केलें; परंतु या कृत्यानें लोक आपणांस ओळखतील व तसें झाल्यास कदाचित् तें कौरवांच्याही कानावर जाईल, या भीतीनें ते तेथून रातोरात निघाले. वाटेंत भीमास हिडिंबेची प्राप्ति होऊन घटोत्कचाचा जन्म झाला. असो. हे सदाचारसंपन्न पांडव एकचक्रा नगरींत पोहोंचल्यावर वेदाध्ययनांत तत्पर राहून ब्रह्मचर्यानें काळ घालवीत मातेसहवर्तमान तेथेंच एका ब्राह्मणाच्या घरीं राहिले त्या ठिकाणीं बकासुर नामक एक बलिष्ठ राक्षस नित्य मनुष्य भक्षण

करीत असे. एकदा त्या बुभुभु राक्षसाची व भीमसेनाची गांठ पडली असतां त्या वीराग्रणी वृकोदरानें आपल्या बाहुबलानें त्या राक्षसास क्षणार्धांत ठार करून नगरवासीयांस संतुष्ट केलें. पुढें पांचाल देशांत राजकन्या द्रौपदीचें स्वयंवर व्हावयाचें आहे ही बातमी पांडवांस समजल्या मुळें ते लगेच तिकडे गेले, व त्याप्रमाणें त्यांस द्रौपदी मिळालीही. या प्रसंगीं पांडवांनीं शत्रूंचा नाश करून पराक्रम गाजविल्यामुळें, हे पांडव असें सर्वांस समजलें. पुढें एक वर्षपर्यंत तेथेंच द्रुपदगृहीं राहून नंतर ते हस्तिनापुरांत परत आले. तेथें आल्यावर धृतराष्ट्र व पितामह भीष्म यांनीं त्यांस असा उपदेश केला कीं, "बाबांनो, तुम्ही व कौरव एकत्र असलां म्हणजे तुमच्या वारंवार कलागती होतात, यास्तव तुम्ही येथें न राहतां खांडवप्रस्थांत जाऊन रहा, म्हणजे तंटा आपोआप मिटेल; अशी तोड आम्हीं विचार करून काढिली आहे, यास्तव मनांत बिलकूल मत्सर न आणतां तुम्ही तेथें रहावयास जा. तो प्रदेश अगदीं पृथक असून कांहीं कमी नाहीं. त्यांतील रस्ते विस्तृत असून त्यांत पुष्कळ देशांचा अंतर्भाव होतो."

राजा, या त्यांच्या आज्ञेप्रमाणें पांडव आपली सर्व संपत्ति घेऊन सुहृज्जनांसहवर्तमान खांडव प्रस्थीं राहावयास गेले. आपल्या शस्त्रप्रतापानें अन्य भूपालांस वश करून ते बहुत काळपर्यंत त्या ठिकाणीं सुखानें राहिले. त्या सदाचारसंपन्न व क्षमाशील पांडवांनीं केवळ धर्मावर सर्व भिस्त ठेवून व कोणत्याही प्रकारें मदोन्मत्त न होतां जागृत राहून आपल्या शेंकडों शत्रूंस धुळीस मिळविलें. महायशस्वी भीमसेनानें पूर्व दिशा जिंकिली; अर्जुनानें उत्तरदिग्विजय केला; आणि नकुलानें पश्चिम दिशा व शत्रुवीरांतक सहदेवानें दक्षिण दिशा जिंकिली. ह्याप्रमाणें पांडवांनीं संपूर्ण पृथ्वी आपल्या स्वाधीन करून घेतली. आपल्या अद्वितीय क्षात्रतेजानें पांचही पांडव सूर्याप्रमाणें झळकूं लागले. हे सूर्योपम पांच वीर व सहावा प्रत्यक्ष सूर्यनारायण असे सहा सूर्य भूतलावर विराजमान झाले असतां पृथ्वीस अनुपम शोभा आली. सव्यसाची अर्जुन अत्यंत गुणवान व स्थिरचित्त असून धर्मराजास प्राणापेक्षांही प्रिय होता; तथापि त्यासही त्या धर्मात्म्यानें कांहीं कारण उपस्थित झाल्यामुळें वनवासास पाठविलें. तो तेरा महिनेपर्यंत अरण्यवास केल्यानंतर द्वारावतीस जाऊन श्रीकृष्णास भेटला. त्या ठिकाणीं त्या महावीराचा कृष्णभगिनी सुभद्रा इजशीं विवाह झाला. ज्याप्रमाणें महेंद्राशीं शची किंवा श्रीकृष्णाशीं रुक्मिणी, त्याप्रमाणें ती मितभाषणी कमलनयना सुभद्रा अनुरूप अर्जुनाशीं संगत झाली. असो; सुभद्रेनें अतिप्रीतीनें अर्जुनास वरल्यानंतर तो तीसहवर्तमान खांडवप्रस्थास परत आला. त्या ठिकाणीं त्यानें खांडववन देऊन अग्नीस तृप्त केलें. अमकी गोष्ट अमुक प्रकारेंच करावयाची अशा निश्चयाचें बळ असलेल्या विष्णूस शत्रुनाश करणें म्हणजे कांहींच विशेष वाटत नाहीं, तद्वत्, श्रीकृष्ण परमात्म्याचें साह्य असल्यामुळें अर्जुनास खांडववनदाहाचें बिलकूल ओझें वाटलें नाहीं. अर्जुनाच्या या कृत्यानें संतुष्ट होऊन अग्नीनें त्यास गांडीव धनुष्य, दोन अक्षय्य भाते, व कपिध्वज रथ दिला. खांडववन दहन करीत असतां त्यांतून अर्जुनानें मयासुराची मुक्तता केली होती, त्या उपकाराची अंशतः फेड करण्याच्या हेतूनें त्यानें पांडवांकरतां एक रत्नखचित दिव्य सभागृह निर्माण केलें. दुष्टबुद्धि दुर्योधनानें अज्ञानतेमुळें परिणामावर दृष्टि न देतां त्या सभागृहाविषयीं लोभ धरला, व शकुनीच्या साह्यानें युधिष्ठिरास द्यूतांत कपटानें जिंकून बारा वर्षेपर्यंत वनवासास पाठविलें. त्याप्रमाणें वनवास करून व एक वर्षपर्यंत अज्ञातवासांत राहून चौदाव्या वर्षी पांडव प्रकट झाले, व त्यांनीं आपली संपत्ति

कौरवांजवळ परत मागितली. परंतु ती देण्याचें कौरवांनीं नाकारल्यामुळे तें भयंकर युद्ध जुंपलें. त्यामध्यें कौरवपक्षीय योद्धयांचा निःपात करून दुर्योधनास ठार केल्यानंतर पांडवांस तें नष्टप्राय झालेलें राज्य परत मिळालें. हे वीरश्रेष्ठा, अशा प्रकारें त्या निर्विकल्प कर्म करणाऱ्या पांडवांविषयीं कौरवांच्या मनांत भेदभाव उत्पन्न होऊन पांडवांचें राज्य गेलें, परंतु शेवटीं विजय होऊन त्यास सर्व पुनः प्राप्त झालें !

अध्याय बासष्टावा.

ग्रंथवर्णन.

जनमेजय विचारतो:-हे द्विजोत्तमा, महाभारताख्यान, व त्यांतील कौरवपांडवांचें समग्र चरित्र तूं संक्षेपानें कथन केलेंस तें श्रवण करून, त्या विचित्र अर्थांच्या कथा विस्तारपूर्वक ऐकण्याची मला अत्यंत उत्सुकता उत्पन्न झाली आहे; वास्तव, हे तपोधना, हें समग्र चरित्र तूं पुनः सविस्तर कथन कर. तूं सांगितलेल्या संक्षिप्त कथाभागानें माझें समाधान न होतां, माझ्या पूर्वजांचें तें अति विस्तृत चरित्र श्रवण करण्याची जी मला इच्छा होत आहे, तीस तशीच बळवत्तर कारणें आहेत. पहा-पांडवांस धर्माधर्मविचार उत्तम अवगत असूनही त्यांनीं भीष्मद्रोणादि अवध्य मंडळीचा घात केला; आणि त्यांच्या हातून असें धर्मबाह्य कृत्य घडलें असून हा लोक त्याबद्दल त्यांची प्रशंसाच करतात ! तसेंच, पांडवांचा कांहींएक अपराध नसतां कौरवांनीं त्यांची जी इतकी गांजणूक केली, ती, प्रतिकाराचें सामर्थ्य अंगात असूनही त्या नरश्रेष्ठांनीं कशी सहन केली ? अयुत गजांचें ज्याचें बळ, त्या भुजवीर्यशाली वृकोदरास इतके क्लेश झाले असतां त्यानें आपला क्रोध आवरून तरी कसा धरिला ? पाषाणहृदयी कौरवांनीं पतिव्रता द्रौपदीची तशा प्रकारें विडंबना केली असतां त्यांस शापून भस्म करण्याचें सामर्थ्य तीस असतांही तिनें त्यांस दग्ध कां करून टाकलें नाहीं ? त्याचप्रमाणें, ते नरश्रेष्ठ भीमार्जुन व माद्रीसुत नकुलसहदेव हे, दुष्ट कौरव आपला घात करीत आहेत हें समजूनही द्यूतासक्त धर्मराजास कसे बरें अनुकूळ झाले ? राजा युधिष्ठिर तरी प्रत्यक्ष यमधर्माचा पुत्र, धर्म जाणणारा व तदनुरूप वर्तन करणारांत वरिष्ठ; तेव्हां अशा त्या युधिष्ठिरानें तरी आपला कांहींएक अपराध नसतां इतके क्लेश कसे सहन केले ? गोपालकृष्ण ज्याचा सारथि, त्या पांडुपुत्र धनंजयानें बाणांचा वर्षाव करून तीं अफाट सैन्यें एकट्यानें यमसदनीं पाठविलीं तरी कशीं ? हे तपोधना, असे नानाप्रकारचे प्रश्न माझ्या मनांत उद्भवले आहेत, यास्तव हें सर्व यथातथ्य कथन करून, त्या महारथ्यांनीं ज्या ज्या स्थळीं जें जें कांहीं केलें असेल तेंही सर्व सांग.

वैशंपायन म्हणाले:—हे महाराजा, अंमळ धीर धर. त्या परमपवित्र महाभारताची ही व्यासप्रणीत अनुक्रमणिका मात्र मीं सांगितली आहे. आतां पुढें, सर्व लोक ज्यांचें पूजन करतात त्या महातेजस्वी व्यास महर्षींचें संपूर्ण मत मी सांगणार आहें. या भारत ग्रंथांत त्या महाज्ञानी सत्यवतीपुत्रानें पुण्यकारक अशा एक लक्ष श्लोकांचें व्याख्यान केलें आहे. जो ज्ञानी हे श्लोक दुसऱ्यांस ऐकवील, व जे लोक ते श्रवण करतील, त्यांस ब्रह्मलोक प्राप्त होऊन ते देवतुल्य होतील. हें आख्यान प्रत्यक्ष वेदांप्रमाणें पवित्र असून फारच रमणीय आहे. श्रवण करण्यास योग्य अशा सर्व पुराणांमध्यें हें वरिष्ठ असल्यामुळें मंत्रद्रष्टे ऋषिही याची फार प्रशंसा करतात. या परमपावन इतिहासांत कामशास्त्र व अर्थशास्त्र यांचें पूर्णपणें स्पष्टीकरण केलें असून, मोक्षोचित ज्ञानही प्रतिपादन केलें आहे,

धर्माविषयीं आस्तिक्यबुद्धि धारण करणाऱ्या सत्यप्रिय दानशूर थोर गृहस्थांस या महर्षि कृष्णद्वैपायनप्रणीत पांचव्या वेदाचें पुराण वगैरे सांगून विद्वज्जन द्रव्यार्जन करितात. या ग्रंथाच्या श्रवणानें भ्रूणहत्येचें पातकही निःसंशय नष्ट होतें; फार काय वर्णन करावें ? हा इतिहास श्रवण करून अतिदारुण पापीही सर्व पापांपासून मुक्त होऊन, राहुमुक्त चंद्राप्रमाणें सोज्ज्वळ होतो! या भारतेतिहासास 'जय' अशी संज्ञा आहे, यास्तव सर्व विजयेच्छूंनीं याचें अवश्य श्रवण करावें. ज्याच्या योगानें सुपुत्र उत्पन्न होतात असें हें श्रेष्ठ व उत्तम पुंसवनच होय. तसेंच, अमित कल्याण करणारें हें एक श्रेष्ठ स्वस्त्ययनच होय. भूपालानें आपल्या पट्टराणीसहवर्तमान याचें अवश्य श्रवण करावें. तेणेंकरून त्यास वीर्यशाली पुत्र होईल. कदाचित् कन्या झालीच तर ती राज्यभागिनी तरी होईल. हें महाभारत म्हणजे एक परमपवित्र धर्मशास्त्र होय. यास सर्वश्रेष्ठ असें अर्थशास्त्रही म्हणता येईल. अमित बुद्धिमान व्यास मुनींनीं हें एक वेदान्तशास्त्रच निर्माण केलें आहे. कित्येक विद्वज्जन सांप्रत हें कथन करीत आहेत, व दुसरे पुष्कळ लोक तें श्रवण करीत आहेत. याच्या श्रवणानें पुत्रास मातापितरांची शुश्रूषा करण्याची इच्छा उत्पन्न होते, आणि सेवक आपल्या धन्यास कल्याणप्रद होतात. जो मनुष्य हें आख्यान श्रवण करितो, त्याचें कायिक, वाचिक व मानसिक असें सर्व प्रकारचें पाप क्षणांत नष्ट होतें. परगुणाविषयीं निर्मत्सर अशा भरतश्रेष्ठ महात्म्या पांडवांचें, व अमित द्रव्यवान असून पराक्रमी, सर्वविद्याविशारद व लोकप्रसिद्ध कृत्यें करणाऱ्या अन्य क्षत्रियांचें हें विस्तृत जन्मवृत्त श्रवण करणारास कोणत्याही प्रकारची रोगबाधा होण्याचें भय नाहीं. या जगांत जो कोणी द्रव्येच्छा मनांत न धरितां केवळ पुण्यप्राप्तीस्तव भारताख्यान शुचिर्भूत ब्राह्मणांस कथन करील, त्याचें पुण्य किती म्हणून सांगावें ? प्रत्यक्ष सनातन धर्म हा त्याचा आहे. या प्रसिद्ध कुरुवंशाचें सतत संकीर्तन करणारास पुष्कळ संतति होते, व तो लोकांत पूज्य होतो. जो ब्राह्मण व्रतस्थ राहून या भारताख्यानाचें अध्ययन करितो, तो वर्षाकालांतील फक्त चार महिन्यांच्या अवधींत सर्व पापांपासून मुक्त होतो. महाभारत पठन करणारालाच ज्ञाता असें म्हणावें, व त्यालाच वेदपारंगत समजावें. ज्यांनीं आपल्या पातकांचें क्षालन केलें आहे असे देवर्षि, राजर्षि व परमपावन ब्रह्मर्षि यांच्या कथा या महाभारतांत असून, शिवाय केशवाचेही गुणानुवाद गाइले आहेत. लोकाधिदेव भगवान शंकर व आदिमाया पार्वती यांचें चरित्र वर्णिलें असून त्यांत षट्कृत्तिकांपासून जन्म पावलेल्या कार्तिकेयाचें जन्मवृत्त कथन केलें आहे. ब्राह्मण व धेनु यांचें माहात्म्य ज्यांत वर्णिलें आहे असा हा महाभारत ग्रंथ म्हणजे कर्मब्रह्मपर सर्व श्रुतींचें भांडागारच होय. हा धार्मिकांनीं अवश्यमेव श्रवण करावा. जो विद्वान हा ग्रंथ ब्राह्मणांस पर्वशार ऐकवील, तो सर्व पातकांपासून निर्धूत होऊन व स्वर्गासही जिंकून शाश्वत ब्रह्मपदास जाऊन पोहोंचेल. याचा अंतिमपाद जें श्राद्धपर्व, तें श्राद्धकालीं ब्राह्मणास ऐकविणाऱ्या मनुष्याचें तें श्राद्ध अक्षय्य होऊन पितरांस सदोदीत संतुष्ट करितें. समजून उमजून किंवा अज्ञतेनें मनुष्य जें जें पाप इंद्रियें व मन याच्या योगानें साऱ्या दिवसांत करितो, तें सर्व या महाभारताच्या श्रवणमात्रेंकरूनच नष्ट होतें. भरतांचें विस्तृत जन्मवृत्त यांत कथन केलें असल्यामुळें यास महाभारत असें म्हणतात. याचें सार जो जाणतो, त्याचें कोणतेंच पातक अवशिष्ट रहात नाहीं. भरतकुलोत्पन्न राजांचा जो अत्यद्भुत इतिहास यांत कथन केला आहे, त्याचें अनुवादन केलें असतां तो मनुष्यांस महदपराधापासूनही सोडवील. कृष्णद्वैपायन महर्षीस हा ग्रंथ करण्याची स्फूर्ति झाल्या-

नंतर त्यांनीं नित्य त्याच्या व्यासंगांत तत्पर राहून आदिपर्वापासून हें संपूर्ण महाभारत तीन वर्षांत निर्माण केलें. तो शुचिर्भूत मुनि महासमर्थ असतांही त्याची मनःकामना पूर्ण व्हावयास तीन वर्षें लागलीं, इतका प्रचंड हा ग्रंथ आहे. व्यासांनीं तपोनियमांचा अवलंब करून पवित्रपणें हा ग्रंथ रचिला आहे, यास्तव ब्राह्मणांनीं व्रतस्थ राहून याचें श्रवण करावें. कृष्णद्वैपायनप्रणीत ही पुण्यकारक सर्वोत्तम अशी भारती कथा जे साग्र पठन करतील, व जे नर ती श्रवण करतील, ते बऱ्या अथवा वाईट कोणत्याही मार्गानें वागणारे असोत, तसेंच त्यांनीं पापपुण्य केलें असो वा नसो, त्यांस त्याबद्दल शोककरावयास नको. कारण, याच्या श्रवणानेंच त्या सर्व प्रत्यवायांचा परिहार होणार आहे. आपल्या हातून धर्म घडावा अशी ज्यास इच्छा असेल, त्यानें हाच समग्र ग्रंथ श्रवण करावा. कारण, याच्या श्रवणानें, धर्माचें फल जें चित्तशुद्धि होणें वगैरे, तें प्राप्त होतें. जो पुण्यवान या अद्भुत ग्रंथाचें श्रद्धापूर्वक पठन करील, त्यास राजसूय व अश्वमेध हे यज्ञ केल्याचें पुण्य लागतें. सागर व मेरु पर्वत हे दोन रत्ननिधि म्हणून प्रसिद्ध आहेत, तद्वत् या महाभारतासही रत्ननिधि असेंच म्हणतात. हें वेदांसारखें पवित्र व उत्तम, रमणीयार्थपरिप्लुत, कर्णमधुर आणि शीलशुद्धि करणारें असून पावन आहे. ज्यानें हा ग्रंथ वाचकास अर्पण केला, त्यानें समुद्रवलयांकित सर्व पृथ्वीच दान केली. राजा, मी आतां जी हर्षप्रद दिव्य कथा सांगणार आहें, ती तूं विजयप्राप्तीस्तव व पुण्यवृद्धीस्तव संपूर्ण श्रवण कर. सदोदीत तत्पर असलेल्या कृष्णद्वैपायन मुनींस हें महाभारत रचण्यास तीन वर्षें लागलीं इतकें हें अद्भुत आहे. पहा-धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हें अवश्यसंपादनीय चतुष्टय व अधर्मानर्थदुःखसंसाररूप त्याज्य चतुष्टय यांचें या ग्रंथांत संपूर्णपणें निरूपण केलें आहे. ह्या ग्रंथांत जें सांगितलें आहे, तेंच दुसऱ्या सर्व ग्रंथांत घेतलें आहे. इतर ग्रंथांत महाभारताहून अधिक असें कांहींएक आढळावयाचें नाहीं. यास्तव, सर्व शास्त्रांच्या अर्थाचें संपूर्णपणें पर्यालोचन करण्याची ज्यास इच्छा असेल, त्यानें याच ग्रंथाचा आदर करावा.

अध्याय त्रेसष्टावा.

-:०:--

उपरिचरराजचरित.

वैशंपायन म्हणाले:—राजा, प्रजाचें रंजन करणारा उपरिचर नामक एक धर्मनिष्ठ भूपाल होता. तो सदोदीत मृगया करण्यांत निमग्न असे. त्या पूरुकुलोत्पन्न राजानें इंद्राच्या उपदेशावरून चेदि देश ग्रहण केला, तो प्रकार असा: उपरिचर राजा शस्त्राचा त्याग करून आश्रमांत उत्तम प्रकारें तपाचरण करीत राहिला असतां, इंद्रप्रभृति देव त्याजपुढें गुप्तपणें येऊन उभे राहिले. आपल्या तपोबलानें हा राजा इंद्रपदासही योग्य झाला आहे असें पाहून देवांनीं त्यापुढें आपलें प्रत्यक्ष रूप प्रकट केलें, व तपाचरणापासून त्यास निवृत्त केलें: देव म्हणाले, "उपरिचरा, सांप्रत भूमीवर नियंता असा कोणी नसल्यामुळें तेथें धर्मसंकर होण्याचा संभव आहे. तो न व्हावा म्हणून तूं पृथ्वीचें राज्य धारण कर. धर्मास तुझा पाठिंबा मिळाल्यावर तो संपूर्ण जग निश्चयानें धारण करील."

इंद्र म्हणाला:—राजा, तूं सदोदीत तत्पर राहून पृथ्वीचें पालन कर. ह्या भूलोकीं धर्माचरण केल्यानंतर त्याच्या योगानें तुला सनातन असे पुण्यलोक प्राप्त होतील. स्वर्गांत राहणाऱ्या माझा तूंच एक या भूलोकीं राहणारा प्रियमित्र आहेस. हे नराधिपा, या पृथ्वीतलावर अतिरमणीय असा जो चेदि देश, आमध्यें तूं वास्तव्य कर. हा देश

पशूंस हितकर व पवित्र असून धनधान्यांनीं समृद्ध आहे. हा स्वर्गतुल्य असल्यामुळें रक्षणीय असून अगदीं सौम्य आहे. उपभोगण्यास अवश्यक असे सर्व गुण या भूमीमध्यें आहेत. सर्व प्रकारचीं द्रव्यें व रत्नें विपुल असून जमिनीच्या पोटांत पुष्कळ द्रव्यनिधि असल्यामुळें हा देश संपत्तिमान झाला आहे. यास्तव तूं या देशांत वास्तव्य कर. हे चेदिपते. येथील लोकवस्तीचीं स्थलें म्हणजे प्रत्यक्ष धर्मपदतीर्थेंच होत. त्यांत राहणारे लोकही साधु असून पूर्ण समाधानी आहेत. याचेदि देशांत एरवीं तर नाहींच, पण थट्टेमध्येंसुद्धां कधीं असत्य भाषण आढळावयाचें नाहीं. पुत्र हे वडिलांपासून विभक्त न होतां सदोदीत त्यांच्या सेवेस सादर राहतात. यांतील जमीन इतकी सुपीक आहे कीं, ती नांगरण्याची जरूर पडत नसल्यामुळें बैलांच्या मानेवर जोकड ठेवण्याचा प्रसंगच येत नाहीं. बरें, जमिनीची मशागत न करतांही इतकें धान्य पिकतें कीं, दीन, अनाथ लोकही येथें आले असतां पुष्ट होतात. हे मानधना, या चेदि देशांतील सर्व वर्णांचे लोक आपापल्या विशिष्ट धर्माप्रमाणेंच नित्य आचरण करतात. राजा, तुला सर्व विदित आहेच. आत्मज्ञानानें तुला न कळलेलें असें या त्रैलोक्यांत कांहींही नाहीं. देवांनीं उपभोग घेण्यास योग्य अशा प्रकारचें एक आकाशांत गमन करणारें स्फटिकमय दिव्य विशाल विमान माझ्या प्रसादानें तुला प्राप्त होईल. भूलोकवासी सर्व लोकांत तूं एकटाच या श्रेष्ठ विमानांत बसून उंच आकाशांत भ्रमण करीत असतां युद्धास निघालेल्या एखाद्या देवाप्रमाणें शोभशील. शिवाय, जींतील कमलें कधींच कोमेजत नाहीत अशी ही वैजयंती माला मी तुला अर्पण करितों. हिचा असा प्रभाव आहे कीं, युद्धप्रसंगीं ही माला गळ्यांत असली म्हणजे तुला शस्त्रांचे व्रण होण्याची भीति नाहीं. हे राजा! 'इन्द्रमाला' नामक ही दैवी माला तुझें एक मोठें अद्वितीय असें इहलोकचें धन्यवाद देणारें भूषणच होईल.

नंतर इंद्रानें या राजाला आपल्या प्रेमाची खूण म्हणून साधूंचे प्रतिपालनार्थ एक वेळूची काठी दिली. असो; इंद्राचे उपकार स्मरून राजानेंही तो संवत्सर संपण्याच्या दिवशीं ती काठी थोडी जमिनींत पुरून ठेविली. ही चाल अद्यापिही राजे लोकांत सुरू आहे. नंतर नवीन वर्षाच्या प्रथम दिवशीं (वर्षप्रतिपदेला) त्या काठीला वस्त्रभूषणें, गंधपुष्पें इत्यादिकांनीं अलंकृत करून उंच उभारितात आणि वसुराजाप्रीत्यर्थ धारण केलेल्या हंसरूपी ईश्वराची या यष्टिद्वारा विधिपूर्वक मोठ्या आदरानें पूजा करितात. आपला हा असा उत्सव त्या वसुराजानें प्रचलित केलेला पाहून त्या चक्रवर्ती नृपावर इंद्राचा अनुग्रह होऊन त्यानें असा वर दिला कीं, "जे नृप व जे लोक चेदिराजाप्रमाणें माझा उत्सव व पूजा करितील, त्यांचा सदैव विजय होत जाऊन त्यांच्या राज्यांत अखंड लक्ष्मी वास करील, व त्यांच्या प्रजाजनांचेंही कल्याण होऊन ते नेहमीं संतुष्ट राहतील." याप्रमाणें त्या उदार महेंद्रानें चेदिमहाराजाचा उत्तम सत्कार केला; असो.

या वसु महाराजाप्रमाणेंच जे जे लोक इंद्राचा प्रातिवार्षिक उत्सव करून भूमिदान किंवा रत्नदान करितील, तेही वसूप्रमाणेंच पूज्य होतील. असो; याप्रमाणें इंद्राचा आवडता झालेल्या त्या चेदिराजानें पृथ्वीचें पालन धर्मतत्त्वानुसार केलें. हा राजा इंद्राचा उत्सव प्रतिवर्षी करी. याला महाशूर व महापराक्रमी असे पांच पुत्र होते. बृहद्रथ, प्रत्यग्रह, कुशांब (मणिवाहन) मावेल्ल व यदु हीं त्यांचीं नांवें होत. या आपल्या पुत्रांस त्यानें निरनिराळ्या देशांचीं राज्यें देऊन त्यांस अभिषिक्त केलें. तेही मोठे पराक्रमी निघाले. त्यांनीं आपलीं नांवें त्या त्या राष्ट्रांस व नगरांस देऊन आपलें नांव चिरस्थायी

केक्य यांचे निरनिराळे शाश्वत असे पांच वंश झाले हें सांगावयास नकोच. इकडे वसु राजा हा इंद्रदत्त स्फटिकविमानांत राहून आकाशांत संचार करीत असतां तेथें गंधर्वादिकांनीं उत्तम प्रकारें त्या महाराजाची सेवा केली. राजा नेहमी आकाशातच राही, म्हणून त्याचें 'उपरिचर' असें नांव प्रसिद्ध झालें.

एकदा असा चमत्कार झाला कीं, आपल्या नगरीजवळूनच वाहणाऱ्या शुक्तिमति नामक नदीला कोलाहल नांवाच्या पर्वतानें कामवासना-पूर्वक अडविलें आहे, हें पाहून वसु राजानें त्या पर्वताला लाथ मारून एक विवर पाडिलें, व नदीप्रवाहाचा मार्ग मोकळा केला. पण त्या पर्वतसंगतीनें नदीला एक मुलगा व एक मुलगी असें जुळें झालें होतें. तें जुळें त्या कृतज्ञ नदीनें प्रसन्न होऊन राजाला दिलें. राजानें मुलाला आपलें सैनापत्य दिलें, आणि मुलीचें आपण स्वतः पाणिग्रहण केलें. या नूतन स्त्रीचें नांव गिरिका. ही लवकरच ऋतुस्नात झाली. नंतर शुद्धस्नान करून शुचिर्भूत झालेल्या त्या नवीन भार्येला ऋतुदान द्यावयाचें त्या दिवशींच, त्या महाराजावर प्रेम करणाऱ्या पितरांनीं 'मृगयेस जा' अशी त्या धार्मिक राजाला आज्ञा केली. राजा मृगयेस गेला, पण अतिसुंदर गिरिकेचें स्मरण त्यास वारंवार होत होतें. तो मृगया करून एका रमणीय वनांत शिरून पाहतो, तों तेथें अनेक प्रकारचे सुगंधि वृक्ष पुष्पफलांनीं ओथंबलेले आहेत, कोकिल रवानें व भ्रमरांच्या गुंजारवानें त्या वनांत अश्रुतपूर्व मधुर स्वर निघत आहे, वसंत ऋतु आहे, पण आपली नूतन भार्या गिरिका नाहीं असें त्यानें पाहिलें. अशा त्या कामपोषक रमणीय वनांत आपली भार्या नाहीं, हें मनांत येऊन त्याचा कामसंताप अत्यंतच वाढला, आणि फिरण्यानें समाधान होत नाहीं हें पाहून तो संतापव्याकुल वसु राजा संतापशमनार्थ पर्णपुष्पफलयुक्त अशा रमणीय अशोक वृक्षाखालीं बसला. इतक्यांत तो रम्य देखावा, सुगंध, वसंत ऋतु इत्यादि मादक वस्तूंनीं कामोन्मत्त झालेल्या त्या राजाचें रेतस्खलन झालें! तेव्हां आपलें अमोघ रेत व्यर्थ जाऊं नये म्हणून त्यानें तें एका वृक्षपत्रांत (द्रोणांत) धरून ठेविलें, व हें उपयोगीं रेत आपलें मार्गप्रतीक्षण करणाऱ्या ऋतुस्नात भार्येस शुभ मुहूर्तावर कसें मिळेल याचा तो विचार करूं लागला, इतक्यांत त्याच्या दृष्टीस एक श्येन पक्षी पडला. हा लवकर चालणारा पक्षी आपलें कार्य करील असें वाटून तो धर्मरहस्य जाणणारा राजा श्येनाजवळ गेला, आणि 'हें अभिमंत्रित रेत माझ्या प्रिय भार्येला लवकर नेऊन दे' अशी त्यानें प्रार्थना केली. ती विनंती मान्य करून तो श्येन जोरानें उडून कांहीं मार्गक्रमण करीत आहे तों त्याच्यावर दुसऱ्या एका बुभुक्षु श्येनानें झडप घातली. तेव्हां अर्थातच त्या उभयतांचें आकाशांत मोठें कडाक्याचें तुंड युद्ध झालें; त्यांत त्या रेतवाहक श्येनाच्या पायांतून रेतपूर्ण द्रोण यमुना नदींत पडला !

राजा, या यमुना नदींत अद्रिका नांवाची अप्सरा ब्रह्मशापानें मत्स्यी होऊन पडली होती. तिनें तो द्रोण घेऊन त्यांतील वीर्य भक्षिलें ! पुढें त्या मत्स्यीला दहाव्या महिन्यांत धीवरांनीं धरून फाडिलें. तेव्हां तिच्या उदरांतून एक मुलगा व मुलगी अशीं दोन मुलें बाहेर आलीं. हा चमत्कार धीवरांनीं राजास सांगितला, व तीं बालकें त्याच्यापुढें ठेविलीं. उपरिचर राजानें मुलाचें नांव मत्स्य असें ठेवून त्याचा स्वीकार केला. हा मुलगा पुढें धर्मयुद्ध करणारा झाला. इकडे ती अद्रिका मत्स्यी, 'दोन मानवांस जन्म दिल्याबरोबर तूं मुक्त होशील' या उश्शापाच्या आधारानें मुक्त होऊन स्वर्गधामाला गेली. त्या मुलांपैकीं मुलगी होती ती एका नाविकाला अर्पण करून 'स्वकन्येप्रमाणें इचें पालन कर' असें राजानें

त्या नाविकाला सांगितलें. ही मुलगी रूप, बळ, तेज इत्यादिकांनीं व स्त्रीजातीला शोभा देणाऱ्या सर्व गुणांनीं युक्त अशी होती. इचें नांव सत्यवती. ह्या मुलीला मासे धरणाऱ्या कोळ्यांची संगति असल्याकारणानें तिच्या अंगाला माशांची घाण येत असे. ही सत्यवती आपल्या मानीव पित्याच्या कामाला हातभार लावून नावही चालवीत असे.

व्यासादिकांची उत्पत्ति.

राजा, पुढें एके दिवशीं, तीर्थयात्रेसाठीं पर्यटन करणारे भगवान पराशर महर्षि त्या नदीवर येऊन नावेंत बसले, तेव्हां या अतिलावण्ययुक्त व सिद्धांना सुद्धां मोह पाडणाऱ्या सत्यवतीचें अनुपम सौंदर्य पाहून कामवश झाले, आणि 'मला रतिदान दे' असें म्हणाले. तेव्हां सत्यवती म्हणाली, "भगवन्! चोहींकडे ऋषि बसले आहेत, तेव्हां यांच्या समक्ष आपला व माझा समागम कसा होऊं शकेल?" सत्यवतीचें हें भाषण ऐकून, त्या कामप्रेरित महर्षींनीं स्वप्रभावानें गाढ धुकें उत्पन्न करून दिवसाढवळ्याच सर्वत्र घनदाट अंधकार पसरविला! हा चमत्कार पाहून ती मुलगी सलज्ज होत्साती पराशरास म्हणाली, "मी बापाच्या आज्ञेंत चालणारी कन्या आहें. आपल्याशीं संग केला तर माझा कन्याभाव दूषित होईल. महाराज! पुढें हें काळें तोंड घेऊन मी जगूं तरी कशी? अशा स्थितींत मला घरीं जातां येत नाहीं, व पाप होईल या भीतीनें मला येथें रहातांही येत नाहीं."

त्या कन्येचें हें अर्थपूर्ण भाषण ऐकून पराशर ऋषि प्रसन्न झाले व म्हणाले, "माझी कामशांति केलीस तरी तुझा कन्याभाव दूषित होणार नाहीं, समजलीस? आणखीही तुला कांहीं अभीष्ट वर मागावयाचा असेल तर माग. माझी वाणी किंवा माझा वर केव्हांही मिथ्या होणार नाहीं." तेव्हां सत्यवतीनें वर मागितला कीं, 'माझ्या सर्व अंगाला सुगंध यावा.' ऋषींनीं 'तथास्तु' असा आशीर्वाद दिला. पुढें त्यांचा समागम प्रीतिपुरःसर झाला या वरप्राप्तीच्या दिवसापासून सत्यवतीला 'गंधवती' असें म्हणूं लागले, व एक योजनपर्यंत तिच्या अंगाचा सुवास जात असे म्हणून तिला 'योजनगंधा' असेंही म्हणूं लागले. पराशर ऋषींपासून तिला गर्भप्राप्ति झाली व पुढें पुत्र झाला. तोच महातेजस्वी श्रीव्यास होय. यमुनाद्वीपांत जन्म झाला म्हणून ह्याला 'द्वैपायन' असें नांव मिळालें; व कृत, त्रेता, द्वापर आणि कलि या युगांत अनुक्रमानें धर्माचा ऱ्हास होत जाणार, त्याच्या चार पायांपैकीं एकएक पाय अनुक्रमानें नष्ट होणार; तसेंच मनुष्यांची शक्ति व त्यांचें आयुष्य हीं युगानुसार कमी होणार; हें पाहून, आणि ब्रह्म व ब्राह्मण यांचें संरक्षण झालें पाहिजे, असें मनांत आणून, श्रीमद्द्वैपायनांनीं वेदांचा शाखाभेदानें विस्तार केला व एकंदरीनें वेदाभ्यास सुलभ केला, म्हणून त्यांस '१व्यास' ही संज्ञा मिळाली. असो; 'माझें स्मरण करशील तेव्हां तुला दर्शन देईन' असा मातेस वर देऊन हे व्यास ऋषि तपश्चर्येसाठीं निघून गेले. श्रीव्यासांनीं भारतासकट पांच वेद सुमंतु, जैमिनि, पैल, वैशंपायन हे शिष्य व शुकाचार्य आपला मुलगा, या सर्वांस पढविले. पुढें, भारताला आधारभूत जे चार वेद, त्यांच्या संहिता, मंत्र व ब्राह्मण हीं पूर्वोक्त शिष्यांनीं निरनिराळ्या स्वरूपांनीं प्रकट केलीं.

राजा, व्यासांप्रमाणेंच श्रीगंगेच्या उदरीं शंतनूपासून महापराक्रमी व शुद्ध कीर्तीचे भीष्माचार्य उत्पन्न झाले. ते अष्टवसूंच्या अंशापासून झाले. तसाच विदुरही यमधर्माच्या अंशापासून जन्मला. त्याचें कथानक असें:—

वेदार्थ जाणणारे महाप्रसिद्ध व महायोग्य अणीमांडव्य महर्षि यांच्यावर एकदा चोरीचा

१ विव्यास वेदान् यस्मात्स तस्माव्यास इति स्मृतः।

आळ येऊन त्यांत त्यांस सुळावर चढविण्याची शिक्षा झाली ! पुढें यमधर्मास त्यांनीं बोलावून आणून विचारिलें कीं, " यमधर्मा ! मीं बाळपणीं एका कीटकाला नुसत्या काटकीनें टोंचिलें होतें, ह्या पातकाशिवाय माझ्या हातून कोणतेंही पातक झालेलें मला आठवत नाहीं. पुन: तें क्षुल्लक पातक माझ्या उग्र तपश्चर्येनें सहजच जळून भस्म झालें असेल. तेव्हां या एवढयाशा दग्ध झालेल्या पातकासाठीं मला तूं ही उग्र शिक्षा दिलीस, व ब्राह्मणवधाचें महापातक केलेंस, यासाठीं तुला शूद्र योनींत जन्म घ्यावा लागेल." या शापामुळें यमधर्माला शूद्र योनींत जन्म घेणें भाग पडलें. हा शूद्र म्हणजे महापुण्यशाली व महाज्ञाता विदुर होय. गवल्गणापासून ऋषितुल्य संजय सारथिकुळांत जन्म पावला. कुंती कन्यास्थितींत असतांनाच सूर्यापासून तिला महाबली आणि जन्मापासूनच कवचकुंडलें धारण करणारा सतेज कर्ण झाला. सर्व लोकांवर अनुग्रह करणारा, दिव्य, देदीप्यमान, सर्ववंद्य व महायशस्वी श्रीकृष्ण भगवान वसुदेवापासून देवकीच्या उदरीं धर्मसंस्थापनेप्रीत्यर्थ अवतीर्ण झाला. तो प्रभु जन्ममरणातीत असून या जगाच्या उत्पत्तिस्थितिलयांचा कर्ता, व स्वत:सिद्ध प्रकाशमान आहे. त्यानें केवळ जगताच्या कल्याणासाठीं यादवकुळांत अवतार घेतला. राजा, जें अव्यक्त, अक्षर, त्रिगुणात्मक व अव्यय ब्रह्म जगताच्या उत्पत्तीला कारण व अधिष्ठान, पुराणपुरुष, पंचमहाभूतात्मक विश्व हें ज्याचें कर्म आहे, ज्याची प्राप्ति केवळ सत्त्वगुणानेंच होते, प्रणव नामक वर्ण हेंच ज्याचें व्यक्त स्वरूप असून जें अनंत, अचल, शुद्ध चैतन्यस्वरूपी असें आहे, तेंच परब्रह्म धर्मसंरक्षणाकरितां वृष्णिकुळांत अवतीर्ण झालें !

असो; अंधकवृष्णिकुळांत सर्व शस्त्रास्त्रज्ञानांत व सर्व शास्त्रज्ञानांत परिपूर्ण आणि महावीर्यशाली अशा बळराम व श्रीकृष्ण यांनीं धर्मरक्षणासाठीं अवतार घेतले. सत्यक व हृदीक यांच्या उदरीं सात्यकि व कृतवर्मा हे झाले. हे नारायणाचे अनुयायी व अस्त्रशास्त्रज्ञ होते. उग्र तपश्चर्या करणारे महर्षि भरद्वाज यांचें रेत एका पर्वतदरीमध्यें स्खलित झालें, त्यापासून द्रोणाचार्य, व गौतमाच्या स्खलित रेतापासून कृपाचार्य व अश्वत्थाम्याची मातुःश्री कृपी हें मिथुन झालें. बलवंत अश्वत्थामा हा द्रोण व कृपी यांचा पुत्र होय. यज्ञांतील प्रज्वलित अग्नीपासून तेजस्वी धृष्टद्युम्न द्रोणवधासाठीं अमोघ धनुष्यबाण घेऊन जन्मास आला. अत्युत्तम रूप धारण करून सर्व जगास स्वतेजानें प्रकाशित करणारी कृष्णा (द्रौपदी) ह्या यज्ञांतूनच निर्माण झाली. प्रल्हादाचा शिष्य नग्नजित् हा सुबल नामक गांधार राजाचा पिता होय. या सुबल राजाचीं मुलें देवकोपामुळे धर्मविघातक झालीं. सुबलाचा मुलगा शकुनि व मुलगी गांधारी होय. शकुनि हा महास्वार्थी असून, दुर्योधनाची मातुःश्रीही दुर्योधन महास्वार्थी म्हणून महास्वार्थी होती. विचित्रवीर्याच्या क्षेत्रामध्यें राजा धृतराष्ट्र व राजा पांडु हीं अपत्यें कृष्णद्वैपायन व्यासांपासून झालीं. धर्म आणि अर्थ उत्तम रीतीनें जाणणारा महाविवेकी व महाबुद्धिमान असा विदुर हाही त्याच क्षेत्रामध्यें द्वैपायनांपासून झाला. पांडु राजास दोन स्त्रियांपासून देवांसारखे तेजस्वी असे पांच पुत्र झाले. त्यांत युधिष्ठिर हा वयानें व गुणांनीं सर्वांहून श्रेष्ठ होता. हा यमधर्मापासून झाला. वायूपासून भीम आणि इंद्रापासून सर्व शस्त्रधाऱ्यांमध्यें श्रेष्ठ व श्रीमान असा अर्जुन झाला. हे तिघेही कुंतीचे पुत्र होत. गुरुसेवेमध्यें निष्णात असे रूपसुंदर नकुलसहदेव हे अश्विनीकुमारांपासून माद्रीला झाले. गांधारीपासून दुर्योधनप्रभृति शंभर पुत्र व वैश्यस्त्रियेपासून युयुत्सु असे एकशें एक पुत्र श्रीमान धृतराष्ट्राला झाले. राजा, ह्यांपैकीं दु:शासन, दु:सह, दुर्मर्षण, विकर्ण,

चित्रसेन, विविंशति, जय, सत्यव्रत, पुरुमित्र आणि वैश्यापुत्र युयुत्सु हे महारथी होते. अभिमन्यु हा सुभद्रा व अर्जुन यांचा मुलगा, श्रीकृष्णाचा भाचा, आणि पांडूचा नातू होय. द्रौपदीलाही युधिष्ठिरापासून प्रतिविंध्य, भीमापासून सुतसोम, अर्जुनापासून श्रुतकीर्ति, नकुलापासून शतानीक व सहदेवापासून प्रतापी श्रुतसेन हे पांच पुत्र रूपसंपन्न आणि सर्वशस्त्रास्त्रपंडित असे झाले होते. हिडिंबेपासून भीमाला घटोत्कच वनामध्यें झाला. शिखंडी हा द्रुपदपुत्र प्रथम स्त्री होता; पुढें त्या मुलीचें प्रिय करावें या इच्छेनें स्थूण नामक यक्षानें तिला पुरुषत्व दिलें. कौरवपांडवांच्या युद्धामध्यें आणखी लाखों राजे विद्यमान होते. त्या सर्वांचीं नांवें सांगण्याला सुद्धां हजारों वर्षे पुरणार नाहींत. तेव्हां, ज्यांचीं चरित्रें येथें विस्तारानें येणार आहेत, व ज्यांच्या चरित्रामुळेंच हा ग्रंथ एवढा मोठा झाला आहे, ते मुख्य पुरुष मात्र येथें निर्दिष्ट केले आहेत.

अध्याय चौसष्टावा.

—:०:—

अवतारनिश्चय.

जनमेजय विचारतो:—ब्रह्मन्! आपण ज्या हजारों पुरुषांचें हें नामसंकीर्तन केलें, त्या सर्वांच्या कथा व त्यांच्या अवतारांचीं कारणें सविस्तर ऐकावीं अशी इच्छा आहे. तेव्हां या देवतुल्य महारथांच्या कथा मला विस्तरत: सांगण्याची कृपा करावी.

वैशंपायन म्हणाले:–राजा! हें सर्व देवांचें रहस्य आहे, असें ऐकितों; तथापि स्वयंभू ब्रह्मदेवाला नमस्कार करून तुला मी सर्व वृत्तांत 'सांगतों ऐक:' परशुरामांनीं एकवीस वेळ निःक्षत्रिय पृथ्वी केल्यानंतर ते महेंद्र पर्वतावर तपश्चर्या करण्यासाठीं गेले. नंतर, पुढें अनेक क्षत्रियस्त्रिया पुत्रप्राप्त्यर्थ पुण्यशील ब्राह्मणांशीं वंशसंरक्षणासाठीं ऋतुकालीं मात्र संगत झाल्या. पुढें गर्भ राहून त्या स्त्रिया प्रसूत झाल्या, व जास्त बलवंत क्षत्रियपुत्र व सुस्वरूप कन्या हीं निर्माण झालीं. सारांश, अर्वाचीन क्षत्रिय स्त्रीपुरुष ब्रह्मबीजापासून झालेलीं आहेत. हा क्षत्रिय वर्ण धर्माचरणानें वृद्धिंगत होऊन दीर्घायुषी झाला. ह्या चारही वर्णांतील नरनारी व पशुपक्ष्यांतील नरमाद्या सदैव ऋतुकालीं मात्र संगत होत. यामुळें प्रजा दीर्घायुषी होत असे. याप्रमाणें धर्मव्रतानें चालणारी सर्व प्रजा आधिव्याधींच्या शारीरिक व मानसिक त्रासापासून मुक्त झाली होती. असो; अशा प्रकारें समुद्रवलयांकित व पर्वत, वनें व नगरें यांनीं भूषित झालेली ही भूमि पुनः धर्मशील क्षत्रियांच्या हस्तगत झाली. या वेळीं ब्राह्मणादि वर्णांस उत्तम सुख झालें. राजे लोक कामक्रोधादिजन्य दोषांचा त्याग करून न्यायमनसुबे करीत, व अपराध्यांस योग्य शिक्षा करीत. येथें धर्माचरण उत्तम आहे, असें पाहून इंद्रही वेळच्या वेळीं व योग्य स्थळीं पर्जन्याची योजना करी. या युगांत मुलें मरत नसत, व यौवनावस्थेपूर्वी स्त्रीसंग होत नसे. मनुष्यांस अपमृत्यु येत नसत, म्हणून सर्वत्र लोकवस्ती भरपूर झाली. क्षत्रिय राजे महायज्ञ करून पुष्कळ दक्षिणा देत. ब्राह्मण हे सांग व उपनिषदांसह वेदाध्ययन करीत. ते ज्ञानाचा क्रयविक्रय करीत नसत, व शूद्रांजवळ (अनार्यांसंनिध) वेदोच्चार करीत नसत. वैश्य लोक बैल घेऊन शेतकीचीं कामें करीत, पण अशक्त बैलांकडून काम घेत नसत; इतकेंच नव्हे, तर त्यास धष्टपुष्ट करीत. अंगावर वासरें पीत आहेत तोंपर्यंत गाईचें दूध काढीत नसत. तसेंच, हे लोक खोटीं वजनें घेऊन क्रयविक्रय करीत असत. सारांश, आर्यलोकांच्या तीन वर्गांचे लोक धर्मनिष्ठ असून धर्मदृष्टीनें आपआपलें कर्तव्य करीत; म्हणून धर्माचा स्थितीत पूर्णत्वाचा होता. गाई व स्त्रिया योग्य कालीं प्रसूत होत व ऋतुकालीं वृक्षही पुष्पफलयुक्त होत. ही कृतयुगाची स्थिति होय.

राजा, धर्म जिवंत असला म्हणजे पृथ्वीवर सर्व जीवांची भरभराटच असते. पण पुढें लवकरच उतरता पाया लागला. संततिसंपत्तीचा उन्माद प्रकट होऊन कित्येक क्षत्रिय राजांच्या वंशांत राक्षसी पुरुष उत्पन्न झाले. स्वर्गलोकीं देवदैत्यांचें युद्ध झालें, त्यांत पराभूत झालेले असुर पदच्युत झाले व येथें जन्मास आले. या असुरांस, मानवलोकीं तरी देवत्व (श्रेष्ठत्व) मिळावें अशी इच्छा उत्पन्न होऊन, त्यांनीं अनेक योनीमध्यें म्हणजे गाई, घोडे, खेचर, उंट, म्हशी, मांस खाणारे लांडगे, बोकड, कोल्हे, वाघ, सिंह, तसेंच हत्ती व इतर मृग यांमध्यें जन्म घेतले. याप्रमाणें हजारों राक्षस पृथ्वीवर जन्म पावल्यामुळें व जन्म पावत असल्यामुळें, आपल्या या गरीब धरित्री मातेला अत्यंत भार होऊन तो तिचा तिलाच सहन होईनासा झाला. कारण, यांपैकीं कांहीं असुर (दितीचे दैत्य व दनूचे दानव) अत्यंत मदोन्मत्त असे राजे झाले. ते महाशूर, मोठे अभिमानी व शत्रूचा पराभव करणारे असे असून अनेक वेष घेऊन सर्व समुद्रवलयांकित पृथ्वीवर धुमाकूळ माजवूं लागले. त्यांनीं ब्राह्मणादि चारही वर्णांस व इतर प्राणिमात्रास सतावून सोडिलें; इतकेंच नव्हे, तर या सर्वांस अनेक प्रकारानें त्रास देऊन ते ठार मारूं लागले. यांच्या धांगडधिंग्यानें कोठेंही सुरक्षित जागा राहिली नाहीं! विद्याविद्वेषी, मदोन्मत्त, महाबालिष्ठ व भगीरथ प्रयत्नाचे कट्टे भोक्ते अशा या राक्षसांनीं ऋषींचे आश्रम सुद्धां दूषित केले, म्हणून, व शेषादि नागांस ही पृथ्वी धरण्याचें सामर्थ्य राहिलें नाहीं म्हणून भयभीत झालेली पृथ्वी माता ही सर्वभूतपिता महा ब्रह्मदेवास शरण गेली. तिच्याबरोबर देव, द्विज व ऋषि होते. या सर्वांस—सृष्टिकर्ता, अव्यय व देवकार्यतत्पर जे गंधर्वादिक त्यांनीं आनंदानें वंदिलेला असा ब्रह्मदेव दृष्टीस पडला. पृथ्वीनें ब्रह्मदेवास नमस्कार केला, आणि शरण जाऊन सर्व लोकपालांसमक्ष प्रभूची प्रार्थना केली. पण त्या स्वयंभू परमेष्ठी व मायापति ब्रह्मदेवाला, पृथ्वी काय प्रार्थना करणार आहे हें पूर्वींच कळून चुकलें होतें. खरेंच आहे! सर्व जगतास उत्पन्न करणाऱ्या ब्रह्मदेवाला देवदानवादि सर्व प्राणिमात्राचें मनोगत कळलें तर त्यांत नवल तें काय? सर्वांचे अभिप्राय त्याला कळावयाचेच. कारण तो सर्वांचें उत्पत्तिस्थान, स्वामी व कल्याणकर्ता आहे. असो.

पृथ्वीचें मनोगत जाणून ब्रह्मदेव म्हणाले:— बाई! ज्या कारणासाठीं तूं मला शरण आलीस, तें कारण मनांत आणूनच मी सर्व देवांस आज्ञा करितों. तूं जा.

नंतर ब्रह्मदेवानें सर्व देवांस स्वतः सांगितलें कीं, "भूमीचा भार हरण करण्याकरितां व भारमूळक राक्षसांचा नाश करण्याकरितां, तुम्हीं सर्वजण आपआपल्या पृथक् अंशांनीं पृथ्वीवर अवतीर्ण व्हा." त्याचप्रमाणें, गंधर्वादि इतर गण होते त्यांसही सांगितलें कीं, "मनुष्य किंवा इतर योनींत स्वांशानें जन्म घेऊन देवब्राह्मणांचें कार्य व पृथ्वीचा उद्धार करा." त्या सुरश्रेष्ठाचें हें तथ्य, अर्थकर व पथ्यकर असें भाषण इंद्रादि देवांस उत्तम मानवलें, व 'आपापल्या अंशांनीं पृथ्वीवर जन्म घ्यावयाचा,' असा कृतनिश्चय करून, शत्रुविघातक जो नारायण त्याचें दर्शन घेऊन त्यांसही विनंति करण्यासाठीं ते सर्व वैकुंठास गेले. तेव्हां त्यांस चक्रगदाधारी, पीतांबरभूषित, मेघश्याम, पद्मनाभ, असुरमर्दन, दयाघन, देवाधिदेव, ब्रह्मदेवपिता, महाबली, श्रीवत्सांकित, हृषीकेश, सर्वदेवदैवतवंद्य आणि सकलसात्विकगुणमंडित जो श्रीभगवान परमेश्वर विष्णु, त्याचें दर्शन झालें. दर्शनानंतर, 'पृथ्वीचा भार हरण करून तिला शुद्ध करावयाची आहे, तेव्हां भगवंतांनीं अवतार घेणें इष्ट आहे,' अशी इंद्रानें प्रभूची प्रार्थना केली; व प्रभूंनींही त्याला 'तथास्तु' असा सार्थ आशीर्वाद दिला!